टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे तात्विक व सामाजिक शास्त्रे
विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विभागास विद्यावाचस्पती
(पीएच.डी.) पदवीकरीता सादर करावयाचा शोध प्रबंध

“गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरीक यांच्या पिडीत कुटूंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन”

संशोधक

प्रा. पंडीत रामदास फुलझेले

एम.ए.(मराठी, राज्य, समाज, अर्थशास्त्र)
एम.एस.डब्ल्यू, नेट, बी.एम.सी., बी.एड., डी.एस.एम.

मार्गदर्शक

डॉ. बी.एम. कऱ्हाडे

एम.एम.,बी.एड., पीएच.डी.(समाजशास्त्र)
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय, चार्मोशी

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

२०११

Prof. Pandit R. Fulzele
M.A. (Soc., Mar., Eco., Pol.)
M.S.W. NET BMC B.Ed., DSM

Ramabai Ambedkar
Jr. College, Saoli,
Dist. Chandrapur
Mob. 9422152364

DECLARATION

I hereby declare that the thesis entitled **"गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरीक यांच्या पिडीत कुटूंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन"** completed and written by me, has not previously formed the basis for the award of any degree or other similar title of this for any other university.

Date :

Place:

Prof. Pandit R. Fulzele
Researcher

Dr. B.M. Karade
M.A. (Sociology), B.Ed.,
Ph.D. (Sociology)

Head of Department
Sociology
Karmavir Dadasaheb Deotale
Sr. College, Chamorshi,
Dist. Gadchiroli
Mob. 9422735000

CERTIFICATE

This is to certify that the Thesis entitled **"गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरीक यांच्या पिडीत कुटूंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन"** which is being submitted herewith for the award of the Degree of Doctor of Philosophy (Ph.D.) in the Department of Sociology of Tilak Maharashtra University, Pune is the result of the original research work completed by **Prof. P.R. Fulzele** under my supervision and guidance and the best of my knowledge and belief the work embodied in this thesis has not formed earlier the basis for this or any other university of examination body.

Date :

Place:

Dr. B. M. Karhade
Research Guide

ऋणनिर्देश

सब धरती कागज करुँ, लेखनी सब वन राय।

सात समुंदर की मसि करु, गुरु गुज लिखा न जाय।।

कबीरजी म्हणतात, जरी संपूर्ण धरतीचा कागद केला, सर्व वनातील वृक्षांची लेखणी केली आणि जगातील सातही समुद्राची शाई केली तरी गुरुचे गुणगाण लिहीता येणार नाही तथा गुरुची महती लिहीता येणार नाही.

प्रस्तुत संशोधनासाठी माझ्या गुरुस्थानी असलेले माझे मार्गदर्शक डॉ. प्रा. बी.एम.कऱ्हाडे सर, यांनी अभ्यासपूर्ण व स्नेहमय मार्गदर्शनांनी संशोधन कार्यात केलेल्या मदतीबद्दल मी विनम्रपणे सदैव त्याच्या ऋणात राहील.

माझे संशोधन कार्य सुरु असतांना महाराष्ट्र टिळक विद्यापीठातील समाजविज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रोफेसर विनय काटेकर सर, समाजविज्ञान विभागप्रमुख डॉ. अनुपमा केसकर, डॉ. दिपक देशपांडे, डॉ. कऱ्हाडे सर, डॉ.बी. आर. कोल्हे सर आणि टिळक विद्यापीठातील सहृदयी विद्‌वान मंडळी ज्यांनी मला वेळोवेळी संशोधन कार्याकरीता मदत केली, मी सदैव ऋणी राहील.

प्रस्तुत संशोधन कार्यात डॉ. अशोक जैन सर मुंबई, डॉ. वृती तांबे पुणे विद्यापीठ, पुणे आदीवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील डॉ. त्रिभूवन सर, यशदा ट्रेनिंग सेंटरचे डॉ. एस.आर. काकडे सर, यांनी योग्य मार्गदर्शक दिशा दाखविल्यामुळे त्यांचा सदैव मी ऋणी राहीन.

माजी जिल्हाधिकारी श्याम तागडे साहेब (IAS), शिरीश जैन साहेब (IPS), मिलींद डुंबेरे साहेब (IPS), उपजिल्हाधिकारी एन.पी. जाधव साहेब, जिल्हाधिकारी अतुल पाटणे (IPS), पोलीस अधिक्षक, विरेश प्रभू साहेब (IPS), प्राचार्य डॉ. पठाण सर (वडसा) डॉ. सतिश मेश्राम (नागपूर), डॉ. वासनिक (यवतमाळ), प्राचार्य डॉ. चंद्रमौली सर (सावली), प्राचार्य डॉ. अरुण प्रकाश (गडचिरोली) प्राचार्य, लिना हकिम (पठाण) (गडचिरोली), प्रा. दिलीप बारसागडे, प्रा. डॉ. विठ्ठल चौथाले सर (चामोर्शी), प्रा. विजय गायकवाड सर, श्री. चंद्रकांत

गेडाम (सावली), कु. चंदा रायपूरे मॅडम (सावली) प्रा. सोनटक्के सर (सावली), प्रा. घनश्याम भडके सर आदींनी मला वेळोवेळी सहकार्य दिले, त्याचा मी ऋणी आहे.

मी ज्या संस्थेत कार्यरत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती शिक्षण प्रसारक संस्था, सावलीचे अध्यक्ष आदरनीय डॉ. एन.वाय. गेडामसाहेब (भाऊ) सचिव, मान. पी.यु. गेडामसाहेब प्राचार्य, ए.आर. दुधेसर, पर्यवेक्षक यु.एच. भैसारे सर, माझे सहमित्र श्री.जी.एन. मेश्राम सर, प्रा. कन्नाके सर, श्री. गिरीश डोंगरे सर, सावजी कुनघाडकर सर, श्री. रामनाथ खोब्रागडे सर, श्री. रुपेश फुलझेले यांच्या सहकार्याशिवाय संशोधन कार्य अशक्यच होते करीता मी सर्वांचा कृतज्ञपूर्वक आभारी आहे.

मला माझ्या शिक्षणाचे स्त्रोत माझे आई–बाबा, श्रेष्ठ बंधू, संघरक्षीत, धाकटे बंधू ॲड. प्रविण, पत्नी सौ. रागिणी तसेच चि. मानसी, चि. स्माईली याचे ऋण मला तोलता येणार नाही.

तसेच संशोधन कार्य पार पाडताना मला नैतिक बळ देणारे श्याम तागडे साहेब (IAS), इ.झेड. खोब्रागडे साहेब (IAS), डॉ. अतुल फुलझेल साहेब (IPS), प्रा. बबीता मेश्राम, डॉ.कैलाश नगराळे या सर्वांचा मी शत्:श आभारी आहे.

अत्यंत सुबकपणे योग्य वेळात संशोधन ग्रंथाची संगणकीय कार्य करुन दिल्याबद्दल डॉ. अतूल कुळकर्णी, यांचा मी आभारी आहे.

या शिवाय ज्या ज्ञात व अज्ञात व्यक्तीने मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्या संशोधन कार्य करतांना सहकार्य लाभले त्याचा ही मी ऋणी आहे.

माया दीपक नर पतंग, भ्रमि भ्रमि इवै पडत।

कहे कबीर गुरुग्यान, एक आध उबरंत।।

धन्यवाद!

प्रा. पंडीत रामदास फुलझेले

संशोधक

अनुक्रमणिका

fooj.k	i"B Øekd
➢ प्रतिज्ञापत्र	(i)
➢ मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र	(ii)
➢ ऋणनिर्देष	(iii)
➢ अनुक्रमणिका	(v)
➢ सारणी सुची	(viii)
➢ आलेख सुची	(xiv)
प्रकरण १	
प्रस्तावना	१ ते ९९
१.१ प्रास्तविक	१
१.२ नक्षलवाद	१०
१.३ नक्षल चळवळीची स्थित्यांतरे	३४
१.४ नक्षलवादी शब्दाचा अर्थ	३४
१.५ गडचिरोली जिल्हयातील नक्षल चळवळीचे स्वरूप	३६
१.६ जिल्हयातील आदिवासीमध्ये नक्षलवादी मुळ प्रेरणा	३६
१.७ नक्षलवाद्यांचे कार्यस्वरुप	३९
१.८ संघम व नक्षलसंघटनेचे जाळे	४२
१.९ जिल्हयातील नक्षल कारवाया	४६
१.१० पोलीस व समाज	५०
१.११ पुर्व संशोधनाचा आढावा	६२
१.१२ प्रकाशीत संदर्भ साहित्याचा आढावा	८७
प्रकरण २	
अध्ययन क्षेत्र दृष्टीक्षेपातील : गडचिरोली जिल्हा	**१०० ते १४६**
२.१ जिल्हयाची भौगोलिकता	१००
२.२ भौगोलिक स्थान	१०२

fooj.k		i"B Øekd
२.३	भुगर्भ रचना	१०३
२.४	जमीनीचे प्रकार	१०३
२.५	पर्जन्यमान	१०५
२.६	नैसर्गिक वनसंपदा	१०६
२.७	जिल्हयाची लोकसंख्या	१०८
२.८	जलसिंचनाची साधने	१०९
२.९	ऐतिहासिक दृष्टीक्षेप	११०
२.१०	स्वतंत्र गडचिरोली जिल्हा	१११
२.११	गडचिरोली जिल्हा निर्मीती	११३
२.१२	ऐतिहासिक व धार्मिक स्थळे	११५
२.१३	आदीवासी जमाती	१२१
२.१४	रस्ते विकास	१३६
२.१५	औद्योगिक विकास	१३७
२.१६	आरोग्य प्रश्न	१३८
२.१७	सामाजिक विकास	१३९
२.१८	महीला व बालकल्याण	१४०
२.१९	आदीवासीच्या सभोवतीची नक्षल चळवळ	१४०
२.२०	जिल्हा पोलीसांचे कार्य व योजना	१४२
२.२१	महात्मा गांधी तंटामुक्ती	१४५
२.२२	मानव विकास मिशन	१४६

प्रकरण ३

संशोधन पद्धती **१४७ ते १८१**

३.१	प्रस्तावना	१४७
३.२	संशोधन समस्या	१४९
३.३	संशोधनाचा उद्देश	१५०
३.४	गृहीतकृत्ये	१५१
३.५	संशोधन आराखडा	१५३

fooj.k		i"B Øekd
३.६	अध्ययनाचे क्षेत्र	१५६
३.७	नमुना निवड	१५८
३.८	तथ्य संकलन पद्धती	१६०
३.९	तथ्य प्रक्रियन	१६९
प्रकरण ४ थे		
सांख्यिकीय विश्लेषण आणि अर्थविवेचन		**१७९ ते ३३९**
कौटुंबिक प्रश्न		१७९
सामाजिक व मानसिक प्रश्न		१९१
आर्थीक प्रश्न		२२९
वैवाहिक व शैक्षणिक प्रश्न		२८९
राजकीय प्रश्न		३३०
प्रकरण ५ वे		**३४० ते ३६५**
निष्कर्ष, सुचना व शिफारशी		
संदर्भ ग्रंथ सूची		**३६६ ते ३७१**
परिशिष्टे		**३७२ ते ३९०**
१) मुलाखत अनुसुची		३७२
२) सारणी पद्धतीशास्त्र		३८२
३) फोटोग्राफी		३८४

सारणी सुची

सारणी क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
	कौटुंबिक प्रश्न	
४.१	लिंग	१७९
४.२	उत्तरदात्याचे वय	१८०
४.३	वैवाहिक स्थिती	१८१
४.४	मातृभाषा	१८२
४.५	कुटूंबाचा प्रकार	१८३
४.६	उत्तरदात्याचा व्यवसाय	१८४
४.७	मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न	१८५
४.८	कुटूंबातील एकूण स्त्रीयांची संख्या	१८६
४.९	कुटूंबातील एकूण पुरुषांची संख्या	१८७
४.१०	कुटूंबातील एकूण मुलांची संख्या	१८८
४.११	कुटूंबातील एकूण मुलींची संख्या	१८९
४.१२	कुटूंबातील एकूण सदस्य संख्या	१९०
	सामाजिक व मानसीक प्रश्न	
४.१३	आपले जिल्हयात किती वर्षापासून वास्तव्य आहे	१९१
४.१४	आपल्या कुटूंबात यापूर्वी कुणी पोलीस होते काय?	१९२
४.१५	असल्यास कोण पोलीस आहे?	१९३
४.१६	आपले कुटूंबीय किती पिढयापासून नोकरी करतो?	१९४
४.१७	कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?	१९५
४.१८	असल्यास ही प्रेरणा कोणी दिली आहे?	१९६
४.१९	कुटूंबाचा प्रकार * कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?	१९७
४.२०	मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न * कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?	१९९
४.२१	आपले कुटूंबीय किती वर्षापासून पोलीस सेवेत कार्यरत आहेत?	२०१
४.२२	पोलीस ऐवजी दुसरी नोकरी करावे असे वाटते काय?	२०२
४.२३	नविन नोकरी विषयी कधी प्रयत्न केला काय?	२०३
४.२४	पोलीस या नोकरीत समाधानी आहात काय?	२०४
४.२५	पोलीस व्यवसाय आवडण्याची कारणे	२०५
४.२६	पोलीस नोकरी कशी प्राप्त झाली?	२०६
४.२७	पोलीस विभागात कोणत्या पदावर कार्यरत होते?	२०७

सारणी क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
४.२८	आपले कुटूंब पोलीसांना शासनाकडून मिळणाऱ्या वेतनावर समाधानी आहे काय?	२०८
४.२९	नक्षल क्षेत्रात पोलीस म्हणून रोज किती तास काम करीत होते?	२०९
४.३०	कुटूंबप्रमुख नक्षल क्षेत्रात किती काळ डयुटी करतो?	२१०
४.३१	अशावेळी एकटेपणा कसे व्यतीत करता?	२११
४.३२	कुटूंबाला आधार म्हणून कुणाची मदत घेता?	२१२
४.३३	नक्षल क्षेत्रातून डयुटीवरुन वापस आल्यावर त्यांचे वर्तन आपणासोबत कसे होते?	२१३
४.३४	आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करताना आपण कुठे होता?	२१४
४.३५	कुटूंबाचा प्रकार * आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करताना आपण कुठे होता?	२१५
४.३६	आपले कुटूंब प्रमुख कुठे डयुटी करतात?	२१७
४.३७	नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन कसे असते?	२१८
४.३८	लिंग * नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन कसे असते?	२१९
४.३९	रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर काय परिणाम होतो?	२२१
४.४०	अशावेळी कुटूंबीय डयुटीवर असल्यास काय करता?	२२२
४.४१	उत्तरदात्याचे वय * रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर काय परिणाम होतो?	२२३
४.४२	गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? हे खरे आहे काय?	२२५
४.४३	लिंग * गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? हे खरे आहे काय?	२२६
४.४४	अशावेळी आपणास मदत कोणाची घेता?	२२८
	आर्थीक प्रश्न	
४.४५	शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय?	२२९
४.४६	कुटूंबाचा प्रकार * शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय?	२३०
४.४७	पोलीस कल्याणद्वारे मदत मिळाली काय?	२३२
४.४८	पोलीस कल्याणद्वारे कोणत्या सुविधा मिळतात?	२३३

सारणी क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
४.४९	शहीदांना सरकार तात्पुरती मदत करतो त्यानंतर अधिकारी लक्ष देत नाही हे खरे आहे काय?	२३४
४.५०	शहीद कुटूंबीयांना शासन कोणती मदत देते?	२३५
४.५१	उत्तरदात्याचे वय * शहीद कुटूंबीयांना शासन कोणती मदत देते?	२३६
४.५२	सामान्य नागरीक म्हणून किती वर्षापासून या गावात आहात?	२३८
४.५३	आपल्या गाव व परीसरात नक्षल घटना घडतात काय?	२३९
४.५४	असल्यास कशा प्रकारच्या?	२४०
४.५५	अशा घटनांना पाहून आपणास काय वाटते?	२४१
४.५६	उत्तरदात्याचे वय * परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून आपणास काय वाटते?	२४२
४.५७	पोलीस आप्तेष्ठ किंवा कुटूंबीय असल्याने नक्षल्याकडून त्रास होतो काय?	२४४
४.५८	आपणास नक्षल दलम किंवा संगमच्या सभेसाठी जावे लागले काय? व कसे?	२४५
४.५९	उत्तरदात्याचे वय * आपणास नक्षल दलम किंवा संमगच्या सभेसाठी जावे लागले काय? व कसे?	२४६
४.६०	गावातील अज्ञान व्यक्तीच्या (चुगलीचा) काही त्रास होतो काय?	२४८
४.६१	असल्यास कोणता?	२४९
४.६२	परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो काय?	२५०
४.६३	असल्यास कोणता?	२५१
४.६४	इतर कोणत्या अधिकाऱ्याचा त्रास होतो?	२५२
४.६५	उत्तरदात्याचे वय * परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो काय?	२५३
४.६६	पोलीस/अधिकारी व नक्षल यांच्या कैचित सापडलो असे आपणास वाटते काय? ते सांगा.	२५५
४.६७	आपल्या परीसरात नक्षल्यांकडून हत्या झाल्याचे ऐकले आहे काय?	२५६
४.६८	असल्यास कोणती?	२५७
४.६९	अशावेळी आपण पिडीतांना कसे मदत करता?	२५८
४.७०	अशावेळी शासनाकडून काही मदत मिळते काय?	२५९
४.७१	नक्षल क्षेत्रात राहणाऱ्या लोकांची जिव सुरक्षित नाही या मताशी सहमत आहे काय?	२६०

सारणी क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
४.७२	शासन स्तरावर मदतीसाठी प्रयत्न केला काय?	२६१
४.७३	सरकारने आपणासाठी काही उपाय योजना करावी असे वाटते काय?	२६२
४.७४	नक्षल्याद्वारे कोणते अत्याचार होतात?	२६३
४.७५	नक्षल समर्थक ठरवून पोलीस अत्याचार कोणता होतो?	२६४
४.७६	लोकप्रतिनिधी विषयी आदर वाटतो काय?	२६५
४.७७	असल्यास का व कसे?	२६६
४.७८	नक्षल्यांना गावबंदी करावे असे वाटते काय व कसे?	२६७
४.७९	अत्याचार पीडीत सामान्य नागरीक म्हणून कोणती मदत मिळाली?	२६८
४.८०	शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणती मदत मिळाली?	२६९
४.८१	कुटूंबाचा प्रकार * शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणती मदत मिळाली?	२७०
४.८२	निराधार कुटूंब यासाठी शासनाकडे अर्ज केला काय?	२७२
४.८३	निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता कोणाकडून त्रास होतो?	२७३
४.८४	यासाठी ते कोणत्या आमीषाची मागणी करतात काय?	२७४
४.८५	लिंग * निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता ते कोणत्या आमीषाची मागणी करतात काय?	२७५
४.८६	शहीद कुटूंब म्हणून शासनाची मदत कुणास मिळाली?	२७७
४.८७	मिळणाऱ्या पैशातून भांडणे होतात काय?	२७८
४.८८	ही भांडणे कुणाकडून सोडविता?	२७९
४.८९	मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?	२८०
४.९०	कुटूंबाचा प्रकार * मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसा करता?	२८१
४.९१	उत्तरदात्याचा व्यवसाय * मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?	२८३
४.९२	उत्तरदात्याचे वय * मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?	२८५
४.९३	पतीनिधनानंतर किती दिवसात नोकरी मिळाली?	२८७
४.९४	पतीनिधनानंतर त्यांचे वेतन मिळते काय?	२८८
	वैवाहिक व शैक्षणिक प्रश्न	
४.९५	पतीच्या निधनानंतर कुणाचा आधार घेता?	२८९
४.९६	लिंग * कुटूंबाला आधार म्हणून कुणाची मदत घेता?	२९०

सारणी क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
४.९७	पती निधनानंतर कुटूंबीयाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?	२९२
४.९८	कुटूंबाचा प्रकार * पती निधनानंतर कुटूंबीयाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?	२९३
४.९९	पती निधनानंतर आपल्या जीवनात निर्माण झालेली पोकळी कसे भरुन काढणार?	२९५
४.१००	मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय?	२९६
४.१०१	उत्तरदात्याचे वय * मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय?	२९७
४.१०२	असल्यास विधवा झाल्या किती कालावधीनंतर	२९९
४.१०३	'पैशापुढे सर्व सुख खरेदी करता येते' या विषयीचे मत सांगा?	३००
४.१०४	पती असतांना आपली मुले कुठे शिक्षण घेत आहेत?	३०१
४.१०५	आता आपली मुले कुठे शिक्षण घेत आहेत?	३०२
४.१०६	वडीलांच्या पश्चात मुलांवर कसे नियंत्रण करता?	३०३
४.१०७	आपल्या मुलांसाठी शासनाने वेगळी व्यवस्था केली काय? व कोणती?	३०४
४.१०८	आपल्या मुलांना शिक्षण देवून अधिकारी बनवावे असे वाटते काय?	३०५
४.१०९	शहीद पत्नी म्हणून कुटूंबीय छळतो काय?	३०६
४.११०	असल्यास कोणत्या नातेवाईकांकडून?	३०७
४.१११	आपल्या मुलांच्या मनात कधी नक्षल्याप्रती बदल्याची भावना दिसून आली होती?	३०८
४.११२	आपल्या मुलामुलींचे लग्न करतांना कोणत्या अडचणी आल्या?	३०९
४.११३	'मृत्यु पश्चात अनेक विधवांचे लैंगिक शोषण होते' हे खरे आहे काय?	३१०
४.११४	असल्यास कोणत्या वर्गाकडून	३११
४.११५	घरात कुटूंब प्रमुख नसल्याने आपली मुले कोणत्या वाईट वळनाला गेली काय?	३१२
४.११६	जर होय असल्यास कोणत्या?	३१३
४.११७	आंतकवाद्याच्या तुलनेत नक्षल्यांशी लढणाऱ्या, शहीदांना न्याय मिळाला नाही, असे वाटते?	३१४
४.११८	सामान्य नागरीकाप्रती शासनाची दुहेरी भूमिका आहे असे वाटते काय?	३१५

सारणी क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
४.११९	शहीदांमध्ये आदीवासीचे प्रमाण जास्त का आहे?	३१६
४.१२०	उत्तरदात्याचे वय * शहीदांमध्ये आदीवासीचे प्रमाण जास्त का आहे?	३१७
४.१२१	मानवी आयोगानुसार सरकारची भूमिका कोणती असावी?	३१९
४.१२२	सामान्य लोकांना नक्षली शिक्षणापासून वंचित ठेवतात काय?	३२०
४.१२३	जर होय असल्यास कारणे?	३२१
४.१२४	नक्षल क्षेत्रात शासकीय योजनाचा लाभ होतो काय?	३२२
४.१२५	असल्यास कोणत्या?	३२३
४.१२६	उत्तरदात्याचे वय * नक्षल क्षेत्रात शासकीय योजनाचा लाभ होतो काय?	३२४
४.१२७	पोलीस विभागाच्या जनजागरण मेळाव्याचा लाभ झाला काय?	३२६
४.१२८	असल्यास कोणता ते सांगा?	३२७
४.१२९	सरकारच्या योजना जिल्हा कार्यालयापूरती मर्यादीत राहतात असे आपणास वाटते काय?	३२८
४.१३०	योजने अभावी आपले जीवन कसे आहे?	३२९
	राजकीय प्रश्न	
४.१३१	आपल्या परीसरात शासकीय अधिकारी भेटी देतात?	३३०
४.१३२	शासनाच्या नक्षल बिमोड करणे या मोहीमेचा लाभ झाला आहे का?	३३१
४.१३३	जिल्हयातील नक्षल समस्या संपुष्टात येईल असे वाटते काय?	३३२
४.१३४	राजकीय पुढारी या समस्येला खतपाणी देतात असे वाटते काय?	३३३
४.१३५	नक्षल समस्या आव्हानात्मक वाटते काय?	३३४
४.१३६	कुटूंबाचा प्रकार * आपले कुटूंबीय नक्षलग्रस्त क्षेत्रात कामावर गेले असता वाईट वाटते काय?	३३५

आलेख सुची

आलेख क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
४.१	कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?	१९८
४.२	कुटूंबातील इतर सदस्यांना पोलीस बनावे असे वाटते काय?	२००
४.३	आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करताना आपण कुठे होता?	२१६
४.४	नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन कसे असते?	२२०
४.५	रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर काय परिणाम होतो?	२२४
४.६	गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? हे खरे आहे काय?	२२७
४.७	शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय?	२३१
४.८	शहीद कुटूंबीयांना शासन कोणती मदत देते?	२३७
४.९	परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून आपणास काय वाटते?	२४३
४.१०	आपणास नक्षल दलम किंवा संमगच्या सभेसाठी जावे लागले काय? व कसे?	२४७
४.११	परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो काय?	२५४
४.१२	शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणती मदत मिळाली?	२७१
४.१३	निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता ते कोणत्या आमीषाची मागणी करतात काय?	२७६
४.१४	मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसा करता?	२८२
४.१५	मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?	२८४
४.१६	मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?	२८६
४.१७	कुटूंबाला आधार म्हणून कुणाची मदत घेता?	२९१
४.१८	पती निधनानंतर कुटूंबीयाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?	२९४
४.१९	मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय?	२९८
४.२०	शहीदांमध्ये आदीवासीचे प्रमाण जास्त का आहे?	३१८

आलेख क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
४.२१	नक्षल क्षेत्रात शासकीय योजनाचा लाभ होतो काय?	३२५
४.२२	आपले कुटूंबीय नक्षलग्रस्त क्षेत्रात कामावर गेले असता वाईट वाटते काय?	३३६

प्रकरण १

प्रस्तावना

संशोधनाचा विषय :

"गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरीक यांच्या पिडीत कुटूंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन"

१.१ प्रास्तविक :

जगातील एकमेव महासत्ता असलेल्या अमेरिकेवर ११ सप्टेंबरला झालेला दहशतवादी हल्ला झाल्यापासून दहशतवादामागच्या मूळ कारणांचा विचार न करता एकांगी प्रचार केला जात आहे. दहशतवादाच्या नावावर अमेरिका–इंग्लंडने अफगाणिस्तान व इराकवर युद्ध लादले. २००५ मध्ये जॉर्ज डब्ल्यू. बुश आणि डॉ. मनमोहन सिंग यांची भेट झाल्यापासून भारतात दहशतवाद ही एकमेव समस्या असल्याचे चित्र उभे करण्यात आले आहे. या दहशतवादाला केवळ मुस्लिम दोषी असल्याचा प्रचार चालविण्यात आला आहे. पण सत्ताधारी गट सुद्धा दहशतवादी कृत्ये करु शकतो, असे अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याचे म्हणणे आहे. या परराष्ट्र खात्याच्या म्हणण्यानुसार 'व्यक्तीनं वा गटानं राजकीय हेतूनं दिलेली धमकी वा केलेली हिंसा म्हणजे दहशतवाद.' ही व्यक्ती वा हा गट प्रस्थापित सरकारसाठी किंवा विरोधी पक्षासाठी काम करणाराही असू शकतो. 'त्याच्या कृत्यानं, प्रत्यक्ष बळीपेक्षा जास्त मोठया गटाला जेव्हा धक्का, हादरा किंवा भीती बसते, तेव्हा ते कृत्य दहशतवादाचं असतं'.[१] 'या व्याख्येनुसार प्रत्यक्ष बळीपेक्षा भीती निर्माण करणेही दहशतवादात मोडते. अमेरिकन परराष्ट्र खात्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. शरदचंद्र गोखले यांच्या

१ डॉ. जगमोहन, 'अमेरिकन परराष्ट्र खाते', गोठलेले तंमग, पृ.क्र. ३७९.

म्हणण्याप्रमाणे 'दहशतवाद म्हणजे राजकीय हेतूने समाजामध्ये दहशत निर्माण करण्याचा संघटीत प्रयत्न होय'.[२] या सर्व व्याख्यांमधून राजकीय हेतूंना महत्व दिल्याचे दिसून येते. युनोच्या प्रस्तावातही दहशतवादाची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, 'जाणून–बुजून निरपराध माणसांच्या विरुद्ध केलेले कृत्य किंवा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक चौकटीला हादरा देणारा हिंसाचार हे कोणत्याही अर्थाने न्याय नाही'. 'राजकीय हेतु साध्य करण्याकरीता अविवेकी आणि अन्यायी पद्धतीने केलेला संघटित हिंसाचार म्हणजे दहशतवाद.' अशीही दहशतवादाची व्याख्या केली गेली आहे.

या सर्व व्याख्या राजकीय संदर्भाशी निगडीत आहेत. या व्याख्यांपेक्षा वेगळे विश्लेषण विरेंद्रकुमार गौड यांनी केले आहे. त्यांच्या मते "समाजवाद, साम्राज्यवाद और मार्क्सवादसे पीडित या प्रेरीत होकर अनेक उग्रवादी संगठन जनमें, लेकीन कुल मिलाकर विचारधाराओं पर आधारित आतंकवादियों का वर्गीकरण विश्वभर में करना कठीण है, क्योंकि राजनीतिक विचारधारा के अलावा धार्मिक विचारधाराओंने भी आंतकवाद को जन्म दिया है'. गौंड यांनी व्यापक विश्लेषण करुन दहशतवादाचा विविध अंगाने विचार करण्याचा प्रयत्न केला आहे तरी त्यातून दहशतवादाचा निश्चित अर्थ काढता येत नाही. दहशतवाद म्हणजे एखाद्या समूहाविरुद्ध द्वेष पसरविणे आणि त्यांच्यावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी संघटितरित्या हिंसाचार करणे होय."[३] एखाद्या समूहाच्या विरोधात सातत्याने विषारी प्रचार करुन समाजमन कलुषित करण्याचा प्रयत्न केला जातो. या विद्वेषी प्रचारातूनच त्या–त्या गटाची हिंसाचार घडविण्याची मानसिक तयारी केली जाते.'

---

२ डॉ. गोखले शरदचंद्र, 'झुंज दहशतवाद्यांची', चिनार पब्लिशर्स, पुणे, पृ.क्र. ९१.

३ गौंड विरेंद्रकुमार, 'विश्व में आंतकवाद', सामाईक प्रकाशन, नवी दिल्ली २००४ पृ. क्र. ९६.

दहशतवादाची बिजे :

समाजामध्ये अधून–मधून उद्रेकांच्या घटना घडत असतात. त्यात हिंसक मानसिकता घडविली जाते. नुकत्यात खैरलांजी हत्याकांडासारख्या घटनेमध्ये दलितविरोधातील हल्ल्यांकरीता जातीय विद्वेष पसरविणारी विषारी प्रचार यंत्रणा कारणीभूत होती, हे काही आता लपून राहिलेले नाही. अशा मानसिकतेमध्ये दहशतवादाची बिजे अनुस्युत असतात अशाच प्रकारे मुसलमान आणि ख्रिश्चनांच्या विरोधातही एकांगी प्रचार करण्यात येत असतो. नुकत्याच मुसलमान विरोधात सी.डी. काढली होती. या सी.डी. मुळे भाजप आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहिल्यानंतर ती सी.डी. मागे घेण्यात आली. हिंदू मुलतत्ववाद्यांप्रमाणे इस्लामी मुल्ला मुस्लिम तरुणांना भडकवित असतात. जैश–ए–मोहम्मदच्या संस्थापक मसूद अजहर स्वत: मौलाना आहे. ही मौलाना मंडळी खिलाफत चळवळीपासून देशाच्या राजकारणात ढवळाढवळ करीत आहेत. मुल्ला–मौलवी आणि धर्मांध हिंदुत्ववादी यांना संरक्षण देण्याच्या भूमिकेमुळे देशात हिंदू–मुस्लिम वैमनस्याची समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या पराकोटीला जाऊन देशाच्या फाळणीमध्ये तिचे रुपांतर झाले. तरीही ही समस्या आज कायम आहे.

"इंग्रजांच्या आमगमनापासून भारतात उदारमतवाद आणि आधुनिकतेचे वारे वाहायला लागले. या उदार वातावरणात महाराष्ट्रात पुरोगामी चळवळीच्या पायाभरणी प्रमाणे प्रतिगाम्यांनीही आपले वर्चस्व अबाधित राखण्यासाठी सर्वसामान्य जनतेमध्ये धर्मांधता आणि जातीयवादाचे विष कालविले. त्याचवेळी महात्मा फुले यांचा वैचारिक प्रवाह जातिविहीन समाज रचनेकरिता जालिम अशा जाती अंताच्या लढयात सहभागी झाला होता. त्यावेळी कॉंग्रेस राजकीय अधिकारासाठी अधिवेशन घेत होती. ठराव पारित करुन ब्रिटीश सरकारला पाठविणे, असे त्या अधिवेशनाचे स्वरुप होते. या कॉंग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्याचे सांगितले जाते. नेतृत्व बदलताच कॉंग्रेसची भूमिका बदलत

राहिली. नेत्यांच्या कर्तृत्वांवरुन कॉंग्रेसची ओळख निर्माण झाली. त्यानुसार १८८५ ते १९२० पर्यंत टिळक कॉंग्रेस, १९२० ते १९४७ पर्यंत गांधी कॉंग्रेस, १९४७ ते १९६५ नेहरु कॉंग्रेस आणि १९७० ते १९८४ पर्यंत इंदिरा कॉंग्रेस असे वर्गीकरण करता येईल. यानंतरच्या पुढील काळात कॉंग्रेसला चेहरा राहिला नाही. टिळक कॉंग्रेस पोथीनिष्टांची कॉंग्रेस होती. कॉंग्रेस अधिवेशनात ठराव मांडायचा. इंग्रज सरकारला निवेदन द्यायचे आणि त्या ठरावावर कार्यवाही झाली नाही तर पुन्हा पुढील अधिवेशनात तोच ठराव मांडायचा, अशी या कॉंग्रेसची कार्यपद्धती होती. त्यावेळी गोपाळ गणेश आगरकर यांच्यासारखे प्रागतिक विचारांचे बुद्धिवादी टिळक कॉंग्रेसपेक्षा वेगळी भूमिका मांडायचे. महात्मा फुले यांचा निग्रोंच्या दु:खाशी नाळ जोडणारा पुरोगामी प्रवाह त्यापूर्वी पासूनच अस्तित्वात होता. ज्योतीराव फुले यांचे स्त्री–शिक्षण, अस्पृश्यांना समानतेची वागणूक, जाती अंताची चळवळ हे टिळक कॉंग्रेसला कधीही पचनी पडले नाही. उच्च जातीतील सामाजिक कुप्रथा व अनिष्ट रुढींमध्ये सुधारणा करण्यास टिळकांनी आगरकरांना विरोध चालविला. सामाजिक सुधारणांपेक्षा राजकारण महत्वाचे मानणारे टिळक 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले जायचे. त्यांच्या दबावामुळेच आगरकराना सामाजिक परिषद गुंडाळावी लागल्याचा इतिहास आहे. टिळकांच्या विरोधामुळे कॉंग्रेस कार्यकर्त्यांची मतल सामाजिक परिषदेचा मंडप जाळण्यापर्यंत गेली होती. त्या टिळकांनी इंग्रजांच्या विरोधात भारतीयांना संघटित करण्यासाठी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली, असे म्हटले जाते, तो गणेशोत्सव आजही अबाधितपणे सुरु आहे."[४]

---

४ किर्ती मिलींद, 'दहशतवाद न्युयॉर्क ते खैरलांजी', सुगावा प्रकाशन, पुणे २००८, पृ. क्र. १५, १६.

दहशतवादाची मिमांसा :

माथेफिरु इस्लामी लोकांमुळे देशात दहशतवादाने धुमाकूळ घातला असल्याचा समज पसरविण्यात आला आहे. सकृत दर्शनी तो खराही वाटतो. "मुंबईमध्ये ११ जुलै २००६ रोजी लोकल रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट मालिका घडविण्यात आली. या स्फोटांची जबाबदारी कोणत्याही दहशतवादी गटाने स्वीकारली नाही. दहशतवादी संघटना एखादे कृत्य केले की, सत्ताधारी पक्षावर दबाव निर्माण करण्यासाठी त्याची जबाबदारी स्वीकारत असते. त्यामागे प्रसिद्धी मिळविण्याचा उद्देश असतो मात्र, मुंबईच्या स्फोटाची जबाबदारी कोणत्याही गटाने घेतली नाही, असे का बरे व्हावे? गुप्तचर यंत्रणा सुद्धा या कृत्यामागील गटाचा शोध घेण्यात अद्यापपर्यंत अपयशी ठरली आहे. १९ फेब्रुवारी, २००७ रोजी पाकिस्तानला जाणाऱ्या समझौता एक्स्प्रेसमध्ये दोन बॉम्बस्फोट घडविण्यात आले. या स्फोटांच्या पूर्वी गाडीत स्फोटके ठेवली असल्याची माहिती शमसूद्दिन नामक प्रवाशाने पोलिसांना दिली होती."[५] देशातील गुप्तचर यंत्रणेबाबत वेळोवेळी प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. समझौता–एक्स्प्रेसच्या स्फोटात लहान मुले व महिला मोठया प्रमाणात मृत्युमुखी पडले होते.

मुंबईची लोकल रेल्वे असो की, समझौता एक्सप्रेस अथवा मालेगावातील मशिद, या सर्व बॉम्बस्फोटात मुस्लिम नागरिक मोठया प्रमाणात ठार झाले. केवळ इस्लाम धर्माविरोधातील लोकांना लक्ष्य करण्याचा इरादा असता तर इस्लाम विरोधकांसोबतच इतर कारवायांसाठीही दहशतवादी हल्ले करु लागले आहेत. '१० नोव्हेंबर, २००६ रोजी श्रीनगरच्या मशिदीत बॉम्बस्फोट करण्यात आला. त्यात पकडल्या गेलेल्या अतिरेक्याची चौकशी झाली. तेव्हा धक्कादायक माहिती बाहेर आली. त्या अतिरेक्याने केवळ एक हजार रुपये मिळाले म्हणून

---

५ दैनिक लोकसत्ता, 'अग्रलेख', २० फेब्रुवारी २००७, पृ.क्र. २.

मशिदीत बॉम्बस्फोअ केला होता. दहशतवादी कारवायांनी पोखरलेल्या काश्मिरात पर्यटनांचा व्यवसाय रसातळाला गेला आहे. बॉम्बस्फोट, बेछूट गोळीबार, सुरक्षा दलांची दहशत आदींमुळे पर्यटक काश्मिरात फिरायला जात नाहीत.'[६] यामुळे काश्मिरमधील पर्यटनाचा व्यवसाय बुडून बेरोजगारांची फौज निर्माण झाली आहे. ही बेरोजगारांची फौज दहशतवादी गटांकरिता सुपीक जमीन आहे. बेकारीने हताश झालेले तरुण आर्थिक प्रलोभन आणि धर्मासाठी पवित्र कार्य या दोन उद्देशाने दहशतवाद्यांच्या जाळयात आपोआप अडकतात.

देशाच्या इतर भागातही यापेक्षा वेगळी स्थिती नाही. सच्चर कमिटीने मुस्लिमांमधील शिक्षण, रोजगार आदींचे आकडे जाहीर केले आहेत. त्यात शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण ही बाब सर्वात गंभीर कारण आहे. मालेगावात ८ सप्टेंबर २००६ रोजी शुक्रवारी नमाज दरमयान मशिदीजवळ बॉम्बस्फोट करण्यात आला. मालेगावात विणकरांचा व्यवसाय बुडाल्याने बेकारांची संख्या वाढली आहे. देशातील इतर भागांपेक्षा मालेगावात मुस्लिमांची संख्या जास्त आहे. तरीही, मालेगावात शिक्षणाचे प्रमाण इतर भागाप्रमाणेच आहे. अल्पशिक्षित व अशिक्षित युवकांना रोजगार नसल्याने धर्माचे काम देण्यात येते. त्यातून मूलतत्ववाद वाढीला लागला आहे. मूलतत्ववाद्यांच्या जाळया अडकलेले बेरोजगार तरुण अल्पशिक्षित असतात. पण दहशतवादी गटांमध्ये काम करणारे डॉक्टर, प्राध्यापक असल्याचेही जाढळून आले आहे. औरंगाबाद येथील घटनेत पकडला गेलेला आरोपी डॉक्टर आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटरचा कट रचणारा इजिप्तचा मोहम्मद अटाने हॅम्बूर्ग विद्यापीठातून टाऊन प्लॅनिंगची पदवी संपादन केली होती. सच्चर कमिटीचा अहवाल केवळ ४ टक्के मुस्लिम मदरशातून शिक्षण घेत असल्याचे दाखवितो. मदरशातून शिक्षण घेणारेच दहशतवादी होतात असा

---

६ किर्ती मिलींद, 'दहशतवाद न्युयॉर्क ते खैरलांजी', सुगावा प्रकाशन, पुणे २००८, पृ. क्र. ४४.

निष्कर्ष काहीजण काढतात. पण टाऊन प्लॅनिंग, वैद्यकीय शिक्षण मदरशातून दिले जात नाही.

'लेबनॉनमध्ये हिजबुल्ला या दहशतवादी संघटनेचा नेता नसरुल्ला चर्चेत आहे. जुलै २००६ व १४ ऑगस्ट २००६ रोजी संयुक्त संघाच्या शांतता ठरावापर्यंत हिजबुल्ला अतिरेक्याचे तळ कष्ट करण्याच्या नावावर इस्त्रायलच्या सांगण्यानुसार ७००० हजार हवाई हल्ले झाले. या हवाई हल्ल्यांनी उद्ध्वस्त झालेल्या लेबनानी लोकांना हिजबुल्ला नेता नसरुल्लाने मदतीचा हात दिला. नसरुल्लाने बैरुतमधील रस्ते, घरे व इतर सुविधा पुन्हा उभ्या केल्या. याकरिता शांतता व मैत्री पथकातून भारतातील विजया चौहान व फिरोझा मिठीबोरवाला गेले होते. या हवाई हल्ल्यांची माहिती देतांना संजय संगवई म्हणतात, 'लेबनॉनवर ७००० वेळा हवाई हल्ले झाले. इस्त्रायली नौदलाने आणखी २५०० बॉम्बहल्ले केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'युनिसेफच्या' पाहणीनुसार त्यात १९८३ सामान्य माणसे—बिगर लष्करी लोक (सिव्हिलियन्स) ठार झाले आणि त्यातील १/३ मुले होती. लेबनॉनच्या उच्च मदत परिषदेच्या सांगण्यानुसार हल्ल्यात ४०५४ लोक जखमी झाले व ९७,००० विस्थापित झाले. सुमारे १५,००० नागरी घरे नष्ट झाली. शेवटी—शेवटी तर एका इस्त्रायली सैनिकाला सोडविण्याचे कारण देऊन आणखी शेकडो बळी घेतले. बेरुत, हौला, टायर? सिडॉन, पूर्व बेको खोरे व लेबनॉन मधील अन्य भागातील गावेच्या गावे या हल्ल्यामुळे बेचिराख झाली. हे केवळ अमानुष युद्ध नव्हे तर संपूर्ण मानवीय सभ्यतेवरचा हा कलंक आहे.' इस्त्राईलने आंतरराष्ट्रीय निर्बंध तोडून जमिनीखालील पाण्याचे व सांडपाण्याचे पाईप्सही नष्ट केले. त्याचवेळी दहशतवादी समजल्या जाणाऱ्या नसरुल्लाने लोकांना मदत केली.'[७]

---

७ संगवई संजय, 'दैनिक लोकसत्ता नागपूर', ६ सप्टेंबर २००६, पृ.क्र. २.

'११ जुलै, २००६ रोजी मुंबई–लोकल–रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर मोबाईल फोनवर एक एसएमएस सर्वत्र फिरत होता त्यात म्हटले होते, 'प्रत्येक मुसलमान दहशतवादी नसतो, परंतु पकडला जाणारा प्रत्येक दहशतवादी मुसलमान आहे.' हा एसएमएस संघपरिवाराच्या विषारी प्रचाराचा नमुना आहे. पकडले जाणारे दहशतवादी केवळ मुसलमान आहेत काय?'[८] मग नांदेड येथे बॉम्बस्फोट झाल्यानंतर बजरंग दल व विहिपचे पकडण्यात आलेले अतिरेकी मुसलमान होते काय? असा प्रश्न संघ परिवाराच्या प्रचारावर उपस्थित केला जाऊ शकतो. या प्रचाराची वस्तुस्थिती लक्षात घेतली तर त्यातील फोलपणा लक्षात येतो. 'प्रा. रॉबर्ट पेप यांच्या नेतृत्वाखाली शिकागो विद्यापीठाने प्राणघातक दहशतवादाचा अभ्यास केला. त्यावर आधारीत 'डाईंग टू विन–दी स्ट्रॅटेजिक लॉजिक ऑफ सुसाईड टेररिझम' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. त्यामधील माहितीनुसार '१९८० ते २००३ पर्यंत जगात झालेलया एकूण ३१५ प्राणघातकी हल्ल्यांपैकी सर्वात जास्त म्हणजे ७६ घातकी हल्ले करणारी दहशतवादी संघटना म्हणजे १९८५ पासून सक्रीय झालेली एलटीटीई यांचे सदस्य हिंदू व ख्रिश्चन धर्मीय तामीळ आहेत. या उलट अयातोल्ला खोमेनी यांनी इस्लाम मुलतत्वावर आधारित राजवट–इराणमध्ये स्थापन केली, ती अजूनही चालू आहे. परंतु त्या देशात दहशतवादी संघटना नाही. जेथे–जेथे परकीयांनी लष्करी बळावर सत्ता स्थापन केली आहे तेथे–तेथे दहशतवादी संघटना उभी राहिली आहे. आणि त्या संघटनांना लोकांचे व्यापक समर्थनही लाभले आहे. हे आक्रमण करणारे देश अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, इस्त्राईल, रशिया, भारत, श्रीलंका हे देश लोकशाही राष्ट्रे आहेत. सौदी अरेबियाची सत्तारुढ राजवट अमेरिकाधार्जिणी आहे. तरी देखील ९५ टक्के जनता ओसामा–बिन–लादेनच्या पाठीशी आहे.

---

८ डॉ. पद्यमाकर दुभाषी, 'दैनिक लोकसत्ता नागपूर', १३ ऑक्टोंबर २००६, पृ.क्र. २.

असे सर्वेक्षणात आढळले आहे.'[९] या प्रा. पेप यांच्या अभ्यासानुसार हिलबुल्लाच्या ४१ आत्मघातक्यांपैकी ३० मुलतत्ववादाचे विरोधक होते. २७ साम्यवादी होते. त्यात काही मुली होत्या. एलटीटीईच्या धनूने २१ मे १९९१ रोजी श्रीपरुंबुदूर येथे निवडणूक सभेत राजीव गांधीना हार घालताना आत्मघाती हल्ला केला. राजीव गांधी यांनी शांतीसेना पाठवून एलटीटीईचे नि:शस्त्रीकरण केले. त्यात तिचे घर लुटले गेले. चार भाऊ मारले गेले. ते राजीव गांधीमुळे, असे तिला वाटले. राजीव गांधी पुन्हा सत्तेवर आले तर श्रीलंकेत शांतीसेना पाठवून तामिळांना उद्ध्वस्त करण्यात येईल, या भीतीने धनू जीवनावर उदार झाली होती.

दहशतवादी हल्ले केवह विरोधकांना नुकसान करण्याकरीताच असतात, असे नव्हे. जम्मू–काश्मिर लिबरेशन फ्रंटचा नेता मूकबूल बटने सीआयडीचे अधिकारी अमरचंद यांचा खून केल्याने १९६६ मध्ये फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. परंतु तो १९६८ मध्ये श्रीनगरच्या तुरुंगातून पसार झाला. तो पुन्हा १९७५ मध्ये काश्मिर करारानंतर परत आल्यानंतर लांगेस येथे एक बॅंक लुटली आणि व्यवस्थापकाला मारले. त्याला अटक करण्यात आल्यावर फाशीची शिक्षा देण्यात आली. मकबूल जेकेएलएफचा वरिष्ठ नेता अमानूल्लाखान याला वरचढ ठरु लागला होता. त्यामुळे अमानूल्लाखान याने त्याचा काटा काढायचे ठरविले. "अमानूल्लाखान आणि त्यांच्या काही मित्रांनी म्हात्रेच (ब्रिटीश उच्च आयोगातील भारतीय कुटनीतिज्ञ रविंद्र म्हात्रे) अपहरण करुन त्यांचा खून करण्याचा कट रचला. त्यांना मारण्यात दोन उद्देश होते. काश्मिर मुक्ती आघाडीला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी प्राप्त करणं आणि त्याचबरोबर संघटनेत त्यांच्या प्रतिस्पर्धी असलेल्या

---

९ किर्ती मिलींद, 'दहशतवाद न्युयॉर्क ते खैरलांजी', सुगावा प्रकाशन, पुणे २००८, पृ. क्र. ५९.

मकबूल बट्टचा काटा काढणं."[१०] या दरम्यान "लांगेस बॅंक लूट व व्यवस्थापकाच्या खून प्रकरणी मकबूल बटला अटक झालेली होती. अमानूल्लाखान याने रविंद्र म्हात्रे यांचा खून करविला. त्यामुळे मकबूल बटला लवकर म्हणजे ११ फेब्रुवारी १९९० ला फाशी देण्यात आली. अतिरेक्यांना फाशी दिल्यानंतरही काश्मिरमधील दहशतवाद संपुष्टात आलेला नाही. उलट इस्लामी दहशतवादाशिवाय इतर धर्मीय गटांनीही दहशतवादी कृत्ये सुरु केली आहेत."[११]

जगात ज्याप्रमाणे दहशतवाद मोठया प्रमाणात पोखरला आहे. त्याप्रमाणे नक्षलवाद भारताच्या अनेक प्रांतात आपले जाळे पसरवून उग्ररुप धारण करुन थैमान घातले आहे.

१.२ नक्षलवाद :

'नक्षलवादी किंवा नक्सल, नक्सलाईट या नावाने हा दहशतवाद ओळखला जातो. या दहशतवादी संघटनेची स्थापना १९६७ साली बंगालमधील नक्सलबारी गावात झाली. नक्षलवादी संघटना ही कम्युनिस्ट पक्षाचा क्रांतिकारक गट आहे. यात अनेक उपगट आहेत. २५ ते १९६७ रोजी एका तरूण शेतकऱ्याने न्यायालयातून आदेश आणून आपल्सा मालकीच्या जमिनीचा ताबा मिळवला. तो जमीन कसण्यास शेतात गेला असतांना त्याच्यावर जमीनदाराने हल्ला करून त्याला जखमी केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून आदिवासी लोकांनी जमीनदारांवर हल्ला करून आपल्या जमिनी परत मिळवल्या. तेव्हापासून ही

---

१० डॉ. जगमोहन, 'गोठलेले तमंग', पृ.क्र. ३३७.

११ किर्ती मिलींद, 'दहशतवाद न्युयॉर्क ते खैरलांजी', सुगावा प्रकाशन, पुणे २००८, पृ. क्र.५९

संघटना या नावाने ओळखली जाते.'[१२] जनतेचा सशस्त्र लढा उभारून व सशस्त्र बंड करून जनतेचे राज्य स्थापन (people's government) करण्याचा या गटाचा निर्धार आहे. आदिवासी, भूमिहीन शेतकरी, शेतमजूर व दलित जनतेचे आपण प्रतिधिनी आहोत असा त्यांचा दावा आहे.

'चारू मुजुमदार आणि कनू संन्याल यांनी या चळवळीला, जनतेच्या चळवळीचे स्वरूप आणून दिले. ते दोघेजण कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते. ते दोघेजण या पक्षातून बाहेर पडले व नक्षलवादी पक्षाची रीतसर स्थापना केली व या पक्षाचे नेतृत्व केले. या दोघांनी नक्षलवादी चळवळीचे पण नेतृत्व केले. चारू मुजुमदारला चिनी नेता माओत्से तुंगची राजकीय विचारसरणी प्रिय होती. चारू मुजुमदारला असे वाटत होते की, भारतीय शोषितवर्ग, शेतकरी, आदिवासी शेतमजूर, दलितवर्ग यांनी माओचा मार्ग स्विकारावा आणि उच्चवर्गाचे आणि त्यांच्या शासनाचे उच्चाटन करावे. कारण शेतकऱ्यांच्या व आदिवासींच्या दु:खाला दारिद्रयाला तेच कारणीभूत आहेत. याकरता लागणारे डावपेच म्हणजे गनिमी युद्ध, लपूनछपून हल्ले, हे होत. चारू मुजुमदार याने मार्क्सवाद, लेनिनवाद या विषयांवर आठ लेख लिहिले. तेच लेख नक्षलवादी चळवळीची मार्गदर्शक तत्वे मानली गेली. १९९७ साली नक्षलवाद्यांनी साम्यवादी क्रांतिकारक (Communist revolutionaries) अखिल भारतीय सम्नवय समिती (co-ordinals) स्थापन कली. (A.I.C.C.) व ते कम्युनिस्ट पक्षातुन बाहेर पडले. या समितीत सात राज्यांचे केरळ, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, बिहार, कर्नाटक (पट्टा), ओरिसा आणि पश्चिम बंगाल यांचे प्रतिनीधी होते. १९६९ साली या चळवळीत कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया – मार्क्सवादी, लेनिनवादी या राजकीय पक्षांची स्थापना करण्यात आली. या पक्षात सध्याचे नक्षलवादी गट निर्माण झाले. उदा.

---

१२ डोंगरे मा.म., 'वेध नक्षलवादी चळवळीचा', भारतीय श्रमशोध मंडळ, पुणे, १९९८, पृ.क्र. २.

P.W.G. वगैरे. यातील दोन प्रमुख गट आहेत – 'पिपल्स वॉर ग्रुप' आणि 'माओवादी कम्युनिस्ट सेंटर' (M.C.C.) भारताच्या विस्तीर्ण मध्यवर्ती पट्टयात (corridor) या पक्षाने आपले बस्तान बसवले आहे. या भागात विकास अत्यंत बेताचा झाला आहे. हे प्रदेश म्हणजे बिहार, झारखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, पूर्व महाराष्ट्र व आंध्रप्रदेश, तेलंगण आणि ओरिसाचा पश्चिम भाग हे आहेत. या प्रदेशात सुमारे १५६ जिल्हयांत नक्षलवादी चळवळीने व हिंसाचाराने उच्चांक गाठला आहे. २००१ साली नऊ नक्षलवादी राज्ये व श्रीलंका आणि नेपाळमधील नक्षलवादी गटांनी एकत्र येऊन एक मध्यवर्ती संघटना – The Coordinating Committee of Parties and Organisations' (C.C.M.P.O.) स्थापन केली आहे. दक्षिण आशियात नक्षलवादी चळवळीचा आणि तत्वज्ञानाचा प्रचार करण्याचा यापाठीमागचा उद्देश आहे.[१३]

आंध्रपदेशातील चळवळ :

अनेक कारणांमुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षात (C.P.I.M.L.) फाटाफुट झाली व त्यातून अनेक गट निर्माण झाले. पण शेतकरी व मजूरवर्गाचा सशस्त्र संघर्ष हे ध्येय सर्व गटांचे समान आहे. एकेकाळी एकटया आंध्रप्रदेशात दहा नक्षलवादी गट अस्तित्वात होते, तर बिहारमध्ये ९ गट होते. चारू मुजुमदार यांचे कट्टर शिष्य कोंडापल्ली सीतारामय्या यांनी १९८० मध्ये 'पीपल्स वॉर ग्रुप' ची स्थापना केली व इतर नक्षलवादी गटांना निष्प्रभ करून सोडले. आंधप्रदेशात त्यांनी उत्कृष्ट संघटना उभी केली होती. अनेक गनिमी पथके (guirrilla squads) पण तयार केली. त्यांना 'डालमा' असे संबोधले जात असे. या पथकांनी, शत्रुचा पूर्ण 'खातमा' करणे, त्याचे तळ उद्धस्त करणे, सुरक्षा

---

१३ प्रा. उदगावकर म.न., 'एकविसाव्या शतकातील दहशतवाद', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पृ.क्र. ४५, ४६.

सैनिकांवर दबा धरून हल्ले करणे, राज्य सरकारच्या मालमत्तेची मोडतोड करणे, नासधूस करणे यांचा सपाटा चालवला.

१९८४ पासून १९८८ पर्यंत २१ शिपाई, ५ हेडकॉन्स्टेबल, ५ सब–इन्सपेक्टर्स, १ डेप्युटी सुपरिटेंडेंट यांना यमसदनी पाठवले आहे. डिसेंबर १९८७ साली 'पुलामेट्टा' खेडयाजवळ ७ आय.एस.ए. अधिकाऱ्यांचे अपहरण करण्यात आले. तुरूंगात असलेल्या ८ नक्षलवाद्यांना सोडल्यानंतरच त्यांची सुटका करण्यात आली. त्यांनी जमीनदार, सावकार, सरकारी अधिकारी यांच्यात जबर दहशत निर्माण केली आणि आंध्र प्रदेशातील त्यांचे वर्चस्व असलेल्या भागात मजुरांना न्याय व योग्य मजुरी देणे भाग पाडले. व्याजाचे दरदेखील योग्य प्रमाणात आकारले जात आहेत की नाही हे बघितले. काही भागांत कमीत कमी श्रमाचा मोबदला देण्याकरता व योग्य किंमती आकारल्या जाव्यात याकरता, जनता न्यायालयाने (people's court) स्थापन करण्यात आली. अशा प्रकारे राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांना व जमिनदारांना वठणीवर आणण्यात आले.

१९९२ पासून माओवादी गटांवर आंध्रप्रदेशात बंदी आली होती. आंध्रप्रदेश सेक्युरिटी ॲक्ट या कायद्यान्वये ही बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे सर्व प्रकरचा हिंसाचार हा गुन्हा समजण्यात येणार होता.

राजशेखर रेड्डी यांचे काँग्रेसपक्षाचे मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यानंतर नक्षलवाद्यांवर घेराबंदी करून त्यांचा शोध घेणे, त्यांना अटक करणे, खटला भरणे, या सर्व प्रक्रियांवर व मोहिमेवर तीन महिन्यांची स्थगिती देण्यात आली व नक्षलवाद गटांना वाटाघाटी करण्याकरीता आमंत्रण देण्यात आले. नक्षलवादी हिंसाचारात आतापर्यंत ६०० हून जास्त माणसे मारली गेली आहेत व जबर आर्थिक नुकसान झाले आहे. अत्यंत कडवा, डावा गट, P.W.G. ने पण वाटाघाटी करून ही समस्या सोडवण्यास संमती दिली. पण चार दिवसांच्या प्रदीर्घ

आणि सखोल चर्चेनंतर सुद्धा हा प्रश्न अनिर्णित राहिला. P.W.G. गटाचे नेतृत्व श्री. रामकृष्ण यांनी केले होते, तर शासनातर्फे गृहमंत्री के.ज. रेड्डी यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले होते. एका गोष्टीबाबत या दोन्ही पक्षांचे एकमत झाले – राज्यात हिंसाचाराचे प्रमाण कमीत कमी व्हावे आणि शांतता प्रस्थापित केली जावी. मार्क्सवादी नेत्यांनी शेतजमीन सुधारणांवर (land reforms) जास्त भर दिला. हैद्राबादच्या जवळपासच्या ज्या कंपनीच्या जमिनी आहेत, त्यांचा तपास करून त्या परत मिळवण्याकरता एक अभ्यास मंडळ स्थापन करण्यात आले. यानंतर आणखीन काही गोष्टींबाबत एकमत झाले. त्यानंतर गंभीर आरोप नसतील त्या आरोपींवरील खटले मागे घेण्यात यावेत. सात वर्षे शिक्षा पूर्ण केलेल्या जन्मठेप झालेल्या कैद्यांची मुक्तता करण्यात यावी. किरकोळ आरोप असलेल्या कैद्यांची पण सुटका करण्यात यावी. शासनातर्फे अशी मागणी करण्यात आली की नक्षलवाद्यांनी आपले शस्त्रे परत करावीत. पण नक्षलवाद्यांचे म्हणणे असे होते की, सरकारच्या समस्या सोडवण्यास नक्षलवादाचा उपयोग होणार आहे. तेव्हा त्यांचेजवळ शस्त्रे असणे आवश्यक आहे. पण याबाबत मात्र एकमत होऊ शकले नाही. कारण गृहमंत्री रेड्डी यांच्यानुसार शास्त्रांच्या सहाय्याने प्रश्न सोडविण्याचे दिवस आता संपले आहेत. या घटना गेल्या काही वर्षातील आहेत.

या वाटाघाटीनंतर त्यातुन एक गोष्ट स्पष्ट झाली की, नक्षलवादी गटाने या बोलण्यात वाटाघाटीत भाग अशाप्रकारे घेतला की, सरकारने काय करावे व काय करू नये हे सांगणे आवश्यक होते, म्हणून हा खटाटोप करण्यात आला. दुसरी गोष्ट म्हणजे राजकीय क्षेत्रात मुख्य प्रवाहात आपले स्थान बळकट करण्याकरिता व त्यात सामील होण्याकरिता आपला base किंवा क्षेत्र मजबूत व्हावे, हा पण त्या पाठीमागचा आणखी एक हेतू होता. यानंतर कम्युनिस्टवादी पक्षाने उघडपणे कार्य करण्याकरिता काही कामगार संघटना, काही संस्था स्थापन

केल्या व राजकीय प्रचार करण्यास प्रारंभ केला. पण आजतागायत ही समस्या पूर्णपणे सूटलेली नाही. केंद्रीय सरकारने नक्षलवादी हिंसाचाराने ग्रस्त असलेल्या राज्यांचे एक मंडळ स्थापन केले असून नक्षलवादी समस्येबाबत एकत्रितपणे, धोरण, डावपेच उपाययोजना यांचा विचार केला जाणार आहे व निश्चित धोरण स्विकारले जाणार आहे.

"छत्तीसगढ या राज्याच्या सीमा मध्यप्रदेश, झारखंड, ओरिसा, कर्नाटक या राज्यांना भिडलेल्या आहेत. हे आर्थिक दृष्टीने मागासलेले राज्य आहे. डोंगराळ प्रदेशात, जंगल विभागात अनेक आदिवासी आणि जनजातीचे वास्तव्य आढळते. त्यात भुमिहीन, शेतमजूर यांचा भरणा असल्याने नक्षलवादी चळवळीकरीता हा भाग अनुकूल असा आहे. यामुळे या राज्यात मधूनमधून हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे राज्यसरकार टेकीस आले आहे. पुढील घटनांवरून आपणास हे सहज लक्षात येईल.

१. ३ सप्टेंबर २००५ मध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाचे २४ जवान कुंजीरनाला येथे मारले गेले.

२. जुलै आणि ऑगस्टमध्ये विरोधी कॉंग्रेस नेते श्री. महेंद्रकर्म यांच्या जवळच्या दोन नातेवाईकांसकट ५० जणांची हत्या करण्यात आली.

३. २ जून २००५ रोजी केंद्रीय राखीव दलाचे ५ जवान फडीगुंडा येथे ठार करण्यात आले.

४. २२ मे २००५ रोजी कें. रा. दलाचे आणखीन पाच जवान भैरवगढ येथे ठार करण्यात आले.

५. २० फेब्रुवारी २००२ साली भूमी सुरूंगाचा स्फोट करण्यात येऊन २३ पोलिसांना ठार करण्यात आले.

छत्तीसगढच्या मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार (रमणसिंग) १३, २२५ चौ. क्षेत्रफळाच्या प्रदेशात नक्षलवाद्यांनी भुमी–सुरूंग पेरले आहेत. राज्य सरकारने १०४ भुमी–सुरूंग निकामी केले आहेत. तरी सुद्धा गेल्या वीस महिन्यांत नक्षलवाद्यांनी २२६ स्फोट घडवून आणले. छत्तीसगढ राज्यात माओवाद्यांचा हिंसाचार म्हणजे फार यातना देणारी गोष्ट आहे, असे मुख्यमंत्र्यांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्र्याकडे गनिमी कावा कारवाईचे तज्ज्ञ पाठवावेत अशी मागणी केली आहे. भुमी–सुरूंग विरोध तंत्रज्ञान छत्तीसगढ राज्याला हस्तांतरीत करावे असे पण सांगण्यात आले आहे. या संदर्भातील एक घटना मन सुन्न करणारी आहे."[१४]

के. रा. पो. दलाचे काही जवान गंगालूर जवळ क्षेत्रपाल पोलीस छावणीकडे सुरूंगविरोधी वाहनात बसून चालले होते. हे वाहन भुमी–सुरंगाचा स्फोट होऊन १० फुट हवेत भिरकावले गेले आणि त्याचे तुकडे तुकडे झाले व आतील २३ जवान जागच्या जागी ठार झाले. रूग्णालयात नंतर तिघेजण मरण पावले. काही महिन्यांपूर्वीच केंद्रीय सरकारने राज्याला २३ भुमीसुरंगा विरोधी वाहने (anti land mine vehicles) पाठवली होती. पण त्याचा काहीच उपयोग न होता, दहा आणखीन स्फोट घडून आले. यात लक्षात राहणारी गोष्ट म्हणजे एकाही नक्षलवादी आरोपीला शिक्षा झाली नाही. बहुतेक सर्व खटल्यात पोलिसांसकट सर्व साक्षीदारांनी साक्षी फिरवल्या.

स्फोटकांच्या भांडारवर हल्ला – सुमारे ९०० सशस्त्र नक्षलवाद्यांनी ८ फेब्रुवारी २००६ रोजी ८ वाजता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा सैनिकांच्या तळावर (central industrial security force) हल्ला केला. हा हल्ला सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगावर होता, हिरोलीजवळ हा तळ आहे. अतिरेक्यांनी ८ जवानांना

---

१४ प्रा. उदगावकर म.न., 'एकविसाव्या शतकातील दहशतवाद', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पृ.क्र. ४८.

ठार केले व अन्य ९ जणांना जखमी केले. अतिरेक्यांनी National Mineral Development Corporation हिरोली येथील दारूगोळा कोठारावर पण हल्ला केला. ५० टन स्फोटक पदार्थांची, १८ रायफलींची लुट केली. त्यात त्याच्याबरोबर वॉकीटॉकी उपकरणे, अमोनियम नायट्रेटचे बरेच साहित्य यांची पण लुट केली. अमोनियम नायट्रेट खाणीत खडकाळ कठीण भाग स्फोटाने फोडण्याकरता वापरतात. त्यापूर्वी माओवाद्यांनी त्या भागाची पूर्ण नाकेबंदी केली व अंदाधुंद गोळीबार करून प्रचंड दहशत निर्माण केली. त्यापूर्वी हातबॉम्बचा मारा करण्यात आला. नंतर आपली शस्त्रे हवाली करून शरण येण्यास सांगितले. यानंतर त्यांनी स्फोटकांच्या कोठाराचा ताबा घेतला. जवानांचा एक मदतनीस की जो नागरिक होता, त्याने कशीबशी सुटका करून घेऊन जवळच टेकाडावर असलेल्या पोलीसचौकीला ही बातमी दिली. पण पोलिसांची कुमक येण्यापूर्वीच नक्षलवादी निसटून गेले होते.

पण जाता–जाता त्यांनी दोन पोलिंसाना ठार केले होते, तर दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अपहरण केले होते. पळून जाणाऱ्या नक्षलवाद्यांवर केला जाणारा गोळीबार मध्येच थांबवावा लागला. कारण अतिरेक्यांनी अपहरण केलेल्या दोन अधिकाऱ्यांची हत्या करण्याची धमकी दिली. पोलिसांच्या गोळीबारात मरण पावलेल्या आपल्या सहकाऱ्यांची प्रेते त्यांनी आपल्याबरोबर नेली.

बेलादिला प्रकल्पातील चार खनिज लोखंडाच्या खाणींची व्यवस्था छण्डण्क्ण्ब्ण म्हणजेच राष्ट्रीय खनिज विकास मंडळाकडे आहे. हा कार्पोरेशनख (मंडळाचा) एक मोठा प्रकल्प आहे, की ज्यामुळे जास्तीत जास्त फायदा मिळतो. या लोखंडाच्या खनिजांचा दर्जा अतिशय उच्च आहे. या खनिजांची निर्यात जपानला केली जाते. हिरालीतील स्फोटकांचा साठा खाणकामातील स्फोट करण्याकरता वापरला जातो. हिरोली हे ठिकाण किरणदल गावापासून १५ कि.मी. दूर आहे. हल्ला करण्यापूर्वी सर्व विजेच्या आणि टेलिफोनच्या तारा तोडून

टाकल्या होत्या व सर्व रहदारीचे मार्ग बंद केले होते. मुख्यमंत्री रमणसींग यांनी पंतप्रधानांची भेट घेऊन छत्तीसगढकरता ज्यादा सुरक्षा सैनिकांची मागणी केली होती.

एक धाडसी भयानक प्रकार – तुरूंगावर हल्ला – कैदखान्यावर हल्ला – पहिला हल्ला ११ नोव्हेंबर २००५ रोजी २०० सशस्त्र नक्षलवाद्यांनी झारखंडमधील गिरीध येथील पोलीस ट्रेनिंग सेंटरवर भयानक हल्ला करून १८६ रायफली, २००० बंदुकीच्या गोळयांची लुट केली. ही लुट चोरून जहानाबाद Operation Jail break करता येथे पाठवण्यात आली. १३ नोव्हेंबर रोजी बुंदकीच्या गोळयांचा आवाज करत नक्षलवादी जहानाबाद गावात शिरले. एकामागुन एक अशा त्यांच्या टोळयांनी गावात प्रवेश केला. यावेळी या लुटून आणलेल्या रायफलींचा आणि दारूगोळयाचा त्यांना दहशत घालण्याकरता उपयोग करण्यात आला. त्यांनी दोन तास पोलिसांबरोबर झटपट केली. पण बिहारमधील निवडणुका लवकरच होणार असल्याने पोलीस इतरत्र बंदोबस्ताकरता पाठवण्यात आले होते व जहानाबादचे अपुरा पोलीस फौजफाटा होता. त्यांनी तुरूंगावर हल्ला करून ३८९ जणांना पळवून नेले. त्यातील आपल्या नक्षलवादी सहकाऱ्यांची सुटका केली. उच्चवर्गीयांच्या रणवीर सेनेच्या काहीजणांना पण त्यांनी पळवून नेऊन त्यातील नऊजणांची हत्या केली. त्यापैकी वीस–पंचवीस जण पुन्हा तुरूंगात परतले. अजय कानू नावाचा त्यांचा त्या विभागाचा कमांडर पोलिसांच्या गोळीबारात जखमी झाला होता. त्याचे नंतर रूग्णालयात निधन झाले.

२००६ मधील ताजी घटना :

ओरिसा राज्य – खाकी गणवेशातील ४०० नक्षलवाद्यांनी, ज्यात काही स्त्रियापण होत्या, दोन लहान ट्रक आणि दोन लहान सुमो गाडयांमधून ओरिसा

राज्यातील उदयगीरा शहरात पहाटे साडेचारच्या सुमारास प्रवेश केला. गावात प्रवेश केल्यानंतर लगेचच त्यांनी टेलिफोन आणि इलेक्ट्रिकच्या वायर्सची मोडतोड केली. शहरावर धाड घालण्यापूर्वी शहरात जाणाऱ्या सर्व रस्त्यांची नाकेबंदी केली. प्रथम त्यांनी तीन सशस्त्र ओरिसा पोलिसांना ओरिसा पोलिसांना गोळया घालून ठासर केले. परत जाताना दोन पोलीस अधिकाऱ्याचे अपहरण केले. या धडीत त्यांनी बरीच शस्त्रे व रोकड पळवली. पैसा लुटला. या तीन तासांच्या धाडीत, तुरूंगावर हल्ला करून ४० कैद्यांची सुटका केली. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनवर झडप घालून ट्रेझरी ऑफीसरची जाळपोळ केली; मोबाईल टॉवर्सची नासधूस केली. त्याचप्रमाणे पोलिस अधिकारी श्री. आर.के. मलिक व तुरूंग अधिकारी श्री. सेठी यांचे अपहरण केले. पोलिसांनी ते पळून जात असतांना त्यांचेवर गोळीबार केला, पण मध्येच तो थांबवावा लागला. कारण अतिरेक्यांनी अपहरण केलेल्या अधिकाऱ्यांची हत्या करण्याची धमकी दिली. मरण पावलेल्या आपल्या साथीदारांची प्रेते त्यांनी आपल्याबरोबर नेली.

बिहार :

बिहार राज्य म्हणजे एकेकाळचे सम्राट अशोकचे साम्राज्य! याच प्रदेशात गौतम बुद्ध निर्वाणाप्रत पोहोचले. मानवी संस्कृतीचा पाळणा असलेले हे राज्य एकविसाव्या शतकात प्राण कासावीस झाल्यासारखे कालक्रमणा करत आहे. याचे कारण गरिबी, साक्षरता, भ्रष्टाचार आणि नैतिक अध:पतन! या जंगलराज्यात कायद्याचे राज्य जवळजवळ संपुष्टात आले आहे. उच्चवर्णीयांच्या छळाला, जबरदस्तीला तोंड देण्यासाठी नक्षलवादी चळवळ जन्मास आली आहे. गेले तीन दशके बिहार राज्य हे जातीय संघर्षाचे आगर बनले आहे. आपले वर्चस्व कायम राखण्याकरता उच्चवर्णीयांनी स्वत:च्या खाजगी सेना उभारल्या आहेत. राज्यात शासनयंत्रणा ठप्प झाल्यामुळे बिहारच्या अनेक भागात समांतर अशी व्यवस्था,

यंत्रणा निर्माण झाली आहे. राज्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या शिक्षणसंस्थांचा बोजवारा उडाल्यामुळे हजारो सामान्य, दिखाऊ शिक्षणसंस्था स्थापन झाल्या आहेत. सरकारी आरोग्यसेवेतील डॉक्टरांना खाजगी प्रॅक्टिस परवानगी दिल्यामुळे डॉक्टर मंडळींनी प्रचंड कमाई केली आहे. सरकारी पाणीपुरवठा, रोगराईचे माहेरघर बनला आहे; कारण दुषित पाणी पुरवठयामुळे हजारो माणसे पावसाळयात आजारी पडत आहेत. पोलीस खात्याबद्दल असंख्य तक्रारी आहेत. पोलीस खाते सर्वसामान्य माणसाला संरक्षण आणि सुरक्षा देऊ शकत नाही. देशातील सर्वात जास्त मनुष्यहत्या, अपहरणे, खंडणी वसुली, कस्टडीतील मृत्यु बिहारमध्ये आढळून येतात. अनेक प्रकरणात, पोलिसांचे, दादा लोक, मवाली, सशस्त्र गुंड यांचेबरोबर साटेलोटे असते. या सर्व कारणांमुळे बिहारमध्ये खाजगी सेनांचे प्राबल्य निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीमुळे, सामान्य जनता, दलित वर्ग, शेतकरी व शोषित वर्ग यांना पण आपापल्या खाजगी सेना उभ्या कराव्या लागल्या आहेत. एवढेच नव्हे तर, गनिमी काव्याची पथके पण येथे उभारली गेली आहेत. नक्षलवादाचा अभ्यास करताना या सर्व गोष्ट लक्षात घेतल्या पाहिजेत.

नक्षल्यांनी पेरमिली येथील स्फोटात उडविलेल्या पोलीस वाहनाचे अवशेष

राज्यातील नक्षलग्रस्त व मागास समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्याच्या हिंसक कारवायांनी सर्वसामान्य नागरिकांना जेरीस आणले. यावर्षी नक्षलवादी व पोलिसांमध्ये झालेल्या चकमकीमध्ये सहा पोलीस जवान शहीद झाले तर १५ ते २० जवान जखमी झाले. जिल्हा पोलीस व निमलष्करी दलाच्या जवानांनी जिल्हयात राबविलेल्या नक्षलविरोधी मोहिमे दरम्यान ४२ नक्षलवाद्यांना अटक करण्यात त्यांना यश आले. तर यावर्षी आठ

नक्षलवाद्यांनी पोलीसांसमोर आत्मसपर्मण करुन नक्षली जीवनाचा त्याग केला. नक्षलवाद्यांनी यावर्षी १९ जणांची हत्या करुन १५ वाहन व इतर सामग्रीची जाळपोळ केली. यात शासन व नागरिकांचे मोठे नुकसान केले. याशिवाय नक्षलवाद्यांनी जिल्हा परिषद कृषी सभापतींच्या पतीसह एटापल्ली व सिरोंचा भागातील सहा लोकांचे अपहरण केले. चार ते आठ दिवसांच्या कालावधीनंतर त्या सर्वांना सोडून दिले. नक्षलवाद्यांनी वर्षाच्या अखेरीस आलापल्ली–सिरोंचा मार्गावरील उमानुरजवळ भुसुरुंगस्फोट घडवून आणला. यात सात पोलीस जवान जखमी झाले. त्यानंतर आलापल्ली–भामरागड व आलापल्ली–सिरोंचा या मार्गांवर झाडे तोडून टाकल्याने हा मार्ग बंद झाला होता. चार दिवसांनी भामरागड मार्ग तर सातव्या दिवशी आलापल्ली–सिरोंचा मार्ग सुरु झाला. या पार्श्वभूमीवर काल २८ डिसेंबर रोजी देशाचे गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी गडचिरोली जिल्हयाला भेट देऊन नक्षल निर्मूलन मोहिमेचा आढावा घेतला. त्यांनी धानोरा व नक्षलीदृष्टया अतिसंवेदनशील मुरुमगाव येथील पोलीस मदत केंद्राला भेट दिली. तेथे तैनात निमलष्करी दल व जिल्हा पोलिसांशी चर्चा करुन त्यांचे मनोबल वाढविले. तत्पूर्वी नक्षलवाद्यांनी या तालुक्यातील कुलभट्टी येथील ग्रामपंचायत इमारत व भीमपूर येथील एका आदिवासी तरुणाची हत्या करुन गृहमंत्री चिदंबरम यांना सलामी दिली. दुसऱ्याच दिवशी गृहमंत्री चिदंबरम यांचे गडचिरोलीत सकाळी ९.३० वाजता आगमन झाले. दोन ते अडीच तासाच्या या दौऱ्या दरम्यान पी. चिदंबरम यांनी जिल्हयात नक्षल निर्मूलनासाठी कार्यान्वित उपाययोजना, विकासात्मक योजना तसेच या ठिकाणच्या अडी–अडचणी व नक्षल्यांशी लढणाऱ्या जवानांचे प्रश्न आदी विषयांवर अधिकारी व जवानांशी चर्चा केली. जिल्हयाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून सर्वांनी प्रामाणिकपणे काम करावे, शासन व प्रशासन अशा लोकांच्या नेहमीच पाठीशी आहे व राहील, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री, पी.चिदंबरम यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी

राज्याचे गृह तथा गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री आर.आर. पाटील त्यांच्यासोबत होते. राज्यातील सर्वांधिक नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयात येऊन नक्षल निर्मूलनाचा आढावा घेणारे पी. चिदंबरम हे देशाचे पहिलेच गृहमंत्री ठरले.

नक्षलवादी पक्ष :

१९६७ साली नक्षलवादी किंवा नक्षलवादी चळवळीचा स्फोट झाला व डाव्या क्रांतिकारक चळवळीच्या युगाचा प्रारंभ झाला. मार्क्सचा सिद्धांत – वर्गसंघर्षाचा आणि अंतिम कामगारांचा विजय आणि त्यांचे राज्य – या विचारसरणीच्या पायावर नक्षलवादी पक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. या चळीवळीतील नेत्यांना राजकीय सत्ता काबीज करावयाची होती; पण त्यांना अपयश आले आहे. या चळवळीचा जोर बिहार, आंध्रप्रदेश, झारखंड, ओरिसा या राज्यांत आढळतो, पण आता त्याचा प्रचार सर्वच राज्यांत झाला आहे. १९६६ मध्ये बिहारमध्ये भुमिगत स्वरूपात सुरू झाली. पण आता बिहारच्या सर्व भागांत नक्षलवादाचा प्रसार झालेला आहे. "१९८० च्या सुमारास यातील तीन प्रमुख संघटना अस्तित्वात आल्या – १) कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया – मार्क्सवादी (P.I.M.L.), २) माओवादी कम्युनिस्ट सेंटर (M.C.C.) ३) लिबरेशन पार्टी – (P.L.M.). १९८९ नंतर लिबरेशन पार्टीने आपल्या भुमिगत तंत्राचा त्याग करून, अन्य पक्षांप्रमाणे सनदशीर स्वरूप घेतले आणि अन्य पक्षांप्रमाणे निवडणुका लढविण्याचे ठरवले. पण या उपगटात, शाखांत सुंदोपसुंदी आणि कलह माजल्यामुळे माओवादी कम्युनिस्ट सेंटर हाच पक्ष प्रभावी ठरला. यातील महत्वाची घटना म्हणजे – पार्टी युनिटी हा नक्षलवादी गट आणि आंध्रप्रदेशातील पीपल्स वॉर ग्रुप – (People's Wear Group) आंध्रप्रदेश – यांचे एकीकरण होऊन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (M.L.) ही नवीन संघटना जन्मास आली. कालांतराने M.C.C या संघटनेचा प्रभाव बिहारमधील २६

जिल्हयांत निर्माण झाला. नक्षलवादी गटांनी बिहारमध्ये शोषित शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या संघटना खडया केल्या."[१५]

या शेतकरी संघटना, जमीनदारांनी जबरदस्ती, छहवणूक, जुलूम याविरूद्ध दंड थोपटून उभ्या राहिल्या व या नवीन लढयास प्रारंभ झाला. या संघटना रेड आर्मी किंवा रेड गार्ड या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. या हत्यारबंद होत्या. ही शस्त्रे, बंदुका जमीनदारांकडून किंवा पोलिसांकडून हिसकावून, पळवून आणलेल्या होत्या. पण या लढयाला आणीबाणीच्या (emergency) काळात मोठा दणका बसला. कारण सी.पी.आय. या डाव्या संघटनेने काँग्रेस पक्षाशी सख्य केले; त्यामुळे नक्षलवादी संघटना एकाकी पडल्या. ज्यावेळी समाजवादी मंडळी जनता पक्षात सामील झाली, त्यावेळी त्यांना दुसरा धक्का बसला. सरंजामशाही, जमीनदारी यांविरूद्ध एकत्र फळ उभारण्याच्या ध्येयापासून ही मंडळी ढळली. या फाटाफुटीमुळे नक्षलवाद्यांना पाहिजे तसे यश मिळू शकले नाही. पण याचा एक चांगला परीणाम म्हणजे, सर्व शेतकरी वर्ग नक्षलवाद्यांच्या छत्राखाली आला. या काळात नक्षलवादी नेतेदेखील शेतकऱ्यांच्या चळवळीला एक अभिनव स्वरूप देण्याच्या विचारात होते. या सर्व गटांना ही चळवळ पार खालच्या थरापर्यंत न्यायची होती. या चळीवळीला जनता लढयाचे स्वरूप द्यावयाचे होते.

पण जमीनदार वर्ग काही झोपलेला नव्हता! शिवाय त्यांच्या बाजूने सर्व राजकीय पक्ष होते; त्यात काँग्रेस पक्ष आघाडीवर होता. याविरूद्ध सी.पी.आय. (M) या डाव्या पक्षाने बऱ्याच आरडाओरडा केला; प्रचार केला. पण या पक्षाचा, गटाचा, भारतीय जनमानसावर विशेषत: बिहारी लोकांवर फारसा प्रभाव पडू शकला नाही. याची काही कारणे आहेत – १) या चळवळीची कार्यक्षेत्रे दूरवर

---

१५ कोळवनकर प्रकाश, 'नक्षलनामा', मोरूच्या प्रकाशन, मुंबई, १९९२.

पसरलेली होती. त्यामुळे सर्वांना एकत्र आणणे कठीण होते. २) परस्परांतील वैमनस्य, द्वेष, चुरस यांमुळे चळवळ जोर धरू शकली नाही. संसदीय राजकारण, निवडणुका, लोकशाही पद्धती याविषयी नक्षलवादी गटांची मते, विचार सारखे बदलत असल्याने, कार्यकर्ते आणि चळवळीला पाठिंबा देणारे यांच्या गोंधळ उडाला.

यातील प्रमख गट, माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर (M.C.C.) याची सापिना बिहारमधील बहारगोर या ठिकाणी १९७० साली झाली. लवकरच त्यांच्या कारवाया वाढत गेल्या. सिंगभूत जिल्हयातील जंगलात लपूनछपून, दहशतवादी कारवाया करण्यास त्यांनी प्रारंभ केला. लवकरच सरकारला त्याचा उपद्रव जाणू लागला. सरकारने कठोर उपाययोजना करून त्यांचा काटा काढला. काहींना अटक करून तुरूंगाची हवा दाखवली, तर काहींना थेट यमसदनाची वाट दाखवली. यानंतर त्यांच्या नेत्यांनी आपला पवित्रा बदलला. गया आणि औरंगाबाद जिल्हयात आपले बस्तान बसवले व तेथे तळ स्थापन केले; आपल्या कारवाया सुरू केल्या. १९८७ साली औरंगाबाद जिल्हयातील एका गावातील उच्चवर्गीय राजपूत कुटुंबातील ४२ व्यक्तींची हत्या केल्यानंतर सर्व बिहारमध्ये हा गट कुप्रसिद्ध झाला. यानंतर १९९२ साली, एका भुमीहार कुटुंबातील ३७ लोकांची अत्यंत क्रूरपणे कत्तल केली. यामुळे सर्व भारतात या गटाचे नाव बदनाम झाले. यानंतर M.C.C. गटाने जमीनदारांच्या, सावकारांच्या नक्षली प्रतिपक्षीयांच्या घरांघर धाडी घालून लुटालूट, खंडणी वसुली, हिंसाचारा हे प्रकार चालचव ठेवले. या यादवी युद्धाचा फायदा, रणवीर सेनेसारख्या जमीनदारांच्या सेनेला मिळणे स्वाभाविक होते. M.C.C. ने पण रणवीर सेनेला नामशेष करण्याची व जमीनदारांवर सुड उगविण्याची कठोर शपथ घेतली होती. हा हिंसाचार चाल असतांना, त्याविरूद्ध प्रतिक्रीया पण उमटता होत्या. काही गटांना ही हिंसाचार पसंत नव्हाता; उदा. आंध्रपदेशातील पीपल्य वॉर ग्रुपला आपल्याच

जनतेविरूद्ध हा हिंसाचार आहे असे वाटत होते. यानंतरची घडामोड म्हणजे, १९९८ साली Party Unity आणि आंध्रप्रदेशातील P.W.G. गटाचे एकीकरण होऊन C.P.M. – M.L. Prople's War ही नवीन संघटना स्थापन झाली. यानंतर M.C.C. या गटाला मोठा शह बसला. पण यानंतर M.C.C. गटाने अनेक माणसे गोळा केली; हत्यारे, दारूगोळा जमवला व People's War च्या सदस्यांवर हल्ले सुरू केले. कारण त्यांना असे वाटले की, या नवीन संघटनेमुळे आपल्या पायाखालची वाळू घरसत चालली आहे व M.C.C. हा गट आपले क्षेत्र काबीज करत आहे. M.C.C. ने जहानबाद जिल्हयातील Prople's War च्या तळावंर आणि ठिकाणांवर हल्ले केले, तर People's War गटाने उत्तर बिहारमधील जंगलात एक अरूंद पट्टा होता त्यावर हल्ले केले. या पट्टयात M.C.C. ची माणसे आसऱ्याला आलेली होती. नक्षलवाद्यांचे जे अनेक लहान लहान गट होते, आत त्यांच्यात पण ही सुंदोपसुंदी – यादवी सुरू झाली व कळसास पोहचली. रक्तपात, हत्या, जाळपोळ, दहशत – वगैरे प्रकार चालूच राहिले व प्रतिस्पर्धांच्या ठिकाणांवर हल्ले केले गेले. या पाठीमागे आपआपल्या प्रदेशावर, भागावर स्वामित्व प्रस्थपित करणे हा प्रधान हेतू होता. यातील मजेची गोष्ट म्हणजे M.C.C. आणि People'S War यांचे स्थानिक प्रश्नाबाबत परस्परांयाी मतभेद होते, तंटा होता, पण आंध्रप्रदेशातील P.W.G. गटाबरोबर मात्र मिळतेजुळते होते.

आर्थिक बाजू :

विचारसरणीत मतभिन्नता होती म्हणून हे युद्ध चालू होते असे नव्हते, तर पैसा, संपत्ती याकरता होते. बंडखोर, दहशतवादी, क्रांतिकारक असो वा कोणीही असो, तरी त्याला नेमून दिलेली कामे करण्याकरता, जिवंत राहण्याकरता निधीच (funds) अत्यंत आवश्यकता होती. नुसत्या तत्वज्ञानावर पोट भरणे शक्य

नव्हते. कोणतेही ग्रामीण कुटुंब पंधरावीस लोकांच्या जेवणाची अचानकपणे कशी सोय करणार? अशा प्रकारची सोय करण्यास एखाद्या गटाने सांगितले तर फजितीच उडणार. याला उपाय म्हणजे – छोटे सहकारी नोकर, भ्रष्ट अधिकारी, कंत्राटदार, व्यापारी, उद्योगपती, धंदेवाईक, लाकडाचे व्यापारी, वनसंपत्तीचोर या सर्वांकडून रीतसर हप्ते (installment) गोळे केले जात. अशा तऱ्हेने नक्षलवादी गटांची आर्थिक गरज निभावली जात असे. त्यांच्या बंदुका, पिस्तुले हे काम सुलभपणे विनासायास व झाटपट करत. भाडोत्री सैनिक म्हणून सेवा करण्याची मागणी देखील काही गंटादाराकडून त्यांच्याकडे केली जाई व हे काम करण्याची पण त्यांची तयारी असे. काही पोलीसांप्रमाणेच पिस्तुल दाखवून सक्तीचा पाहुणचार स्विकारण्याची पण त्यांनी मानसिकता होती. याप्रसंगी हाताला जे लागेल ते हिसकावून किंवा पळवून नेत.

"ओरिसा, आंध्रदपदेश व बिहारच्या काही भागात तेंदू (Kendu) पानांचे उत्पादन केले जाते. या पानातून बिडी (bidi) कमविली जाते. या बिडया म्हणजे गरीब माणसाची सिगारेट (cigarette) असते. तेंदू पानांच्या कंत्राटदारांकडून कमिशन हडप करून पैसा गोळा केला जाई. यातुनच नक्षलवादी चळवळ फोफावत होती. नैर्ऋत्य बिहारमध्ये काही खनिजांच्या, ग्रॅफाइट, बॉक्साईठच्या खाणी आहेत. यातून देखील कमिशन नक्षलवादी गटांना सहजपणे मिळत होते. या भागात अन्य कोणत्याही गटाचा शिरकाव होऊ नये, याची काळजी M.C.C. गट घेत असे. पालामू कमिशनरच्या (Palamu) अंदाजानुसार M.C.C. आणि Party Unity हे दोन गट दरमहा ३० कोटी रूपये पट्टी (charges) वसूल करत होते."[१६]

---

१६ प्रा. उदगावकर म.न., 'एकविसाव्या शतकातील दहशतवाद', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पृ.क्र. ५४, ५५.

त्याशिवाय त्या भागातील विकास योजनेकरता (development funds) काही निधी राखून ठेवला जात असे. उदा. जवाहर रोजगार योजना. या निधीवर या गटांचीच (M.C.C., Party Unity वगैरे) मक्तेदारी असे. असे म्हणता येईल की, नक्षलवादी गटांचे समांतर शासन (parallel government) होते. त्यांच्या माणसाकडून म्हणजेच अधिकाऱ्याकडूनच ज्या माणसांची नावे सुचविली जात त्यांनाच या योजनेच्या निविदा दिल्याखेरीज गत्यंतर नसे.

"कार्यक्षेत्रे (Field of Activities) – सुरूवातीला सामान्य व अन्य लोकांचे लक्ष्य आपल्या संघटनेकडे वेधून घेण्यासाठी हे गट नाना प्रकारच्या क्लृप्त्या लढवीत असत. हुंडापद्धती, दलितांची पिळवणूक, स्त्रियांवरील अत्याचार, वेश्या व्यवसाय वगैरे सामाजिक अनिष्ट गोष्टींवर टीका करून त्याविरूद्ध प्रचार करून हे कार्यकर्ते जनतेची मने वेधून घेत. M.C.C. गट सामान्य जनतेत लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे, त्यावेळी शासनयंत्रणा सर्वत्र कोलमडली होती."[१७]

जन–अदालत (Prople's Courts) :

M.C.C. गटाचे आणखीन एक कार्यक्षेत्र होते. जनअदालत (people's courts). अन्य नक्षलवादी गटांप्रमाणे हा गट पण जन–अदालत म्हणजेच लोक न्यायालये भरवीत असे. अर्थात ही न्यायालये, त्यांच्या बालेकिल्ल्यातच भरवली जात. सहसा जंगलात, पार अंतर्भागात भरवली जात. तेथे या कोर्टाचे कामकाज चालत असे. यातील निकाल (verdict) झटपट दिले जातात. दिलेले निकाल कठोरपणाने अमलात आणले जातात. दंड करणे, सर्वांसमक्ष चोप देणे, यापासून ते मृत्युदंडापर्यंत शिक्षा दिल्या जातात. जन–अदालत तर्फे राजकारणी, भ्रष्टाचारी, पोलिस अधिकारी, उच्च वर्गातील पुढारी, मंडळी व अन्य वर्गशत्रू

१७ प्रा. उदगावकर म.न., 'एकविसाव्या शतकातील दहशतवाद', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पृ.क्र. ५४, ५५.

(classenemies) यांची अपराधी म्हणून नावे नोंदवली जातात. त्यांच्या गैरहजेरीत त्यांना फाशीच्या शिक्षेसकट सर्व प्रकारच्या शिक्षा दिल्या जातात. जनता न्यायालये भरवण्यापूर्वी सर्व लोकांत दवंडी पिटवली जाते. याप्रसंगी, आम जनता हजर राहावी, म्हणून हे केले जाते.

पोलीस खात्याच्या गुप्त अहवालानुसार १९९६–९७ या काळात जनता न्यायालयाने दिलेल्या शिक्षेनुसार ८३ अपराध्यांना फाशी देण्यात आली. ही न्यायालये लोकप्रिय झाली, कारण सरकारी कोर्ट कचेऱ्यातील खटले अनेक वर्षे चालतात. निकाल लवकर लागत नाहीत. वकिलाच्या डोंबलावर भलामोठा पैसा मारावा लागतो आणि इतके करूनही न्याय मिळेल याची शाश्वती नसते. या क्षेत्रात देखील भ्रष्टाचार माजला आहे. उपलब्ध आकडेवारी असे सांगते की, जिल्हा न्यायालयात प्रविष्ट असलेल्या २४०० प्रकरणांची संख्या १६०० पर्यंत कमी झाली. या १६०० मध्ये १२०० प्रकरणे दहशतवादी गुन्हयांची, ९५ टक्के प्रकरणे खोटी होती. यातील अपराधी, निरपराध, सरळमार्गी, शेतकरी, मजूर होते. हे सर्व ग्रामीण भागातील होते.

जनअदालत भरविण्याचे आणखीन एक उद्देश म्हणजे आपल्या पक्षाच्या विचारधारांचा प्रचार करणे – वर्गसंघर्ष, त्यातील कामगार, शेतकऱ्यांचा विजय, त्यांचे प्रशासन व सर्वांना न्याय या विचारधारा वगैरे वगैरे. मार्क्सवादाचा अर्थ समजावून सांगून अनुयायी बनवणे हे महत्वाचे कार्य पण ठिकठिकाणी केले जाते. हे काम करत असतांनाच त्यांच्याकडून वर्गणीपण गोळा केली जाते. शासनाकडून होणाऱ्या अन्यायाविरूद्ध सशस्त्र बंड केल्याखेरीज गत्यंतर राहिले नव्हते. याचा अर्थ असा की, रक्तपात, हत्या या गोष्टी आल्याच, असा प्रचार केला जाई.

त्यामुळे सरकारला या लोकन्यायालयांवर बंदी घालावी लागली. नक्षलवाद्यांच्या काही गटांना देखील या प्रकारचा हिंसाचार मान्य नाही. लोकांना सुद्धा हे पटत नाही, त्यामुळे अन्य राजकीय पक्षांप्रमाणे नक्षलवादी संघटना व पक्ष राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे जनमानसात त्यांची प्रतिमा उजळ राहिली नाही. पोलीस यंत्रणेने त्यांना प्रखर विरोध केला व करतात. त्यामुळेच रणवीर सेना नक्षलवाद्यांवर हल्ला करून बदला घेतात. नक्षलवादी गटांना हे सर्व सहन करावेच लागते. पण हा M.C.C. गट आपल्या हिंसाचाराचे समर्थन करतो. याही पुढे जाऊन नक्षलवादी गट स्वार्थापोटी, राजकीय पक्षांबरोबर संधान बांधून त्यांच्याबरोबर सहकार्य करतात.

खाजगी सेना (private armies) :

पूर्वी जमीनदार लाठीधारी गुंड पदरी बाळगत, त्यांना लाठेता (lathetha) असे संबोधले जात असे.

स्थानिक लोकांचे तंटे मिटविण्यासाठी, शेतकरी आणि शेतावरील कुळे, यांच्यावर वचक ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या आडदांड, दादा, मवाली लोकांची टोळी जमीनदार ठेवीत. या एका दशकात किंबहुना काही वर्षांतच विशिष्ट जातीची उदा. रजपूत सेना उभारली जात आहे. मध्य बिहारमध्ये हा प्रकार आढळतो. बऱ्याच गोष्टींत बदल होत आहेत. सध्या गरीब, दलित माणसांवर जबरदस्ती, जुलूम, अन्याय करण्याच्या पद्धतीत, प्रकारात, बराच बदल झालेला आढळतो. भुमिहीन शेतकऱ्यांना, मजुरांना जुलूम, मारझोड, अन्याय आता एकटा दुकटा जमीनदार करत नाही. दबाव असणाऱ्या उच्च जातिजमातीच्या सेना कोणताही उठाव, बंड प्रतिकार मोडून काढते. यात कसलीही दयामाया दाखविली जात नाही. अशा प्रकारची सेना प्रथमच राजपूत जमातीने १९७९ साली स्थापन केली. या सेनेला कुएर सेना (Kuer) असे नाव होते. यानंतर अन्य जमातींनी

पण अशा आठ सेना स्थापन केल्या आहेत. उदा. यादव सेना, सनलाइट सेना, रणवीर सेना, भूमी सेना वगैरे. मागासलेल्या जमातींनी पण आपापल्या सेना उभारल्या आहेत. १९८३ साली यादव जमातीने, 'लोरीक सेना' स्थापन केली. उदा. रणवीर सेना. मुस्लीम समाजाने रजपूत जातीशी समझोता करून 'सनलाईट सेना' उभारली आहे.

या सेनांच्या खर्चाकरता लागणारा पैसा गोळा करण्याचे मुख्य साधन म्हणजे उच्चवर्गीय जमीनदार. त्यांच्याकडून रितसर वर्गणी गोळा केली जाते; देणग्या मागितल्या जातात; दिल्या जाता. कंत्राटदार, सरकारी अधिकारी, उद्योगपती, व्यापारी, धनिकवर्ग यांच्याकडून खंडणी वजा रक्कम वसूल केली जाते.

यानंतर प्रश्न म्हणजे बंदुका, पिस्तुले यांचा व दारूगोळा व स्फोटक पदार्थांचा. रीतसर परवाना काढून शस्त्रे व दारूगोळा मिळविला जातो. अन्य मार्गाने म्हणजे बेकायदेशीरपणे हत्यारे, दारूगोळा मिळविणे, पोलीस अधिकाऱ्यांना गाठून, हल्ला करून बंदुका, पिस्तुले हिसकावून घेतली जातात. हा अचानक हल्ला करण्याची कारवाई आतंकवादी करतात. चोरीचे कृत्य असेच केले जाते. जमीनदाराकडून अशाच प्रकारे शस्त्रे हस्तगत केली जातात. बऱ्याच वेळेला, पोलीस अत्याचाराला, छळवणुकीला बळी पडलेल्या व्यक्ती आपल्या टोळी प्रमुखांना दागदागिने सुद्धा देतात व त्यांच्याकडून पोलिसांचा बदला घेतात, त्यांच्यावर सुड उगवतात. अशा तऱ्हेने परस्परांतील हा संघर्ष सतत चालत राहतो, कारण या टोळयांचे परस्परांशी संघर्ष होतच असतात. सेनेतील प्रत्येक जवानाला द.म. १०००/— ते १२००/— इतकी रक्कम तनखावजा दिली जाते. यांचे काम एवढेच की दलित माणसे स्त्रिया, मुले यांना गोळया घालून ठार करणे. १९९९ साली एका पोलीस अधिकाऱ्याच्या अभ्यासानुसार, पाहणीत १९७

परवाना असलेल्या बंदुका होत्या, तर विनापरवाना याच्या पाचपट सहापट असाव्यात.

रणवीर सेना :

उच्चवर्गाची खाजगी सेना म्हणून रणवीर सेनेचा निर्देश करता येईल व केला जातो. आतापर्यंत अनेक व्यक्तींच्या क्रूर हत्येत रणवीर सेनेचा प्रत्यक्ष सहभाग होता. राजपूत आणि भूमीहर जमीनदारांची ही खाजगी सेना आहे. १९९४ च्या ऑगस्टमध्ये ही सेना स्थापन करण्यात आली. ही सरंजामदाराची सेना असल्याने पोलीस अधिकारीही वचकून असतात; उदवंतनगर – बिहार येथील एका भुमीहर जमीनदाराच्या मालकीची १७०० एकर भुमी आहे. त्याच्या शेताला सरकारी पाटबंधाऱ्यातुन पाणीपुरवठा केला जातो. रणवीर सेना हे एकेकाळी बडे प्रस्थ होते. सध्या या सेनेवर बंदी आहे. पण एकेकाळी या सेनेला सर्व राजकीय पक्षांचा पाठिंबा होता. बिहारमधील राजकारणाचा विचार केला तर, एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते की, स्वातंत्र्योत्तर काळात प्रत्येक शासनाचे उच्चवर्गीयांचेच लाड केले व त्यांना अनेक सवलती बहाल केल्या आहेत.

याचे कारण समजण्यासारखे आहे. केंद्रीय, राज्य निवडणुकांत, त्यांचे सहकार्य पाठिंबा अपरिहार्य असतो. सध्यादेखील हीच परिस्थिती आहे, थोडाफार फरक पडला असेल एवढेच! याच्या अगदी उलट वागणूक नक्षलवादी गटांना मिळते. १९८६ साली बिहार सरकारने जातीवर उभारलेल्या खाजगी सेनांवर बंदी घातली. १९९६ साली रणवीर सेनेवर देखील बंदी घातली आहे; तरीपण हा संघर्ष २००६ सालापर्यंत चालू आहे.

राज्य सरकारने नक्षलवादी समस्या सोडविण्याकरता अनेक उपाय योजले आहेत. ७० कोटींची सिद्धार्थ साहाय्य योजना कार्यान्वित केली आहे.

या योजनेत शासकीय सुधारणा, रस्तेबांधणी वगैरे कार्यक्रम होते. मेघदूत साहाय्य कार्य ही आणखीन एक योजना होती. Operation Meghdut या कार्यक्रमात शासनाची मुळपायापासून चौकट बदलण्याचा प्रयत्न होता. उदा. दुरवरच्या खेडयात रस्तेबांधणी, दळणवळण, वाहतूक व्यवस्था. यानंतर जवाहर रोजगार योजना पण राबविण्यात आली. पण या योजनेचा जास्तीत जास्त फायदा नक्षलवादी गटांनाच मिळाला. गरीबी हटविण्याकरता आणखीन काही योजना राबविण्यात आल्या. पोलीस यंत्रणा सुधारण्याकरता काही कोटी रूपये खर्च करण्यात आले.

नक्षलवादी हिंसाचाराचा बंदोबस्त करण्याकरता काही उपाययोजना करण्यात आल्या, अनेक कारवाया करण्यात आल्या; नक्षलवाद्यांचा पाडाव करण्यात शासनाला काही प्रमाणात यश मिळाले. प्रत्येक क्रूर कत्तलीची दहशतवादी घटना घडल्यानंतर, प्रत्येक हत्येनंतर त्या व्यक्तीच्या कुटुंबाला १—५० लाख रूपये 'आधार' म्हणून देण्यात आले. त्याचप्रमाणे सहा महिने फुकट रेशन व पक्के कायमचे राहण्याकरता घर या सुविधा पुरविण्यात आल्या. बिहार सरकारने या दहशतवादी कारवायांचा बंदोबस्त करण्याकरता खास पोलीस दलाची स्थापना केली. त्यात १५० कमांडोची भरती करण्यात आली. गृहरक्षक दलाची (Home Guard) पण मदत घेण्यात आली. नक्षलवाद्यांचा उपद्रव असलेल्या ६०० खेडयांत, त्यांची नेमणूक करण्यात आली.

इतके सगळे करूनही नक्षलवादी संकट पूर्णपणे टळलेले नाही. आजतागायत मधूनमधून दहशतवादी घटना घडतच आहे व त्याला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले आहे व हे संकट वाढतच आहे.

बिहार सरकारला दहशतवादी समस्या सोडविण्यासाठी पुढील गोष्टींचे पालन करणे गरजेचे आहे.

जातीजातीचे राजकारण थांबविल्याशिवाय नक्षलवादी कारवायांचा शेवट होणार नाही. राजपूत आणि भुमीहारसारख्या उच्च जाती भारतीय जनता पक्षसंमत पक्षाला पाठिंबा देतात. त्यामुळे नको ती माणसे निवडून येतात. यादव आणि कुर्मीसारखे मध्यमवर्गीय राष्ट्रीय जनता पक्षाला पाठिंबा देतात. काही छोटया व खालच्या जातींकडून सुद्धा आर.जे.डी. ला (R.J.D.) पाठिंबा मिळतो. त्यामुळे या जातीची सेनादले पोसली जातात वा दहशतवादी कृत्यांना उत्तेजन मिळते. खतपाणी दिले जाते. तेव्हा हे सर्व थांबवलेच पाहिजे.

यातील महत्वाचा भाग म्हणजे पोलीस यंत्रणा अत्याधुनिक केली पाहिजे. संगणक, इंटरनेट, मोबाईल फोन यांचा पोलीस खात्याने वापर केला पाहिजे. त्यांना पुरेशी वाहने – जीपगाडया, स्कुटर्स व दुचाकी गाडया पुरवल्या पाहिजेत; म्हणजे पोलिसांच्या हालचाली वेगाने होऊ शकतील. नवीन पोलीसांची भरती केली पाहिजे व दूरवरच्या खेडयांतसुद्धा पोलिसांची सेवा उपलब्ध झाली पाहिजे. संदेश देवाणघेवाण (communications) यात सुधारणा झाल्या पाहिजेत.

यातील महत्वाचा घटक – विकासयोजना – याची त्वरीत अंमलबजावणी झाली पाहिजे. बिहारमध्ये जातीजातीतील राजकारण आणि संघर्ष होण्याचे कारण म्हणजे सामाजिक आहण आर्थिक मागासलेपणा. शिक्षणाच्या सुविधा, आरोग्य, दळणवळण या सर्वांच्या अपुरेपणामुळे सामान्य लोक शासनापासून दुरावलेले आहेत. अशा एकटया पडलेल्या खेडयांना अतिरेकी आपले लक्ष्य (target) बनवतात. अशा खेडयांत कोणत्याही सुविधा नसल्याने तेथे नक्षलवादी राज्य अस्तित्वात येते. तसेच केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने ज्या काही योजना जाहीर केल्या आहेत, त्या दुबळया, कमकुवत शासनामुळे आणि भ्रष्टाचारामुळे त्यांची अंमलबजावणी रडतखडत झाली आहे. परिणामत: जैसे थे स्थिती आढळते.

नक्षलवादी चळवळीने केंद्रीय शासन व राज्य शासन हादरून गेले आहेत. या चळवळीचा सखोल अभ्यास केला जात आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाद्वारे पुढील विस्मयकारक माहिती उपलब्ध करण्यात आली आहे.

१.३ नक्षल चळवळीची स्थित्यांतरे :

नक्षलवादी आंदोलनाची दोन खास वैशिष्टये : एक म्हणजे आंदोलन सकृ दर्शन स्वरूपाचे आहे तर दुसरे – म्हणजे आंदोलनात उघडपणे हिंसाचाराच्या वापराला प्रतिष्ठा दिली आहे. गेल्या तीन दशकांत नक्षलवादी आंदोलनात तीन स्थित्यांतरे झाली त्याचा विचार करणे गरजेचे आहे.

१. नक्षलवादीचे उग्र आंदोलनाचे स्वरूप स्थानिक न राहता नक्षलवाद चळवळ ही देशाच्या वेगवेगळया भागात पसरली हा देशाचा चिंतेचा विषय आहे.

२. सर्व शोषित वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी निर्माण झालेली चळवळ हिंसाचाराचा वेध घेत आहे.

३. सामाजिक प्रश्नाच्या रूपाने निर्माण झालेली चळवळ राजकीय स्वरूप प्राप्त करण्याच्या प्रयत्नात विविध राज्य जसे बिहार, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, मध्यप्रदेश, छत्तिसगढ या ठिकाणी जाळे पसरलेले आहे.

१.४ नक्षलवादी शब्दाचा अर्थ

"बंगालच्या उत्तरेकडील जिल्हयात 'जलपैगुंडी' उपविभागातील नक्षलबाडी येथे स्वयंस्फूर्त किसान आंदोलन सुरू झाले. या पासूनच भारताच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात 'नक्षलवाद' हा शब्द प्रचलित झाला. या गावातील चारू 'मुजूमदार' या युवकाने जवळच असलेल्या 'बळामनिराम जोत' या गावातील तरूणांनी तांदूळ लुटून नेपाळ देशात नेवून विकला. या गावातील जमिनदार 'नागराय चौधरी' यांची हत्या नक्षलवाडीत झाली त्यामुळे बंडाळी करणाऱ्या या

लोकांच्या पक्षाला 'नक्षलवादी' अशी उपाधी दिली व त्यांच्या हिंसाचाराला 'वाद' तात्विक अर्थ त्यांनीच लावला. ही चळवळ सतत तीन वर्षे चालली. या हिंसाचारात हजारोंचा बळी गेला. जमिनदारांच्या भीषन शोषणाच्या विरोधात लढे देत (People War Group) या नक्षलवादी गटाने आपले बळ देशभर वाढविले."[१८]

'अनेक कारणांमुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षात फाटाफुट झाली व त्यातून अनेक गट निर्माण झाले. पण शेतकरी, शेतमजूर वर्गाचा सशस्त्र संघर्ष हे त्यांचे ध्येय होते. त्यावेळी एकटया आंध्रप्रदेशात दहा नक्षलवादी गट अस्तित्वात होते. तर बिहारमध्ये ९ गट होते. चारू मुजूमदार यांचे कट्टर शिष्य 'कोंडापल्ली सितारामय्या' यांनी १९८० मध्ये आंध्रप्रदेशात People War Group विकसीत केला व इतर नक्षलवादी गटाना विष्प्रभ करून सोडले आणि आंध्रप्रदेशात उत्कृष्ट संघठन उभे केले. अनेक गनिमी काव्याने पथकांचा, शत्रुचा खातमा करणे, त्यांचे तळ उध्वस्त करणे, सुरक्षा सैनिकांवर दबा धरून हल्ला करणे, राज्यसरकारच्या मालमत्तेची मोडतोड करणे, नासधुस करणे याचा सपाटा लावला. सन १९८४ ते १९८८ पर्यंत २१ शिपाई ५ हेडकॉन्स्टेबल, ५ पोलिस निरीक्षक इत्यादीचा खुन केला. डिसेंबर १९८७ ला 'पुलामेट्टा' खेळयाजवळ ७ आय.एस.ए. अधिकाऱ्याचे अपहरण करून तुरूंगात असलेल्या ८ नक्षल्यांना सोडल्यानंतर त्याची सुटका केली. नक्षल्याच्या वाढत्या दबाब कृत्यामुळे जमिनदार सावकार, अधिकारी यांच्यात जबर दहशत निर्माण केली.

---

१८ डॉ. गोंविद गा. रे., 'नक्षलवाद व आदिवासी', आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे, २००२, पृ.क्र. ७, ८.

१.५ गडचिरोली जिल्हयातील नक्षल चळवळीचे स्वरूप :

कम्युनिस्ट पक्षाच्या (मार्क्सवादी–लेनिनवादी) नागी रेड्डी गटाच्या पर्यत्नामुळे ही चळवळ आंध्रप्रदेशात आली. या पक्षाचे पुढे तीन गट निर्माण झाले. चंद्रपूरला रेड्डी, कोंडापल्ली, सिंतारामय्या व पी. वासुदेव यांनी पाऊल ठेवले. खऱ्या रितीने रेड्डी गटाने चंद्रपूर जिल्हयात १९७८ साली पाय रोवले आणि कोंडापल्ली सितारामय्या गटाचे एक पथक सिरोंचा (गडचिरोली) येथे पिपल्स वॉर ग्रृप निर्माण करून देवलमारी गावात १९८० मध्ये दाखल झाले आणि प्रथम राज्य राखीव दल व नक्षलवादी यांची पहिली चकमक झाली. यात पेट्टीशंकर हा नक्षलवादी मोयाबिन पेठा या ठिकाणी जानेवारी १९८० मध्ये मारल्या गेला. नक्षलवादी यात नमले नाही आणि सिरोंचा, अहेरी, एटापल्ली तालुक्यात नक्षलवादी चळवळ हळुहळू पाय रोवून सज्ज झाली.

आजही आंध्रप्रदेशातील चकमकी केल्यानंतर करीमनगर जिल्हयातून घनदाट जंगलाचा आश्रय घेत नक्षलवादी गडचिरोली जिल्हयात स्थिर होतांना दिसून येत आहेत.

१.६ जिल्हयातील आदिवासीमध्ये नक्षलवादी मुळ प्रेरणा :

"ओढातले पाणी उपसून उपसून हजारो टन पिकविले।।
पण एक शीत नाही पानात माझ्या। एक शित जेवणात।।
मी झाडे कापणे थांबणार नाही। जरी जीवन आहे त्याच्यांत।।
मी पाने खुडणे थांबणार नाही। जरीती निसर्गाला सौंदर्य देतात।।
मी फांदया तोडणे थांबणार नाही। जरी त्या झाडाचे हातच आहेत।।
कारण मला हवी आहे एक झोपडी''

नक्षल चळवळीतील 'चेराबंडा राजू' याने या कवितेत उपरोध ठासून भरलेला आहे. याचा अर्थ एकासाठी जे सौंदर्य आहे, तेच दुसऱ्यासाठी जीवन. हे जीवन प्राणिमात्रांचे आणि मानवाचे जीवनतत्व यात सांगितले आहे.''[१९]

आज विकासाच्या प्रक्रियेत सर्व सामान्य आदिवासी भरडला गेला आहे. त्यांचा जंगलावरील अधिकार गेला. जमीन गेली, परंतु त्याच्या मोबदल्यात त्याला काहीच मिळाले नाही. तो पुर्णपणे नागवला गेला आहे. अन्याय व शोषणाचा तो बळी झालेला आहे. त्याच्या मनात प्रचंड क्षोत्र आहे. विकास प्रक्रियेत तो स्वत:चे अस्तित्व गमावून बसला आहे. तो पुन्हा–पुन्हा आपल्या जीवनाच्या अस्तित्वाचा शोध घेत आहे आणि मनाशी म्हणत आहे,

''वाण्याच्या पोटी जन्मा जाशील तर, तोलून तोलून मरशिल।
चांभाराच्या पोटी जन्मा जाशील तर, नाडया ओढून ओढून मरशिल।
पण आदिवासीच्या पोटी जन्मा जाशील तर, जंगलाचा राजा होशील।''

आदीवासी याच भावनेने आजपर्यंत आपले स्वतंत्र्य अस्तीत्व जपलेले आहे. ज्या प्रेरणेने त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणायला हवे होते, परंतु जिल्हयातील सरकारी अधिकारी त्यांना समजून घेतले नाही. त्यामुळे व्यथित झालेल्या या आदीवासी समाजाला नक्षवादी चळवळीचा आधार मिळाला. बिहार, पूर्व उत्तरप्रदेश, बंगाल, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश या राज्यांतील काही भागातून आलेल्या नक्षलवाद्यांनी आदीवासीच्या दारिद्रय व अज्ञानाचा आधार घेवून आपला जम या जिल्हयात बसविला आहे.

जिल्हयात होणारी शेतमजूर व आदीवासीची पिळवणूक, जमिनदारी पद्धती, उद्योग विरहीत असल्यामुळे होणारे आर्थिक शोषण, स्थानिक, राजकारण व राजकीय घराणेशाही, जिल्हयाच्या विकासातील असमतोल, सरकारी

१९ डॉ. गारे गोविंद 'नक्षलवादी आणि आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे, २००३.

खात्यातील भ्रष्ट कारभार यामुळे याचा परीपूर्ण फायदा घ्यायला या चळवळीला खतपाणी मिळत गेले आहे. नक्षलवाद्यांना लपून राहण्यासाठी वेळोवेळी जंगलाचा आधार घ्यावा लागतो. परंतु 'गरीबासाठी लढणारे' अशी नक्षलवाद्यांची स्वत:ची प्रतिमा निर्माण केल्यामुळे खेडे गावातील स्थानिक लोकही त्यांना मदत करु लागले. गावामध्ये नक्षलवादी कार्यकर्ते समांतर न्यायव्यवस्था उघडयाने चालवत आहेत. प्रस्तापित व्यवस्था व राज्यकर्त्या विषयाची घृणास्पद वागणूकीमूळे या चळवळीने जोर पकडला. आदिवासींना सरकार जमीनीचे पट्टे दिले नाही. जमीनदाराच्या जमीनी वाटपात सरकारला आलेले अपयश, बांबूची कटाई करणाऱ्या व तेंदू संकलन करणाऱ्या मजूराचे होणारे ठेकेदारापासूनचे शोषण, दुष्काळ व पुर अशावेळी सरकारकडून दाखविली जाणारी निष्क्रीयता यामूळे नक्षलवाद्यांबदल आत्मीयता निर्माण झाली. त्यातूनच जिल्हयामध्ये नक्षलवादयांचा प्रभाव वाढला आहे.

रयत कुली संगम कमलापूर :

"गडचिरोली जिल्हयाच्या निर्मीतीनंतर सन १९८३ मध्ये अहेरी तालुक्यातील 'कमलापूर' येथे नक्षलवाद्यांनी एक अधिवेशन घेतले त्याल 'रय्यत कुली संगम' असे नाव देण्यात आले. सरकारने हे अधिवेशन चिरवून टाकण्याचा पर्यंत केला. परंतु पारंपारिक तिरकामटयाने चार ते पाच हजार आदीवासीच्या जमावाने नक्षलवाद्यांच्या चळवळीला बळ दिला. नक्षलवाद्यांच्या चळवळीचा महाराष्ट्रातील हा पहीला विजय होता. त्यामुळे त्यांच्या कामाला गती प्राप्त झाली. हेमलकसा, नागेपल्ली, भामरागड या क्षेत्रात 'पिपल्स वॉर गृपने' आपले

वर्चस्व वाढविले. या भागात काही दिवस 'जागृती आदीवासी संघटना' या नावाने ते काम करीत असत."[२०]

जिल्हयातील सिरोंचा, असरअल्ली, अहेरी, चामोर्शी, कुरखेडा, कोरची तालुक्यातील दुर्गम खेडयातील लोकांमध्ये या चळवळीचे संकेत पोहचले. त्यामुळे या परीसरातील क्षेत्राला नक्षल क्षेत्र म्हणून घोषित केल्या गेले.

गडचिरोली जिल्हयाला लागलेल्या चंद्रपूर जिल्हयातील सिमावर्ती गावामध्ये तसेच आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, सिमावर्ती क्षेत्रात या चळवळीचे बीज पेरल्या गेले याचा परीणाम "नक्षल्यांचा दबाव व पोलीसांचा जाच" यांच्या कोंडीत या सिमावर्ती भागातील सामान्य लोक व आदीवासी सापडला होता. यामध्ये पिपल्स वॉर ग्रुपच्या जहाल विचार सरणीचा प्रभाव प्रभावी ठरला. त्याच्या विचार सारणीचे सूत्र असे होते. श्रमजीवीची हुकूमशाही प्रस्तापीत करण्याकरता सशस्त्र क्रांतीचा पाया घालण्यात येत आहे. सशस्त्र उठाव हे साध्य नसून साधन आहे. हिंसाचाराचे राजकारण नक्षलवाद्यांना निषीद्ध नाही. राज्यघटना व लोकशाहीचा मार्ग त्यांना मान्य नाही."

१.७ नक्षलवाद्यांचे कार्यस्वरुप :

'कसेल त्याची जमीन' हा कार्यक्रम राबवितांना "शसस्त्र क्रांतीकारकांच्या गटामागे जनतेची ताकत उभी करणे", अत्यावश्यक कमीत–कमी हिंसा या सुत्रानुसार कार्यरत राहणे, हा नक्षलवाद्यांचा गुप्त विशेष कार्यक्रम आहे. स्वातंत्र्य मिळूनही लोकशाही क्रांती आलेली नाही. सरंमजामशाहीच्या बंधनात जखळलेली आहे. सरंजामशाहीमुळे उत्पादन संबंध नष्ट होतील. भांडवलदार वर्गाचे स्वरुप बदलले व समाजवादी क्रांतीचा मार्ग मोकळा होईल. अशी धारणा आहे, म्हणून

---

२० डॉ. गोंविद गा.रे., 'नक्षलवाद व आदिवासी', आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे, २००३, पृ.क्र. ५६.

त्यांच्या साहित्यात भांडवलदार, मक्तेदार, नव–वसाहतवाद, प्रतिक्रांतीकारक, प्रतिक्रियावादी असे शब्द वापरतात.

"आदीवासीची दिशाभूल करणे, त्यांना कायदेभंग व गुन्हे करण्यास प्रवृत्त करणे स्वत: गुन्हे करुन आपण पळून जाणे, पोलीसांनी आदीवासींना पकडल्यावर त्यांना जमीन मिळवून देतो असे आश्वसन देणे खटला लढण्यास आदीवासींना आर्थिक मदत देणे व आपला प्रभाव वाढविणे." अशी त्यांची कार्यप्रणाली आहे. दुकानदार, सावकार, श्रीमंत व्यक्ती यांच्याकडे जावून जेवण्यासाठी अन्नधान्य व पैसा मिळविणे. गावाबाहेर जेवण बनविणे एखाद्याने वस्तु व पैसा देण्यास नकार दिल्यास त्यांना धमकी देणे. गावात ओळखी असलेल्या व्यक्तीकडे मुक्काम करणे, रात्री गावा–गावात मिटींग, सभा भरविणे, कॅडर प्रशिक्षण कॅम्प भरविणे, अतिशय काळजीपूर्वक आणि कुशाग्र बुद्धीने आपल्या कार्याचे जाळे जिल्हयात तयार केले आहे.

दलमची रचना :

गावातील राजकीय दृष्टया पुढारी नक्षलवाद्यांचे केंद्र आहे. नक्षलवाद्यांच्या कामाच्या दोन पद्धती आहेत. त्या म्हणजे 'दलम आणि संगम' गडचिरोली जिल्हयात दलमचे ८० टक्के कार्यकर्ते विखुरलेले आहेत. "दलम म्हणजे कामात अडथळा निर्माण करणाऱ्यास बंदूकीची गोळी घालून ठार मारणे व शेवटी त्याचे तुकडे–तुकडे निर्माण करुन दहशत निर्माण करणारा गट होय. तर संघम म्हणजे गावामध्ये काय चालते याची माहीती देणारा निरोप्या होय. संघमने पुरविलेल्या माहितीच्या आधारावर कार्यवाही करणारा शास्त्रसज्ज आणि गणवेषात वावरणारा व्यक्ती फक्त दलम कार्यकर्ता असतो."[२१]

---

२१ डॉ. गारे गोविंद 'नक्षलवादी आणि आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे, २००३, पृ. १४ ते १६.

१. नक्षलवाद्यांच्या दलमामध्ये ९ ते ११ युवक कार्यकर्ते व २ युवतीचा समावेश असतो. या सर्वांना विविध शस्त्रे हाताळण्याची कला अवगत झालेली असते.

२. जंगलातील वाटा–आळवाटा याची माहीती त्यांना असते. दोन–तीन दिवस अन्नाविना जंगलात राहणे रोज चाळीस–पन्नास कि.मी. अंतर चालते याचे प्रशिक्षण दिले जाते.

३. नक्षलवाद्यांनी विस्तारलेल्या मार्गावरील 'असीम श्रद्धा व निष्ठा' यामूळे अविचल मनाने हे तरुण–तरुणी ही कामगिरी स्विकारतांना दलमधील तरुणांची लैंगिक भूक भागविण्यासाठी प्रत्येक दलमामध्ये तरुणीची योजना केली असते असे बोलले जाते, पण ते खरे वाटत नाही.

४. प्रत्येक दलामध्ये एक कमांडर एक डेप्युटी कमांडर व एक पोलीटीकल प्रोपगंडीस्ट असतो. या सर्वांच्या आदेशाचे पालन करणे प्रत्येक सभासदांचे कर्तव्य असते.

५. दलम हा नक्षलवादी कारवायांचा गाभा आहे प्रत्येक गावात आदीवासीचे संघठन करणे, जनता कोर्ट चालविणे कंत्राटदार, तेंदू कंत्राटदार, बाबू उद्योगांकडून खंडणी मागणे अशी कामे दलम सदस्याद्वारे केली जातात. यामध्ये अपराध्यांना मृत्युदंड देण्याचा अधिकार दलमचे म्हणणे ऐकून केंद्रीत समिती ठरवून देते.

६. प्रत्येक दलमची खास संदेश वहन यंत्रणा विकसीत केली आहे. संगम कार्यकर्त्यांना मिळालेल्या बातम्या दलमपर्यंत ताबडतोब पोहचतात. या निरोपानंतर कोणत्या प्रकारची निती आखायचे याचे गुपीत कुणालाही कळत नसते. आजच्या स्थितीत त्यांच्याकडे अत्याधुनिक संदेशवहन यंत्रणा आहे. त्याचा अंदाज आजही पोलीसांना सापडला नाही.

७. कमांडर, डेप्युटी कमांडर आणि ७ ते ९ सदस्य अशी साधारणत: ९ ते ११ नक्षलवादी सदस्याची टोळी असते. या टोळीत विषम संख्याचा विचार केला जातो.

८. जिल्हयातील गावामध्ये १५ ते २० गावासाठी एक टोळी काम करते. ही सभा ३ महिन्यात दोनदा घेतली जाते. काही वेळी भिंतीपत्रके, प्रचार बॅनर्स लावले जातात. या सभेत सावकार, दुकानदार, सरपंच, सरकारी कर्मचारी, अधिकारी पोलीस यांचे विरुद्ध अत्याचाराविरोधी, शोषणाविरुद्ध जहाल भाषणे केली जातात. गावातील लोक नक्षलवाद्यांना 'अण्णा' म्हणतात. अण्णा म्हणजे भाऊ असे नाते होय. म्हणून आदीवासींना त्यांच्याप्रती सहानुभूती असल्याचे दिसून येते.

९. संपूर्ण चळवळ भूमिगतरित्या चालवित जनतेच्या स्थानिक प्रश्नांना हात घालते. त्यांच्या भावना जपने आणि त्यांच्या अभिमानाच्या जागा हेरुन त्यावरच स्वत:चा कब्जा करते. संपूर्ण समाज चळवळीमागे उभे करणे हे सावध व संयमी धोरण त्यांनी गडचिरोली जिल्हयात अवलंबिलेले दिसते. हा संयम नक्षलवाद्यांप्रमाणे आदीवासीने सांभाळला आहे.

१.८ संघम व नक्षलसंघटनेचे जाळे :

१. "संघम हे नक्षलवाद्यांचे महत्वाचे शक्ती केंद्र आहे. संघमची स्थापना करुन आदीवासीना संघटीत केले जाते. कंत्राटदार, सरकारी अधिकारी यांच्यावर दबाव निर्माण करुन कामाची मंजूरी वाढवून मागीतली जाते. त्यावर अधिकारी व कंत्राटदार संयमचा कार्यकर्ता म्हणून भितीयुक्त जीवन जगताना दिसून येतो.

२. संघम कार्यकर्ते गावामध्येच कार्यरत असतात जिल्हयाची केंद्र, नागरी (तालुका) वस्ती या ठिकाणी कामगार संघठना, नौजवान भारतसभा,

विद्यार्थी प्रगत संघटना, यासारखे जाळे निर्माण करुन मध्यमवर्गातील तरुणांना क्रांतीकार्याकडे आकर्षित करण्याचे काम विद्यार्थी व युवक संघटना करीत आहेत. जसे – श्री. अरुण भेलके, कु. कांचन नन्नावरे या दोन युवकांच्या क्रांती संदेशाद्वारे गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील अनेक युवकांना संघम मध्ये समाविष्ट करुन घेतले होते. ऑक्टो २००८ मध्ये या दोन्ही युवकांना चंद्रपूर पोलीसांनी अटक करुन तुरुगांत ठेवले आहे.

३. पोलीस विभागामार्फत सापडलेल्या 'पिपल्स वॉर ग्रृपच्या' एका पुस्तकात नोंदल्याप्रमाणे मध्यम वर्गीयाचे निवासी भुखंड भुमिहिनांनी बळकावले तेव्हा पिपल्स वॉर ग्रृपने मध्यस्ती करुन तो प्रश्न दोन्ही लोकांचे प्रश्न लक्षात घेवून समोपचाराने मिटविला. अशा प्रकारे स्वत: जनमत मिळविण्याचा हा एक प्रयत्न केला जातो आहे."[२२]

४. पिपल्स युनियन फॉर सिव्हील लिबर्टीज या कमिटी फॉर प्रोटेक्शन ऑफ डेमाक्रॅटीक राईट्स या सारख्या संघटना ग्रामीण भागातील पत्रकार, शिक्षक, ग्रामसेवक, वकील या साारख्या बौद्धीक क्षेत्रातील मंडळींना या कार्यात सहभागी करीत असल्याचे दिसून येते.

५. शासनावर नैतिक दबाव आणणे व आपले काम करणे. लोक जेव्हा आपल्याला न्याय मागण्यासाठी संघर्षाला उभे राहतात. तेव्हा त्यांनी कितीही शांततामय व लोकशाहीचा वापर केला तरीही सत्ताधारी वर्ग या संघर्षाला 'कायदा व सुव्यवस्थेची' समस्या मानतो. आणि ती दडपण्याचा प्रयत्न करतो याचा गैरफायदा नक्षल संघटना घेत आहे.

६. शोषणामुळे किंवा असंतोषाने समाजात राजसत्तेच्या विरोधात आवाज उठविला जातो त्यावेळी शासन त्याला प्रतिव्युत्तर देते. या परिस्थितीत

---

२२ गोळवणकर प्रकाश, 'नक्षलनामा' डोंबीवली (ब) मोरुच्या प्रकाशन १९९२, पृ. १८, १९.

मानवाच्या नागरी स्वातंत्र्याचा विचार होत नाही. अशावेळी लोकशाही हक्क संरक्षण समिती यासारखी संघटना शासनाशी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

७. जिल्हयातील नक्षल प्रभावीत क्षेत्रात अनेकदा पोलीस नक्षल चकमकी होतात. वेळप्रसंगी यामध्ये कधी पोलीस तर कधी निरअपराधी सामान्य व्यक्तीचा जीव जातो. (जसे—ऐडका आत्राम) किंवा कधी—कधी बनावट चकमकी निर्माण केल्या जातात असे ऐकले आहे. यामधील मृत्यू आणि निरअपराध आदीवासींना होणारी अटक यावर आधारीत अहवाल आजपर्यंत कोणत्याही संस्थेनी सादर केल्याचे मात्र आढळून आले नाही.

८. "गावपातळीवर 'रय्यत कुली संघम' या नावाने संघटना कार्य करते. जसे, बैठकींना आदीवासी जमविणे, त्यांच्या जेवणाची व्यवस्था करणे, सभा बैठका चालू असतांना रस्त्यावर पाळत ठेवणे, पोलीसांच्या गस्तीवर लक्ष ठेवून त्यांची माहिती देणे, आदवासीचे व गैरआदीवासी यांच्यातील भांडणे, त्तंहे, वाद नक्षलसमक्ष सोडविणे यासाठी ही संघटना कार्य करतांना दिसून येत आहे."[२३]

९. आदीवासी किसान शेतमजूर संघटना, विद्यार्थी प्रगत संघटना, प्रगतशील विद्यार्थी संघटना, नवजात भारत सभा, अखिल महाराष्ट्र कामगार युनियन, महाराष्ट्र शेतकरी शेतमजूर संघटना, लोकशाही हक्क संरक्षण समिती, अशा संघटना आदीवासी भागात निरनिराळया स्तरावर काम करतात. या संघटना मोर्चे काढणे, धरणा धरणे, रास्ता रोको यासारख्या लोकशाही स्वरुपाच्या आदीवासीच्या आंदोलनाला हिंसक वळण देतात. त्यामुळे गरीब आदीवासीचे नाव पोलीसांच्या यादीत नोंदले जाते. मग त्यांना वर्ष दोन वर्षाची सजा होईल अशी भिती दाखविली जसे निरअपराध

---

२३ डोंगरे मा.ग., 'वेध नक्षलवादी चळवळीचा' भारतीय श्रमशोध मंडळ, पुणे १९९८.

आदीवासी घाबरुन निरनिराळया संघटनामध्ये भरती होतात. सोबतच मजदूर संघटना, संघर्ष मोर्चा या नावाने वापरणाऱ्याही संस्था नक्षल संघटना आहेत. याशिवाय या संघटनांचे मुखपत्रे मासीके देखील आहेत. जसे– मासीक (Report) आव्हाण कलामंच (Spring Thunder) मासीक (Pregressive Democratic Students Union) बिरसम कला मंच/आंध्र व जननाटय मंडळी इ.

नक्षलवाद्यांची आचारसंहीता :

१. नक्षलवादी गोर–गरीब जनतेच्या मदतीला धावून जाणे व त्यांना मदत करणे.

२. समाजात वावरतांना जे व्यक्ती किंवा पुढारी किंवा नेता समाज विरोधक कृत्य करीत आहे त्याला नक्षलवादी शिक्षा करतात. उदा. कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष, मालू कोपा बोगामी यांचा खून २००१ मध्ये झाला.

३. स्वत:ची पत्नी असतांना अज्ञात आदीवासी महिलेची छळ करणाऱ्या बदल त्यांच्यात संताप आहे.

४. नक्षलवादी स्वत: दारु पीत नाही आणि कोणत्याही स्त्रिया छळत नाही. (अपवाद– गडचिरोली तालुक्यातील रांगी येथील तीन शिक्षीकांना नक्षलांच्या संगम कार्यकर्त्यांनी रात्रभर ओलीस ठेवून त्यांच्यावर बलात्कार केला आहे. ऑगस्ट २००९)

५. गरीब जनतेच्या सहकार्यामुळे ते पोलीसांशी चकमकी करतात जिल्हयाच्या सिमापर्ती भागांमध्ये प्रसार होतात.

६. नक्षलदलांमध्ये ९, ११, १३, १५, १७, २१ अश्या विषम अंकाची टोळी असते. प्रत्येक दलमला दिलेल्या कार्यक्षेत्रात त्यांना काम करावे लागते. कंमाडरच्या आदेशाचे पालन करणे गरजेचे असते.

७. नक्षल दलममध्ये काम करतांना प्रत्येक सदस्यांना शिस्त, मानसिकता, हुकूमत, मानण्याची तयारी ठेवावी लागते.

८. बरेचदा पोलीसांना आदीवासी नक्षल दलमध्ये काम केल्याचे माहीत झाल्यास पोलीस आदीवासीची विचारपूस करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये विचारणा करतात किंवा छळतात त्याचा त्यांना भयंकर राग असतो. (अपवाद—याच रागातून धानोरा तालुक्यात मरकेगाव या ठिकाणी फेब्रुवारी २००९ मध्ये १५ पोलीसांची हत्या करण्यात आली.)

९. नक्षल दलामध्ये काम करणाऱ्या सदस्यांना ४० ते ५० किलोमीटर अंतर चालणे बंधनकारक असते. अशी कठोर आचारसंहितेचे पालन करणे प्रत्येक सदस्यांचे आद्य कर्तव्य असते.

१.९ जिल्हयातील नक्षल कारवाया :

गडचिरोली जिल्हयाबरोबर चंद्रपूर भंडारा, गोंदिया, नागपूर जिल्हयामध्ये नक्षल कारवांया वाढत चालल्या आहेत. १९८० पासून गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांतून पोालीस व सामान्य नागरीकांच्या मोठया प्रमाणात हत्या केल्या जातात. काही हल्ल्यात पोलीसांना स्वत:चे कर्तव्य बजावताना शहीद व्हावे लागत आहे. पोलीसांच्या स्टेनगन्म, पिस्तुले, रायफली, बंदुका, काळतुसे पळविण्यात आली आहेत. या दहशतीने सामान्य माणूस नव्हे तर शासकीय यंत्रणाही हादरुन गेलेली आहे.

१. “राजाराम खांदला गावचे सरपंच गंगाराम आत्राम यांचा १३ डिसेंबर १९८८ रोजी शिरच्छेद करुन तुकडे करण्यात आले.

२. सिरोंचा येथील प्राथमिक शिक्षक रुद्र राजू याला पोलीस खबऱ्या समजून त्याचा उजवा हात तोडण्यात आला.

३. गडचिरोली जिल्हयात १९८८ मध्ये ३७७ नक्षलवाद्यांना पोलीसांनी पकडले. त्या चकमकीत नक्षलवाद्यांना मारतांना १३ पोलीसांना वीर मरण आले.

४. १९८९ मध्ये २१ शस्त्र चकमकी उडाल्या यात नक्षलवाद्यांवर १११ गंभीर गुन्हे दाखल झाले. यात सामान्य नागरीकांचे खून, दरोडे, जाळपोळ यांचा समावेश आहे.

५. २६ एप्रिल १९९१ माजी पालकमंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्यासह प्रजनांचे मैदापल्ली येथे अपहरण करुन जहाल नक्षलवादी शिवन्ना यांची सुटका करण्याची अट घातली होती.

६. १३ मे १९९१ या नक्षल संगमच्या कार्यकर्त्यांनी शाळेकरी मुले व बेकार युवकांना यात भरती केले होते.

७. ६ ऑक्टोंबर १९९१ नक्षलवाद्यांनी रस्ता बांधकाम कंत्राटदाराचा गळा व पाय कापून निर्घृण हत्या केली.

८. १० ऑक्टोबर १९९१ तुमरगुंडा येथे राज्य राखीव पोलीसांची भुसूरुंग स्फोट करुन पोलीस व्हॅन उडविली यात १० पोलीस शहीद झाले १३ जखमी झाले. यामध्ये पोलीस १८ रायफली ३ स्टेनगन्स व दारुगोळा लुटून प्रसार झाले.

९. १९९३ मध्ये मंगेझरीतील मुन्सुरुंग स्फोटात १३ पोलीस शहीद झाले."[२४]

गडचिरोली जिल्हयाच्या नक्षल कारवाहीत दंडकारण्य प्लॉटुन दलम, चेन्नुर दलम, महादेव पुरम दलम मुतखेळ दलम व अहेरी, एटापल्ली, सिरोंचा भागात संगमपार्टी तर धानोरा, कुरखेडा तालुक्यात तांडा समिती स्थापन करुन दहशतवादी कारवाया उग्र रुप धारण केले आहे.

---

२४ 'पोलीस डायरी घटना घडामोडी', पोलीस मुख्यालय, गडचिरोली, अप्रकाशित साहित्य (महा.शासन)

या २८ वर्षांच्या काळात १४९ पोलीस शहीद झाले व २५६ पोलीस अपंग जखमी आहेत. तर ३२६ सामान्य नागरीकांचा बळी गेला आहे व २१७ सामान्य नागरिक जखमी झाले आहेत यामध्ये पोलीस पाटील इतर निष्पाप आदीवासी आहे असे एकूण ४७५ लोकांचा बळी गेला आहे.

२८ वर्षात पोलीस व सामान्य नागरीक यांच्या झालेल्या हत्याचा आराखडा खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्षे	शहीद पोलीस	सामान्य नागरीक	एकूण
१	१९८२	—	०१	०१
२	१९८३	—	०६	०६
३	१९८४	०१	०४	०४
४	१९८५	०३	०३	०६
५	१९८६	—	०१	०१
६	१९८७	—	०१	०१
७	१९८८	—	—	१३
८	१९८९	१३	०२	०२
९	१९९०	—	०७	०७
१०	१९९१	१३	१६	२९
११	१९९२	०९	१४	२३
१२	१९९३	—	—	—
१३	१९९४	—	१४	१४
१४	१९९५	—	०५	०५
१५	१९९६	—	११	११

अ.क्र.	वर्षे	शहीद पोलीस	सामान्य नागरीक	एकूण
१६	१९९७	०५	०६	११
१७	१९९८	०५	०७	१२
१८	१९९९	०२	११	१३
१९	२०००	००	१०	१०
२०	२००१	०१	०८	०९
२१	२००२	०३	२१	२४
२२	२००३	०६	२७	३३
२३	२००४	०६	१०	१६
२४	२००५	१८	२६	४४
२५	२००६	०३	३९	४२
२६	२००७	०३	२४	२७
२७	२००८	०६	१५	२१
२८	२००९	५२	३७	८९
२९	२०१०	१०	१६	२६
	एकूण	**१५९**	**३४२**	**५०१**

"सन १९८२ ते २०१० या २९ वर्षात १५१ शासकीय वाहणे नष्ट करण्यात आलीत. तसेच २२१ खाजगी वाहनाला जाळण्यात आले. यामध्ये जीप, टॅक्टर, ट्रक यांचा समावेश आहे. शासकीय मालमत्तेचे १० कोटी २१ लाख ६० हजाराचे नुकसान झाले.

खाजगी लोकांचे ९ कोटी ९५ लाख ३० हजाराचे नुकसान केले आहे. असे एकूण २० कोटी १६ लाख ९० हजार रुपयांचे नुकसान केले आहे."[२५]

१.१० पोलीस व समाज

प्रत्येक समाजामध्ये आपल्या सदस्यांच्या जीवित व वित्ताचे संरक्षण करुन त्यांना सुरक्षितता मिळवून देणे आणि त्या समाजातील बेशिस्त वर्तन, समाज विघातक शक्ती, अपप्रवृत्ती इत्यादीचे नियंत्रण करण्याची व्यवस्था असते. कोणत्याही समाजातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करणारी जी अधिकृत संघटना असते तिला सामान्यपणे पोलिस असे म्हटले जाते. सामान्यत: अंतर्गत आर्थिक व्यवस्थेचे व्यवस्थापन करण्याच्या भूमिकेतून तसेच शासकीय नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणून व्यापक अर्थाने पोलिस या शब्दांची योजना करण्यात आली होती. पुढे काळाच्या ओघात पोलीस यंत्रणा, तिचे संघटन, तिची रचना, कार्ये आणि स्वरुप बदलत गेले. गुन्हेगारी शास्त्राचा अभ्यास हा पोलीस व्यवस्थेच्या अभ्यासाशिवाय अपुराच राहिल म्हणून या प्रकरणामध्ये आपण पोलीस, पोलीस दलाची उत्पत्ती, त्यांची कार्ये, पोलीसांची भूमिका, मुख्य म्हणजे पोलीस आणि समाज यातील संबंध इत्यादींचा अभ्यास करणार आहोत.

पोलीस व्यवस्थेचा उगम आणि विकास :

"Polis या ग्रीक शब्दापासून पोलीस हा शब्द बनला असून मूलकी राज्यव्यवस्था या अर्थाने फ्रेंच भाषेत तो प्रथम रुढ झाला. पूर्वी पोलीस हा शब्द केवळ शासकीय नियमांची अंमलबजावणी आणि अंतर्गत आर्थिक व्यवस्थापन पाहणारा असा व्यापक अर्थाने योजला जात होता. पुढे काळाच्या प्रवाहामध्ये

---

२५ 'नक्षल सेल विभाग', पोलीस मुख्यालय, गडचिरोली, अप्रकाशित साहित्य (महा. शासन), १९८२—२०१०.

पोलीस या संज्ञेचा अर्थ अतिशय संकुचित किंवा मर्यादित झाला आणि आता तर त्याचा अर्थ 'कायदा आणि सुव्यवस्था राखणारा तसेच फौजदारी कार्यप्रणालीतील नियमांची अंमलबजावणी करणारा शासन अभिकर्ता" इतका तो मर्यादित झाला आहे. (Agent of the State to maintain law and order and to enforce the regulation of The Code of Criminal Procedure)[२६]

१. इ.स. १२८५ मध्ये इंग्लंडमध्ये पहिल्या एडवर्डच्या काळात गुन्हेगारांपासून संरक्षण करण्याच्या उद्देशाने सामाजिक पातळीवर संरक्षण करण्याची पद्धत तेथे सुरु झाली.

२. १८८७ च्या ब्रिटीश पार्लमेंट कायद्यानुसार एक सुसंघटित पोलीस व्यवस्था नियमीत रुपात निर्माण करण्यात आली. शहरे आणि आसपासच्या इलाक्यात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले होते. औद्योगिकरण आणि नागरीकरणामुळे समाज जीवनातील गुंतागुंत आणि क्लिष्टता वाढली. नवीन गुन्हे आणि गुन्हे कार्यप्रणाली निर्माण होऊ लागल्या आणि ही पोलीस व्यवस्था अपुरी ठरु लागली.

"पोलीस दलात काम करणाऱ्या कॉन्स्टेबल्सना 'पीलर्स' असे म्हटले जात असे. अर्थातच, सर रॉबर्ट पील यांच्या नावावरुन हे संबोधन पडले हे स्पष्टच आहे नंतर हेच पीलर्स बॉबी म्हणून ओळखले जाऊ लागले."[२७]

भारतामध्ये अतिप्राचीन काळापासून या ना त्या स्वरुपात पोलीस व्यवस्था होती असे रामबाण महाभारतातील संदर्भावरुन दिसते. मनूने सुद्धा पोलीस व्यवस्था या विषयावर सविस्तर ऊहापोह केलेला असून ज्यांना स्थानिक

---

२६ प्रा. माने माणिक, 'गुन्हेगारीशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९९, पृ. १६७

२७ प्रा. माने माणिक, 'गुन्हेगारीशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९९, पृ. १६८

प्रदेशाची, समाजाची चांगल्यापैकी जाण आहे अशाच लोकांची पोलीस दलामध्ये भरती केली जावी असे म्हटले आहे.

अगदी मौर्य, गुप्त आणि मोगलांच्या राजवटीमध्ये सुद्धा आपणास अशाच दोन पोलीस व्यवस्था असलेल्या दिसतात. इतकेच नव्हे तर आजही 'शहर' आणि 'ग्रामीण' पोलीस अशा दोन स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था असलेल्या दिसतात.

ग्रामीण समाजातील स्थानिक जमीनदार किंवा खेडयातील मुख्य माणसाने करावे (Village Headman) अशी अपेक्षा होती. मोगलांच्या काळामध्ये सुसंघटित पोलीस व्यवस्था होती. दरोगा–इ–फौजदारी हा पोलीस प्रमुख असे तर त्याच्या हाताखाली असणाऱ्यांना दरोगा किंवा कोतवाल असे म्हटले जाई.

भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी व्यवहार मुंबई, कलकत्ता आणि मद्रास या शहरातून मोठया प्रमाणात वाढले. १७९२ मध्ये लॉर्ड कॉर्नवालिस यांनी पहिल्यांदा स्थानिक जमीनदारांकडून पोलीस प्रशासनाचे अधिकार काढून घेऊन ईस्ट इंडिया कंपनीला जबाबदार राहणारे नवीन पोलीस दल निर्माण केले.

"१८६० आणि १८६१ साली इंडियन पीनल कोड आणि क्रिमिनल प्रोसिजर कोड भारतीय दंड संहिता आणि दंडनीय कार्यप्रणाली या दोन संहिता करण्यात आल्या. साहजिकच त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीसांसाठी अशी एखादी संहिता किंवा कोड निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. त्यासाठी १८६० साली शासनाचे पोलीस कमिशनची स्थापना केली. याच कमिशनच्या शिफारशीवर आधारीत असा पोलीस ॲक्ट, १८६१ हा कायदा पास झाला."[२८]

---

२८ The Indian Penal Code, १८६०.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्येही अगदी आजही इंग्रजांनी केलेल्या कायद्यावरच पोलीस यंत्रणा अवलंबून असलेली दिसून येते. स्वतंत्र भारताची राज्यघटना अस्तित्वात आली आणि 'पोलीस' हा विषय 'राज्य यादीमध्ये' समाविष्ट झाला. केंद्राच्या अखत्यारीत सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हिस्टिगेशन, सेंट्रल रिझर्व्ह पोलीस (केंद्रीय राखीव पोलीस दल आणि केंद्रशासित प्रदेशातील पोलीस दल, रेल्वे सुरक्षा दल, (Railway Protection Force) सीमा सुरक्षा दल (Border Secirotu Force) इत्यादींचे प्रशासन येते. यामध्ये १० मार्च, १९६९ पासून केंद्रीय ओद्योगिक सुरक्षा दल (Central Indusrial Security Force) या नवीन दलाची भर पडली आहे.)

राज्य पोलीस दलाच्या अखत्यारीत, राज्य राखीव पोलीस दल (State Reserve Police Force) गृह संरक्षक दल, (Home Guard) इत्यादींचा समावेश होतो. जेव्हा–जेव्हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा–तेव्हा राज्य पोलीसांना सहाय्यक म्हणून राखीव पोलीस, गृहसंरक्षक दलाची मदत घेतली जाते. राज्य पोलीस दलामध्ये वेगवेगळया विशेषीकृत शाखा असतात. उदा. गुप्तचर शाखा, वाहतूक शाखा, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, राज्य गुप्तचर विभाग इत्यादी शाखांद्वारे विशेषीकृत कार्ये पार पाडली जातात.

पोलीस संघटन :

"भारतीय पोलीस सेवेतील (IPS) अधिकारी सेवा ज्येष्ठतेनुसार या पदावर नियुक्त होतात. त्यानंतर पोलीस महानिरीक्षक, पोलीस उपमहानिरीक्षक, पोलीस अधिक्षक, उपअधिक्षक, मंडल पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक–सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, हवालदार, नाईक, कॉन्स्टेबल अशी दर्जानिहाय श्रेणीरचना असते. जिल्हा पोलीस अधिक्षकांपासून वरील सर्व अधिकारी हे भारतीय पोलीस सेवेतून आलेले

असतात. पोलीस अधिक्षकांच्या नियंत्रणाखाली जिल्हयातील संपूर्ण पोलीस यंत्रणा काम करत असते. जिल्हा पोलीस अधिक्षक हे जिल्हा दंडाधिकाऱ्यांना (कलेक्टर) जबाबदार असतात. आवश्यकतेनुसार वरील पोलीस अधिकाऱ्यांची संख्या कितीही असू शकते. मात्र मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक सारख्या शहरांमध्ये (विशेषत: मेट्रोपोलिटन शहरे, जिथे महानगरपालिका आहेत अशी शहरे) पोलीस आयुक्त (पोलीस कमिशनर), पोलीस प्रमुख पदी असून त्यांच्या हाती पोलीस अधिक्षक तसचे जिल्हा दंडाधिकाऱ्याचे अधिकार केंद्रीत झालेले असतात. पोलीस शिपायांपासून उपअधिक्षकांपर्यंतचे सर्व कर्मचारी हे राज्य शासनाच्या निवड प्रक्रियेतून निवडले जातात."[२९]

महिला पोलीस :

जगात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये (U.K.) १९१७ साली सी.आय.डी. गुन्हे अन्वेषण विभागात महिला पोलीसाची भरती करण्यात आली होती. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतात महिलांची पोलीसांची संख्या वाढली. स्त्रिया व विशेषत: बाल गुन्हेगार हाताळण्याचे काम त्यांना करावे लागे. विशेषत: स्त्रियांना अटक करणे, स्त्रियांना न्यायालयात आणि कोठडीत घेऊन जाणे—आणणे स्त्रियांची अंग झडती घेणे, स्त्रियांच्या सभा, मोर्चे इत्यादी प्रसंगी सुव्यवस्था राखणे इत्यादी कामे महिला पोलिसांना करावी लागतात.

१९३८ साली पहिल्यांदा उत्तर प्रदेशातील कानपूर आणि त्या पाठोपाठ १९३९ मध्ये त्रावणकोरमध्ये महिला पोलिसांची मदत घेतल्याच्या नोंदी वगळता भारतात महिला पोलीस ही कल्पना अज्ञातच होती. भारताची फाळणी झाली आणि त्या पाठोपाठ भारतात हिंसाचाराच्या उद्रेक झाला. स्त्रियांची विटंबना,

---

२९ प्रा. माने माणिक, 'गुन्हेगारीशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९९, पृ. १७०, १७१.

अत्याचार, अपहरण करणे, बलात्कार, विक्री इत्यादी घटनांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली. स्त्रियांची ही परिस्थिती पाहता पोलीस दलात महिलांचा समावेश असावा हा विचार पुढे आला.

मुंबई, पुणे, कलकत्ता, यासारख्या मोठया शहरातून स्त्रियांच्या पोलीसांच्या दृष्टीकोनातून वेगळया समस्या निर्माण होत आहेत. घरुन स्वत:हून पळून आलेल्या, फूस लावून पळवून आणलेल्या, अल्पवयीन वेश्या, सुसंस्कृत नागरी वस्त्यातून चालणारे प्रतिष्ठित वेश्या व्यवसाय, गर्भार अविवाहिता, विधवा इत्यादींची संख्या वाढत आहे. तर काही स्त्री गुन्हेगार गळयातले दागिने पळविणे (Snatching) पाकीटमारी, अमली पदार्थ विक्री–वाहतूक यामध्ये तरबेज होऊन आत्मविश्वासाने मोठया प्रमाणावर गुन्हे करत आहेत. यासाठी मुंबई पोलीसांनी तर सामाजिक सुरक्षा शाखाच कार्यान्वित केली आहे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या महिला पोलीसांची संख्या मंजूर संख्ये इतकी कधीच असत नाही. त्यामुळे महिला पोलीसांची कमतरता जाणवते.

पोलीसांची भूमिका, पोलीसांची प्रतिमा हे अत्यंत वादग्रस्त विषय आहेत. पहिल्यांदा आपण पोलीसांच्या भूमिकेचा विचार करु.

विशिष्ट समाजव्यवस्थेत विशिष्ट काळी एखाद्या व्यक्तीला असलेले स्थान म्हणजे दर्जा होय. (Status is the place in a particular system which a certain individual occupies at a particular time…….. Raiph Linton) अशी राल्फ लिंटन यांनी दर्जाची व्याख्या केली आहे.

"दुसरी म्हणजे या स्थानाशी निगडीत काही कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या (Duties and obliqations) असतात. पोलीस व्यवस्थेतील प्रत्येक स्थानावरील व्यक्ती किंवा कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये म्हणजे त्या–त्या पोलीसाची किंवा अधिकाऱ्यांची भूमिका होय. पोलीस व्यवस्थेमध्ये पोलीस,

हवालदार, जमादार, पोलीस, उपनिरीक्षक, निरीक्षक, उपअधिक्षक, अधिक्षक, उपमहानिरीक्षक अशी एक श्रेणी रचना (Hierarchy) असते. याचाच अर्थ या अधिकार श्रेणी रचनेमध्ये सर्वच स्थानांना सारखाच दर्जा नाही आणि भूमिका अर्थातच भिन्न–भिन्न असणार आहे."[३०]

पोलीसांची कार्ये :

१. **पारंपारिक कार्य :** प्राचीन काळापासून आजतागायत चालत आलेले हे कार्य असून यामध्ये विविध गुन्हयातील संशयीतांवर कारवाई करण्याचे काम पोलीसांना करावे लागते. त्यामध्ये घटनास्थळी भेट देणे, पंचनामा करणे, जाबजबाब नोंदविणे, गुन्हेगारांचा शोध घेणे, त्यांना अटक करुन न्यायालयातून पोलीस कोठडी मिळविणे, तपास करणे, आवश्यक पुरावा गोळा करुन त्याच्यावर न्यायालयात आरोपपत्र दाखल करणे इत्यादींचा समावेश होतो.

२. **गुन्हेगारी प्रतिबंध (Prevention of Crime)** : मुळातच गुन्हे घडू नयेत म्हणून दक्षता घेण्याचे काम पोलीसांना करावे लागते. Prevention is better than cure हे तत्व त्यामागे आहे. त्यासाठी संवेदनाक्षमता क्षेत्रांमध्ये पोलीस बंदोबस्त, रात्रीची गस्त घालणे, संशयितांवर, चोरीचा माल घेणाऱ्यांवर निगराणी ठेवणे, गुप्त बातम्या काढणे इत्यादींचा समावेश होतो. मुख्य म्हणजे जे समाजविघातक प्रवृत्तीचे दाखलेबाज गुन्हेगार आहेत, नजीकच्या भविष्य काळात (म्हणजे गणेशोत्सव, निवडणूका इत्यादी) जे गुन्हेगारी कृत्ये करु शकतात अशा व्यक्तींवर

---

३० श्री. सानप माधव, 'पोलीसांच्या प्रतिमेवर एक दृष्टीक्षेप' दक्षता दिवाळी अंक, १९९७, पृ. १६५.

प्रतिबंधात्मक कारवाई करणे. क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कलम १५१ आणि १०७ अन्वये पोलीस अशी प्रतिबंधात्मक कारवाई करु शकतात.

३. **प्रासंगिक कार्ये** : पोलीसांना विशिष्ट परिस्थितीत काही प्रासंगिक कार्ये पार पाडावी लागतात. त्यामध्ये वाहतूक खोळंबा झाल्यावर ती सुरळीत करणे, रस्ता रोको किंवा अन्य आंदोलन, मिरवणूका, वेगवेगळे बंद, सार्वजनिक ठिकाणचे असभ्य वर्तन, सांप्रदायिक हिसांचार इत्यादी प्रसंगी संयमित वर्तन करुन कुठलाही सामाजिक क्षोभ निर्माण होऊन देता ती हाताळावी लागतात.

ही सर्व कार्ये पार पाडली जात असली तरीही शेवटी पोलीसांची भूमिका कोणती? हा प्रश्न उरतोच. समाजाला शांतता व सुव्यवस्था राखून समाजविघातक अपप्रवृत्तीपासून समाजाचे संरक्षण करुन गुन्हेगारी नियंत्रित करणे ही पोलीसांची भूमिका असते—असली पाहिजे असे आपल्याला थोडक्यात म्हणता येईल.

पोलीसांच्या भूमिकेवर प्रभाव पाडणारे घटक (Factors Affecting Role of Police):

पोलीस हा गणवेशातील नागरीक असतो. तोही एक माणूसच असतो. पोलीसाला आपली भूमिका परिणामकारकपणे पार पाडायची असेल तर अर्थातच त्याच्या किमान आकांक्षा, सोयी—सवलती, आधुनिक दळणवळणाची साधने, शस्त्रास्त्रे इत्यादींचा विचार व्हायला हवा. पोलीसांना किमान पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्याशिवाय (Infra Structure) पोलीस आपली भूमिका परिणामकारकपणे पार पाडू शकणार नाहीत. खालील घटकांचा पोलीसांच्या भूमिकेवर प्रभाव पडतो, येथे फक्त त्यांचा उल्लेख केला आहे.

१. विद्यमान परिस्थितीशी सुसंगत वेतन—भत्ते—सवलती

२. कामाचे अनिश्चित तास, वेळ, रजा–सुट्टी इत्यादी वरील निर्बंध

३. अपुरा कर्मचारी वर्ग

४. समाजाचे असहकार्य–उदासीनता

५. संगणक–इंटरनेट–आधुनिक तंत्रातील प्रगत ज्ञान

६. न्याय वैद्यक प्रयोगशाळा (Forensic Medicine Laboratory)

७. महिला पोलीसांची मर्यादित संख्या

८. पोलीस–समाज यातील परस्पर अविश्वासाचे संबंध

९. राजकारण्यांचा नको इतका हस्तक्षेप

१०. पोलीस आणि न्यायव्यवस्थेचे संबंध

११. वरिष्ठांकडून मिळणारी पक्षपाती–अन्यायकारक वागणूक

१२. पोलीसांची मलीन प्रतिमा

पोलीसांनी कितीही प्रामाणिकपणे काम केले तरी पोलीसांवर अकार्यक्षम, भ्रष्ट, पक्षपाती असे 'लेबल' लागले आहे. **उदा.** एका गुन्हयाच्या संदर्भात संशयिताला अटक केली नाही म्हणून एका मोठया मोर्चाने पोलीस ठाण्यावर मोर्चा आणून 'आरोपीला अटक करा' असा दबाव आणला. त्याला अटक केली तर वरिष्ठांकडून खाते निहाय चौकशीची शक्यता वर्तविली गेली. अशा परिस्थितीत पोलीसाने आपली भूमिका कशी पार पाडायची अशी अपेक्षा आहे? असा प्रश्न एका पोलीसाने प्रस्तुत लेखकाला केला!

पोलीस आणि समाज : परस्पर संबंध :

"पोलीस आणि समाज यांच्यातील संबंध हे परस्पर विश्वासाचे, संशयातील, सामंजस्यपूर्ण आणि परस्पर सहकार्याचे असावेत अशी पोलीस आणि समाजाचीही अपेक्षा असते, 'असावेत' असे म्हटले जाते, याचा अर्थ असे संबंध अस्तित्वात नाहीत असा होतो.

केवळ कायद्यांच्या चौकटीत राहून आपली विहीत कर्तव्ये पार पाडणारी एक सरकारी यंत्रणा न बनता तिची व्याप्ती सामाजिक सेवेत विस्तारली पाहिजे.

"पोलीस प्रतिमा म्हणजे जनतेच्या अपेक्षा व या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पोलीस करीत असलेले प्रयत्न यामध्ये जी दरी किंवा अंतर आहे यालाच पोलीस प्रतिमा म्हणता येईल."[३१]

गुन्हेगारी नियंत्रण आणि न्यायव्यवस्था (Crime Conrol and Justice) :

गुन्हेगारी नियंत्रणाचा भारताच्या संदर्भात विचार करताना आपल्याला तो मुख्यत: क्रिमिनल प्रोसिजर कोड आणि इंडियन पीनल कोडच्या संदर्भात करावा लागतो. कोणत्याही फौजदारी कायद्याचे अंतिम उद्दिष्ट हे कायदा व सुव्यवस्था, जीवित व मालमत्तेचे सरंक्षण करुन सामाजिक अपप्रवृत्तींपसून समाजाचे संरक्षण करणे हे असते. त्यासाठीच या कायद्यातील तरतुदींचे विश्लेषण करुन गुन्हेगारांना शिक्षा व निरपराध्यांना न्याय देण्याचे काम न्यायालयांना करावे लागते. अर्थातच शिक्षा सुनावल्यामुळे गुन्हेगारी नियंत्रण होते का हा वादग्रस्त प्रश्न असून त्याबाबतचे विविध सिद्धांत आपण 'गुन्हा आणि शिक्षा' या प्रकरणात अभ्यासले आहे.

पोलीसांची कार्यपद्धती :

सामान्यपणे पोलीस ठाण्यात जे गुन्हे नोंदले जाता ते (१) दखलपात्र गुन्हे (Cognizable Crime) आणि (२) अदखलपात्र गुन्हे (Non-Cognizable Crime) या दोन प्रकारचे असतात. दखलपात्र गुन्हयांचा तपास पोलीस स्वत: करु शकतात आणि वॉरंटशिवाय आरोपीला अटक करु शकतात. तथापी, ज्या मॅजिस्ट्रेटना अदखलपात्र खटले चालविण्याचा अधिकार आहे अशा मॅजिस्ट्रेटच्या हुकूमाशिवाय पोलीस अदखलपात्र गुन्हयांचा तपास करु शकत नाहीत. अर्थातच असा हुकूम मिळाल्यास (कलम १५५ (२) प्रमाणे पोलीस तपास करु शकतात.

---

३१ श्री. लिमये गो.ल., 'पोलीस नागरीकांचे संबंध' दक्षता १९८३, पृ. ९९.

योग्य तो तपास करुन, संशयितांचा शोध घेऊन पोलीस संशयिताला आपल्या ताब्यात २४ तास ठेवू शकतात. पण तपासकामी आणखी पुरावा मिळविण्यासाठी पोलीस अशा संशयिताला मॅजिस्ट्रेट पुढे २४ तासांच्या आत उभे करुन पोलीस कोठडी मिळवू शकतात. यालाच रिमांड घेणे असे म्हणतात. ही कोठडी पधंरा दिवसांपेक्षा जास्त असत नाही.)

आरोपीचा अधिकार (Rights of the Accused)

१. **मॅजिस्ट्रेट पुढे हजर करण्याचा हक्क (Right to be produced before Magistrate)** : मॅजिस्ट्रेटलाच दंडाधिकारी असेही म्हणतात. एखाद्या संशायिताला अटक केल्यावर पोलीस त्याला आपल्या ताब्यात २४ तासांपेक्षा जास्त वेळ ठेवू शकत नाही. अटक झाल्यापासून २४ तासांचे आत पोलीसांनी आरोपीला न्यायालयात दंडाधिकाऱ्या पुढे हजर केले पाहिजे.

२. **जमिनीचा हक्क (Right to Ball)** : दंडाधिकाऱ्यांपुढे हजर केल्यापासून पुढे तपास–पुरावा प्रत्यक्ष खटल्याची सुनावणी होऊन निकाल लागेपर्यंत प्रदीर्घ काळ व्यतीत होत असतो.

३. **कायदेशीर मदत आणि वकील इत्यादींशी सल्लामसलतीचा हक्क (Right to Counsel and Legal Aid)** : घटनेच्या कलम २२(३) नुसार एखाद्याला अटक केल्याबरोबर त्याची कारणे सांगितल्याशिवाय त्याला डांबून ठेवता येणार नाही. तसेच त्यांच्या मर्जीच्या वकीलाशी सल्ला मसलत करण्यास प्रतिबंध करता येणार नाही.

४. **स्वत: विरुद्ध पुरावा न देण्याचा हक्क (Right Against Self Incrimination)** : एखाद्या आरोपीला स्वत: विरुद्ध पुरावा देणे बंधनकारक करता येणार नाही असे तत्व इंग्रज कायदा व्यवस्थेत आहे. तसेच भारतीय कायदा व्यवस्थेत पण आहे.

५. **दुहेरी जोखमी विरुद्ध संरक्षण (Right to Double Jeopardy)** : ज्या व्यक्तीवर सक्षम न्यायालयाकडून एखाद्या गुन्हयाबद्दल खटला चालून ती व्यक्ती दोषी अथवा निर्दोषी ठरली असेल आणि तो आदेश अमलात असेल तर त्या व्यक्तींवर त्याच गुन्हयांसाठी पुन्हा खटला चालविता येणार नाही.

६. **खटला लवकर निकाली काढण्याचा हक्क (Right to Speedy Trial)** : "उशिरा न्याय मिळणे म्हणजे न्याय नाकारण्यासारखेच आहे.' (Justice delayed is justice denied) असे म्हटले जाते. खटल्याची सुनावणी तहकूब होणे–लांबणे याचा परिणाम म्हणजे आरोपींना दीर्घकाळपर्यंत कोठडीतून राहावे लागते. हा काळ अनिश्चिततेचा, मानसिक ताण वाढवणारा असतो. साहजिकच या खटल्यांचा लवकर निकाल लागणे रास्त ठरते. तसा हक्क आरोपीला आहे.

कधीकाळी ऐकले होते – नाव बरेच शहीदांचे
आज त्यांचा प्रत्यय आला – पाहुण चित्र शहीदांचे
माय बापांना सांगतायेतील – दु:ख पुत्र वियोगाचे
लेकरांच्याही दु:खी नजरा – पित्रूछत्र हरविल्याचे
दु:खी मनाला कसे सावरावे – कोण सांगेल या अश्रुंना
अूजणी जिवंत आहात तुम्ही – सांगावे शुरविरांना

विभाग ब

१.११ पुर्व संशोधनाचा आढावा :

जॉर्ज गॉर्नर यांनी केलेल्या संशोधनात असे नमूद केले आहे की, दहशतवादांच्या विविध गटांतील त्रुटीचा विशेषत्वाने विचार करण्यात यावा. एकंदरीत पाहता दहशतवाद्यांहून पोलीसांनी कमी चूका कराव्यात व त्याचा सामान्य जनतेशी कमीत–कमी संबंध यावा याबाबत प्रयत्नशील राहावे. या संशोधनात दहशतवाद्यांच्या मानसिक क्षमतेबाबत अध्ययन करुन त्यांच्यातील नेतृत्व क्षमतेला कमी करण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करण्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे दहशतवादी, सामान्य नागरिक, कायद्या व सुव्यवस्थेतसाठी असलेली पोलीस यंत्रणा या तिन्ही बाबींचा दहशतवादांचा बिमोड करण्यास अत्यंत महत्वपूर्ण आहे. त्याचप्रमाणे पोलीसांची कार्यक्षमता तसेच त्यांच्या कुटूंबियांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास हा देखील महत्वपूर्ण आहे.[३२]

हॅनसेस जॉरले यांनी दहशतवाद्यांच्या मानवी बॉम्ब याबाबतीत सोमालिया या देशाच्या संदर्भात संशोधन केले. या संशोधनात असे नमूद केले आहे की, सोमालियातील मानवी बॉम्ब स्फोट ही सरकारच्या कुटनितीतील असफलतेमुळे तसेच सैन्याच्या दहशतवादा विरुद्धच्या विविध मोहीमाविरुद्ध प्रतिक्रिया आहे. त्याचप्रमाणे मानवी बॉम्ब स्फोट ही संकल्पना सोमालियातील दहशतवाद्यांच्या विचारसरणी विरुद्ध असून यांचा मुख्य उद्देश पोलीसांना व त्या अनुषंगाने सरकारला जास्तीत–जास्त नुकसान व्हावे असा असल्याचे निदर्शनास येते.[३३]

---

३२ Garner George, Case Studies in Exploiting Terrorist Group Divisions with Disinformation and Divisive/Black Propaganda, Journal of Terrorism Research, Volume 1, Issue 1, pp. 1-11

३३ Dr Hansen Stig Jarle, Revenge or Reward? The case of Somalia's suicide bombers, Journal of Terrorism Research, Volume 1, Issue 1, pp. 12-32

मार्टीन गॅलाघर यांनी गॉस गोव विमानतळावर २००७ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्यानंतर विविध प्रसार माध्यमांमध्ये प्रकाशित झालेल्या माहितीचे विश्लेषणात्मक अध्ययन केले. या संशोधनात प्रकाशित झालेल्या विशिष्ट माहितीचे जसे—गुप्त संकलन करणाऱ्या लोकांचे वय, रोजगार व जन्मस्थान. या माहितीचे विश्लेषण करुन दहशतवादी हल्या संदर्भात संपादीत केलेल्या माहितीचा वृत्तसंकलन करणाऱ्या लोकांच्या जाती व जन्मस्थानाशी असलेला संबंध बघण्यात आला. या संशोधन कार्यातील निष्कर्ष असे दर्शवितो की, बहुतांश आशिया खंडातील लोकांबद्दल वृत्तप्रकाशित होते तर इतर भागातील लोकांबद्दल कमी प्रमाणात माहिती प्रकाशित करण्यात येते.[३४]

एकॉएस वेरा यांनी तुरकी या देशातील सामाजिक परिस्थिती व त्या अनुषंगाने संपूर्ण समाजाच्या मानसिकतेवर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन केले. एकंदरीत पाहता समाजाच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये शिक्षणाचा अभाव व हालाखीची आर्थिक परिस्थिती असल्याचे आढळते. तसेच, तुरकी या राष्ट्राचा समावेश युरोपीयन युनियनमध्ये न होणे ज्याचे प्रमुख कारण सामाजिक—राजकीय व आर्थिक सुधारणांचा अभाव आहे.[३५]

झुहूर शरीफा यांनी केलेल्या संशोधनामध्ये असे नमूद केले आहे की, सद्य: परिस्थितीत मुस्लिमांमधील अंतर्गत कलह बऱ्याच प्रमाणात त्यांच्यात अशांतीसाठी कारणीभूत आहे. सुधारमतवादी व पुराणमतवादी यांच्यामधील वैचारीक कलह बऱ्याच प्रमाणात सामाजिक अशांतीचे कारण आहे. या तसेच

---

३४ Gallagher Martin, An Analysis of the Public Reporting to Lothian and Borders Police on Perceived Terrorism-Related Matters after the Glasgow Airport Terrorist Attack in 2007, Journal of Terrorism Research, Volume 1, Issue 1, pp. 33-44

३५ Eccarius-Kelly Vera, Unresolved Questions and another Crossroads in Turkey, Volume II, Issue I, 2008, P.3

इतर कारणांमुळे मुस्लिम जनतेमध्ये बऱ्याच अंशी संभम्र असून त्यांच्यामध्ये दहशतवादाची उत्पत्ती होत असल्याचे आढळते.[३६]

जेफरी कपलान व प्रो. डेव्हीड रॉकोपोट यांनी प्रस्तुत केलेला दहशतवादाबद्दलचा सिद्धांताची समिषा केलेली आहे. त्यांच्याप्रमाणे डॉ. रॉकोपोट यांनी जगातील विविध भागातील दहशतवादी सघटंनाचे अध्ययन करुन त्यांच्यातील समानता प्रस्तुत केलेली आहे. त्यांच्याप्रमाणे विविध दहशतवादी संघटनांचा उगम त्यांच्या सांस्कृतिक इतिहासावरुन लक्षात येतो. यावरुन हे प्रकर्षाने निदर्शनास येते की, सामाजिक तसेच सांस्कृतिक इतिहास बऱ्याच अंशी दहशतवादांच्या तिव्रतेसाठी कारणीभूत असतो.[३७]

रिचर्ड जॅस्कन यांच्याप्रमाणे आज जगात दहशतवादांच्या दोनशेहून अधिक व्याख्या अस्तित्वात आहे. त्यांच्याप्रमाणे इतक्या जास्त प्रमाणात विविध संशोधकांनी मांडलेल्या व्याख्यांमुळे दहशतवादा संदर्भातील सिद्धांतीक विकासात अडथळे निर्माण होत आहे व दहशतवादा संदर्भातील संशोधन अपेषेनुरुप गती प्राप्त करीत नाही. संशोधकाप्रमाणे दहशतवादांच्या व्याख्येवर होत असलेल्या वादांमुळे दहशतवादाला सरकार व गैरसरकारी यंत्रणा विविध दृष्टीकोनातून बघतात. ज्यामुळे त्यांचे प्रयत्न खऱ्या अर्थाने दहशतवादांचा नायनाट करण्यास बऱ्याच अंशी अपुरे ठरतात. त्याचप्रमाणे दहशतवादांच्या विविध व्याख्यांमुळे न्याय व्यवस्था तसेच पोलीस यंत्रणा यांच्या कार्यक्षमतेवर देखील परिणाम होतो. म्हणून एक सर्वमान्य दहशतवादांची व्याख्या अत्यंत आवश्यक आहे. ज्यामुळे सामाजिक एकात्मता जपण्यास फार मोठी मदत होईल. या व्याख्यांमुळे बऱ्याच

---

३६ Zuhur Sherifa, Opinion Brief: Wars of Our Own Creation, Volume II, Issue I, 2008, P. 12

३७ Kaplan Jeffrey, Terrorism's Fifth Wave: A Theory, A Conundrum and a Dilemma, Volume II, Issue 2, 2008, P.12

वेळा काही विशिष्ट समुह दहशतवादी समुह म्हणून स्थापन होतात ज्यामुळे त्यांची विविध यंत्रणाकडून बऱ्याच वेळा अवहेलना होते व त्यांच्याकडे संन्यहास्पद दृष्टीकोनातून बघितले जाते.[३८]

लुई कोटे व इन्द्रिया सलिनास यांनी दहशतवाद्यांकडून झालेल्या आत्मघाती हल्ल्यांची सफलता हल्ला करणाऱ्यांच्या मृत्युवर अवलंबून असते. बऱ्याच प्रमाणात आत्मघाती बॉम्ब स्फोट सर्वात अधिक विनाशकारी प्रवृत्ती दर्शक असल्याचे आढळते. इतिहासीक दृष्टीकोनातून बघितल्यास आत्मघाती हल्ल्याचे प्रमाण दिवस–न–दिवस वाढत असल्याचे आढळते. आत्मघाती हल्ल्यांची वाढ काही विशीष्ट भागापुरती (देशापुरती) मर्यादीत नसून सर्व कमी अधिक प्रमाणात होत असल्याचे आढळते. या प्रकारचे हल्ल्यांची नोंद लेब्यानॉन, इझराईल, श्रीलंका, भारत, इराक, स्पेन, इफगानिस्तान, पाकिस्तान, अलजीरीया, मुरोको, उझबेकीस्तान इत्यादी ठिकाणी झाल्याचे आढळते.[३९]

चार्ल्स प्याडीस यांनी आपल्या संशोधनात स्थानीय पोलीस गुप्तचर संघटना इत्यादी दहशतवादाला निभवण्यासाठी फार महत्वपूर्ण घटक असल्याचे नमूद केले. त्यांच्याप्रमाणे स्थानीय पोलीसांना विविध दहशतवादी संघटनांचा उगम कसा झाला त्यांच्या कार्यशैलीमध्ये कसे–कसे बदल झाले हे माहिती असल्यामुळे दहशतवाद्यांची लढतांना त्यांना तसेच त्यांच्या कुटूंबातील इतर सदस्यांना बऱ्याच अंशी आत्मविश्वास असतो. अशा स्थानीय भागातील पोलीसांना कुठल्या दहशतवादी–नक्षलवादी गटांचा सामान्य जनतेवर कसा प्रभाव

---

३८ Jackson Richard, An Argument for Terrorism, Volume II, Issue 2, 2008,P. 25

३९ Corte Luis de la and Giménez-Salinas Andrea, Suicide Terrorism as a Tool of Insurgency Campaigns: Functions, Risk Factors, and Countermeasures, Volume III, Issue 1, 2009, P. 11

आहे याची माहिती असते. ज्यामुळे त्यांच्या स्वत:च्या सामाजिक व मानसिक स्थितीमध्ये कमी प्रमाणात नकारात्मक प्रभाव होतो.[४०]

टॉम क्युजीन यांनी केलेल्या संशोधनामध्ये अल कायदा या दहशतवादी संघटनेकडे तरुण मुले का आकर्षित होतात याचे अध्ययन केले. यांच्या संशोधनात त्यांनी अल कायदा संघटनेची विचारधारा व तिचा तरुणांवर होणारा प्रभाव यांचे अध्ययन केले. त्यांच्याप्रमाणे या विचारधारेत आठ प्रमुख घटकांचा समावेश आहे. ज्यांचा उपयोग तरुण मुलांची मने दहशतवादाकडे वळविण्यासाठी होते. संशोधकाप्रमाणे या सर्व घटकांचा सखोल अभ्यास केल्यास अल कायदा दहशतवादी संघटनेचा विरोध करणे शक्य होईल. [४१]

नाकोस बिगेट यांनी केलेल्या संशोधनात असे नमूद केले आहे की, विविध क्षेत्रातील दहशतवादी इतर संघटनांनी केलेल्या दहशतवादी हल्ल्यांचे अनुकरण करतात जे प्रसार माध्यमांनी प्रकाशित केलेल्या माहितीच्या आधारावर असते. जरी विविध दहशतवाद संशोधक, सरकारी अधिकारी, पत्रकार, यांनी दहशतवादा संदर्भात विविध प्रश्नांचा मागोवा घेतलेला आहे. तरी या सर्वांचे निष्कर्ष वेगवेगळे आहेत. सद्य:स्थितीत माहिती व तंत्रज्ञानातील क्रांतीकारी विकासामुळे जरी माहितीचे आदान–प्रदान अत्यंत गतिमान झाले आहेत तरीही दहशतवाद्यांना नवनविन कल्पना या प्रसार माध्यमांमधून प्राप्त होतात.[४२]

लेविट मॅथ्यू यांनी केलेल्या संशोधनात असे नमूद केले आहे की, सिरीया या देशात दहशतवाद्यांनी विदेशी दहशतवाद्यांच्या हालचालीसाठी एक उत्तम

---

४० Faddis Charles S., A Perspective on Intelligence Reform, Volume III, Issue 1, 2009, P.20

४१ Quiggin Tom, Understanding al-Qaeda's Ideology for Counter-Narrative Work, Volume III, Issue 2, 2009, P.18

४२ Nacos Brigitte L., Revisiting the Contagion Hypothesis: Terrorism, News Coverage, and Copycat Attacks, Volume III, Issue 3, 2009, P.3

यंत्रणा बनविली आहे ज्यांच्या माध्यमातून ते ईराक देशात या दहशतवाद्यांना पाठवितात. या संशोधनातील मुख्य निष्कर्ष असे दर्शवितात की, प्रामुख्याने दहशतवादी हे स्वत: राहत असलेल्या भौगोलिक क्षेत्रापासून दूर क्षेत्रात दहशतवादी कृत्यांचे प्रशिक्षण प्राप्त करतात, त्याचप्रमाणे आर्थिक जुळवाजूळव देखील करतात. दहशतवाद्यांच्या कृत्यामध्ये कमतरता आणण्यासाठी त्यांच्या आर्थिक घटकांबाबत परिणामकारक धोरण बनविणे आवश्यक आहे.[४३]

भारतातील अनेक राज्यातील नक्षलवाद आपल्या दारापर्यंत आला आहे. बिहार—आंध्रप्रदेशातील नक्षलवाद गडचिरोली सारख्या घनदाट अरण्यांत पोहचला आहे. दहशतवादा बरोबरच ही एकमेव समस्या असल्याचे दिसून येत आहे. हा प्रश्न देशांचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनाही पडला आहे.

१. परराष्ट्रखात्याच्या म्हणण्यानुसार ''व्यक्तीनं वा गटाने राजकीय हेतुने दिलेली धमकी वा केलेली हिंसा म्हणजे दहशतवादयाप्रमाणे नक्षलीकृत्य होय'' त्यांच्या कृत्यानं, प्रत्यक्ष बळीपेक्षा जास्त मोठया गटाला जेव्हा धक्का, हादरा किंवा भिती बसते तेव्हा ते कृत्य दहशतवादयाप्रमाणे असते.

२. आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक डॉ. शरदचंद्र गोखले यांच्या म्हणण्याप्रमाणे ''दहशतवादी (नक्षलवादी) कृत्य राजकीय हेतूने समाजामध्ये दहशत निर्माण करण्याचा संघठीत प्रयत्न होय''.

३. या व्याख्यापेक्षाही वेगळे विश्लेषण विरेंद्रकुमार गौड यांनी केले आहे. त्यांच्यामते ''समाजवाद साम्राज्यवाद, और मार्क्सवाद से पिडीत या प्रेरीत होकर अनेक उग्रवादी संघठन जनमें, लेकिन कुच मिलकर विचारधाराओं

---

४३ Levitt Matthew, Foreign Fighters and Their Economic Impact: A Case Study of Syria and al-Qaeda in Iraq (AQI), Volume III, Issue 3, 2009, P.14

पर आधारीत आंतकवादी कृत्यों का वर्गीकरण विश्वभर में करना कठीन है।[४४]

'नक्षलवाद' या संकल्पनेला भारतीय सामाजिक चळवळींच्या इतिहासात एक विशेष अर्थ आहे. नक्षलवादी आंदोलन गेल्या तीस वर्षांत कधी गनिमी पद्धतीने, तर कधी आक्रमकपणे भारतीय राजकारणात आणि समाजकारणात चर्चेचे केंद्र बनले आहे.[४५]

सामाजिक चळवळींचा संबंध सामाजिक बदल अथवा सामाजिक चौकटीशी आहे. या चळवळी किंवा आंदोलने सामाजिक परिवर्तनासाठी किंवा परिवर्तनविरोधीही असू शकतात. पण प्रचलीत समाजव्यवस्थेत स्थित्यंतर घडवून आणणारी चळवळ म्हणजे सामाजिक आंदोलन, या व्याख्येसंबंधी सर्वांचे एकमत आहे.[४६]

सामाजिक चळवळी या सामाजिक रचनेतून अथवा त्या रचनेच्या काही वैशिष्टयांतून निर्माण होतात. याचा अर्थ असा की, समाजरचनेत घडून येणाऱ्या स्थित्यंतरांना प्रतिसाद म्हणून काही सामाजिक चळवळी उदयास येतात आणि त्याचा परिणाम म्हणून समाजरचनेत बदल घडून येत असतो. याप्रकारे सामाजिक परिवर्तन आणि चळवळी यांचा संबंध जवळचा असतो.

सामाजिक आंदोलनालाही स्वत:ची एक चौकट असते. सामाजिक आंदोलनामुळे सामाजिक चौकटीवर परिणाम होत असतो. त्या चौकटीतून आंदोलने निर्माण होतात.

---

४४ किर्ती मिलींद, 'दहशतवाद : न्युआर्क ते खैरलांजी' सुगावा प्रकाशन, पूणे, २००८, पृष्ठ क्र. १३–१४.

४५ प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००९.

४६ प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००९.

''१९६७ मध्ये पश्चिम बंगालच्या उत्तरेकडील जिल्हयात जलपैगुडी उपविभागात नक्षलबाडी येथे एक स्वयंस्फूर्त किसान आंदोलन सुरू झाले. स्वातंत्र्यपूर्व काळातही बंगालमध्ये बटाईदारांना कुळांचे अधिकार आणि संरक्षण मिळवून देण्यासाठी सन १९४६–४७ मध्ये 'ते भाग' हे आंदोलन झाले होते. कम्युनिस्ट चळवळीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनाने उग्र रूप धारण केले होते. परंतु, स्वातंत्र्याप्राप्ती आणि त्यासोबत आलेल्या विभाजनातून बंगालमध्ये जातीय आणि राजकारण उसळले. त्यानंतरच्या राजकीय घडामोडी आणि पक्षीय राजकारणात विकासाचे अग्रक्रम बदलले आणि बटाईदारांचा दशकानुदशके प्रलंबित असलेला प्रश्न राज्यकर्त्यांच्या दृष्टिआड झाला. त्याचाच परिणाम नक्षलवादी चळवळ सुरू होण्यास झाला.

नक्षलवादी आंदोलनाची दोन खास वैशिष्टये सांगता येतील. एक म्हणजे ते आंदोलन सकृदर्शनी स्थानिक स्वरूपाचे आहे. दुसरे, या आंदोलनाने उघडपणे हिंसाचाराचा वापर करण्यास प्रतिष्ठा दिली''.[४७]

गेल्या तीन दशकांत नक्षलवादी आंदोलनात जी तीन स्थितंतरे झाली आहेत त्यांचा विचार करणे प्रथम आवश्यक आहे.

अ) या उग्र आंदोलनाचे स्वरूप आता स्थानिक राहिलेले नाही. नक्षलवादी चळवळ ही देशाच्या वेगवेगळया भागांतही पसरली. तरीपण त्या–त्या प्रदेशांत चळवळींचा प्रभाव स्थानिक पातळीवरच मर्यादित होता.

ब) बटाईदारांच्या प्रश्नांतून निर्माण झालेले हे आंदोलन त्या प्रश्नांतुन बाहेर आले आणि सर्वच शोषित वर्गाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यापर्यंत त्याच्या कार्यक्षेत्राचे क्षितिज विस्तृत होत गेले.

---

४७ डॉ. गोविंद गा. रे., 'नक्षलवाद व आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे २००२, पृष्ठ क्र. ७–८.

क) शोषित वर्गांच्या प्रश्नांवर त्यांच्या सामाजिक संदर्भामध्ये नक्षलवादी नक्षलवादी चळवळीने प्रवेश केला व ही चळवळ केवळ बंगालपुरती मर्यादित न राहता इतर राज्यांतही पसरली. बिहार, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब इत्यादी राज्यांतही या आंदोलनाचा विस्तार झाला. त्यातुन पुढे काही स्थित्यंतरे झाली.

एक म्हणजे मार्क्सवाद–लेनिनवाद यांचा भिन्न प्रकारे अर्थान्वय (Interpretations) करणारे नेतृत्वगट चळवळीमध्येच तयार झाले. याचा परिणाम म्हणजे या विविध गटांमध्ये ध्येयधोरणा आणि आंदोलनाची रणनीती यांविषयी मतैक्य राहिले नाही. त्यांच्यातील मतभिन्नता ही अगदी टोकाला पोचली. त्यामुळे भारतीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहातील जे दोन डावे पक्ष होते, त्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्यामधून नक्षलवादी चळवळीचे उग्रवादी नेतृत्व आपोआपच उदयाला आले.

सामाजिक चळवळींचे वैचारिक अधिष्ठान कसे असावे, याविषयी नक्षलवाद्यांनी क्रांतिकारक भूमिका मांडली. ती भुमिका परंपरागत पोथीनिष्ठ मार्क्सवाद–लेनिनवादाला छेद देणारी होती. त्यामुळे संपुर्ण डाव्या अंगानी चालणाऱ्या परंपरागत चळवळीला एका अर्थाने हादरा बसला. कारण ती परंपरागत चळवळ त्यावेळी उदामतवादी राजकारणाच्या जवळ येऊ लागली होती. त्यामुळे डाव्या चळवळीला अंतर्गत आव्हानच नक्षलवादाच्या रूपाने निर्माण झाले आणि सामाजिक चळवळींच्या इतिहासात नवे पर्व सुरू झाले.''[४८]

''इ.स. १९६७ पासून भारताच्या राजकीय–सामाजिक क्षेत्रात नक्षलवाद हा शब्द प्रचलित झाला. अल्पकाळातच नक्षलवादी आंदोलन भारतात अनेक प्रदेशांत पसरले. माओवादी साम्यवाद्यांचा हा जहाल क्रांतिकारक गट अखिल भारतीय

४८ प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००९.

स्वरूपाचा नसला तरी त्याचे अस्तित्व, हालचाली, कारवाया, त्याचे एक राजकीय–सामाजिक तत्वज्ञान या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर हे आंदोलन नगण्य तर नाहीच, पण राजकीय नी राष्ट्रीय क्षेत्रात एक नवे आव्हान म्हणून त्या लढयाला निश्चितच महत्व प्राप्त झाले.

माओवादी क्रांतिकारकांच्या लढयाची सुरूवात पश्चिम बंगालच्या उत्तर भागातील 'नक्षलवादी' या ग्रामीण भागात झाल्यामुळे एकुणच लढयाला 'नक्षलवाद आंदोलन' असे नामाभिधान प्राप्त झाले. तेथून ही चळवळ भारताच्या अन्य प्रदेशांत पसरली. भारतासारख्या विशाल देशाच्या एका कोपऱ्यात एका ग्रामीण भागात, वरवर पाहता अनपेक्षित आणि राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त असे, हे 'माओवाद्यांच्या नेतृत्वाखालील किसान आंदोलन' जसे प्रक्षोभक होते, तसेच भारतीय कम्युनिस्टांची व एकुणच लोकशाही मार्गाचे अनुसरण करणाऱ्या व मधून–मधून गरिबांच्या आर्थिक प्रश्नांवरून आंदोलन करणाऱ्या पक्षांचीही झोप उडवणारे ठरले.''[४९]

नक्षलवादी चळवळीचा मागोवा घ्यायचा तर ३०–३५ वर्षे मागे जावे लागेल. १९६२ साली झालेल्या भारत चीन युद्धाच्या पार्श्वभुमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्षात मोठी फुट पडली. त्यातुन भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सी.पी.आय्.) आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी (सी.पी.आय्.एम्) असे दोन गट उदयाला आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे मवाळ धोरण पक्षातीलच एका मोठया गटाला मान्य नव्हते. आंध्र प्रदेशामधील पक्ष अधिवेशनात त्याचा पुढे स्फोट झाला. पक्षनेतृत्वाने जहान गटाचे म्हणणे फेटाळले. त्याचा परिणाम ज्योती बसू, रणदिवे वगैरेंनी पक्ष सोडला आणि ''मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष'' या नावाचा आर्थिक कडवा पक्ष काढला. या नव्या पक्षाने १९६७ च्या निवडणुकीत भाग

---

४९ डॉ. गा.रे. गोविंद 'नक्षलवाद व आदिवासी'आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे २००२, पृष्ठ क्र. ८.

घेतला तेव्हा ''क्रांतीचा मार्ग टाकून संसदीय मार्ग स्विकारलात काय? असा प्रश्न या पक्षातील तरूण विचार लागले. ''बंगाला काँग्रेस'' या काँग्रेसमधील फुटीर गटाशी हातमिळवणी करून हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सत्तेवरदेखील आला. तेव्हा ''आता कुठे गेली तुमची क्रांतीवरील निष्ठा?'' असा रास्त प्रश्न विचारात चारू मुजुमदार, कानू संन्याल, विनोद मिश्रा, महादेव मुखर्जी वगैरेंनी पक्ष सोडला आणि नव्या माओवादी (लेनिनवादी) पक्षाची घोषणा केली. या पक्षातून निर्माण झालेली चळवळ पुढे 'नक्षल चळवळ म्हणून नावारूपाला आली.

आमचा पक्ष आणि पक्षाची चळवळ क्रांतीशी एकनिष्ठ आहे हे सिद्ध करण्याची या पक्षाला इतकी घाई झाली होती की, त्यांनी पक्ष स्थापन झाल्याबरोबर पश्चिम बंगालमध्ये सरळ क्रांतीची घोषणाच केली. ही क्रांती अर्थात सशस्त्र होती, परंतु अशा प्रकारच्या उठावाला जी पूर्वतयारी लागते तिचा संपूर्ण अभाव त्यावेळी होता. या अचानक पुकारलेल्या क्रांतीने बंगालमधील कम्युनिस्ट वर्चस्वास आणि भारतातील पहिले बिगर काँग्रेस सरकार कोंडीत सापडले. हे बंड दडपले असते तर सरकार भांडवलशाहीचे हस्तक झाले असून क्रांतीशी गद्दारी करत आहे, असा या नव्या पक्षाचा आरोप खरा ठरला असता. पश्चिम बंगालमधील बिगर काँग्रेस सरकारला शासनकर्ते या नात्याने स्वस्थही राहती येत नव्हते. राज्य शासनाच्या या द्विधा मन:स्थितीचा पुरेपुर फायदा या नव्या पक्षाले घेतला. पश्चिम बंगालचे त्यावेळचे गृहमंत्री ज्योती बसू यांच्याकडून या पक्षाने अभय मिळविले. अवघड जागी दुखणे असल्यामुळे शासनाकडे दुसरा पर्याय उरला नव्हता. नाही म्हटले तरी डाव्या विचारांची नाळ त्यांच्यात समानच असल्यामुळे माओ–लेनिनवादी पक्षाची चळवळ या राज्यात वाढत गेली.

या नव्या क्रांतीकारी पक्षाचे केंद्र उत्तर बंगालमधील 'नक्षलबाडी' क्षेत्रात होते. त्यावरून पुढे या दहशतवादी गटाला 'नक्षलवादी गट' म्हणुन संबोधण्यात येऊ लागले. नक्षलवाद या नावाला तसा काही तात्विक अर्थ नव्हता. परंतु

नक्षलवाद्यांच्या या लढयाला अन्याय, जुलुम, शोषणाविरूद्ध सशस्त्र लढा असे रूप मिळाले. त्यातुन जुलमी जमीनदार, निष्क्रीय राज्यकर्ते, भ्रष्ट शासकीय अधिकारी व पोलीस अशा लोकांच हत्या या जहाल गटाकडून केल्या जाऊ लागल्या व दहशतीचे नवे दालन या चळवळीने प्रस्थापित केले.

''पश्चिम बंगालमध्ये दार्जिलिंग जिल्हयामधील 'नक्षलबाडी' हे एक गाव आहे. नक्षल चळवळीचे अध्वर्यू चारू मुजुमदार यांचे हे गाव. या गावाच्या नजीक बडा मणिराम जोत नावाचे एक गाव आहे. या गावाहून काही तरूणांनी तांदूळ लुटून तो शेजारील नेपाळ देशात नेऊन विकला. ही नक्षल बंडाळीची सुरूवात होती. नागनजोत हे आणखी एक गाव या काळात गाजले. या गावचा जमीनदार नागराय चौधरी हा वृद्ध आणि केवळ नावापुरताच जमीनदार होता. परंतु जमीनदारांविरूद्ध हा लढा असल्याने यात पहिली आहुती या नागराय चौधरीची पडली. या गदारोळात नागरायाची हत्या नक्षलबाडीत झाली अशी वार्ता सर्वत्र पसरली. त्यामुळे बंडाळी करणाऱ्या या पक्षाच्या लोकांना 'नक्षलवादी' ही उपाधी कायमची चिकटली आणि त्यांच्या हिंसाचाराला 'वाद' असा तात्विक अर्थ त्यांनीच लावला''.[५०]

''पश्चिम बंगालमधील नक्षलवादी चळवळ सलग तीन वर्षे टिकली. हजारोंचे बळी या हिंसाचारात पडले. त्यात जमीनदारांपासून कोलकत्यातील सामान्य वाहतुक नियंत्रक पोलिसांपर्यंत सर्वांचा समावेश होता. याच सुमारास पश्चिम बंगालमधील अनेक पक्षांचे संयुक्त सरकार कोसळले आणि सिद्धार्थ शंकर रे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सत्तेवर आली. त्यांनी आल्या आल्या काही महिन्यांतच या नक्षलबंडाळीवर अक्षरक्ष: वरवंटा फिरवला. साम–दाम–दंड–भेद या सर्वांचा वापर झाला. चारू मुजुमदार पकडले गेले. कोलकत्यातील 'लाल

---

५० डॉ. गोविंद गा.रे.,'नक्षलवाद व आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे २००२, पृष्ठ क्र.९.

बझार' तुरूंगात त्यांचा पुढे अंत झाला आणि चीनच्या 'पीपल्स डेली' या वृत्तपत्राने "Spring Trhunder over India", ''तथाकथित क्रांती विझून गेली'' असे शेवटी वर्णन केले.''[५१]

''नक्षलबाडीतील हा उठाव जरी फसला, तरी भुमिगत कार्यकर्त्यांनी आपापले स्वतंत्र अस्तित्व कायम राखून क्रांती अद्याप संपली नसल्याची घोषणा केली. परिणामी त्यातून अनेक नक्षलवादी गट उदयास आले. वेगवेगळया ठिकाणी स्थानिक जनतेला स्थानिक प्रश्नांवरून भडकावण्याचे कार्यक्रम सुरू झाले. भारत हा एक देश नसून यात अनेक देश आहेत, अशी 'अनेक राष्ट्रवादाची' नवी संकल्पना पुढे आणण्यात आली.''

आज भारताच्या विविध भागांत नक्षलवाद्यांचे सत्तावीस गट कार्यरत आहेत. या सर्वांची हिंसाचारातून क्रांती घडवण्याच्या संकल्पनेवर निष्ठा आहे. या विविध गटांच्या मार्फत बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालमधील आदिवासींना चिथावण्यात आले. झारखंडच्या चळवळीला जोर मिळाला. झारखंड चळवळ उभारणाऱ्या संतोष राणा, विनोद मिश्रांनी नक्षलवाद्यांकडूनच दीक्षा घेतलेली होती. परंतु पुढे विनोद मिश्रा यांनी 'इंडियन पीपल्स फ्रंट' हा राजकीय पक्ष काढून राजकारणात प्रवेश केला. आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश व महाराष्ट्रातील कोंडापल्ली सीतारामय्या उर्फ के.एस. यांच्या नेतृत्वाखालील 'पीपल्स वॉर ग्रुप' ही संघटना मात्र कडवीच राहिली.

''विखुरलेल्या नक्षलवादी संघटना देशभर एम्.सी.सी. (माओईस्ट को–ऑर्डिनेशन कमिटी) या नावाने एका सुत्रात बांधण्याचा प्रयत्न त्या काळात झाला. पीपल्स वॉर ग्रुपचाही त्यात सहभाग होता. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हयात रेड्डी गट त्यावेळी कार्यरत होता. मुंबईतील काही सुशिक्षित नक्षलवादी विचाराच्या

---

५१ डॉ. गोविंद गा.रे., 'नक्षलवाद व आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे २००२, पृष्ठ क्र. १०–११.

मंडळींनी या गटांमध्ये समझोता घडवून आणला. पश्चिम बंगाल ते तामिलनाडू असा अतिरेकी चळवळींनी व्यापलेला पट्टाच त्यातून तयार झाला. त्याला पंजाब, कश्मीर, आसामातील अतिरेक्यांची साथ पुढे मिळाली.''

''पूर्वीच्या अनेक गटांत सामंजस्य नव्हते. पण समझोत्यानंतर यांच्यात शास्त्रांची देवाणघेवाण वाढली. नक्षलवादी प्रचारपत्रकात काश्मीरच्या चळवळीचा उल्लेख 'स्वातंत्र्य– चळवळ' असा होऊ लागला. १९६७ मध्ये नक्षलवादी जनतेच्या शस्त्राने लढत होते. धनुष्यबाण व कुऱ्हाड अशी ती हत्यारे होती. पण त्यानंतर परिस्थिती पालटली. अत्याधुनिक शस्त्रांनिशी नक्षलवादी सज्ज झाला. केरळ, आंध्र, मध्य प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालमध्ये त्यांचे सक्रीय कार्यकर्ते वाढले. शिवाय पंजाब, काश्मीर आणि आसाममधील अतिरेकी कारवायांनी हा देश सतत पोखरला जात असतांना त्यांना कधी नव्हे अशी परिस्थिती अनुकूल बनत गेली. १९६७ मधील त्यांचा उठाव मोडण्यास सरकारला सैन्यास पाचारण करावे लागले आणि उठाव मोडण्यास तब्बल चार वर्षे लागली. आज देशभरात दहा हजारांच्या आसपास नक्षलवाद्यांची सशस्त्र फळी उभी आहे. आदिवासी, शेतमजूर, काही प्रमाणावर दलित यांची त्यांना सहानुभूती आहे. पोलीसही त्यांच्याविरूद्ध मनापासून कारवाई करीत नाहीत, हे अनेक राज्यांतील परिस्थितीवरून स्पष्ट झालेले आहे. पाच–सहा टोपण नावे असलेल्या आणि स्वत:चा पत्ता नसलेल्या नक्षलवाद्यांना पोलिसांनी पकडले तरी, त्यांच्या जमिनीचाही तात्काळ व्यवस्था होते. पोलिसांच्या गाडया जंगलात लांबवर जाऊ शकत नाहीत. स्थानिक जनतेने पोलिसांना सहकार्य मिळत नाही अशी आजची परिस्थिती आहे.''[५२]

''ओढयातले पाणी उपसून उपसून हजारो टन पिकवले,
पण एक शीत नाही पानात माझ्या, एक शीत नाही जेवणात.''

---

५२ डॉ. गोविंद गा.रे., 'नक्षलवाद व आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे २००२, पृष्ठ क्र. ११.

असे गाणे जेव्हा चेराबंडा राजू आपल्या पहाडी आवाजात लोकगीतांच्या चालीवर आदिवासींसमोर म्हणायचा तेव्हा आदिवासींची भुक त्यांना बरोबर जाणवायची.

''मी झाडे कापणे थांबवणार नाही, जरी जीवन आहे त्यांच्यात
मी पाने खुडणे थांबवणार नाही, जरी ती निसर्गाला सौंदर्य देतात
मी फांद्या तोडणे थांबवणार नाही, जरी त्या झाडांचे हातच आहेत
कारण मला हवी आहे एक झोपडी.''

चेराबंडा राजुच्या या कवितेत उपरोध ठासून भरलेला आहे. एकासाठी जे सौंदर्य आहे, तेच दुसऱ्यासाठी जीवन, हे सजीव प्राणीमात्राचे आणि मानवाचे जीवतत्व त्यात सांगितले आहे.

आज विकासाच्या प्रक्रियेत सर्वसामान्य आदिवासी पूर्णपणे भरडला गेला आहे. त्याची जंगले शेती, जमीन गेली, जल गेले. त्याच्या बदल्यात त्याला काही मिळाले नाही. तो पूर्णपणे नागवला गेला आहे; अन्याय आणि शोषणाचा तो बळी झालेला आहे. त्यामुळे त्याच्या मनात प्रचंड क्षोभ आहे. विकासप्रक्रियेत तो स्वत:चे अस्तित्व गमावून बसला आहे आणि पुन्हा–पुन्हा तो आपल्या अस्तित्वाचा शोध घेत आहे आणि मनाशी म्हणत आहे, ''बामणाच्या जन्मा जाशील तर लिहून–लिहून मरशील, वाण्याच्या जन्मा जाशील तर तराजू तोलीत मरशील, पण वाल्याच्या जन्मा येशील तर जंगलाचा राजा होशील.'' आदिवासींनी याच भावनेने आजपर्यंत आपले स्वतंत्र अस्तित्व जपलेले आहे. ज्या सहृदयतेने त्यांना हाताळत–हाताळत राष्ट्रीय प्रवाहात आणायचे, ती सहृदयता दुदैवाने सरकारी अधिकाऱ्यांनी, शहरवासियांनी दाखवली नाही.

परिणामी मनातून दुभंगलेल्या या समाजास नक्षलवादी चळवळीचा आधार मिळाला.''[५३]

बिहार, पूर्व उत्तर प्रदेश, बंगाल, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र, मध्य प्रदेश या राज्यांतील काही भागातून नक्षलवाद्यांनी चांगला जम बसविलेला आहे. शेतमजुरांची व आदिवासींची पिळवणूक, जमीनदारी पद्धत, आर्थिक शोषण, स्थानिक राजकारण, विकासातील असमतोल, सरकारी खात्यातील भ्रष्ट कारभार यामुळे या चळवळीला खतपाणी मिळत गेले आहे.

गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादी चळवळ

नक्षलवादी[५४] किंवा नक्सल, नक्सलाईट अशा विविध नावाने ही दहशत पसरविणारी संघटना गडचिरोली जिल्हयात सक्रिय झाली आहे. या संघटनेची स्थापना १९६७ साली बंगालमधील 'नक्सलबाटी' गावात झाली. आजही या संघटनेचे अनेक गट तयार झालेले आहेत. दिनांक २५ मे १९६७ रोजी एका तरूण शेतकऱ्याने न्यायालयातून एक आदेश आणून आपल्या मालकीच्या जमिनीचा ताबा मिळविला. तो जमीन करण्यासाठी शेतात गेला असताना जमिनदाराने हल्ला करून त्याला जखमी केले. हया झालेल्या अन्यायाचा बदला म्हणून आदिवासी लोकांनी जमिनदारांवर हल्ला करून आपल्या जमिनी परत मिळविल्या. तेव्हापासून ही संघटना नक्सल किंवा 'नक्षलवादी' या नावाने ओळखली जावू लागली.

---

५३ डॉ. गारे गोविंद 'नक्षलवादी आणि आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे, २००३, पृष्ठ क्र. १२

५४ प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००९, पृष्ठ.क्र. ४५–४६.

''जनतेचा सशस्त्र लढा उभारून व सशस्त्र बंड उभारून जनतेचे राज्य स्थापन (people's Government) करण्याच्या या गटाला 'नक्षलवाद' संबोधले आहे.

गरीब, आदिवासी, भूमिहीन शेतकरी, शेतमजूर व दलीत जनतेच्या हितासाठी त्यांचे कल्याण करण्याच्या हेतूने 'चारू मुजूमदार' आणि 'कनु संन्याल' यांनी या चळवळीला खरे रूप प्राप्त करून दिले व आपण या जनतेचे प्रतिनिधी आहोत असा दावा केला. रितसर नक्षलवादी पक्षाची स्थापना करून या पक्षाचे नेतृत्व केले. यापूर्वी हे दोघेही कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य होते.

१. चारू मुजूमदाराला चिनी नेता 'माओत्से तुंगची विचारसरणी प्रिय होती. त्याला असे वाटे, भारतीय शोषित वर्ग, शेतकरी, आदिवासी, शेतमजूर, दलितवर्ग यांनी माओचा मार्ग स्विकारावा आणि उच्च वर्गाचे आणि त्यांच्या शासनाचे उच्चाटन करावे' शेतकऱ्यांच्या आदिवासींच्या दु:खाला दारीद्र हेच कारणीभूत आहे. त्यासाठी डावपेच, गनिमीयुद्ध, लपून–छपून युद्ध हल्ले करण्यात सुरूवात केली.

२. सन १९६९ साली या चळवळीत 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया – मार्क्सवादी, लेनिनवादी' या राजकीय पक्षाची स्थापना करण्यात आली. या पक्षात सध्याचे 'नक्षलवादी' गट निर्माण झाले. उदा P.W.G. (People war group) आणि M.C.C. (Maowadi Communist Center) असे आहेत.

'नक्षलवाद' या संकल्पनेला भारतीय सामाजिक चळवळीच्या इतिहासात विशेष अर्थ आहे. नक्षलवादी कारवाया गेल्या तिस वर्षात गनिमी व आक्रमक पद्धतीने भारतीय राजकारणात व समाज कारणात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. हा संपूर्ण देशासमोर चिंतेचा विषय बनत चालला आहे.

कोणत्याही सामाजिक चळवळीचा संबंध सामाजिक परीवर्तन व सामाजिक बदलाशी संबंधीत असतो. परंतु काही आंदोलने परीवर्तन – विरोधी असू शकतात हे या चळवळीने दाखवून दिले आहे.

सन १९६७ साली 'नक्षलबारी या नावावरून 'नक्षलवादी' चळवळीचा स्फोट झाला. डाव्या क्रांतीकारक चळवळीच्या युगाला प्रारंभ झाला. मार्क्सच्या वर्गसंघर्षाचा आणि अंतिम कामगाराचा विजय आणि त्यांचे राज्य' या विचारसरणीच्या पायावर 'नक्षलवादी' पक्षाची स्थापना करण्यात आली.[५५]

या चळवळीतील नेत्यांना राजकीय सत्ता काबीज करावयाची होती, परंतु या चळवळीस अपयश आले. सर्वप्रथम या चळवळीचा जोर बिहार, आंध्रप्रदेश, झारखंड, ओरिसा या राज्यात आढळतो. परंतु गडचिरोलीसारख्या आदिवासी मागासलेल्या जिल्हयांत पुर्णपणे पाळेमुळे रोवल्या गेली आहेत.

सन १९८० च्या सुमारास या पक्षाच्या तिन संघटना निर्माण झाल्यात.

१. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (P.I.M.L.) मार्क्सवादी

२. माओवादी कम्युनिस्ट सेंटर (M.C.C)

३. लिबरेशन पार्टी – मार्क्सवादी (P.I.M)

सन १९८९ नंतर लिबरेशन पार्टीने आपल्या भूमिगत तंत्राचा त्याग करून अन्य पक्षाप्रमाणे निवडणूका लढविण्याचे ठरविले. या पक्षात कलह माजल्याने केवळ 'माओवादी कम्युनिस्ट सेंटर' हाच पक्ष प्रभावी ठरला. याचे खरे स्वरूप म्हणजे पार्टी युनिटी हा नक्षलवादी गट आणि आंध्रप्रदेशातील पिपल्स वॉर गृप (People War Group) यांचे एकीकरण होवून कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' ही पार्टी जन्मास आली. तोपर्यंत M.C.C. या संघटनेने बिहार मध्ये २६ जिल्हयांत

---

५५ प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन पूणे, २००९, पुष्ठ क्र. ५२.

आपला प्रभाव मांडला. 'नक्षलवादी' गटाने शोषीत शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या संघटनांना सोबत घेवून जमीनदाराकडून होणाऱ्या जबरदस्ती, छळ, जुलूम या विरूद्ध बंड केले. या संघटना रेड आर्मी किंवा रेड गार्ड या नावाने ओळखल्या जावू लागल्या. या हत्यारबंद होत्या, ही शस्त्रे, बंदुका जमीनदार व पोलिस यांच्याकडून हिसकावून नक्षल संघटना प्रबळ झाली होती. परंतू –

१. सी.पी.आय. डाव्या पक्षाने देशाच्या कॉग्रेस पक्षाशी एकी केल्यामुळे नक्षल संघटना एकाकी पडली. हाच पहिला धक्का होय.

२. सोबत या एकीकरणामुळे सरंजामशाही, जमीनदार या विरूद्ध बंड करण्याचे ध्येय नष्ट झाले. हा दुसरा धक्का होय.

३. या चळवळीचे कार्यक्षेत्र दुरवर पसरलेले असल्याने त्यांना एकत्रित आणणे कठीण झाले. चळवळीतील परस्परातील द्वेश, वैमनस्य, चुरस यामुळे चळवळीला वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

भारतातील अनेक राज्यातील नक्षलवाद आपल्या दारापर्यंत आला आहे. बिहार–आंध्रप्रदेशातील नक्षलवाद गडचिरोली सारख्या घनदाट अरण्यांत पोहचला आहे. दहशतवादा बरोबरच ही एकमेव समस्या असल्याचे दिसून येत आहे. हा प्रश्न देशांचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनाही पडला आहे.

४. परराष्ट्रखात्याच्या म्हणण्यानुसार ''व्यक्तीनं वा गटाने राजकीय हेतुने दिलेली धमकी वा केलेली हिंसा म्हणजे दहशतवादयाप्रमाणे नक्षलीकृत्य होय'' त्यांच्या कृत्यानं, प्रत्यक्ष बळीपेक्षा जास्त मोठया गटाला जेव्हा धक्का, हादरा किंवा भिती बसते तेव्हा ते कृत्य दहशतवादयाप्रमाणे असते.[५६]

---

५६ किर्ती मिलींद, 'दहशतवाद : न्युआर्क ते खैरलांजी' सुगावा प्रकाशन, पूणे, २००८, पृष्ठ क्र. १३–१४.

५. आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक डॉ. शरदचंद्र गोखले यांच्या म्हणण्याप्रमाणे ''दहशतवादी (नक्षलवादी) कृत्य राजकीय हेतूने समाजामध्ये दहशत निर्माण करण्याचा संघठीत प्रयत्न होय''.

६. या व्याख्यापेक्षाही वेगळे विश्लेषण विरेंद्रकुमार गौड यांनी केले आहे. त्यांच्यामते ''समाजवाद साम्राज्यवाद, और मार्क्सवाद से पिडीत या प्रेरीत होकर अनेक उग्रवादी संघठन जनमें, लेकिन कुच मिलकर विचारधाराओं पर आधारीत आंतकवादी कृत्यों का वर्गीकरण विश्वभर में करना कठीन है।

'नक्षलवाद' या संकल्पनेला भारतीय सामाजिक चळवळींच्या इतिहासात एक विशेष अर्थ आहे. नक्षलवादी आंदोलन गेल्या तीस वर्षांत कधी गनिमी पद्धतीने, तर कधी आक्रमकपणे भारतीय राजकारणात आणि समाजकारणात चर्चेचे केंद्र बनले आहे.

सामाजिक चळवळींचा संबंध सामाजिक बदल अथवा सामाजिक चौकटीशी आहे. या चळवळी किंवा आंदोलने सामाजिक परिवर्तनासाठी किंवा परिवर्तन विरोधीही असू शकतात. पण प्रचलीत समाजव्यवस्थेत स्थित्यंतर घडवून आणणारी चळवळ म्हणजे सामाजिक आंदोलन, या व्याख्येसंबंधी सर्वांचे एकमत आहे.

सामाजिक चळवळी या सामाजिक रचनेतून अथवा त्या रचनेच्या काही वैशिष्टयांतून निर्माण होतात. याचा अर्थ असा की, समाजरचनेत घडून येणाऱ्या स्थित्यंतरांना प्रतिसाद म्हणून काही सामाजिक चळवळी उदयास येतात आणि त्याचा परिणाम म्हणून समाजरचनेत बदल घडून येत असतो.[५७] याप्रकारे सामाजिक परिवर्तन आणि चळवळी यांचा संबंध जवळचा असतो.

---

५७ प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००९,

सामाजिक आंदोलनालाही स्वत:ची एक चौकट असते. सामाजिक आंदोलनामुळे सामाजिक चौकटीवर परिणाम होत असतो. त्या चौकटीतून आंदोलने निर्माण होतात.

''१९६७ मध्ये पश्चिम बंगालच्या उत्तरेकडील जिल्हयात जलपैगुडी उपविभागात नक्षलबाडी येथे एक स्वयंस्फूर्त किसान आंदोलन सुरू झाले. स्वातंत्र्यपूर्व काळातही बंगालमध्ये बटाईदारांना कुळांचे अधिकार आणि संरक्षण मिळवून देण्यासाठी सन १९४६–४७ मध्ये 'तेभाग' हे आंदोलन झाले होते. कम्युनिस्ट चळवळीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनाने उग्र रूप धारण केले होते. परंतु, स्वातंत्र्याप्राप्ती आणि त्यासोबत आलेल्या विभाजनातून बंगालमध्ये जातीय आणि राजकारण उसळले. त्यानंतरच्या राजकीय घडामोडी आणि पक्षीय राजकारणात विकासाचे अग्रक्रम बदलले आणि बटाईदारांचा दशकानुदशके प्रलंबित असलेला प्रश्न राज्यकर्त्यांच्या दृष्टिआड झाला. त्याचाच परिणाम नक्षलवादी चळवळ सुरू होण्यास झाला.

नक्षलवादी आंदोलनाची दोन खास वैशिष्टये सांगता येतील. एक म्हणजे ते आंदोलन सकृदर्शनी स्थानिक स्वरूपाचे आहे. दुसरे, या आंदोलनाने उघडपणे हिंसाचाराचा वापर करण्यास प्रतिष्ठा दिली''.[५८]

गेल्या तीन दशकांत नक्षलवादी आंदोलनात जी तीन स्थितंतरे झाली आहेत त्यांचा विचार करणे प्रथम आवश्यक आहे.

अ) या उग्र आंदोलनाचे स्वरूप आता स्थानिक राहिलेले नाही. नक्षलवादी चळवळ ही देशाच्या वेगवेगळया भागांतही पसरली. तरीपण त्या–त्या प्रदेशांत चळवळींचा प्रभाव स्थानिक पातळीवरच मर्यादित होता.

---

५८ डॉ. गा.रे. गोविंद 'नक्षलवाद व आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे २००२, पुष्ठ क्र.७–८.

ब) बटाईदारांच्या प्रश्नांतून निर्माण झालेले हे आंदोलन त्या प्रश्नांतुन बाहेर आले आणि सर्वच शोषित वर्गाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यापर्यंत त्याच्या कार्यक्षेत्राचे क्षितिज विस्तृत होत गेले.

क) शोषित वर्गांच्या प्रश्नांवर त्यांच्या सामाजिक संदर्भामध्ये नक्षलवादी नक्षलवादी चळवळीने प्रवेश केला व ही चळवळ केवळ बंगालपुरती मर्यादित न राहता इतर राज्यांतही पसरली. बिहार, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब इत्यादी राज्यांतही या आंदोलनाचा विस्तार झाला. त्यातुन पुढे काही स्थित्यंतरे झाली.

एक म्हणजे मार्क्सवाद–लेनिनवाद यांचा भिन्न प्रकारे अर्थान्वय (Interpretations) करणारे नेतृत्वगट चळवळीमध्येच तयार झाले. याचा परिणाम म्हणजे या विविध गटांमध्ये ध्येयधोरणा आणि आंदोलनाची रणनीती यांविषयी मतैक्य राहिले नाही. त्यांच्यातील मतभिन्नता ही अगदी टोकाला पोचली. त्यामुळे भारतीय राजकारणाच्या मुख्य प्रवाहातील जे दोन डावे पक्ष होते, त्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्यामधून नक्षलवादी चळवळीचे उग्रवादी नेतृत्व आपोआपच उदयाला आले.

सामाजिक चळवळींचे वैचारिक अधिष्ठान कसे असावे, याविषयी नक्षलवाद्यांनी क्रांतिकारक भुमिका मांडली. ती भुमिका परंपरागत पोथीनिष्ठ मार्क्सवाद–लेनिनवादाला छेद देणारी होती. त्यामुळे संपुर्ण डाव्या अंगानी चालणाऱ्या परंपरागत चळवळीला एका अर्थाने हादरा बसला. कारण ती परंपरागत चळवळ त्यावेळी उदारमतवादी राजकारणाच्या जवळ येऊ लागली होती. त्यामुळे डाव्या चळवळीला अंतर्गत आव्हानच नक्षलवादाच्या रूपाने निर्माण झाले आणि सामाजिक चळवळींच्या इतिहासात नवे पर्व सुरू झाले.''[५९]

---

५९ प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, २००९.

''इ.स. १९६७ पासून भारताच्या राजकीय–सामाजिक क्षेत्रात नक्षलवाद हा शब्द प्रचलित झाला. अल्पकाळातच नक्षलवादी आंदोलन भारतात अनेक प्रदेशांत पसरले. माओवादी साम्यवाद्यांचा हा जहाल क्रांतिकारक गट अखिल भारतीय स्वरूपाचा नसला तरी त्याचे अस्तित्व, हालचाली, कारवाया, त्याचे एक राजकीय–सामाजिक तत्वज्ञान या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर हे आंदोलन नगण्य तर नाहीच, पण राजकीयांनी राष्ट्रीय क्षेत्रात एक नवे आव्हान म्हणून त्या लढयाला निश्चितच महत्व प्राप्त झाले.

माओवादी क्रांतिकारकांच्या लढयाची सुरूवात पश्चिम बंगालच्या उत्तर भागातील 'नक्षलवादी' या ग्रामीण भागात झाल्यामुळे एकुणच लढयाला 'नक्षलवाद आंदोलन' असे नामाभिधान प्राप्त झाले. तेथून ही चळवळ भारताच्या अन्य प्रदेशांत पसरली. भारतासारख्या विशाल देशाच्या एका कोपऱ्यात एका ग्रामीण भागात, वरवर पाहता अनपेक्षित आणि राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त असे, हे 'माओवाद्यांच्या नेतृत्वाखालील किसान आंदोलन' जसे प्रक्षोभक होते, तसेच भारतीय कम्युनिस्टांची व एकुणच लोकशाही मार्गाचे अनुसरण करणाऱ्या व मधून–मधून गरीबांच्या आर्थिक प्रश्नांवरून आंदोलन करणाऱ्या पक्षांचीही झोप उडवणारे ठरले.''[६०]

नक्षलवादी चळवळीचा मागोवा घ्यायचा तर ३०–३५ वर्षे मागे जावे लागेल. १९६२ साली झालेल्या भारत चीन युद्धाच्या पार्श्वभुमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्षात मोठी फुट पडली. त्यातून भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सी.पी.आय्.) आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी (सी.पी.आय्.एम्) असे दोन गट उदयाला आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे मवाळ धोरण पक्षातीलच एका मोठया गटाला मान्य नव्हते. आंध्र प्रदेशामधील पक्ष अधिवेशनात त्याचा पुढे स्फोट

---

६० डॉ. गारे. गोविंद, 'नक्षलवाद व आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान,पूणे २००२, पृष्ठ क्र. ८.

झाला. पक्ष नेतृत्वाने जहान गटाचे म्हणणे फेटाळले. त्याचा परिणाम ज्योती बसू, रणदिवे वगैरेंनी पक्ष सोडला आणि ''मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष'' या नावाचा आर्थिक कडवा पक्ष काढला. या नव्या पक्षाने १९६७ च्या निवडणुकीत भाग घेतला तेव्हा ''क्रांतीचा मार्ग टाकून संसदीय मार्ग स्विकारलात काय? असा प्रश्न या पक्षातील तरूण विचार लागले. ''बंगाला काँग्रेस'' या काँग्रेसमधील फुटीर गटाशी हातमिळवणी करून हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सत्तेवरदेखील आला. तेव्हा ''आता कुठे गेली तुमची क्रांतीवरील निष्ठा?'' असा रास्त प्रश्न विचारात चारू मुजुमदार, कानू संन्याल, विनोद मिश्रा, महादेव मुखर्जी वगैरेंनी पक्ष सोडला आणि नव्या माओवादी (लेनिनवादी) पक्षाची घोषणा केली. या पक्षातून निर्माण झालेली चळवळ पुढे 'नक्षल चळवळ म्हणून नावा रूपाला आली.

आमचा पक्ष आणि पक्षाची चळवळ क्रांतीशी एकनिष्ठ आहे हे सिद्ध करण्याची या पक्षाला इतकी घाई झाली होती की, त्यांनी पक्ष स्थापन झाल्याबरोबर पश्चिम बंगालमध्ये सरळ क्रांतीची घोषणाच केली. ही क्रांती अर्थात सशस्त्र होती, परंतु अशा प्रकारच्या उठावाला जी पूर्वतयारी लागते तिचा संपूर्ण अभाव त्यावेळी होता. या अचानक पुकारलेल्या क्रांतीने बंगालमधील कम्युनिस्ट वर्चस्वास आणि भारतातील पहिले बिगर काँग्रेस सरकार कोंडीत सापडले. हे बंड दडपले असते तर सरकार भांडवलशाहीचे हस्तक झाले असून क्रांतीशी गद्दारी करत आहे, असा या नव्या पक्षाचा आरोप खरा ठरला असता. पश्चिम बंगालमधील बिगर काँग्रेस सरकारला शासनकर्ते या नात्याने स्वस्थही राहती येत नव्हते. राज्य शासनाच्या या द्विधा मन:स्थितीचा पुरेपुर फायदा या नव्या पक्षाले घेतला. पश्चिम बंगालचे त्यावेळचे गृहमंत्री ज्योती बसू यांच्याकडून या पक्षाने अभय मिळविले. अवघड जागी दुखणे असल्यामुळे शासनाकडे दुसरा पर्याय उरला नव्हता. नाही म्हटले तरी डाव्या विचारांची नाळ त्यांच्यात समानच असल्यामुळे माओ–लेनिनवादी पक्षाची चळवळ या राज्यात वाढत गेली.

या नव्या क्रांतीकारी पक्षाचे केंद्र उत्तर बंगालमधील 'नक्षलबाडी' क्षेत्रात होते. त्यावरून पुढे या दहशतवादी गटाला 'नक्षलवादी गट' म्हणुन संबोधण्यात येऊ लागले. नक्षलवाद या नावाला तसा काही तात्विक अर्थ नव्हता. परंतु नक्षलवाद्यांच्या या लढयाला अन्याय, जुलुम, शोषणा विरूद्ध सशस्त्र लढा असे रूप मिळाले. त्यातुन जुलमी जमीनदार, निष्क्रीय राज्यकर्ते, भ्रष्ट शासकीय अधिकारी व पोलीस अशा लोकांच हत्या या जहाल गटाकडून केल्या जाऊ लागल्या व दहशतीचे नवे दालन या चळवळीने प्रस्थापित केले.

''पश्चिम बंगालमध्ये दार्जिलिंग जिल्हयामधील 'नक्षलबाडी' हे एक गाव आहे. नक्षल चळवळीचे अध्वर्यू चारू मुजुमदार यांचे हे गाव. या गावाच्या नजीक बडा मणिराम जोत नावाचे एक गाव आहे. या गावाहून काही तरूणांनी तांदूळ लुटून तो शेजारील नेपाळ देशात नेऊन विकला. ही नक्षल बंडाळीची सुरूवात होती. नागनजोत हे आणखी एक गाव या काळात गाजले. या गावचा जमीनदार नागराय चौधरी हा वृद्ध आणि केवळ नावापुरताच जमीनदार होता. परंतु जमीनदारांविरूद्ध हा लढा असल्याने यात पहिली आहुती या नागराय चौधरीची पडली. या गदारोळात नागरायाची हत्या नक्षलबाडीत झाली अशी वार्ता सर्वत्र पसरली. त्यामुळे बंडाळी करणाऱ्या या पक्षाच्या लोकांना 'नक्षलवादी' ही उपाधी कायमची चिकटली आणि त्यांच्या हिंसाचाराला 'वाद' असा तात्विक अर्थ त्यांनीच लावला''.

''पश्चिम बंगालमधील नक्षलवादी चळवळ सलग तीन वर्षे टिकली. हजारोंचे बळी या हिंसाचारात पडले. त्यात जमीनदारांपासून कोलकत्यातील सामान्य वाहतुक नियंत्रक पोलिसांपर्यंत सर्वांचा समावेश होता. याच सुमारास पश्चिम बंगालमधील अनेक पक्षांचे संयुक्त सरकार कोसळले आणि सिद्धार्थ शंकर रे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सत्तेवर आली. त्यांनी आल्या आल्या काही महिन्यांतच या नक्षलबंडाळीवर अक्षरक्ष: वरवंटा फिरवला. साम—दाम—दंड—भेद

या सर्वांचा वापर झाला. चारू मुजुमदार पकडले गेले. कोलकत्यातील 'लाल बझार' तुरूंगात त्यांचा पुढे अंत झाला आणि चीनच्या 'पीपल्स डेली' या वृत्तपत्राने "Spring Trhunder over India'' ''तथाकथित क्रांती विझून गेली'' असे शेवटी वर्णन केले.''[६१]

१.१२ प्रकाशीत संदर्भ साहित्याचा आढावा :

"अब तो घबराके यह कहते हैं के मर जायेंगे।
मरके भी चैन न पाया तो किधर जायेंगे?"

शहीदांना लाभलेला मृत्यू असा सामान्य माणसांच्या मृत्यू सारखा बैचेनी प्राप्त करुन देणारा नसतो. जवानांच्या नशिबी आलेला मृत्यू त्यांना "शहीद" करुन जातोच. पण भूमातेच्या चरणी देह ठेवला म्हणून एक अत्युच्च समाधान देऊन जातो. आम्ही मागे जीवंत राहिलेले मात्र क्रुर मृत्युला हतबल होवून कवटाळतो. आणि कृमी–किटकासारखे मातीआड होतो किंवा निरर्थक जीवनाची माती करुन मातीत मिळण्यासाठी नदीकाठी जळतो म्हणूनच सर्वसामान्यांना वरील ओळी भेडसावतात. शहीद झालेला जवान मात्र ही सीमा ओलांडून, दैवी समाधानाचे वाटेकरी झालेले असतात, यात संदेह नाही, हे विचार लेखकाने कुशलतेने मांडले आहेत.

श्री. भोर बा.ज., "हरपलेले मोती", भाग–१, गणेश प्रिंटर्स १३४१, राजारामपुरी, कोल्हापूर, २००४.

दहशतवादाची संकल्पना या जगात नवीन नाही. समाजाच्या व राज्य संस्थांच्या घडणीतून आंतकवाद अस्तित्वात आहे. फरक एवढाच की, त्याची

६१ डॉ. गारे. गोविंद 'नक्षलवाद व आदिवासी' आदिवासी विकास प्रतिष्ठान, पूणे २००२, पुष्ठ क्र. ९–१०.

व्याप्ती व स्वरुप सतत बदलत आले आहे. २१ व्या शतकातील दहशतवादाची व्याप्ती अवाढव्य आहे आणि जगाच्या काना–कोपऱ्यात तो पोहोचला आहे.

दहशतवादी संघटना पूर्वी लुटालूट करणे, मिळतील त्या शस्त्रांचा वापर करणे, जंगल–दऱ्याखोऱ्यात लपून आपल्या छावण्या चालवणे इत्यादी मार्गांचा अवलंब करीत असत. त्यात शस्त्रास्त्राची व अमली पदार्थांची तस्करी या मार्गाची २० व्या शतकातील ७० च्या दशकात भर पडू लागली. पूर्वी अशिक्षित समाज आतंकवादाचा आधारस्तंभ होता. पण आता सुशिक्षित समाज त्यात सामील होऊ लागला आहे.

'दहशतवाद' हा 'सामाजिक लढयाची एक पद्धत' आणि 'समस्येच्या निराकरणाचा एक पवित्रा' या स्वरुपात जोपासला जात आहे आणि हे सत्य जनसामान्यांना आत भेडसावत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रा. म.ना. उद्‌गावकर यांनी सखोल अभ्यास करुन २१ व्या शतकातील दहशतवादावर लिहिलेले हे पुस्तक सर्वसामान्यांना अत्यंत उपयुक्त ठरेल यात शंकाच नाही. आपला समाज, आपला भारत आणि आपले जग कोणत्या वास्तवात वावरत आहे हे प्रत्येक वाचकाला यातून समजून येईल.

प्रा. उदगावकर म.न.,'एकविसाव्या शतकातील दहशतवाद' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०,२००९.

उगवत्या पिढीला अंधारात असणाऱ्या जमातीची माहिती असणे अनिवार्य आहे. असा विचार पटल्याची ती साक्ष आहे. ज्या एका विशिष्ट पर्यावरणाचा विलक्षण परिणाम माणसाच्या जडण–घडणीवर होत असतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आदिवासी हे आहेत. डोंगर कपाऱ्यात राहणाऱ्या या आदिवासींचे प्रश्न अगदी सहानुभूतीने समजून घेऊन त्यावर मानवी उपाय शोधले पाहिजेत.

आदिवासींच्या प्रश्नांचे चिंतन करुन त्यावरील उपाययोजना ही आजची गरज आहे. प्राथमिक अवस्थेतील जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे प्रश्न गुंतागुंतीचे तर आहेतच पण त्यांच्यावरील उपाययोजना त्यांच्यावर कोणताही आघात न होता केला पाहिजे. मानवी स्पर्श असलेले उपायच शेवटी अखिल मानवजातीला हितकारक ठरत असतात.

गडचिरोली जिल्हयातील चामोर्शीसारख्या मागास भागात जीवन व्यतीत करुन डोंगरवळणातील अरुंद वाटा पायदळी तुडविणाऱ्या माझ्या सारख्याला अभ्यासक्रमाच्या राजामार्गावरुन चालणे जमले किंवा नाही हे सांगणे कठीण आहे. तो अधिकार अभ्यासू वाचक वर्गाचा आहे.

प्रा. डॉ. कऱ्हाडे बाबु,'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' शिक्षक कॉलनी, चामोर्शी, गडचिरोली, २००४.

ग्लोबलायझेशन मुळे होणाऱ्या जगाच्या फेररचनेत दलित, ओबीसी, आदिवासी व मुस्लिम (डोम) यांचे स्थान काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. जागतिक स्पर्धेत या दुर्बल घटकांनी आत्महत्या कराव्यात किंवा पोलिसांच्या गोळयांना बळी पडावे असे चित्र निर्माण झाले आहे. या ग्लोबलायझेशन मध्ये हिंसाचाराच्या भाषेला अधिक महत्व देण्यात येत आहे. कोणतीही समस्या दमनशक्तीने सोडविता येते, असा प्रचार करण्यात येत आहे. अफगाणिस्तान, इराक, बुद्ध आणि खैरलांजी हत्याकांड यात दमनशाहीचे समान सूत्र आहे. या पुस्तकांची जुळवा–जुळव सुरु असतांनाच खैरलांजीचे हत्याकांड घडले. त्यातून संघपरिवार आणि सनातन्यांचा हिंसक चेहरा पुन्हा एकदा समोर आला. काळजाचे पाणी करणाऱ्या या घटने विषयी तुरळक अपवाद वगळता, राजकारणी व समाजकारणी यांनी मौन पाळले.

आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन समाजात शांतता निर्माण करणे शक्य आहे. मात्र या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेत लोटण्यात येत आहे. (गणपती मूर्तीला दूध पाजणे) बहुजन समाजाची तलवार आणि ढाल वापरुन दडपशाही व हुकूमशाही सुरु आहे. या हुकूमशाहीचा पर्दापाश करण्यात खारीचा वाटा उचलता आला तरी या पुस्तकाचा उद्देश यशस्वी होईल.

किर्ती मिलींद, 'दहशतवाद : न्युआर्क ते खैरलांजी' सुगावा प्रकाशन, पूणे, २००८.

अहेरीसारख्या आदिवासी बहुल आणि संवेदनशील परिसरात अध्यापन आणि पत्रकारिता करतांना, जनमानस ढवळून काढणारा नक्षलवाद नीट न्याहाळता आला लेखक म्हणून त्यांच्या मुळांशी जाण्याचाही प्रयत्न केला. आदिवासी माणसांची जीवघेणी फरपट, त्याची कमालीची सोशिकता, प्रामाणिकपणा हा स्थायीभाव जोपासूनही वाटयाला आलेलं मागासलेपण, जिवावर उठलेले नक्षली, चाललेले सुनियोजित शोषण आणि आदिवासींचे 'माय–बाप' म्हणवणाऱ्या राजकारण्यांची त्यांना लाभलेली कोरडी सहानुभूती अन् प्रगतीची आभारी आश्वासने यासारख्या विदारक वास्तवाशीही परिचय झाला. एकंदरीत गोंडवनच्या या शापित मातीने माझ्या कथेला बरीच माणसं पुरवली त्यांच्या जगण्याच्या–सोसण्याच्या नाना तऱ्हा मला दिल्या त्यामुळेच लेखन तंत्राची पर्वा न करता काही कथा प्रखर वास्तवाला सामोऱ्या गेल्या आहेत. ललित साहित्याला भावणाऱ्या कल्पित वास्तवाची जागा अस्सल वास्तवानं कधी घेतली.

मोरांडे विनोद, 'सांज सावल्या' हरिवंश प्रकाशन, गजानन मंदिर मार्ग, चंद्रपूर, २००८.

'एनकाउंटर' म्हणजे कडवट भेट किंवा समोरासमोरचा सामना, या इंग्रजी शब्दाच्या अर्थछटा हळूहळू विरोधाभासात बदलत आहेत.

ॲड, एकनाथ साळवे हे वकील म्हणूनही आदिवासी चळवळीचेंच आहेत. त्यांची बाजू ते सर्व पातळयांवर जीरकसपणे मांडतात. मराठी साहित्यात रुढ झालेल्या मुल्ये, प्रमाणके, मापदंड, भाषा, यांच्या एकाधिकार शाहीचा मुलाहिजा न ठेवता साळवेंनी अनेक पातळयांवरच्या संघर्षाला रांगडया आशयासोबत चित्रित केले आहे. आशय गडद ठेवण्यासाठी, शब्दाचा अनुवाद न करता 'एनकाउंटर' हेच शिर्षक दिले आहे. अंतविरोधांनी भरलेल्या वास्तवाचा अनुवाद करुही नये. विजय आत्राम हा या कांदबरीचा वरकरणी नायक वाटत असला तरी ती सूत्रधार आहे.

बिरसा मुंडाचा आत्मा फिरावा तसे 'ऊलगुलामाला अंत नाही' हे घोषवाक्य पुन्हा–पुन्हा येत राहते. सर्व पातळयांवर एकाच वेळी ऊठाव करुन, त्या उठावांचा समन्वय साधणे म्हणजे ऊलगुलाम होय. त्यामुळे बिरसा मुंडाने दिलेली ती घोषणा नव्हती तर ते कृती कार्यक्रमाचे नियोजन होते. विजय आत्रामच्या शालेय जीवनाच्या चित्रणात शिक्षण क्षेत्रातही अस्पृश्याला लेखकाने अचूक टिपली आहे.

भारतातील नक्षलवाद हा अमानुष दमन व्यवस्थेशी निकराची झुंज देणारा मनस्वी तरुण रक्ताने शोधलेला एक मार्ग आहे. लोकशाही व्यवस्थेतील प्रतिकाराचे सर्व मार्ग जेव्हा सत्ताधारी वर्गाकडून आणि बहुसंख्य शोषकाकडून कायदेशीर मार्गाने निकामी केले जातात, तेव्हा नक्षलवादाचा जन्म होत असतो. नक्षलवाद हा बहुसंख्याकांच्या हुकूमशाही विरुद्धची अल्पसंख्य शोषितांनी आणि त्यांच्या शोषणाचे भान झालेल्या विचारनिष्ठ मोजक्या तरुणांनी हातात विध्वसंक शस्त्रे घेऊन नोंदविलेली आत्मघातक प्रतिक्रिया म्हणून सिद्ध झालेली आहे. हा

आत्मघात तरुण रक्ताने मन:पूर्वक स्विकारुन जशा त्यांच्या निष्ठा सिद्ध केल्या आहेत तशाच भारतीय राजकीय लोकशाहीच्या मर्यादाही स्पष्ट केल्या आहेत.

भारतातील लोकशाहीतले बहुसंख्य आणि अल्पसंख्य हे 'राजकीयदृष्टया' ठरत नाहीत तर ते 'जातीयदृष्टया' ठरले जातात. त्यामुळे बहुजन समाजातील कनिष्ट जाती आणि आदिवासी राजकीय दृष्टयाही जन्मत:च अल्पसंख्य ठरतात आणि बहुसंख्य शोषक लोकशाहीच्या आधारे आणि कायदेशीर मार्गाने त्यांचे शोषण करु शकतात.

लोकशाही प्रस्थापित होईपर्यंत आरक्षणाचा आग्रह धरीत होते. आरक्षण हे गुणवत्तेच्या आणि पर्यायाने लोकशाहीच्या विरोधी आहे असे मानून चळवळी करणारे आणि जन्मजात अल्पसंख्य असणाऱ्या आदिवासी समाजाचे शोषण करणारेच या नक्षलवादाचे खरे जन्मदाते आणि पोषणकर्ते आहेत याची जाणीव सामान्य जनतेला करुन देणे आवश्यक आहे. कारण नक्षलवाद ही या शोषणा विरुद्धची अगतिक आणि असहाय परंतु कर्तव्यदक्ष निष्ठूरपणे नोंदविलेली विद्रोही प्रतिक्रिया आहे.

ज्या काळात नक्षलवाद हा सर्व थरातील जनतेच्या टीकेचा विषय बनला होता आणि टाडा सारख्या कायद्यांच्या माध्यमातून नक्षलवादी आणि आदिवासी यांचा शासनाने उच्छेद मांडला होता, अशा काळात आदिवासी समुदायाला न्याय मिळवून देण्यासाठी उजळ माध्याने पुढे येणे ही एक जोखीम होती. ॲड. साळवे यांचे व्यक्तिमत्व अनेकवेळा अनेकांना गूढ वाटण्याची शक्यता आहे कारण वैभवाच्या मार्गावर प्रवाहपतीत न होता, ॲड. साळवे अशा प्रकारच्या अनेक जोखिमा स्वत: होऊन अंगावर घेताना दिसतात.

'एन्काउंटर' या दीर्घ कथेची समीक्षा मराठी समिक्षक निश्चितच करतील. माझा या क्षेत्रात अधिकार नसल्यामुळे मी या ठिकाणी केवळ माझ्या शुभेच्छा नोंदवित आहे.

साळवे एकनाथ, गावीत नजुबाई (आदोर) 'एन्काउंटर' फुले–आंबेडकर स्टडी ग्रृप प्रकाशन, चंद्रपूर, १९९८.

गडचिरोली हद्दीतील नक्षलवादी चळवळीचा बीमोड करण्याचे काम समाजाने आणि शासनाने पोलिस दलावर सोपविलेले आहे. हे काम तडीस नेण्यास प्रस्थापित पोलिस दल खरोखर सक्षत आहे का? या मुद्याचा गंभीरपणे कोणीच विचार केलेला नाही. नवराबायकोचे भांडण अगर नक्षलवादी चळवळीचा बीमोड करणे ही कामे पोलिस अधीक्षक म्हणून माझ्याकडे आली तर मी ती पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्यांकडे पाठवीन. पोलीस प्रभारी अधिकारी अशी कामे पोलिस कॉन्स्टेबल किंवा हेड कॉन्स्टेबल दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सोपवितो. गुन्हेगारीसारख्या गुंतागुंतीचा प्रश्न सोडविण्याची कोणती क्षमता अशा पो. कॉ. दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे असते? अशा अधिकाऱ्यांकडे दोन क्षमता असतात. पहिली क्षमता म्हणजे पोलिस प्रशिक्षण शाळेतील नऊ महिन्यांचे ट्रेनिंग प्रशिक्षण ज्यामधील निम्मा वेळ 'दहिने मुड बाये मुड' शिकत परेड करावी लागते व दुसरी क्षमता म्हणजे त्याच्या हातात दिलेली साडेतीन फुटाची लाठी, या दोन क्षमता असलेल्या पोलिसांवर अनादिकालापासून चालत आलेल्या गुंतागुंतीच्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे काम सोपविलेले आहे.

गुन्हयांचे प्रमाण वाढल्याने वर्तमानपत्रात पोलिस दलावर टीका सुरु झाली की, पोलिस अधिकाऱ्यांना वरिष्ठांकडून एकच हुकूम मिळतो, तो म्हणजे गुन्हेगारांना फोडून काढा, चांगला इंगा दाखवा, नाहीतर गोळया घाला. दुदैवाने एका पाहणीमध्ये असे आढळले की, पोलिसांनी गुन्हेगारावर थर्ड डिग्रीचा वापर

करावा असे सामान्य जनतेलाही वाटते. वाढत्या गुन्हेगारीला आपण एकटे जबाबदार आहोत आणि वाढती गुन्हेगारी थांबविण्याची जबाबदारी आपली एकटयाचीच आहे असे समजून अधिकारी त्यांना कायद्याने दिलेल्या साडेतीन फुटाच्या लाठीचा वापर गुन्हेगाराविरुद्ध करतात. या लाठीमुळे एखादा संशयित गुन्हेगार मरतो अशा पोलिस कोठडीत मृत्यूबद्दल वर्तमानपत्रामध्ये पुन्हा टीका सुरु होते.

प्रा. माने माणिक, 'गुन्हेगारीशास्त्र' समाजशास्त्र विभाग प्रमुख, फडके प्रकाशन, १२४३, दुधाळी, कोल्हापूर १९९९.

संशोधनाचा हेतू :

गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद समस्या वाढत आहे. नक्षल्यांच्या दहशतीमुळे पोलीस, पोलीस पाटील व सामान्य नागरिक यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हयातील बेरोजगार युवक पोलीस बनण्यास घाबरत आहे. दुर्गम भागातील शिक्षीत युवकांना बंदूकीच्या धाकावर दलममध्ये ओढल्या जात आहे. नक्षल दलमचा गरीब आदीवासी कुटूंबातील युवक, युवतीवर दबाव वाढत आहे. याला विरोध झाल्यास त्याचा बळी जात आहे. परंतु यासाठी शासन कोणते प्रयत्न करतो, किंवा संरक्षण करण्यासाठी तैनात असलेल्या पोलीसांचा भू–सुरुंग स्फोट करुन ठार केले जाते. यात शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरिक यांच्या पिडीत कुटूंबांच्या समस्या कोणत्या? याचे अध्ययन करणे महत्वाचे ठरले आहे.

गडचिरोली जिल्हा आदीवासी बहुल असल्यामुळे पोलीस आदीवासी तर नक्षलवादी आदीवासी असे समीकरण आहे. यात आदीवासीचे शोषण होत आहे. म्हणून त्यांना परत कोणत्या समस्येला तोंड द्यावे लागते याचा विचार करण्यात आला आहे.

कोणत्याही संशोधनामुळे सामाजिक जीवनातील बरेच रहस्य उलगडतात. व सामाजिक वास्तवेसंबंधी आपले ज्ञान विकसीत होत जाते. संशोधनकर्ता सामाजिक कार्यकर्ता या नात्याने आदीवासी जनतेपर्यंत पोहचत असल्यामुळे येथील सामान्य नागरिक व पोलीस यांच्याशी जवळचा संबंध आला. त्यामुळे पिडीत कुटूंबाचे अवलोकन करण्याची संधी मिळाली. शहीद पोलीस व सामान्य नागरिक यांच्या समस्या काय? व त्यांना कोणता न्याय मिळतो? हे लक्षात घेऊन संशोधनाचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवण्यात आले.

समस्या विधान :

गडचिरोली जिल्हयातील दुर्गम असलेल्या धानोरा, कोरची, कुरखेडा, एटापल्ली, भामरागड, सिरोंचा या तालुक्यात नक्षलवादी अनेक दलमच्या रुपाने कार्यरत आहेत. अनेक घातपात बॉम्बस्फोट, नक्षल पोलीस चकमक, या सिमावर्ती भागात घडून येते. या घातपातात अनेक पोलीस व सामान्य नागरिक शहीद झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या शहीद झालेल्या पिडीत कुटूंबावर कोणते परिणाम घडून आलेत. त्यांना शासनाची कोणती मदत मिळाली. एकीकडे शासन सर्व प्रयत्न करतांना कोणत्या अडचणी आल्या. सामान्य नागरिकांमध्ये कोणता बदल घडून आला. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व अभिरुची वर कोणता प्रभाव पडला याचा चिकित्सक अभ्यास यांत करण्यात आला.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती जिल्हयातील १२ तालुक्यापुरती मर्यादीत राहील. यात कोरची, भामरागड, धानोरा, कुरखेडा, एटापल्ली व सिरोंचा यामध्ये घडणाऱ्या घटना जास्त प्रमाणत आहेत. जिल्हयातील १२ तालुक्यातील पिडीत कुटूंबाचे अध्ययन करण्यात आले.

या संशोधनासाठी नक्षल कारवाहीत शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरिकांच्या कुटूंब नातेवाईक, पत्नी, मुले यांचा समावेश करण्यात आला आहे. यापैकी ५०० कुटूंबाची मर्यादा पुढील प्रमाणे निवडण्यात आली.

अ.क्र.	तालुके	शहीद पोलीसांचे कुटूंब	सामान्य नागरिकांचे कुटूंब	एकूण
१.	गडचिरोली	१०	१०	२०
२.	चामोर्शी	१०	१०	२०
३.	आरमोरी	१०	१०	२०
४.	वडसा	२०	२०	४०
५.	कोरची	२५	२५	५०
६.	धानोरा	२५	२५	५०
७.	कुरखेडा	२०	२०	४०
८.	एटापल्ली	२०	४०	६०
९.	भामरागड	३०	४०	७०
१०.	अहेरी	२५	२५	५०
११.	मुलचेरा	१५	१५	३०
१२.	सिरोंचा	२५	२५	५०
	एकूण	**२५०**	**२५०**	**५००**

संशोधन समस्या निवडण्याचे कारण :

१. गडचिरोली जिल्हा आदिवासी जिल्हा असून आदीवासींचे प्रमाण ३८ टक्के आहे. जिल्हयातील दुर्गम भागात लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, जादूटोणा, निरक्षरता याचा फायदा घेऊन नक्षल संघटना जास्त प्रमाणात

सक्रिय झाली आहे. जिल्हयात तीन विधानसभा क्षेत्र आदीवासीसाठी राखीव असूनही रस्ते, दळणवळण, वाहतूक, रेल्वे, विद्युत, दवाखाने आदी सुविधा पुरेशा रुपाने पोहचली नाही.

२. गडचिरोली जिल्हा ७९.३६ टक्के वनाने व्यापला असून उत्तर व दक्षिण वने असे विभाग आहेत. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, छत्तिसगढ या सिमावर्ती भागात नक्षल कारवाही घडवून या जंगलाचा आश्रय वास्तव्यासाठी करीत असल्याने येथील सामान्य लोकांवर नक्षल दहशतीचा प्रभाव वाढत चालला अहे.

३. नक्षल दहशतीमुळे शासकीय कर्मचारी, वनअधिकारी, पोलीस व सामान्य नागरिक यांच्यात भयभितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

४. वाढत्या बेरोजगारीमुळे अनेक युवक–युवती नक्षल दलमध्ये दबावात येऊन भरती होत आहेत. किंवा भुलथापांना बळी पडले जात आहेत.

५. शासन विशेष कृती योजना, नक्षल गावबंदी, नक्षल आत्मसमर्पण जनजागरण मेळावे, शासनाच्या विविध योजना राबवून ही याला पुरेशा प्रमाणात प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

६. अनेक शहीद पिडीत कुटूंबांपुढे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य रोजगार शिक्षण या मुलभूत गरजापासून वंचीत असल्याचे दिसून आले. यासाठी शासन अपयशी ठरले काय? किंवा त्यांच्यापर्यंत सुविधा पोहचल्या काय? याचा शोध घेण्याचे संशोधन कर्त्यांने ठरविले होते.

संशोधनाचे उद्देश :

प्रस्तुत संशोधनाच्या अध्ययनासाठी खालील उद्देश मांडले आहेत.

१. नक्षलग्रस्त गावाचा शोध घेऊन नक्षल समस्येचे आकलन करुन घेणे.

२. नक्षल कारवाहीत शहीद झालेल्या कुटूंबियांच्या विविध समस्येचा शोध घेणे.

३. शासनाच्या विविध योजना राबवितांना त्या गतिरोधक ठरल्या काय?

४. नक्षलग्रस्त कुटूंबातील शैक्षणिक व सांस्कृतिक समस्येचा शोध घेणे.

५. नक्षल प्रभावित क्षेत्रात कोणत्या शासनाच्या उपाययोजना केल्या जातात. त्यांचा नक्षत प्रभावित कुटूंबाला सावरण्यासाठी काय उपयोग होतो याचा शोध घेणे.

६. पिडीत सामान्य नागरिकांसाठी शासकीय व अशासकीय उपाययोजना काय ते जाणून घेणे.

७. नक्षल व पोलीस चकमक व भू–सुरुंग स्फोटातील पिडीत कुटूंबाच्या पुर्नवसनाची माहिती व समस्यांचे शोध घेणे.

८. परीसरातील दहशतीचा मानवी जीवनावर होणारा परिणाम जाणून घेणे.

कार्यात्मक व्याख्या :

१. **दहशतवाद** : 'व्यक्तीनं वा गटानं राजकीय हेतूनं दिलेली धमकी वा केलेली हिंसा म्हणजे दहशतवाद होय.'

२. डॉ. शरदचंद्र गोखले यांच्या म्हणण्याप्रमाणे 'दहशतवाद म्हणजे राजकीय हेतूने समाजामध्ये दहशत निर्माण करण्याचा संघटीत प्रयत्न होय'.

३. **नक्षलवाद** : चारु मुजूमदार यांच्या मते, 'भारतीय शोषितवर्ग, शेतकरी, आदिवासी शेतमजूर, दलितवर्ग यांनी माओचा मार्ग स्विकारावा आणि उच्चवर्गाचे आणि त्यांच्या शासनाचे उच्चाटन करावे आणि शेतकऱ्यांच्या व आदीवासीच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी गनिमी युद्ध, लपुन–छपुन

हल्ले करुन सामान्य लोकांना न्याय द्यावा यासाठी केला जाणारा प्रयत्न म्हणजे नक्षल चळवळ होय.'

४. संशोधनकर्त्यांच्या मते, "पश्चिम बंगाल राज्यातील नक्षलवादी गावात चारु मुजुमदार व कानु सन्याल यांच्या नेतृत्वात तेथील जमीनदारांच्या विरोधात सर्वप्रथम सुरु झालेली चळवळ म्हणजे **नक्षलवादी चळवळ** होय. आज हया चळवळीचा भारतातील इतर राज्यात प्रसार/विस्तार झालेला आहे. हया चळवळीत सामान्यत: आदिवासी व उपेक्षीत समाज जमिनदार व सरकारी यंत्रणेच्या विरोधात हिंसक व दहशतीच्या मार्गांचा अवलंब करतो आहे."

५. **पोलीस व समाज :** 'कोणत्याही समाजातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करणारी जी अधिकृत संघटना असते तिला सामान्यपणे पोलिस असे म्हटले जाते.'

६. 'सर रॉबर्ट पील, पोलीस दलात काम करणाऱ्या कॉन्स्टेबल्सना 'पीलर्स' असे म्हटले जात असे.'

प्रकरण २


अध्ययन क्षेत्र : दृष्टीक्षेपातील गडचिरोली जिल्हा

२.१ जिल्हयाची भौगोलिकता :

मानव जातीच्या अभ्यासासाठी प्रादेशिक व नैसर्गिक परिस्थितीचे वास्तविक ज्ञान प्राप्त करण्यासाठी ग्रामीण, शहरी, आदिवासी या माध्यमातून विभाजन करण्यात आले आहे. कोणताही प्रदेश ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून त्याचे भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तरात विभाजन झालेले असते. कारण प्रत्येक प्रदेशाचा पाया हा भौगोलिक घटकावर अवलंबून असतो. ज्या भागाचा अभ्यास करावयाचा असतो त्या भागाशी संबंधीत भूगोल (Geographical) भूगर्भ (Geological) आणि हवामानाची संबंधीत (Metrological) माहीती आवश्यक असते. कारण हयावरील घटकांचा परीणाम लोकसंख्येची विभागणी, आर्थिक जीवन, निवास प्रकार भौतिक संस्कृती व मानव जातीच्या जीवन पद्धतीवर भर पडत असतो. ते खालील प्रमाणे आहे :

“भौगोलिक क्षेत्रफळ	:	१५,४३४ चौ.कि.मी.
हवामान	:	तापमान कमाल ४३.३ अं.से., किमान ११.३ अं.से.
लागवडीचे क्षेत्र	:	१,८१,५०० हेक्टर
खरीप पीक क्षेत्र	:	१,४९,६०० हेक्टर
रब्बी पीक क्षेत्र	:	३५,७०० हेक्टर

लोकसंख्या	:	९,७०,२९४
(सन २००१ नुसार)		पुरुष – ४,९१,१०१
		स्त्री – ४,७९,१५१
बोलीभाषा	:	मराठी, हिंदी, बंगाली, तेलगू, माडी, गोंडी, छत्तीसगड़ी
मुंबई राजधानीपासून अंतर	:	९५९ कि.मी.
नागपूर उपराजधानीपासून अंतर	:	१९१ कि.मी.
पर्यटन स्थळे	:	मार्कंडेश्वर, सोमनुर, चपराळा, अभ्ययारण्य
लोककला	:	रेलानृत्य, घेरानृत्य, दंडार, झाडीपट्टी नाटके, गोंडीनृत्य."[६२]



६२ महाराष्ट्र शासन, (२००८), 'प्रतिबिंब विकासाचे' जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली,पृ. १

२.२ भौगोलिक स्थान :

महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेस असलेल्या जिल्हा असून उत्तर अक्षांश १८. ४२ ते २१.५० पुर्व रेखांश ७९.४५ ते ८०.५५ च्या दरम्यान पसरलेला आहे. या जिल्हयाच्या पुर्वेस मध्य प्रदेशातील राजनांदगाव व बस्तर जिल्हा आहे. पश्चिमेस चंद्रपूर जिल्हा आहे. उत्तरेस भंडारा जिल्हा आहे तर दक्षिणेस आंध्र प्रदेशातील करीमनगर व आदीलाबाद जिल्हा आहे. वैनगंगा ही जिल्हयाची प्रमुख नदी असून ती जिल्हयाच्या पश्चिम दिशेकडून वाहते. पुढे ही नदी वर्धा नदीला जावून मिळते व यांचा संयुक्त प्रवाहाने प्राणहीता नदी तयार झाली आहे. तिचा प्रवाह सिरोंच्यापर्यंत असून तिचा प्रवाह गोदावरी नदीला मिळतो आहे. म्हणजेच दक्षिण सीमेवरुन गोदावरी, पुर्व सीमेवरुन इंद्रावती ही नदी वाहते आहे. या संगमाला सोमणूर संगम म्हटले आहे. या ठिकाणी 'पुष्कर' मेला भरतो आहे.

याशिवाय विना, गाढवी, खोब्रागडी, कठाणी, पौर, निब्रा, कोठारी, पर्लकोटा, पालमगौतम, बाडीया या उपनद्या आहेत. या नद्यांचा जिल्हयातील मानवी जीवनावर पावसाळयाच्या दिवसात विपरीत परीणाम होवून जिल्हयाचा व तालुक्याचा संपर्क विस्कळीत होत आहे.

गडचिरोली जिल्हा आकारमानाने महाराष्ट्रात चौथ्या क्रमांकावर असून एकूण क्षेत्रफळांपैकी (३०७७१३ चौ.कि.मी.) ५.०१ टक्के क्षेत्र जिल्हयाने व्यापले आहे. हे क्षेत्रफळ १५,४३४ चौ.कि.मी. आहे. जिल्हयाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रांपैकी ७७.४१ टक्के वनानी आच्छादीत आहे.

गडचिरोली जिल्हयात अहेरी, भामरागड, टिपागड, पळसगड, सुरजागड या डोंगरानी जंगल व्यापले आहे. जिल्हयातील सर्वात उंच शिखर गड्लगट्टा पन्हाळामध्ये आहे त्याची उंची समुद्रसपाटीपासून ९६७ मी. आहे. टिपागड रांगाची उंची ६०९ तर सिरोंचा रांगाची उंची ५४८ मीटर आहे.

२.३ भुगर्भ रचना :

"जिल्हयातील अहेरी, आरमोरी तालुका वगळता जिल्हयात आर्कियन कालीन खडक आढळतो. यात ग्रॅनाईड, नाईल मेबाबेस्कर यांचा समावेश आहे. तर सिरोंचा, अहेरी, परीसरात चुनखडी व मातीचे खडक आढळतात. तर सिरोंच्या दक्षिणेस व वडसा (दे) या भागात गोंडवाना कालीन खडक आढळतो. ऐट्टापल्ली परीसरात लोह खनिज साठे मोठया प्रमाणात आहेत. परंतु नक्षल चळवळीमुळे या क्षेत्रात इतर कंपन्या येवून कार्य करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे जिल्हयात मोठे उद्योग येण्यास विलंब लागतो आहे."[६३]

२.४ जमीनीचे प्रकार :

गडचिरोली जिल्हा वैनगंगा नदीच्या खोऱ्यात येतो, येथील जमीन सुपीक आहे. जिल्हयात लोहखनिज चुनखडी ही खनिजे मिळतात तसेच जिल्हयातील जमीनीच्या उंचसखल भागावरुन त्याचे चार विभाग पाडले जातात.



अ) टिपागडचा डोंगराळ प्रदेश : "भौगोलिक क्षेत्राचा पूर्वेकडील भाग उंच व डोंगराळ प्रदेशाने व्यापला असून पूर्व भागाला सातनाला, टिपागड, चिरोली डोंगराच्या पर्वतरांगा पसरल्या आहेत. याला घाटाचा भाग असे

६३ महाराष्ट्र शासन, (१९९८), 'वाटचाल १९८२–१९९७' गडचिरोली, जिल्हा नियोजन अधिकारी, पृ. १२

म्हणतात. हा संपूर्ण भाग कुरखेडा, धानोरा, कोरची तालुक्याचा असल्याने या भागात लोकांची वस्ती विरळ स्वरुपाची आढळते."[६४]

ब) **वैनगंगा व उपनद्यांचे खोरे** : "जिल्हयाच्या पश्चिम सीमेवरुन वैनगंगा नदी वाहते व सिवनी या ठिकाणी वर्धा नदीसोबत संगत आहे. वैनगंगा नदीचे संपूर्ण खोरे सुपीक जमीनीचे असल्यामुळे या भागात मामातलाव, बोडी असून नैसर्गिक वने आहेत. या भागात दरवर्षी पावसाचे प्रमाण सरासरी १०१६ ते १२७० मी.मी. आहे. या नदीला जिल्हा मुख्यालया जवळील कठाणी, पोटफोडी, खोब्रागडी, पौर या उपनद्या मिळतात या भागात भाताचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. कधी–कधी पावसाळयात पुरामुळे जिल्हा मुख्यालयाचा उपराजधानीशी संपर्क तुटतो आहे."[६५]

क) **सुरजागड डोंगराळ प्रदेश** : "जिल्हयाच्या दक्षिण भागासी संबंधीत सुरजागड, भामरागड, चिकीमाला, सिरकोंडा या डोंगराळ पर्वतरांगा आहेत. या भागातून कोठडी, पर्लकोटा, पालम–गौतम हया नद्या वाहतात पर्लकोटा, पालम गौतम व इंद्रायणी हया नद्यांचा त्रिवेणी संगम भामरागड या ठिकाणी पहावयास मिळतो. या भागातील आदिवासी लोकांची वस्ती विरळ असून अज्ञान व दारिद्रयामुळे मासेमारी, शिकारी, कंद गोळा करणे यावर आपली उपजिवीका करतांना दिसतात."[६६]

---

६४ महाराष्ट्र शासन, (१९९८), 'वाटचाल १९८२–१९९७' गडचिरोली, जिल्हा नियोजन अधिकारी, पृ. १२

६५ महाराष्ट्र राज्य पाठय पुस्तक, (२००८), 'गडचिरोली जिल्हा' निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, पृ. २५,२६,२७,२८.

६६ महाराष्ट्र शासन, (१९९४), गडचिरोली जिल्हा माहीती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन चंद्रपूर सुयोग मुद्रणालय, पृ. ३, ४

ड) **प्राणीहीता नदीकाठचा प्रदेश** : "वर्धा व वैनगंगा नदीच्या संगमानंतर प्राणहीता नदीचा उगम झाला पुढे ती नदी 'नगरम' या गावाजवळ गोदावरीला मिळतो. या प्रदेशात वनराई नटलेली असून गोदावरीला गंगा नदीचे स्थान प्राप्त झाले आहे. या ठिकाणी सोमनुर संगमवर 'पुष्कर' यात्रा भरते. हा भूभाग अरुंद पट्टीचा असून उत्तर व दक्षिण लांबी २३० कि.मी. तर पुर्व–पश्चिम लांबी ८० ते १०० कि.मी. आहे. या भागातील लोकवस्ती आंध्रप्रदेशाच्या जवळची असून दुर्गम भागात व्यापक वनक्षेत्र व मोठया नद्यांचे जाळे यामुळे विरळ लोकवस्ती व भाषेचा अभाव मोठया प्रमाणात जाणवतो. या भागातील लोक मक्का, तंबाखू, ज्वारी, मिरची ही पिके घेतात."[६७]

२.५ पर्जन्यमान :

गडचिरोली जिल्हयात उन्हाळा हा कडक असून तापमान ४६.३° से. ची नोंद आहे. तर हिवाळयात ५° से. पर्यंत खाली उतरते. तीव्र उष्णतामान व घनदाट अरण्यामुळे हवेत असणारे बाष्पाचे मोठे प्रमाण यामुळे मे, जून हया महिन्यात वातावरण त्रासदायक असते.

गडचिरोली जिल्हयात पाऊस मोठया प्रमाणात पडला. सरासरी १४०० ते १५०० मी.मी. पावसाची नोंद होते. परंतु जिल्हयात खोब्रागडी नदीवरील तूलतूली प्रकल्प व पोटफोडी नदीवरील 'कारवाफा' ही धरणे न झाल्याने येथील लोकांचे जीवनमान निसर्गावर अवलंबलेले आहे.

---

६७ महाराष्ट्र राज्य पाठय पुस्तक, (२००८), 'गडचिरोली जिल्हा' निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, पृ. २५,२६,२७,२८.

२.६ नैसर्गिक वनसंपदा :

गडचिरोली जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्रापैकी ७७.४१ टक्के क्षेत्र वनाखाली आहे. एवढे मोठे क्षेत्र असणारा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा आहे. जिल्हयातील १३,७०८ क्षेत्रापैकी ३४९ चौ.कि.मी. महसूल क्षेत्राचे आहे. ९,५०१ क्षेत्र राखीव तर ३,८४९ चौ.कि.मी. क्षेत्र संरक्षीत आहे आणि उर्वरित ९ चौ.कि.मी. अवर्गीकृत आहे.

या क्षेत्रात सागवण मोठया प्रमाणात मिळत असून याशिवाय ऐन बेहळा, बीबा, धावना, हळदी, आवळा, गराडी, खैर, मोह, चार टेंभरु आंजन, कुळा, बहावा, माली या उपयुक्त वनऔषधी आहेत. जिल्हयातील आदीवासी पडसावर लाख काढतात. तर बाकी झाडापासून डींक गोल करतात. याशिवाय मोहफूले गोळा करुन दारु काढली जाते. तर टेंभरुच्या पानाला गोळा करुन बीडी उद्योगासाठी इतर प्रांतात पाठविल्या जाते. अनेक घरासाठी येथील वृक्षाचा उपयोग केला जातो. या जिल्हयात अनेक फुलझाडे व वनऔषधीची झाडे आहेत. परंतु येथील सागवन लाकडाचा दर्जा भारत व संपूर्ण आशिया खंडात उच्च प्रतीचा मानला जातो.

जिल्हयाच्या उत्पादनाच्या दृष्टीने विचार केला तर दरवर्षी ४०.८८ कोटी वनापासून महसूल प्राप्त होत असल्याचा अंदाज आहे.

अ) पशुपक्षी : जिल्हयाच्या डोंगराळ व घनदाट अरण्यात माऊस डोअर ही हरणाची प्रजाती आढळते. याशिवाय ससा, मोर, पोपट, पानकोंबळी, रानडुक्कर, निलगाय, अस्वल, वाघ, बिबट आदी आढळतात. परंतु आदीवासींचा प्रमुख व्यवसाय शिकारी असल्यामुळे चोरटी पद्धतीने शिकार करुन त्याचे मास भक्शन करीत असल्याने सर्व दुर्मिळ होण्याच्या मार्गावर आहेत.




ब) कोसा उत्पादन केंद्र : जिल्हयातील आरमोरी तालुक्यात सुमारे २०० वर्षापेक्षाही अधिक काळापासून कोसा, रेशमाचा उत्पादनाचा व्यवसाय चालत आहे. सध्या खादी ग्राम उद्योग व विदर्भ विकास महामंडळाद्वारे कोसा उत्पादन करण्यात येत आहे. तुतीपासून मलबेरी सिल्कचे उत्पादन होत असून एकूण ४१ एकर जमीनीत शेतकरी तुती झाडाची लागवड करुन कोसा उत्पादन केल्या जात आहे. या उद्योगात ६५८ शेतकरी गुंतलेले असून त्यापासून १९०५ खंडी कोसाचे उत्पादन होत आहे. त्याची अंदाजे किंमत २०.१४ लाख रुपये आहे.

क) कृषी जमिनीचा वापर : जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४,४७,७०० हेक्टर असून त्यापैकी २,०६,००० हेक्टर विकसीत असून उर्वरीत जमीन जंगल व्याप्त करण व ओसाड आहे. २००१ च्या जनगणनेनुसार ५७,४०० आदीवासी कुटूंबे असून त्यापैकी ४३,४६८ कुटूंबे दारीद्र रेषेखालील आहेत. जिल्हयात अल्पभूधारक ३८,७४५ कुटूंबे आहेत, ३८,९५१ कुटूंबे अत्यल्प भूधारक आहेत तर अनुसूचित जातीची १४,८७५ कुटूंबे दारीद्र रेषेखालील आहेत.

जिल्हयात खरीप हंगामाचे सर्वसाधारण क्षेत्र १,४९,६०० हेक्टर असून भाताचे प्रमुख पीक आहे. तर रब्बी पीकांसाठी ३५,७०० हेक्टर असून उन्हाळी पीकांचे सर्वसाधारण क्षेत्र ३,४०० हेक्टर आहे.

ड) **फळबाग योजना** : जिल्हयामध्ये रोजगार हमी योजनेद्वारे शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर फळबाग योजनाद्वारे फळबागाची लागवड करण्यात आली आहे. सन २००५ ते २००९ पर्यंत ४४४.६५ हेक्टर जमिनीवर फळबाग लागवड करण्यात आली.

इ) **फलोत्पादन कार्यक्रम** : फलोत्पादन कार्यक्रमाद्वारे फुल सृष्टीचे उत्पादन करणे, शेडनेट कार्यक्रम, एकात्मीक किड व्यवस्थापन, गांडूळ खते निर्मिती इ. कार्यक्रमासोबत आंबा, फळबाग, केळी, मसाला पीके, सुंगधी वनस्पती लागवड मधुमक्षीका पालन आदी कार्यक्रम राबविण्यात आले.

२.७ जिल्हयाची लोकसंख्या :

"२००१ च्या जनगणनेनुसार गडचिरोली जिल्हयाची एकूण लोकसंख्या ९,७०,२९४ असून यामध्ये पुरुषांचे प्रमाण ४,९१,१०१ तर स्त्रीयांचे प्रमाण ४,७९,१९३ आहे. जिल्हयात एकूण घरे २,१०,३६२ आहेत. जिल्हयामध्ये १००० पुरुषामागे ९७६ स्त्रियांचे प्रमाण आहे. जिल्हयातील शहरात ६७,२६१ लोक राहतात तर ग्रामीण क्षेत्रात ९,०३,०३३ लोक वास्तव्य करीत आहेत. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी लोकसंख्येचे प्रमाण ६.९ टक्के आहे. जिल्हयात एकूण साक्षर ४,९३,४८५ असून त्यापैकी २,८८,६८० पुरुष आणि २,०४,८०५ स्त्रिंयाचा समावेश आहे. जनगणनेच्या प्राथमिक अंदाजानुसार साक्षरतेचे प्रमाण ६०.२९ टक्के आहे. त्यापैकी पुरुषांची ६९.७२ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५०.६४ टक्के आहे.

जिल्हयाचा लोकसंख्या वाढीचा दर १९८१–९१ ला २३.४८ टक्के होता. तर १९९१–२००१ मध्ये २३.२५ टक्के होता. प्रत्येक कि.मी. मागे लोकसंख्येची घनता सन १९९१ मध्ये ५५ चौ.कि.मी. होती. त्यात वाढ होवून २००१ मध्ये ६७ चौ.कि.मी. साली आहे.

एकूण लोकसंख्येपैकी ० ते ६ वयोगटातील संख्या १,५१,४८६ इतकी असून त्यात ७६,७५० मुले व ७४,७३६ मुलींचा समावेश आहे."[६८]

२.८ जलसिंचनाची साधने :

जलसिंचन करणाऱ्या विविध प्रकारच्या साधनांना भिनविले जाणाऱ्या क्षेत्रांचा विचार केला असता जिल्हयात नैसर्गिक साधन सामग्रीचा जिल्हयातील पावसाशी संबंधीत आहे. नैसर्गिक पावसाची उपलब्धता बऱ्याच प्रमाणात असल्यामुळे विहीरीच्या पाण्यावर होणारे ओलीताचे प्रमाण तलाव, कालवे, बोडया, मामा तलाव इ. साधनांनी होणारा ओलीताच्या प्रमाणापेक्षा नेहमी कमी राहत आले आहे. "जिल्हयात ओलीताखाली निव्वळ क्षेत्र ५४,९४४ हेक्टर असून त्यापैकी ५१,६१९ हेक्टर कालवे, तलाव, बोडया इ. साधनाने ओलीत केले जात आहे. तर ३२.९५ हेक्टर क्षेत्र विहीरीच्या माध्यमाने ओलीत केले जाते. ओलीताखालील एकूण क्षेत्रफळ ५८,३४४ हेक्टर एवढे आहे. जिल्हयात जिल्हापरीषदेचे १९६८ तर राज्यशासनाचे २१ एकूण १९८९ तलावे आहेत तर सिंचन विहीरी ४,७४४ आहेत. जिल्हयामध्ये अनेक प्रकल्प वनकायद्यामुळे रखडले"[६९] गेले आहे जसे, तुलतूली, चेंन्ना त्यामुळे जिल्हयात एकही मोठा प्रकल्प नाही. रेगडी (घोट) येथील 'दिना' हे एकमेव प्रकल्प आहे.

जिल्हयातील प्रमुख पीक भात असल्यामुळे ९३.३२ टक्के क्षेत्र या पिकाखाली आहे. त्यानंतर उरलेल्या ६.६८ टक्के क्षेत्रात मक्का, तूर, जवस, तीळ, ज्वारी, मिरची, भाजीपाला इ. पिकांची लागवड केली जाते.

---

६८ महाराष्ट्र शासन, (१९९८), 'वाटचाल १९८२–१९९७' गडचिरोली, जिल्हा नियोजन अधिकारी, पृ. १३

६९ महाराष्ट्र शासन, (२००८), 'प्रतिबिंब विकासाचे', जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली, पृ. ३,५,६,७.

२.९ ऐतिहासिक दृष्टीक्षेप :

ऐतिहासिक दृष्टीकोनातून या जिल्हयाला बरेच महत्व आहे. मौर्य, गुप्त, सातवाहन, यादव, गोंड, ब्रिटीश, भोसले यांच्या कारकीर्द या जिल्हयाला लाभलेल्या आहेत. हा संपूर्ण भाग पूर्वी इ.स. ७५३ ते ९५३ पर्यंत राष्ट्रकूट राज्याच्या अधिपत्याखाली होता. पुर्वीच्या ऐतिहासिक संशोधनावरुन राष्ट्रकूट राज्याच्या काळात येथील प्रसिद्ध "मार्कंडचे देवालय" याच राज्याने बांधले आहे.[७०]

देवगीरीचा प्रधान हेमांद्री यांच्या स्थापत्य शैलीतून साकार झालेले शिल्पकालीन, अविष्कार या जिल्हयात पहावयास मिळते. "नवव्या शतकात वैरागड येथे मानाजातीच्या नागवंशीय राज्यांनी सत्ता स्थापन केली. पहीला राजा 'कुसूमप्रदोह' होय. माना राजाची सत्ता गडचिरोली, चंद्रपूर ब्रम्हपूरी, राजूरा, सिरोंचा या प्रदेशावर पसरलेली होती. इ.स. १४७४ मध्ये बहामनी सुलतानाच्या ताब्यात असलेले वैरागड बाबाजी बल्हाळशहाचा मांडलीक टिपागडचा राजा 'पुरमशहा' याने जिंकून घेण्याची कामगिरी पार पाडली. वैरागडला हिऱ्याची खान असल्याचा उल्हेक आहे.[७१] "व्रज म्हणजे हिरा हिऱ्याच्या खाणीला संस्कृतमध्ये 'वैरागर' म्हणत यावरुन या गावाचे नाव वैरागड पडले. या खाणीचा उल्हेक अब्दूल फजलने लिहीलेल्या ऐन—इ—अकबरी या ग्रंथात आढळतो. ही खान इ. स. १६४३ साली रघुजी भोसले (नागपूर) यांच्या काळात बंद करण्यात आली. इ.स. १७५१ मध्ये रघुजी राज्यांनी चंद्रपूर हस्तगत केल्यानंतर गोंड राज्याची सत्ता संपुष्टात आली."[७२]

---

७० राजूरकर अ.ज., (१९८२), 'चंद्रपूर जिल्हयाचा इतिहास', चंद्रपूर महाकाली प्रकाशन, पृ. १५,२२,३६

७१ राजूरकर अ.ज., (१९८२), 'चंद्रपूर जिल्हयाचा इतिहास', चंद्रपूर महाकाली प्रकाशन, पृ. १५,२२,३६

७२ महाराष्ट्र शासन, (२००८), 'गडचिरोली जिल्हा' म.रा.पा.पु.नि.म. पुणे, पृ. २८, २९.

विदर्भ हा एक प्राचीन प्रदेश असून विदर्भ नामक राज्याने येथे आर्याची वसाहत करुन त्यांना भरभराटीस आणले. म्हणून याला विदर्भ नाव पडले आहे. विदर्भाचा पूर्वभाग म्हणजे गडचिरोली जिल्हा होय. याबाबत अनेक लेखक आणि जगप्रसिद्ध विद्वानांनी आपल्या ग्रंथात नोंद करुन ठेवली आहे. त्यात धम्मानंद कोसंबी चिनी प्रवासी **हयु–एन–त्सांग, डॉ. रायबहादूर हिरालाल, डॉ. प्रदिपकुमार मेश्राम** आदींचा उल्हेक करता येईल. मुलचेरा संस्कृती इ.स. ११ व्या शतकात जम्बुद्विपाचे (भारताचे) १६ जनपदे अस्तीत्वात आली. त्यापैकी महाराष्ट्रातील गोदावरीच्या खोऱ्यातील प्रदेश म्हणजे 'अश्यम जनपद' हे होय.

२.१० स्वतंत्र गडचिरोली जिल्हा :

चंद्रपूर जिल्हयातून विभाजन होऊन २६ ऑगस्ट १९८२ ला गडचिरोली जिल्हा अस्तीत्वात आला. या जिल्हयाला महाराष्ट्र राज्यात आदीवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. नव्याने अस्तीत्वात आलेला गडचिरोली जिल्हयात विपूल साधन सामग्री आहे.

"चंद्रपूर जिल्हयाच्या निर्मीतीपासून या जिल्हयाची निर्मीती करण्यात आली. जिल्हयाच्या रचनेत क्षेत्रात व सीमेअंतर्गत अनेक बदल करण्यात आले आहे. मराठयांच्या सत्तेचा ऱ्हास झाल्यानंतर ब्रिटीशांनी त्यांच्याकडून सत्ता हस्तगत झाल्यानंतर इ.स. १८५३ मध्ये चंद्रपूर जिल्हा मध्यप्रदेशचा भाग समजला जात होता. त्यावेळी बरोरा, मुल, ब्रम्हपूरी यातील तालूक्याचा समावेश होता. इ. स. १६७४ मध्ये मद्रास प्रांताच्या अप्पर गोदावरी जिल्हयाचे विसर्जन करुन चार तहसील चंद्रपूर जिल्हयाला जोडण्यात आल्या होत्या! त्यातील सिरोंचा ही एक होती व सिरोंचा तालुका हे त्याचे मुख्यालय करण्यात आले होते.

"इ.स. १८९५ मध्ये मुल तालुक्यांचे मुख्यालय मुल येथून चंद्रपूर येथे हलविण्यात आले. तसेच ब्रम्हपूरी व चंद्रपूर तालुक्याचा भाग स्थालांतरीत करुन

नव्याने गडचिरोली तालुक्याची निर्मीती करण्यात आले. इ.स. १९०५ मध्ये गडचिरोली तहसील निर्माण झाले."[७३] आणि प्रशासनाच्या सोयीसाठी सिरोंचा तालुक्यातील चेरला, अलबका व नगर हे विभाग मद्रास प्रांतात विलीन करण्यात आले.

त्यानंतर १९५६ पर्यंत या जिल्हयातील सीमेत कोणताही बदल झाला नाही. परंतु १९५६ च्या राज्य पुर्नरचनेच्या वेळी हा जिल्हा मध्यप्रदेशातून स्थालांतरीत करण्यात आला व १९६० च्या महाराष्ट्र निर्मीतीनंतर हा महाराष्ट्राचा महत्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जावू लागला. 'राजूरा' हा तालुका पूर्वी आदीलाबाद (आंध्रप्रदेश) जिल्हयाचा भाग समजल्या जात असे. निजाम सरकारने १९५६ च्या राज्य पूर्वरचनेच्या वेळी या तालुक्याचे नांदेड जिल्हयात स्थानांतरण केले होते. परंतु १९५९ मध्ये प्रांतीक रचनेत या तालुक्याचा समावेश चंद्रपूर जिल्हयात करण्यात आला. जानेवारी १९६४ मध्ये चांदा या शहराचे चंद्रपूर हे नामाकरण करण्यात आले. त्यावेळी ब्रम्हपूरी, वरोरा, गडचिरोली, चंद्रपूर, सिरोंचा, राजूरा या सहा तालुक्यात विभागण्यात आला.

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा व आदीवासीची संख्या जास्त असल्यामुळे तसेच अंतराने लांब चिंचोळया आकाराचा असल्याने दुर्गम भागातील आदीवासी लोकांना त्यांचे दारीद्र अज्ञान व वाहतूकीच्या साधनांचा अभाव यावेळी जिल्हा मुख्यालयी वेळेवर पोहचता येणे शक्य नव्हते. शासकीय यंत्रणा व अधिकारी यांना सुद्धा दळणवळणाच्या साधना अभावी या परीसरातील लोकांच्या समस्या जाणून घेता आल्या नाही. त्यामुळे जिल्हयातील पुर्वेकडील अर्धा भाग मागासलेला राहिला. हा असमतोल भरुन काढता यावा व आदीवासींचा स्वतंत्ररित्या विकास करता यावा या दृष्टीने या जिल्हयाचे विभाजन

---

७३ महाराष्ट्र शासन, (२००८), 'गडचिरोली जिल्हा' म.रा.पा.पु.नि.म. पुणे, पृ. २८, २९.

करुन २६ ऑगस्ट १९८१ पासून चंद्रपूर व गडचिरोली असे दोन स्वतंत्र जिल्हे निर्माण करण्यात आले.

२.११ गडचिरोली जिल्हा निर्मीती :

महाराष्ट्र शासनाने गडचिरोली जिल्हयाचा मागासलेपणा व अविकसीतपणा दूर करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मान, **बाबासाहेब भोसले** यांनी विधान सभेत घोषणा केल्याप्रमाणे २६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन होवून गडचिरोली जिल्हा अस्तीत्वात आला.

"पूर्वी चंद्रपूर जिल्हयात १८ तालुक्याचा समावेश होता. चंद्रपूर जिल्हयातील जूने ब्रम्हपूरी, वरोरा, राजूरा, चंद्रपूर हे तालुके चंद्रपूर जिल्हयात ठेवण्यात आले व अस्तीत्वात असलेल्या पंचायत समितीच्या धरतीवर तालुक्यांची पुर्नरचना करण्यात आली. प्रशासनाच्या सोयीसाठी १० तालुके निर्माण करण्यात आले. तर गडचिरोली जिल्हयात ८ तालुके समाविष्ट करण्यात आले.

जिल्हा विभाजनापूर्वी गडचिरोली व सिरोंचा ही दोनच तालुके अस्तीत्वात होती. तसेच गडचिरोली व अहेरी हे दोन महसूल उपविभाग होते. विभाजनानंतर गडचिरोली जिल्हा हा गडचिरोली, आरमोरी, कुरखेडा, धानोरा, सिरोंचा, चामोर्शी, अहेरी, एटापल्ली या आठ तहसिलामध्ये विभागला गेला."[७४]

अलीकडे ७ ऑगस्ट १९९२ ला महाराष्ट्र शासनाने जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन महसूल विभागाची पुर्नरचना करुन वडसा देसाईगंज उपविभाग करण्यात आला. तसेच वडसा देसाईगंज, कोरची, भामरागड,

---

७४ महाराष्ट्र शासन, (२००८), 'गडचिरोली जिल्हा' म.रा.पा.पु.नि.म. पुणे, पृ. २८, २९.

मुलचेरा हे चार नविन तालुके असून सहा जिल्हयात तालुक्याची संख्या १२ झाली आहे.

१. जिल्हा मुख्यालय वाद :

गडचिरोली जिल्हा निर्मितीमध्ये जिल्हयाचे मुख्यालय गडचिरोली किंवा घोट (चामोर्शी) असावे असा वाद निर्माण झाला. यासाठी राजे विश्वेसर महाराज प्रयत्नशील होते. परंतु त्याचे बळ शासन दरबारी कमी पडल्याने त्या ऐवजी गडचिरोली या नावाचा शिक्कामोर्तब करण्यात आला. शासन तत्वानुसार १२ तालूके व १२ पंचायत समिती अस्तीत्वात आल्या.

पूर्वी गडचिरोली जिल्हयात वडसा देसाईगंज ही एकच नगरपालिका होती. ती कायम ठेवून २६ ऑगस्ट १९८२ च्या जिल्हा निर्मीती नंतर गडचिरोली येथील ग्रामपंचायत बरकास्त करुन १ जून १९८२ नविन नगर पालीका स्थापन करण्यात आली. सध्याच्या अवस्थेत जिल्हयात गडचिरोली व वडसा देसाईगंज हया दोनच नगरपालिका आहेत.

२. जिल्हा परीषद आणि पंचायत समिती :

'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये' जिल्हयाकरीता जिल्हा परीषदेची निर्मिती करण्यात आली. जिल्हा निर्मितीच्या तब्बल ११ वर्षानंतर १९९३ मध्ये जिल्हा परिषदेची निवडणूक घेण्यात आली. "खऱ्या अर्थाने सत्तेचे लोकांना हस्तांतरण करणे हे विकेंद्रित लोकशाहीचा मर्म आहे." या भारत सरकारच्या धोरणानुसार लोकशाही संस्था मार्फत विकेंद्रीकरण प्रक्रियेला चालना मिळाली आहे. सध्या जिल्हयात १२ तालुके असल्यामुळे १२ पंचायत समित्या आहेत या पंचायत समिती अंतर्गत १६७१ गावे असून १५०३ वस्तीगावे जर १६८ वस्ती नसलेली गावे आहेत. तसेच ४६७ ग्रामपंचायती असून काही स्वतंत्र तर काही गट ग्रामपंचायती आहेत.

२.१२ ऐतिहासिक व धार्मिक स्थळे :

गडचिरोली जिल्हयात घनदाट अरण्ये, डोंगरदऱ्या आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेला जिल्हा आहे. येथे अनेक निसर्गरम्य स्थळे, विलोभनीय नद्यांचे संगम व ऐतिहासिक व धार्मिक स्थळे असून जिल्हयातील नक्षल समस्येमुळे अनेक ऐतिहासिक स्थळांचा पुरेश्या प्रमाणात विकास झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हयाचे पर्यटन क्षेत्र आजही दुर्लक्षित असल्याचे दिसून येते.

१. **मार्कंडेश्वर देवस्थान** : विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जाणारे मार्कंडा देवस्थान विदर्भातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. जिल्हा मुख्यालयापासून ४५ कि.मी. अंतरावर चार्मोशी तालुक्यात आहे. वैनगंगा नदीच्या उत्तर वाहिणीच्या डाव्या तिरावर वैभवशाली इतिहासाची साक्ष देत उत्कृष्ठ शिल्पकलेची आठवण करुन देणारे हे देवालय आहे. प्रगट कला व संस्कृतीचे मार्कंडेम ऋषीच्या नावाने ओळखले जाणारे मार्कंडा मंदीर सर्वात मोठे असून त्याच्या सभोवताल आहे. वेरुळ अंजिठाप्रमाणे कलाकृतीचे नमुने कोरलेले आहे. मंदीराच्या गाभाऱ्यात महादेवाची पींड आहे. पीडींच्या खाली भुयारीवाट आहे. त्यामुळे याचे आकर्षण भाविकांना असून हे हेमांडपंथी मंदीर आहे.

"या मंदीराच्या सभोवताल लहान देवळाचा भाग आहे. मंदीराजवळ ज्योतिलिंग असून भूवनेश्वर, गणपती, हनुमान, महिषासूर मर्दिनी यांचे मंदीर आहे. सर्वप्रथम ब्रिटीश इतिहासकार सर 'कॅनिगहॅम' यांनी भेट दिल्याचे प्रोव्हीन्सेंसच्या १९७४–७५ च्या रिपोट वरुन दिसून येते. त्यावेळी या ठिकाणी २४ देऊळे असल्याचा उल्हेक आहे.[७५] त्यापैकी २० देऊळे नामोनेष झाल्याच्या खुणा आहेत."

---

७५ महाराष्ट्र शासन, (२००८), 'प्रतिबिंब विकासाचे' जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली, पृ. ६,७

"१९७३ च्या चंद्रपूर गॅझीटी अरमध्ये मार्कडा मंदीर समुहाने बांधकाम राष्ट्रकुलांनी केल्याचे नमूद केले. प्रसिद्ध इतिहास संशोधक स्व. डॉ. मिराशी यांच्या मते आठव्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रकूट सम्राट तिसरा गोंविदा यांच्या काळात या मंदीराची निर्मीती झाल्याचे असावे. त्यातील उल्हेकावरुन त्याची राजधानी मयुरखंडी होती. मार्कंडा किंवा मार्कंडी हे त्या काळाच्या ओघात झालेले मयुरीखंडीचे अपभ्रम्य कप असावे."[७६] परंतु पुरातन विभागाने याकडे लक्ष न दिल्याने हे मंदीर नामुनेष होण्याच्या मार्गावर आहे.

या मंदीरात दरवर्षी महाशिवरात्रीला १५ दिवस भव्य यात्रा भरते. यासाठी विदर्भातील लाखो लोक भाविक व मार्कंडाश्वरांच्या दर्शनासाठी येतात.



२. **चपराळामंदीर व अभयारण्य** : "जिल्हा मुख्यालयापासून ७० ते ७५ कि.मी. अंतरावर मुलचेरा तालुक्यातील चपराळा हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. याठिकाणी कार्तिक स्वामी महाराजांचे मंदीर असून त्याला लागून साईबाबा, हनुमान, शंकर, मारोती इत्यादींचे मंदीर व शिवलिंग आहे. महाशिवरात्रीस येथे दोन दिवसाची यात्रा भरते व हनुमान जंयतीला येथे भजन किर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम साजरा केला जातो.

---

७६ महाराष्ट्र शासन, (२००८), 'प्रतिबिंब विकासाचे' जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली, पृ. ६,७

मंदीरापासून जवळच वर्धा व वैनगंगा या नदीचा संगम आहे. यालाच 'प्रशांत धाम' असे म्हणतात हा परिसर नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. मंदीराच्या सभोवताल सागवणाची विस्तीर्ण वृक्षे असून या परिसरात चंदनाची वृक्षे आहेत. हे मंदीर घनदाट जंगल परीसरात असल्याने भाविकांना व पर्यटकांना वृक्षछायेचा आश्रय घेवून मौज करण्यास आनंद वाटतो."[७७]

या मंदीराच्या परीसरास चपराळा उभयारण्य असे क्षेत्र वनविभागाने घोषित केले. त्याचे निरीक्षण करण्यासाठी निरीक्षण कुटी तयार करण्यात आली. त्यामुळे वन्य प्राणी व वनाची सुरक्षा व संगोपन झाले. या उभयारण्यांत वाघ, बिबटया, रानडुक्कर, निलगाय, सांभर, चित्ता, हरीण, राणमांजर, कोल्हे, ससे इ. वण्यप्राणी आढळतात याशिवाय अनेक पक्षी दिसून येतात.

३. **वनवैभव (Glori of Forast)** : जिल्हयाच्या मुख्यालयापासून ११० कि. मी. अंतरावर आल्लापल्ली ते भामरागड या मुख्य मार्गावर वनखात्याच्या पुरातन तलावाजवळ 'वनवैभव' नावाचे सागवणी झाडांनी नटलेले जंगल आहे. सुमारे ७ हेक्टर वनक्षेत्र हे राखीव जंगल म्हणून घोषीत केले आहे.

"येथील परिसरात गगनचुंबी सागवन वृक्ष आहेत. बीजा, येन, तिवस, तेंदू, हळद, करम, सिसम इ. जातीचे वृक्ष आहेत. ही सर्व झाडे जास्त गोलाईचे असून ६ ते ७ मीटर आहे. तर उंची ३५ ते ४० मीटर आहे, या सागवण लाकडाचा दर्जा आशिया खंडात उच्च प्रतीचा मानला जात आहे. ही सर्व उंच वृक्ष निसर्गाचे वरदान ठरले आहे. या परिसरात

---

७७ महाराष्ट्र शासन, (२००८), 'प्रतिबिंब विकासाचे' जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली, पृ. ६,७

वन औषधीचा साठा मोठया प्रमाणात असून जंगली भूईनिंब, मिरची, आवळा, वेलीयुक्त औषधी आहे. हे ठिकाणी समुद्र सपाटीपासून २६० मीटर वर आहे."[७८] या परिसरात अनेक पर्यटक या वनश्रीला भेटी देवून निसर्गप्रेमी या वनवैभवाचे सौंदर्य न्याहाळतांना दिसतात.



४. **भामरागड (हेमलकसा)** : जिल्हयातील अत्यंत दुर्गम व अतिमागास क्षेत्र म्हणून भामरागड़ ओळखले जाते. मुख्यालयापासून १८० कि.मी. अंतरावर आहे त्यांच्या सभोवताल पायल गौतम, इंद्रावती व पर्लकोटा या नद्यांचा त्रिवेणी संगम आहे. सभोवताल घनदाट अरण्ये व दऱ्याखोऱ्यांनी युक्त परिसर आहे. या त्रिवेणी संगमावरुन सकाळचा सुर्योदय, सुर्यास्त पाहण्याचा वेगळा आनंद प्राप्त होतो. पर्यटकांना राहण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने विश्रामगृह हे येथील आकर्षण आहे.


"भामरागडच्या पूर्वी हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्प असून या प्रकल्पाचे निर्माते **डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे** यांना २००८ साली रेमन मॅगसेचे पुरस्कार मिळाला. गडचिरोली जिल्हयाच्या टोकावर १९७३ पासून आरोग्य, शिक्षण व आदीवासीच्या जागृतीसाठी कार्य केल्यामुळे त्यांना हा पुरस्कार मिळणे म्हणजे जिल्हयाची शान आहे. याठिकाणी आरोग्य सोयीयुक्त दवाखाना असून त्यास अनेक गंभीर

७८ महाराष्ट्र शासन, (२००८), 'प्रतिबिंब विकासाचे' जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली, पृ. ६,७

रोगांवर शस्त्रक्रिया केल्या जातात. आदीवासी गोंड, माडी, बडामॉडीया यांच्या मुलांना शिक्षणासोबत शेती, शिक्षण, हस्तकला, लाकूड काम, बांबू हस्तकला याद्वारे स्वावलंबी होण्याचे शिक्षण दिले जाते."[७९]

या परिसरातील जंगलात असलेल्या हिस्त्र प्राण्यांची माहिती आदीवासींना व्हावी यासाठी येथील प्राणी संग्रालयात वाघ, बिबट, तरस, राणडुक्कर, हरीण, माकड, विषारी नाग, मण्यार तसेच अजगर, सुसर व पक्षी लोकबिरादरीत पहावयास मिळतात.

"या निसर्गाने नटलेल्या परिसरात आदिवासी आनंदाने राहात त्यांच्या परंपरा व कला संस्कृती जपून ठेवली आहे. त्यांची लोकगीते रेला, बेस, गोंडीनृत्य आजही सनासुदीला, लग्नप्रसंगी व होळी सारख्या आनंदाच्या वेळी ढोल ताश्याच्या गजरात पहावयास मिळते. हे विशेष आकर्षनाचे प्रमुख केंद्र आहे."[८०]



५. **सर्च (शोधग्राम)** : जिल्हा मुख्यालयापासून १७ कि.मी. अंतरावर **डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग** यांनी आदीवासीच्या विकासासाठी मॉ.

---

७९ चौधरी सुरेश व धनकर मदन, (२००९), 'प्रकाशाक्ष' हरीवंश प्रकाशन, चंद्रपूर, पृ. ७,८

८० चौधरी सुरेश व धनकर मदन, (२००९), 'प्रकाशाक्ष' हरीवंश प्रकाशन, चंद्रपूर, पृ. ७,८

दंतेश्वरी दवाखाना निर्माण केला. प्रथम याची सुरुवात गडचिरोली येथे करण्यात आली. परंतु रुग्णाची सेवा करण्यासाठी जवळपास जमीन उपलब्ध न झाल्यामुळे चातगाव येथे खर्च शोधग्राम निर्माण करण्यात आले. या शोधग्राममध्ये आदीवासी अनेक समस्येवर प्रत्यक्ष याठिकाणी वास्तव्य करुन श्रेष्ठ प्रतीचे वैद्यकीय व सामाजिक कार्य चालू आहे. सामाजिक, शारीरिक, आरोग्याच्या हितार्थ संशोधन, लेखन तसेच आदीवासी भागातील कुपोषित बालकांच्या आरोग्यासाठी 'कोवळी पानगळ' हा अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर केला याची दखल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली. तसेच समाजाच्या सर्वांगीक आरोग्यासाठी केलेले संशोधनाचे कार्य आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त आहे. या संस्थेद्वारे उपेक्षित वंचीत आदीवासी समाजाचे उन्नतीचे कार्यासोबत व्यसनमुक्ती शिबीराचे आयोजन करण्यात येते. यासाठी देशातील अनेक प्रांतातील युवक या शिकारीस उपस्थित राहून जागृतीकडे वळले आहे. त्यांना २००३ या वर्षात महाराष्ट्र भुषण हा सन्मान देण्यात आला.

निसर्गाच्या कुशीत बसलेले हे सर्व पर्यटकांचे व रोग्यांचे प्रेरणा स्थान ठरले आहे.

६. **आमंगाव बुट्टी** : गडचिरोली पासून ५५ कि.मी. अंतरावर देसाईगंज–लांखादूर २ कि.मी. प्रसिद्ध गाव आहे.

७. **लख्वामेढा** : आलापल्ली सिरोंचा मार्गावर रेपन्नपली वरुन ३५ कि.मी. अंतरावर असून 'महाभारतातील लाक्षागृह' या ठिकाणी आहे. बोगम दान परसू असे नैसर्गिक खुले रंगमंच (पांडवांची बसण्याची जागा) म्हणून परीचित आहे.

२.१३ आदीवासी जमाती :

महाराष्ट्रातील आदीवासी जमाती भिन्न–भिन्न प्रांतात वास्तव्य करीत आहेत. महाराष्ट्रात स्थुलमानाने आदीवासी जमातीचे प्रांतवार तीन विभाग पडतात.

१. गोंडवाना विभाग, २. सातपुडा विभाग, ३. सहयाद्री विभाग

गडचिरोली जिल्हा हा गोंडवाना विभागात येत असून या जिल्हयात गोंड, माडीया, हलबा, परधान, हलबी, कबर, कोलाम आदी जमातीचा समावेश आहे. 'गोंड' ही गडचिरोली जिल्हयातील प्रमुख जमात आहे. ही अनार्य जमात असून द्रविडीयन वंशातील असल्याचे मानले जाते. "ही जमीन ज्या भूप्रदेशात वास्तव्य करते तिचे अनेक वर्ष राज्य केले त्या भुप्रदेशाला गोंडवन या नावाने संबोधले गेले आहे."

"गोंड स्वत:ला कोयवंशीय, कोयतूर म्हणवून घेतात त्याचा वेगळा धर्म व संस्कृती असून ती 'कोयतूर संस्कृती' हया नावाने ओळखली जाते. गोंड ही एक जात नसून तो एक किंवा अनेक उपजाती मिळून बनलेला समाज होय."

रे हिस्लाप यांच्या मते गोंड हा शब्द कोड या शब्दाचे स्वरुप आहे. या विषयी विश्लेषण करतांना हिस्लाप पुढे म्हणतात की, तेलंगू लोन खोंड या शब्दांचा गोंड किंवा केांड असा उच्चार करतात. कॅनिंग हॅम ने असे म्हटले की, मध्य प्रदेशात गोंड शब्दाचा उच्चार साधारणत: गोंड असा करतात आणि 'क' व 'ग' च्या बदलाने कोंड असा शब्द रुप बनतो आहे म्हणून गोंड किंवा कोंड हे दोन्ही शब्द मध्य प्रांतातील शब्दाप्रमाणे एकच आहेत.

डॉ. इरावती कर्दे हया गोंड आदीवासी विषयी म्हणतात. हिंदूस्थानी एक महत्वाची संख्येने मातबर व मोठया प्रदेशात पसरलेली बर्ज्य जमात होय. कारण मध्य प्रदेशात गोंडाची वरती नाही असा एकही गाव राही गोंड हे नाव त्यांना इतरांनी दिलेले आहे. ते कोलाम व गोंड लोकांशी वंशाने व भाषेने संलग्न आहे.

बाराव्या शतकात दक्षिणेकडून ते महाराष्ट्रात आले आणि आपले राज्य स्थापीत केले असावे असा अंदाज आहे."[८१]

पाश्चात संशोधक **सर कनिंगहॅम** हयाने गोंडवन राज्याच्या स्थापनेविषयी त्यांच्या मते "गोंड राजा दोराय हयाने इ.स. ३८२ मध्ये शंकरशहाच्या बलिदानानंतर झाला असे म्हटले जाते. गडचिरोली जिल्हयात फार पूर्वीपासून गोंड राज्याचे राज्य अस्तीत्वात होते. पुढे त्यांचा व्यापक समाज निर्माण झाला. जिल्हयात राजगोंड, माडीयागोंड हया पोटजमाती आजही अस्तीत्वात आहेत.

१) **राजगोंड** : जिल्हयात ज्या आदीवासी जमाती आढळून येतात, त्यात ऐतिहासिक वांशिकदृष्टया महत्वाची म्हणून 'राजगोंड' या जमातीचा उल्हेक करता येईल. आजही त्याची राजधानी जिल्हयात अस्तीत्वात आहे. ही जमात लोकसंख्येच्या १५ टक्के आहे. त्यांच्या चार पोटजाती आहेत.

१) राजगोंड, २) माडीया, ३) धुर्वे, ४) खातुलवार गोंड

डॉ. एल्वीन यांनी आदीवासी संस्कृतीचे पाच वर्ग पाडले ते या संदर्भात विचारात घेणे गरजेचे आहे.

१. खऱ्या अर्थाने आदीवासी किंवा अतिमागास.

२. स्थित्यंतर होत असलेले परंतु परंपरा प्रिय आदीवासी.

३. बाहय संपर्कमुळे जलद गतीने बदलत असलेला आदीवासी.

४. बाहय संपर्कमुळे आपले अस्तीत्व टिकविलेला आदीवासी.

५. बाहय संपर्कात मिसळून गेलेला आदीवासी.

---

८१ चौभाले विठ्ठल, (२००७), 'आदीवासी भागातील विभिन्न वातावरणातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक दर्जा आणि त्याच्या शैक्षिक व व्यावसायिक अभिरुचीतील संबंधाचा चिकित्सक अभ्यास, (अप्रकाशीत साहीत्य पीएच.डी.), पृ. ५८,५९

महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा आदीवासीसाठी प्रसिद्ध असून येथील डोंगर दऱ्यात बसलेला आहे. जिल्हयात पूर्वीपासून अहेरी जमीनदारी अस्तीत्वात होती या प्रदेशात राजगोंड राज्याचे अस्तीत्व मोठया प्रमाणात होते. त्याच्या सोबतीत राहणारा माडीया गोंड ही जमात आज ही मोठया प्रमाणात आहे. म्हणून जमीनदारीचा आढावा घेणे गरजेचे आहे.

खांडल्या बल्लाळशहाच्या मृत्यूनंतर गादीवर आलेला त्याचा **मुलगा हिरशहा** १२१८ ते १३४२ च्या सुधारणावादी धोरणामुळे ज्या सतरा जमीनदाऱ्या निर्माण झाल्या त्यापैकी अहेरी जमीनदारी होय.

"अहेरी गोंडराजे जमीनदारीचा संस्थापक कोकशहा त्रास मानता त्याचा कार्यकाल इ.स. १७०३ ते १७६९ असा आहे.

अ.क्र.	जमीनदाराचे नाव	कार्यकाळ (वर्षे)
१.	कोकशहा	१७०३ ते १७६९
२.	भीमराव उर्फ व्यंकटराव	१७६९ ते १८१८
३.	भुजंगराव (पहीले)	१८१८ ते १८४७
४.	व्यंकटेश्वरराव	१८४७ ते १८५१
५.	लक्ष्मीबाई	१८५१ ते १८६१
६.	मेगाराव	१८६१ ते १८६६
७.	सावित्रीबाई	१८६६ ते १८७१
८.	धर्मराव पहीले (आत्राम घराने)	१८७१ ते १८९३
९.	भुजंगराव (व्हिलिय)	१८९३ ते १९२८
१०.	द्वितीय धर्मराव/ किर्तीमंतराव	१९२८ ते १९५०
११.	विश्वेश्वराव/ भगवंतराव/ दौलतराव	१९५० ते १९९८
१२.	राजे सत्येवान/ राजे धर्मराव	१९९८ ते आजपर्यंत

वरील वंशवळीच्या आधारे असे म्हणता येईल की, सावीत्रीबाईच्या मृत्यूनंतर १८७१ पासून आत्राम घराण्याची सुरुवात झाली. १९४७ ला देशाला

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जमीनदारी हक्क विशेषाधिकार नाहीसे व्हावे यासाठी मागणी होवू लागली त्याचा परीणाम होवून द्वितीय राजे धर्मराव याचा ६ एप्रिल १९५० रोजी मुत्यू झाला आता जमीनदारी राहीली नाही. परंतु त्याचे अस्तीत्व कायम आहे, आजच्या स्थितीत अहेरी येथे दसऱ्याच्या सनाला राण्यांची पालखी काढली जाते. आदीवासी बांधव आपल्या राज्याला मानाचा मुजरा करण्यासाठी येथे एकत्र जमतात राजवाडयापासून गडअहेरी येथे कुलदेवतेची पुजा केली जाते. तेव्हा रेला, घेरनृत्य, माडीयानृत्य परंपरेने रात्रभर येथे चालताना दिसून येते."[८२]

२) **माडीयागोंड** : "गोंडाच्या ज्या उपजाती आहेत त्यातील 'माडीया' ही उपजाती आहे. ही जमात जिल्हयातील सिरोंचा, अहेरी, भामरागड, लाहेरी, जांबीया, धानोरा, कुरखेडा, बडेगाव, त्रसेली या भागात प्रामुख्याने आढळते. अतिशय घनदाट जंगलाने वेढलेल्या डोंगराळ प्रदेशात ते राहतात ते इतरांना कोणामध्ये मिसळताना दिसून येत नाही. वृत्तीने कोळे, विनोद व हसतमुख असलेले माडीया अतिशय कारक मजबूत बांध्याचे व चपळ असतात. माडीचा गोंड ही महाराष्ट्रातील स्वतंत्र्य जमात आहे. गोंड ही मुख्य जमात असून त्याच्या काही उपजमाती आहेत. माडीया, बडामाडीया, वाडमाडीया इ. आहेत.

१. बडामाडीया,

२. छोटामाडीया

बडामाडीया वस्ती भामरागड आणि लाहेरी नजीकच्या टेकडयांच्या आसपास प्रदेशातील गावात आढळते. ते प्रामुख्याने लाहेरी विना गुंडा गुंडेनडोह, पोरेवट्टी, हिंदून विशंगी कुबाकोडी या भागात आढळते."[८३]

---

८२ प्रा. कन्हाडे बी.एम., (२००५), 'गडचिरोली जिल्हयातील समाज परीवर्तन समाजशास्त्रीय अध्ययन' (अप्रकाशित साहीत्य पीएच.डी.), पृ. १७

८३ चौभाले विठ्ठल, (२००७), 'आदीवासी भागातील विभिन्न वातावरणातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक दर्जा आणि त्याच्या शैक्षिक व व्यावसायिक

छोटामाडीया हे प्रामुख्याने कायर, मुरमल, गोडपाळी, ताडपाळी, लाहेरी जुव्वाहोदरी, बिनामुंडा, गोल्लामुंडा, पेनार, कुर्सिनार या गावामध्ये पहावयास मिळते.

माडीया गोंड बडामाडीया व छोटामाडीया या आदीवासीचे समाज जीवन वैशिष्टय पुर्ण आहे. त्याची भाषा माडीया असून त्या भाषेला लिपी व साहित्य नाही. प्रादेशिक सान्निध्यामुळे तिच्यात मराठी, हिंदी, तेलंगू, कावडी शब्द दिसून येतात. परंतु आपले भावे विषयीचे प्रेम ते जपत आहेत.

माडीया आदीवासीचे सभोवतालच्या भौगोलिक आर्थिक व परंपरांगत चालत असलेल्या व रुढ झालेले जीवन आहे. आदीवासी लोकांवर जंगलाचा झालेला परीणाम त्याच जंगलाच्या कपारीत दऱ्याखोऱ्यात ते वस्ती करतात. शिकार, कंदमुळे, ओळका ताडी, सिंदी त्याचे खाद्य ठरले आहे. मागासलेपणाचे शेतीतंत्र ज्ञानाचा अभाव नैसर्गीय आपत्तीला घाबरुन पूजा अर्चा करणे. अंधविश्वास अज्ञानाच्या खाईत डुबलेला जादूटोना, भूत, चेटकी इ. वर विश्वास करणारा रोगराईवर जादूटोना जडीबुट्टी ने उपचार करणारा जंगलावर आधारीत मोहफूले गोळा करणे, डींक, मध, कंदमुळे गोळा करणे, परंपरागत कामा सोबत तेंदूकटाई, कोळसाभट्टी, जंगल खात्याचा कामावर मजूरी करणे २४ तास श्रम करुनही जो मोबदला मिळाला त्यावर आपली उपजिवीका करणे. नक्षलवाद्यांनी सांगितलेल्या कामाची जबाबदारी अंगावर घेणे पोलीसांनी दिलेली कामे करणे अशा डबघाईत अत्यंत हलाकीचे जीवन जगत आहे.

३) **माडीयाचा अर्थ** : "गोंड जमातीला 'माडीया' हे नाव कसे धारण केले याविषयी माहीती उपलब्ध काही ऐतिहासीय व पाश्चात्य अभ्यासकांनी हया शब्दाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. 'माडीया' हा शब्द 'मारा'

अभिरुचीतील संबंधाचा चिकित्सक अभ्यास, (अप्रकाशीत साहीत्य पीएच.डी.), पृ. ५८,५९

किंवा 'झाड' या शब्दापासून झाला असावा असे मत **रे.एस.हिस्लाप** यांनी व्यक्त केले आहे. चंद्रपूर डिस्ट्रीक गॅझेटमध्ये सुद्धा अशाच प्रकारची उत्पत्ती आहे.

रॉय बहादूर हिशलास यांनी मुर आणि मुळ पासून माडीया शब्दाची उत्पत्ती दर्शविली आहे. घनदाट अरण्यांमध्ये डोंगरदऱ्यात वास्तव्य करणारा व लहान समुहाने वास्तव्य करणारा माणूस म्हणजे माडीया असा साधा व सरळ अर्थ घेता येईल.

माडीयांचा भाषा—माडीया ही मुळ द्रविडी भाषा परीवारातील बोलीभाषा असून तिला लिपी नाही. लगतच्या जनसमुह व त्याची भाषा यांच्याशी संपर्क आल्याने तिच्यात अनेक बदल झालेला आढळून येतात. अनेक लोकांच्या देवाण—घेवाणीतून शब्द संपदा तयार झाली. आंध्र प्रदेशातून तेलंगू मध्य प्रदेशातील हिंदी महाराष्ट्रातील मराठी इतकेच नव्हे तर संस्कृत, कन्नड आदी भाषेतील शब्द ही माडीया बोलीत दृष्टीक्षेपास पडताना दिसतात. माडीया भाषेत कोणत्याही प्रकारचे साहित्य व लिपी नसल्यामुळे या भाषेचा वापर केवळ समुह संवादासाठीच होत असल्याचे दिसून येते आहे.

४) **आदीवासीची धार्मिक व सांस्कृतिक जीवनपद्धती** : "कोणत्याही प्रकारचा धर्म म्हटल्यावर त्याच्या सामाजिक जीवनात धर्माला वेगळे महत्व आहे. ग्रामीण, आदीवासी, समाजाचा परीवर्तनाचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, अलौकिक भक्तीवरील श्रद्धा हे धर्माचे उगमस्थान आहे. त्याचा संबंध पवित्र—अपवित्र घटकांशी आला आहे. धर्माचा विचार करीत असताना अलौकिक घटना किंवा त्यांच्या संबंधीत घटना यावर भर नाही तर धर्म एक सामाजिक घटना म्हणून त्याचा सामाजिक जीवनाशी काय संबंध आहे? या संबंधी विचार करण्यात आला आहे. भारतासारख्या अति प्राचीन समाजाच्या की, ज्या समाजात ग्रामीण व आदीवासी समाज मोठया प्रमाणात आहे येथे समाज जीवनाचा विचार

करीत असतांना समाजातील धर्माचे स्वरुप व त्यांची व्याप्ती काय असते त्याचे स्वरुप जाणून घेणे गरजेचे आहे. कारण कोणताही समाज त्या समाजाचे अपरीवर्तनीय स्वरुप स्विकार करुन घेत नाही. तर ज्या काळाच्या आजी कालखंडाच्या ओघात परीवर्तन होते ते सरळ परीवर्तन असो किंवा चक्रकार परीवर्तन असो ते स्विकारले जाते. कोणत्याही समाज, संरचनेतील धर्म संस्थेतील परीवर्तन मंद गतीने घडते. त्यात 'यडवर्ड टॉयलय' याचा आत्मवाद (Animasm) मुलरचा निसर्गवाद मॅनिनीव्हास्केचा गोत्र प्रतीकवाद याचा विशेषत्वाने उल्हेक केला जातो."[८४]

भारतीय जीवनात विशेषत: ग्रामीण व आदीवासी खेडयातील जीवनाचा अभ्यास करतांना हया संकल्पना अपुऱ्या पडतात याचे कारण पाश्चिमात्य समाजात आफ्रिकेतील जे आदीवासी समाज डोक्यासमोर ठेवून त्याचा जो विकास झाला त्यापेक्षा भारतातील डोंगरदऱ्यातील जनजातींचे स्वरुप हे कसे वेगळे आहे. मुळात 'Triber' या शब्दाला भारतीय भाषेत कोणताही पर्यायी शब्द नाही म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात हाच शब्दप्रयोग केला आहे. म्हणून आजही काही आदीवासी सोडल्यास बहुतेक आदीवासी मुळ अस्तीत्व टिकवून ठेवण्यात व्यस्त आहेत.

५) **आदीवासींचे नृत्यकला/रेल्या** : आदीवासी समाजात विविध धार्मिक उत्सव सण, समारंभ, देवदेवतांची पुजा अर्चा या प्रसंगी आदीवासी समुदायातील तरुण मुले—मुली सामुदायिक नृत्यकला/रेला सादर करतात त्याच्या नृत्यात लय, ताल, रंग रुप व विशेष आकर्षण नसले तरी त्याची वेगळी संस्कृती वेगळेपण एक विशेष लय व ताल पहावयास मिळते. ते आपले नृत्य पारंपारीक पद्धतीने वेळप्रसंगी करीत असतात. गोंडी नृत्यात विशेष काही असते तर वेरुळ अजिंठा

८४ गारे गोविंद, (१९८८), 'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्या व विकास' पुणे आदीवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पृ. ११०

लेण्यातून प्रतिबिंबीत झाले असते. अलीकडे हा नृत्य प्रकार लोप पावत असल्याचे दिसून येते. आजच्या टी.व्ही. च्या युगाने त्याच्यावरही थैमान घातले आहे. त्यामुळे पारंपारीक नृत्य करणारे आदीवासी युवक–युवती नृत्य करण्यास त्यांना कमीपणा वाटतो आहे.

गोंड आदीवासीमध्ये ज्या १२ जमाती आहेत त्यापैकी युंकेल, बडी व डोखर हे अस्पृश्य समजले जातात. बाकीच्या ९ जमातीपैकी गोंड, राजगोंड, माडीया गोंड व तुरळक प्रमाणात कोरकू गोंड हया जाती उच्च मानल्या जातात.

आदीवासी समाजात कुलचिन्हे (Totenism) चे अस्तीत्व आहे त्याचे अस्तीत्व पुर्वज पुजेच्या स्वरुपात हे कुलप्रतिकवार आढळत नाही. काही विशिष्ठ वस्तुंचे सेवन काही लोक बकऱ्या, कोबडयांचे मास निसीद्ध मानतात. काही लोक बांबूला कुलचिन्हे मानत असतील तर त्याला निसीद्ध मानतात. कदाचित याचा संबंध त्याच्या पुर्वजांच्या काही घटकांशी असल्याचे दिसून येत आहे. जर का एखादे झाड, पक्षी याद्वारे पुर्वज शोधण्याचा ते प्रयत्न करीत असतील असे वाटते.

आदीवासी समाजाचा स्वत:चा एक वेगळा अस्तीत्व शोधणारा धर्म आहे. या समाज व्यवस्थेत त्याची अशी वेगळी ओळख आहे. गडचिरोली जिल्हयातील माडीया गोंड ही जमात फार दिर्घकाळापासून हिंदू धर्माच्या संपर्कात आहे त्यामुळे हिंदू देव–देवतांचा व रितीरिवाज प्रथाचा त्याच्या धर्म संस्कृतीवर निश्चित रुपाने परिणाम झाला असेल असे वाटते. आदीवासी धर्माचे स्वरुप पुजा अर्चा हा प्रकार अगदी हिंदू धर्माच्या पद्धतीनुसार दिसून येतो आहे. महादेव (भगवान शंकर) हा आदीवासीचा प्रमुख देव आहे. हिंदूमध्ये पर्वतावर वास्तव्य करणारा व गावापासून दूर जंगलात तपस्पर्धा करणारा अशीच या देवाची प्रमुख ओळख आहे. आदीवासीचा वेगळा धर्म म्हणता येईल. परंतु कालांतराने हिंदूच्या संस्कृतीचे

अनुकरण ही संस्कृती करण्याची प्रक्रिया आहे. परंतु या क्षेत्रात वयोवृद्ध लोकांकडून आदीवासीचा वेगळा धर्म असल्याचे जाणवत नाही. म्हणून **डॉ. गो.स. धुर्वे** यांनी आदीवासीला 'मागासलेले हिंदू' हा जो शब्दप्रयोग केला तो निश्चित खरे आहे.



६) **माडीया गोंड जमातीचे सन** : भारतीय समाज रचनेत धार्मिक सण समारंभाला विशेष महत्व आहे. या सनाचा प्रत्येक मानवजातीशी संबंध आला आहे. ज्याप्रमाणे हिंदू, मुस्लीम, शिख, बौद्ध या धर्मामध्ये सणांचे महत्व आहे. त्याप्रमाणे माडीया गोंड आदीवासी जमाती आपल्या धर्मातून नविन संकल्पना शोधताना दिसतात.

रविंद्र मुखर्जी यांच्या मते "माडीया गोंड या आदीवासीच्या सणामध्ये देवदेवतांना विशेष महत्वाचे स्थान असून ते परीसरात जीवन जगताना त्या परीसराचे ऋण मानतात पण फुल ना फुलाची पाकळी या न्यायाने कृतज्ञतापूर्वक, आदरभावाने त्या ऋणातून मुक्त होण्यासाठी त्या परीसरातील पर्यायाने निसर्गाचे पुजन करतात. निसर्ग आपली धरती माय त्यांच्या देणगीवरच आपले जीवन आपला उदरनिर्वाह चालतो. त्याची जाणीव ठेवूनच त्यांच्या सण समारंभातून प्रगट होते.

"बडादेव" माडीयाचा मुख देवता 'पेरसापेन' हा होय याची स्थापना करण्यासाठी एखाद्या झाडाची निवड करुन त्याला कुंपण घालतात मग त्या

झाडाच्या बुद्यांला रंगीत फुले व एखादा कपडा बांधतात आणि त्या ठिकाणी 'पेइसापेन' देवतांची स्थापना करतात. हया पुजेचा दिवस कॅलेडर प्रमाणे निश्चीत केला नसतो. परंतु साधारणत: धानाचे (भाताचे) पीक निघाल्यानंतर डिसेंबर–जानेवारी महिन्यात देवीचा उत्सव करुन पुजा करतात हा त्यांचा 'बडादेव' होय.

"छोटादेव" या देवाला 'मायलपेन' म्हणजेच मातादेवी किंवा माऊली म्हणतात. बडादेवाचा उत्सव झाल्यानंतर गावाच्या माऊली जवळ येवून तिची पुजा करतात व कोंबडे–बकरे कापून मद्यपान करुन सामुहिक भोजन करतात व रात्रीला शेकोटीच्या सभोवताल घेर घेवून रेलानृत्य करतात. कोणतेही झाडाचे फळ, नविन धान्य, पीठ, तांदूळ खायचे असल्यास समारंभपूर्वक प्रथम देवाला नंतर पुजाऱ्याला दान केल्यानंतर स्वत: खाण्याची प्रथा त्यांच्यात आहे. त्यासाठी पोलो, पूजा, सण, उत्सव असे संबोधले जाते.

नविन बीज पेरताना सण (बिजापेंदूम) नविन अंकूर झाल्यावर त्याचा पुजेचा सण नवीन धान्य व फळ खाण्याचा सण (नवापेंदूम) या प्रत्येक सणाला पोलो (कामाला सुट्टी) असते. यावेळी जर कितीही महत्वाचे काम असले की, जाणे वर्ज ठरविले जाते. जो व्यक्ती नकळत गेल्यास त्यांच्यावर सामाजिक दंड समाजाला दयावे लागते. म्हणजेच प्रत्येकांना सणाला हजर राहणे अनिवार्य असते. याचाच अर्थ त्याच्या जीवनात सणाला विशेष महत्व आहे.

आदीवासी समाजाच्या लोकांमध्ये सणामध्ये दारु हा त्याचा महत्वाचा घटक आहे. ताडाच्या झाडापासून निघालेली ताडी, सिंधीच्या झाडापासून निघालेली निरा किंवा सिंधी गोरगा झाडापासून निघालेला गोरगा तसेच मोहू फुलापासून काढलेली दारु हे त्यांचे आवडते पेय आहे. गरीबीमुळे किंवा भूकेची क्षमता टिकविण्यासाठी पुरुष, महिला, मुले–मुली, एक वनस्पती औषधी म्हणून

याचे सेवन करतात. दारु हा त्यांच्या जीवनात प्रतिष्ठेचा प्रश्न मानला जातो. त्यामुळे देवीला दारु अर्पण करण्याची त्यांच्यात प्रथा आहे. घरी नविन पाहुणा आला तर त्यांना ताडी किंवा गोरगा दिला जातो.

आदीवासी हिंदूचे सण समारंभ पाडतात परंतु स्वत:च्या संस्कृतीची वेगळी ओळख ते ठेवतांना दिसून येते.

७) **दसरा सण** : हा सण आदीवासीचा परंपरागत सण असून माडीया लोक आपआपल्या गावी साजरा करतात. जिल्हयामध्ये या विभागातील भूतपूर्व अहेरी जमीनदारी येथे माडीया स्त्री–पुरुष चमुने नाचत गात घेरानृत्य, दांडीनृत्य करीत अहेरीचे राजे यांच्या वाडयात दर्शनासाठी येतात व आपल्याकडील सोने, चांदी, पैसा राज्याला दान म्हणून वाहतात. महाराजांना पालखीत बसवून गाजत–वाजत पालखीत बसवून अहेरी जवळील गडअहेरी येथील कुलदेवताची पुजा करण्यासाठी सज्ज होतात. या ठिकाणी असलेल्या वृक्षाची (पेनसापेनी) देवाची पूजा करतात. पालखी वाडयावर परत आल्यानंतर सामुहीक भोजनानंतर रात्रभर आदीवासी परंपरेचे सुलवे, गात रेलानृत्य, रेघानृत्याचे कार्यक्रम साजरे करतात. या सर्व नृत्याची जबाबदारी टोली, वस्ती, या ठिकाणाहून आलेल्या महीला मुखीमेकडे त्यांची जबाबदारी दिलेली असते.

८) **दिवाळी सण** : हा आदीवासीचा परंपरागत सण नाही. परंतू हिंदू धर्माच्या संपर्कामुळे आजही आदीवासी दिवाळी सण साजरे करताना दिसत आहेत. पण त्यांच्यात इतराप्रमाणे फारसा आनंद नसतो. याचा अर्थ दसरा सणाच्या तूलनेत कमी महत्व असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात आदीवासी बांबुच्या मध्यभागात एक छिद्र पाडून त्याला टिनपत्राची रिंग लावतात यात रॉकेल भरुन रात्रभर अंगणाच्या समोर हा दिवा लावला जातो. दिवाळीच्या सणाच्या तिसऱ्या दिवसी आदीवासी मनोरंजनासाठी दंडार, गोंधळ, झुलवे असे कार्यक्रम करतात.

अर्थात संस्कृतीकरणाची जी संकल्पना **डॉ. श्रीनिवास** यांनी मांडली त्याचे अनुकरण आदीवासीमध्ये होतांना दिसून येत आहे.

९) होळी : या सणाच्या वेळेस आदीवासीची शेतीतील सर्व कामे आटोपलेली असते. ताडी व गोरगा मुबलक प्रमाणात मिळते त्यामुळे आदीवासी हा सण मोठया आनंदात करतात. होळीच्या वेळी प्रत्येक घरी जावून मोनारा (वर्गणी) गोळा करतात. दारु मुबलक प्रमाणात पीतात आदीवासीनी जंगलातील लाकडाची होळी पेटवितात. या होळीला नैवेद्य, हळद, नारळ, गाठी इ. अर्पण करतात त्यांच्या मते होळी म्हणजे आकृती होय ही अग्नी देवतेची पूजा होय. होळी जवळ दिवस निघेपर्यंत रेला चालतो दिवस उजाळल्यावर बकरा कापला जातो. रंग म्हणून पळसाच्या फुलांचा रंग उधळतात याचा अर्थ एकमेकांप्रती असलेली दूरमणी दूर केली जाते आणि दारु, मटन याचा आस्वाद घेतात.

१०) पोळा : पोळयाच्या दिवशी माडीया लोक 'कोडालपेन' या देवाची पूजा करतात. पोळा हा बैलाचा सण आहे, माडीया लोक हिंदूप्रमाणे बैलाला सजवित नाही. त्या दिवशी ते बैलांना पीठ चारतात, गुरांच्या गोठयाची पुजा करतात व पुजेचे नैवेद्य बैलांना चारतात. यावरुन बैलाना सुरक्षीतता लाभावी. यासाठी 'कोडांलपेन' या देवाला प्रसन्न करण्यासाठी पूजा केली जाते.

११) सांस्कृतिक कार्यक्रम : ग्रामीण समाज परीवर्तनाचा विचार करतांना त्यांच्या संस्कृतीचा विचार करणे ही क्रमप्राप्त ठरते. आतापर्यंत झालेल्या विवेचनातून म्हणजेच गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण समाजाच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक जीवनातून त्याच्या सांस्कृतिक जीवनाचा व त्यात होत असलेल्या परीवर्तनाचा प्रत्यय आला आहे.

संस्कृतीमध्ये सतत परीवर्तन घडत असले तरी संस्कृतीचा भुतकाळाशी दुवा असतो. त्याचा लवकर ऱ्हास होत नाही असे म्हटले जाते. मनोरंजनाच्या

साधनांचा पूर्णता अभाव असलेल्या या ग्रामीण जीवनात आदीवासी आपली संस्कृती जपण्याचा पर्यंत करतो आहे. हीच संस्कृती त्यांच्या दारीद्र दु:ख, कष्टाने केलेल्या शरीरास जीवंत ठेवण्यासाठी सक्षम आहे.

संस्कृतीचे महत्व विषद करतांना **डॉ. शैलेजा देवगावकर** म्हणतात. अत्यल्प गरज आणि अत्यंत साधे जीवन जगणाऱ्या या आदीवासीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात प्रतीत होणारी त्याची संस्कृती ही अजूनही अभिजात भारदस्त आणि प्रामाणिकपणाने युक्त आहे. संगीत, नृत्य, विविध कला दागिणे घराची व खेडयाची स्वच्छता या सर्व गोष्टीवरुन त्यांच्या भौतिक आणि मौलिक संस्कृतीचे श्रेष्ठत्व लक्षात येते. त्यांचे सनवार, लोककथा, गीते वाद्यप्रकार इत्यादीवरुन त्यांचा मानसिक आणि वैचारिक श्रेष्ठत्वाची कल्पना येते.[८५]

आदीवासी युवकांचे पारंपारीक अनौपचारीक व सांस्कृतिक केंद्र म्हणजे 'गोदूल' होय, याला सयायांग असेही म्हणतात त्यामध्ये युवक–युवतीच्या पुढाकाराने ते टिकून आहे. प्रत्येक गावाच्या मध्यभागी गोदूलाची रचना असून रात्री ८.०० च्या सुमारास गोदूलच्या भव्य पटांगणावर शिंगे फुकूंन आव्हान केले जाते. शिंगाची ललकारी ऐकल्या बरोबर कामे टाकून आदीवासी तरुणी या ठिकाणी रेला खेडण्यासाठी येतात त्यात हसत खेळत आनंदात मुले–मुली, स्त्री–पुरुष मध्यभागी लाकडे पेटवून त्याच्या उजेडात रेला, घेरानृत्य केले जाते. एक हात कमरेवर एक हात मैत्रीतील खांद्यावर ठेवून मुले–मुली गाणे म्हणत एक पाऊल पुढे, तर दुसरे पाऊल बाजूला टाकीत वर्तूळाकार नृत्य सुरु असते. सांयकाळी पिलेल्या ताडी गोरगा याच्या नशेत रात्रभर नृत्य करतात व आपल्या संस्कृतीचे जतन करतात.

---

८५ देवगांवकर शैलजा, (१९८९), 'वैदर्भीय आदीवासी जीवन आणि संस्कृती' नागपूर श्री. मंगला प्रकाशन, पृ. १०८

१२) **आदीवासीची जीवनपद्धती** : आदीवासी जमात आज ही डोंगरदऱ्यात वसलेला आहे. आजच्या परीवर्तनाच्या प्रक्रियेत हे आदीवासी आपली अस्मिता जपतात. **रविंद्र मुखर्जी** यांच्या मते,"भारतीय समाज म्हणजे एक रंगीसाठी नाही तर बहुरंगी चुनरी आहे." या विधानाचे तात्पर्य असे की, सामाजिक समुहाच्या सांस्कृती तत्वाचा एक सुसंगत समन्वय पहायला मिळतो. धार्मिक भिन्नता, सांस्कृतिक सभ्यता भौगोलिक विविधता लोकाचार चालून विविधतेचे दर्शन घडते.

आदीवासीची व्याख्या करतात पाश्चात्य मानव शास्त्रज्ञांनी "राजकीय स्वायत्ता असणाऱ्या एका विशिष्ठ भौगोलिक क्षेत्रावर वास्तव्य करणारा व जमात रचना असणारा गट अशी कल्पना मांडली आहे.

१८८१ च्या जनगणना अहवालात भटक्या जनजाती, पशुपालक जनजारी शेती करणाऱ्या जनजाती असे त्याचे वर्गीकरण आढळते. **डॉ. धुर्वे** यांच्या मते "भारतातील वेगवेगळया क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या जनजातीत वेगवेगळी संस्कृती आढळून येते. पूर्वेकडील भाग सोडला तर बहुसंख्य जनजाती जाती व्यवस्थेवर आधारीत असून त्याची जीवन पद्धती हिंदूच्या संपर्कामुळे परीवर्तीत होत असल्याचे दिसून येते. म्हणूनच आदीवासीचा अभ्यास करतांना गैर आदीवासीचा त्यांच्या संबंधाचा विचार करावयास हवा.

जसे माडीया जनजात देखील बडा माडीया उपवाद वगळता गैर आदीवासीचा संपर्कात असल्याचे दिसून येते. अगदी याप्रमाणे गडचिरोली जिल्हा फार पूर्वीपासून आदीवासी व गैर आदीवासी पूर्वीपासून एकत्रीतरित्या वास्तव्य करताना दिसून येतात.

गडचिरोली जिल्हा हा आदीवासीचा जिल्हा घोषीत करण्यात आला. त्यामुळे त्याच्या समाज जीवनाचा अभ्यास करतांना आदीम समाजावर भर देणे गरजेचे आहे. या जिल्हयात आदीवासीचे प्रमाण एकूण ६८.७० टक्के आहे.

गडचिरोली जिल्हा संस्कृतीकरणात फारच खालच्या स्तराला असलेली व म्हणून अतीमागास मानलेली माडीया गोंड ही जमात या जिल्हयात सापडते.

आदीवासी समाजाचे अभ्यासक **डॉ. विनायक तूमराम** म्हणतात, "आदीवासी समाज हा निर्धन असेल, निरक्षर असेल पण तो असंस्कृत नाही हे लक्षात ठेवले पाहीजे. त्यांना स्वत:ची बोलीभाषा आहे. रितीरिवाज आहेत, दैवते आणि धर्म बिबि आहे. शहरी दलीत समाजापेक्षा त्या अरण्यवासी आदीम समाजाचे हे वैशिष्टे नेहमी लक्षात ठेवले पाहीजे हा समाज विभूती पुजा, झंडशाही आणि हिंसाचार या दुर्गूणापासून अलिप्त आहे याचे कारण त्यांना लाभलेला सांस्कृतिक वारसा होय."[८६]

या देशाची अस्मीता शोधण्यासाठी प्रथम येथील मूळ निवासीयांची अस्मिता शोधणे क्रमप्राप्त आहे. आदीवासी माणूस आपली अस्मिता गमवून बसला आहे. या भूमिवर मुळचा असलेला आदीवासी माणसाच्या वैभवशाली जीवनाची झलक आपणास सिंधू संस्कृतीच्या अवशेषामध्ये पहावयास मिळते. आदीवासीच्या शिल्पकला, लेण्या, किल्ले या अप्रतिम व जिवंत कलेचा नमूना आजही पहावयास मिळतो. परंतु आज या भूमीचा मालक गुलाम होवून बसला आहे. आदीवासी संस्कृतीमध्ये गाय, बोकड, नंदी, लिंगपीडम् ही शिल्पे गोंड आदीवासीची महत्वाची शिल्पे असल्याचे दिसून येते.

सिंधू संस्कृतीचे अभ्यासक व इतिहास संशोधक **श्री. व्यंकटेश आत्राम** यांनी एका लेखात समप्रमाण सिद्ध करण्याचा आणि गोंडी संस्कृतीच्या संदर्भात सिंधू संस्कृतीच्या शिल्पात अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे धरतीच्या लेकरांकडे पहाण्याचा दृष्टीकोन विशद करतांना **डॉ. गोंविद गारे** लिहीतात. "आदीवासी म्हणजे निर्भिड अरण्यात नग्न, अर्धनग्न अवस्थेत राहणारे नरभक्षक

---

८६ तुमराम विनायक, (१९९४), 'आदिवासी साहित्य स्वरुप आणि समीक्षा' नागपूर, विजय प्रकाशन, पृ. १०३

कच्चे मास खाणारे शिकार करणारे असेच त्यावेळी लोकांना वाटत होते. यावरुन त्यांना आदीवासी संबोधले गेले. यावरुन आदीवासी हे निषाद, किरात, वाल्याकोडी आणि शबरी त्याचे वंशज आहेत असे वाटते.

आदीवासी कोण?

अलीकडच्या काळात आदीवासी हा शब्द विशिष्ट भाषा बोलणारा विशिष्ट जीवन पद्धतीने परंपरेशी नटलेल्या आणि शेकडो वर्षे जंगल पहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक, सांस्कृतिक मुल्ये जोपासणारा मानव समुहाची ओळख करुन देण्यासाठी वापरला जातो. फार मोठया प्रमाणावर त्याच्या दु:खावर उध्वस्त प्रपंचावर हळहळी व्यक्त केली जाते.

उपाशी, तापाशी अर्धनग्न, लंगोटी नेसून शिकारी करण्यासाठी रानमोल वन–वन भटकल्यामुळे त्यांना 'वनवासी' किंवा वन्यजमाती म्हणून ओळखण्याचा प्रघात पडला आहे. कोणी त्यांना अरण्यक, लंगोटे म्हणून संबोधतात. कोणी सहानभूतीने 'धरतीचे लेकरे', 'आदी पुत्र' किंवा वनपूत्र या नावाने ओळखले जाते. परंतू भारतीय संविधानाने 'अनुसूचित जमाती' असे संबोधले आहे हीच त्याची ओळख आहे.

२.१४ रस्ते विकास :

गडचिरोली जिल्हयात नक्षलक्षेत्र असल्यामुळे ग्रामीण लोकांचा शहरी जीवनमानाशी संबंध साधता यावा यासाठी दळणवळणाच्या विचार करुन आंतरीक रस्ते व जिल्हा प्रमुख मार्ग मुख्यालयाशी जोडण्यासाठी रस्ते विकासाकडे लक्ष देण्यात येत आहे. जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १४,४१४ चौ.कि.मी. त्यापैकी आदीवासी भागाचे क्षेत्रफळ १३,०८६ चौ.कि.मी. आहे. तर बिगर आदीवासी भागाचे क्षेत्रफळ १,३२६ चौ.कि.मी. आहे. त्यापैकी ११,८४१ चौ.कि.मी. हेक्टर क्षेत्र सुमारे ७९ टक्के हे वनाने व्यापले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ अंतर्गत प्रमुख राज्य मार्गाचा दर्जा असलेले २८ कि.मी. चा रस्ता आहे. तर राज्य मार्गाचा दर्जा असलेले ३०७ कि.मी. चा रस्ता आहे. प्रमुख जिल्हा मार्गाची २२६.२६५ कि.मी. डांबरी रस्ते व खडीकरणाची १०,९५० कि.मी. चे रस्ते आहे. असे एकूण २७८.०७५ कि.मी. चा जिल्हा मार्ग आहे.

२.१५ औद्योगिक विकास :

महाराष्ट्र राज्यामध्ये औद्योगिक विरहीत जिल्हा म्हणून गडचिरोली जिल्हयाला ओळखले जाते. परंतु बेरोजगारांना रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण व सामुहिक प्रोत्साहन याद्वारे रोजगार विकासाचा विचार करण्यात आला. सध्या जिल्हयात आष्टी येथे पेपरमिल कार्यरत असून त्यात ९४६ कामगारांना दैनंदिन रोजगार मिळत आहे. आणि जिल्हयात सध्या १२२ लघुउद्योग असून त्यात १,०४४ लोकांना रोजगार दिला जातो आहे. नव्याने सुरजागड स्टील माईन्स निर्माण झाल्यास अंदाजे १००० लोकांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे. गडचिरोली शहरात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळा मार्फत ८१.७३ हेक्टर क्षेत्रात औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात आली. त्यातील १३० भूखंड लघुउद्योगाना विस्तीत करण्यात आले. त्यापैकी २ ते ३ लघुउद्योग सुरु आहेत. तर अहेरी येथे ९.२० हेक्टर जमीन, कुरखेडा येथे १६.४८ हेक्टर जमीन धानोरा येथे ११.८० हेक्टर जमीन संपादीत करुन लघुउद्योगासाठी देण्याच्या मार्गावर आहे.

सारासार विचार केल्यास जिल्हयात वने, बांबू, तेंदू, मोहफूल असा कच्चा माल मुबलक असूनही नक्षलकारवाईमुळे बाहेरील, कपणी जिल्हयात उद्योग

करण्यास समर्थ नाही. तर जिल्हयातील उद्योजक वर्ग कमी असल्याने उद्योगाच्या संदर्भात उदासीनता दिसून येते आहे.



२.१६ आरोग्य प्रश्न :

जिल्हयातील सर्वसामान्य, आदीवासी, लोकांचे आरोग्य आच्छादित राखण्यासाठी जिल्हयाच्या मुख्यालय ठिकाणी जिल्हा सामान्य रुग्णालयाची निर्मिती करण्यात आली. यामध्ये २०० खांटाची व्यवस्था असून सिटीस्कॅन, सोनोग्राफी, एक्स–रे, ब्लडबॅक, पॅथालॉजी, शस्त्रक्रिया गृह, प्रसुतीगृह आदी विभाग कार्यरत आहेत. या विभागात कार्य करण्यासाठी बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, सर्जन फिजीशियन, बधीरीकरण, पॅथालाजिस्ट, रेडीथोलाजिस्ट, सोनोलाजिस्ट, नेत्रचिकीत्सक इ. तज्ञांची पदे आहेत. तर ६ खांटाचे ट्रामा केअर आहे आणि २० खांटाचे नेत्र विभाग आहे. ५ खांटाचे आय.सी.यु. आहे. जिल्हयातील १२ तालुक्यात उपजिल्हा रुग्णालये आहेत. जिल्हयात ४५ प्राथमिक आरोग्य केंद्र, ३७४ उपकेंद्र, ५ आयुर्वेद दवाखाने, ३६ आरोग्य पथके, ३ फिरते पथके आहे.

जिल्हयात खाजगी रुग्णालय नाहीत हे विशेष जिल्हयात नक्षलकारवाया मोठया प्रमाणात असल्याने तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी येण्यास असमर्थ असल्याने उपजिल्हा रुग्णालयाची सेवा कोलमडली

आहे. दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचारी कमी असल्याने मुख्यालयाची उपचारासाठी येतांना कित्येकांचा जीव जातो आहे. या रुग्णालयात सुविधा कमी असल्याने अनेक रुग्ण चंद्रपूर, नागपूर, ब्रम्हपूरी येथील दवाखान्याकडे जाण्याचा कल वाढत चालला आहे.

२.१७ सामाजिक विकास :

जिल्हयात अनुसूचित जाती तथा नवबौद्ध यांची एकूण लोकसंख्या १,०८,८२४ आहे. त्यापैकी ५४,८८२ पुरुष असून ५३,९४२ स्त्री आहेत एकूण टक्केवारी ११.२ टक्के आहे. तर अनुसूचित जातीचे दारीद्र रेषेखालील लोकांची संख्या १४,८७५ आहे याचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास व्हावा यासाठी सामाजिक न्याय विभाग कार्यरत आहे. त्याच्यासाठी कृषी योजना, ग्रामीण विकास कार्यक्रम, सामाजिक सेवा, आरोग्य शिक्षण, पाणीपुरवठा, चर्चउद्योग, मागासवर्गीय कामगार कल्याण इ. अनुसूचित जाती, नवबौद्ध वंचीत घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान योजना २००८ पासून सुरु करण्यात आली. या योजनेद्वारे अनुसूचित जाती व नवबौद्ध दारीद्रय रेषेखालील भूमिहीन कुटूंबाला ४ एकर कोरडवाहू जमीन देण्यात येते. यासाठी ५० टक्के अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत जिल्हयात १२ लाभार्थींना २९.५० एकर जमीन वाटप करण्यात आली आहे.

तसेच कन्यादान योजनेअंतर्गत २००४ ते २००९ पर्यंत अनुसूचित जातीच्या २०० लाभार्थ्यांना विवाहाच्या वेळी १०,००० रुपये अनुदान व ६,००० किंमतीचे मंगळसुत्र देण्यात आले आहे आणि ९ लाभार्थ्यांना शेतीसाठी पावरमिटर पुरवठा करण्यात आला आहे.

२.१८ महीला व बालकल्याण :

महिला व बाल कल्याण विकास विभागाद्वारे जिल्हयात शासकीय निरीक्षण गृह आहे. यामध्ये मुलांची काळजी व संरक्षण करण्यात येते. यामध्ये जिल्हयात ५० मुलांची मान्यता असून ७ ते १८ वयोगटातील संघर्ष ग्रस्त २४ बालकांचा समावेश करण्यात आला आहे.

जिल्हयात याच कार्यालयाद्वारे ६ बालसदने सुरु असून १० मुलांचे १ युनिट याप्रमाणे स्वंयसेवी संस्थामार्फत बालसदने १० युनिट लाभार्थीकरीता चालविली जात आहेत. या बालसदनामध्ये बेघर, अनाथ, निराधार, निराश्रीत बालकांचा समावेश असून या बालसदनात ७ ते १८ वयोगटातील बालकांचा समावेश आहे. सदर बालसदने स्व: राजीव गांधी बालसदन वडसा, संहकार बालसदन पेठतळा, क्षितीज बालसदन वडसा, महानकाली बालसदन चौडमपल्ली, अहिल्याबाई बालसदन नेवरअली, नवजीवन बालसदन सिरोंचा येथे कार्यरत आहेत.

तसेच या कार्यालयामार्फत माई रमाई बालकथन कोंटकल येथे आहे. सदर प्रवेश बालकल्याण समिती मार्फत देण्यात येत आहे. यात बेघर, अनाथ, निराश्रीत बालकांचा समावेश आहे.

या संस्थेद्वारे ० ते १८ वयोगटातील अनाथ–निराधार, निराश्रीत कुटूंबात राहात असलेल्या लाभार्थ्यांना लाभ दिला जातो याचा लाभ ११० बालक घेत आहेत.

२.१९ आदीवासीच्या सभोवतीची नक्षल चळवळ :

गडचिरोली जिल्हयात आदीवासी समाजाच्या सभोवताल असलेली नक्षल चळवळ हा चिंतेचा विषय ठरला आहे. ही चळवळ जी शासन, संस्था पोलीस

यंत्रणा आणि स्थानिक समाज व्यवस्थेवर आपली पांडेमुळे घट्ट केली आहे. याचा परीणाम आदीवासीच्या मानसिकतेवर मोठया प्रमाणात पडत आहे.

'नक्षलवाद' हा शब्द पश्चिम बंगालमधील नक्षलबाडी या गावापासून निर्माण झाला. इ.स. १९६७ मध्ये माओवादी लोकांनी सशस्त्र उठाव करण्याचा प्रयत्न केला. नक्षलवादी मार्क्सवादी, लोणीनवादी तत्वज्ञानाचा भारतातील एक अविष्कार होता. चीनच्या क्रांतीचा नेता 'माओत्सेतुंग' च्या विचारांना अमलात आणण्यासाठी नक्षलवाद्यांनी भारतात आपली पक्की ओळख निर्माण केली आहे.

नक्षलवादी येथील **विंगल केसन** हा आदीवासी युवक २ मार्च १९६७ रोजी न्यायालयाचा आदेश घेवून आपली जमीन कसण्यासाठी गेला असता तेथील जमीनदारांनी गुंडाकडून त्याची हत्या केली. त्यातूनच आदीवासीनी आपल्या जमीनी ताब्यात घेण्याचे सत्र सुरु केले. यामध्ये आदीवासीनी पोलीस निरीक्षकांची हत्या केली. या दंगलीला उग्र रुप येवून आदीवासी तरुण ठार झाले.

पुढे ही चळवळ सरकत गडचिरोलीच्या दुर्गम आदीवासीना हक्कासाठी लढण्यास सज्ज करण्यासाठी तयार झाली. या चळवळीत अनेक आदीवासी तरुण–तरुणी मुक्तपणे संचार करीत आहेत. गावाच्या शोषणापासून व दडपणातून मुक्त करण्यासाठी लोकांच्या सर्वात शत्रू वर्गाला ठार मारण्यात येवू लागले. त्यात बडे जमीनदार, सावकार, व्यापारी, पोलीस यांचा समावेश आहे.

डॉ. रावसाहेब कसबेच्या मते, "भारतातील नक्षलवाद हा अमानुष दमन व्यवस्थेशी निकराची झूंज देणार, मनस्वी तरुण रक्ताने शोधलेला एक मार्ग आहे. लोकशाही व्यवस्थेतील प्रतीकारांचे सर्व मार्ग जेव्हा सत्ताधारी वर्गाकडून आणि बहुसंख्य शोषकाकडून कायदेशीर मार्गाने निकामी केले जाता. तेव्हाच नक्षलवाद्यांचा जन्म होत असणे." आदीवासी तरुणांनी हातात शस्त्रे घेवून नोंदविलेली आत्मघातकी प्रक्रिया म्हणून सिद्ध झाली आहे.

यात अनेक गरीब आदीवासीचे जीवन संपण्याच्या मार्गावर आले आहे.

सन १९७८–७९ मध्ये चोरपावलांनी आलेली ही चळवळ अधिक प्रमाणात सक्रिय झाली आहे.

२.२० जिल्हा पोलीसांचे कार्य व योजना :

गडचिरोली जिल्हयात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी जीव मुठीत घेवून घनदाट अरण्यात पोलीस विभाग कार्य तत्पर आहे. रस्ते, पाणी, वीज अशा महत्व पुर्ण सुविधा नसतांनाही केवळ टिनाचे पत्रे टाकलेले बॅरेक, कापडी टेंट यामध्ये वास्तव्य करीत जिल्हयात जिल्हा पोलीस, एस.आर.पी.सी. आर.पी. बार्डर सेक्युरीटी फोर्स कार्यरत आहेत. गेल्या ४२ वर्षापासून जिल्हयात नक्षल चळवळीचे मुळे रोवले गेल्याने विशेष नक्षल सेल विभाग निर्माण करुन यात जिल्हयातील सी. ६० पोलीस जीव ओतून काम करतांना दिसतो आहे. जिल्हयातील नक्षल समस्या ही पोलीसामुळे व सामान्य जनतेपुढे आव्हानात्मक असल्याचे पाहून या कारवायांना पायबंद करण्यासाठी जिल्हयातील पोलीस अधिकारी/कर्मचारी सेवाव्रत कार्यतत्पर झाले आहे. या चळवळीत गरीब आदीवासी सहभागी होवू नये तसेच या चळवळीत गुंतलेल्या आदीवासी तरुण–तरुणींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पोलीस विभाग अनेक योजना आदीवासीच्या विकासासाठी राबवित आहे त्या खालीलप्रमाणे आहेत.

अ) **आत्मसमर्पण योजना** : जिल्हयात सुरु असलेल्या दुर्गम भागातील आदीवासी रोजगार, शिक्षण, अंधविश्वास, दारीद्र या कंटाळून नक्षल चळवळीत सहभागी झालेल्या युवकांना मुख्य प्रवाहात सहभागी करण्यासाठी वाट चुकलेल्या तरुणांना सामान्य नागरीकांसारखे जीवन प्राप्त व्हावे यासाठी शासन स्तरावरुन त्यांना सुधारण्याची संधी मिळावी व जास्तीत–जास्त आदीवासी या प्रवाहात सहभागी व्हावे यासाठी

आदीवासी नक्षल समर्थक व नक्षलवादी म्हणून कार्यरत असलेल्या विविध दलममध्ये काम करणाऱ्या युवकांना यात सहभागी केले जात आहे. यामध्ये ३५० नक्षल समर्थकांना आत्मसमर्पीत करुन मुख्य प्रवाहात आणण्यात आले यासाठी शासनाने आजपर्यंत १२,२५,५०० रुपये अर्थ सहाय्य केले. आत्मसमर्पीत आलेल्या नक्षलवाद्यांना घर, भूखंड, व आर्थिक सहाय्य देवून स्वंयरोजगार त्याच्या मुलांसाठी शिक्षण इ. सुविधा दिल्या जात आहे.

ब) **ग्रामभेट व जनजागरण मेळावे** : आदीवासी गोरगरीब जनतेस शासन स्तरावर त्याच्यासाठी कोणत्या योजना आहेत. त्या योजनाची माहीती व्हावी यासाठी समाजकल्याण, आदीवासी कल्याण, कृषी विभाग, आरोग्य विभाग, स्वंयरोजगार, जिल्हा उद्योग केंद्र येथील अधिकाऱ्यांना सहभागी करुन पोलीस विभागामार्फत ग्रामभेट व जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

ग्रामीण आदीवासीचे प्रश्न कोणते, विज, रस्ते, पाणी, आरोग्य, शाळा, मुलभूत गरजा, जमीनीचा प्रश्न यावर या मेळाव्यातून लोकांमध्ये जागृती केली जाते. यामध्ये बाजाराच्या दिवशी मुख्य प्रवाहात असलेल्या २ ते ३ हजार लोकवस्ती असलेल्या गावात हा मेळावा आयोजीत करुन आजू–बाजूच्या परीसरातील लोकांना या मेळाव्यात सहभागी करुन घेतले जात आहे. ही जिल्हयात राबविण्यात येणारी विशेष कृती योजना आहे. योजनेद्वारे आदीवासीना मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांना त्या योजनाविषयी मार्गदर्शन करणे व त्या गावातील अडचणी दूर करणे हा प्रमुख हेतु आहे. या योजनेला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला आहे.

क) **नक्षल गावबंदी योजना** : पोलीस विभागाद्वारे जनतेमध्ये जागृती निर्माण करुन नक्षलवाद्यांना गावबंदी करण्यास लोक सहभागातून लोकांना प्रवृत्त केले जात आहे. नक्षलवाद्यांना गावबंदी करण्यासाठी शासनाने या

योजनेला गावकऱ्यांनी प्रतीसाद द्यावा व गावाचा विकास साधता यावा ज्या गावाने ही योजना यशस्वी करुन दाखविली. त्या गावाचा विकास साधण्यासाठी 'विकासनिधी' म्हणून २ लाख रुपये देण्याचे शासनाने जाहीर केले आहे. या योजनेत जे गाव सहभागी होतील व तेथील लोकांचा व गावातील रस्ते, बीज, पाणी, आरोग्य यावर खर्च करण्यास अनुमती दिली आहे. जिल्हयातील नक्षलवादी चळवळीच्या दहशतीला झूंगारुन जो धाडस, साहस १२२ गावांनी आजपर्यंत दर्शविला आहे.

ड) **शहीद पोलीसाच्या मुलांना शिक्षण** : जिल्हयात नक्षल कारवाया मोठया प्रमाणात वाढल्या आहे प्रत्येक वर्षीचा शहीदांचा आकडा वाढत चालला आहे. कर्तव्य बजावत असताना जे पोलीस अधिकारी व कर्मचारी शहीद झाले त्यांच्या मुलांसाठी शिक्षण मिळावे म्हणून पोलीस कल्याण निधीद्वारे मुलांची शाळा व वस्तीगृहाची सुसज्ज इमारत पोलीस मुख्यालय परीसरात तयार करण्यात आली आहे. या वस्तीगृहात ४० ते ५० विद्यार्थी वास्तव्य करीत आहेत. या मुलांच्या पुर्नवसनासाठी शासन कर्तव्य तत्पर आहे.

योजनातील अपयश :

१. नक्षल समर्थक म्हणून सहभागी झालेल्या युवक–युवतीकरीता पोलीस मुख्यालय परीसरात बॅरेक बांधण्यात आले. त्याची वेगळी व्यवस्था करण्यात न आल्याने पोलीस विभागाची गोपनियता भंग होत असल्याचे दिसून येते.

२. आत्मसमर्पीत योजनेनंतर शहीद पोलीसाची संख्या व नक्षलकांड मोठया प्रमाणात वाढले आहे. 'कुऱ्हाडीचा दांडा गोत्यास काळ' अशी स्थिती आहे.

३. ग्राम भेट जनजागरण मेळावे स्वंयस्फूर्त व्हायला पाहिजे त्या प्रमाणात होताना दिसून येत नाही.

४. २००९ पासून जनजागरण मेळाव्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नक्षल कारवायांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

५. गावबंदी योजनेचा निधी मंजूर होतो परंतू ज्या गावांनी धाडस दर्शविले त्या गावला देण्यासाठी गाजावाजा दिला जातो. त्यामुळे असे गावे नक्षल्याच्या हिटलीस्टवर आली आहेत त्यामुळे त्यांची गृजता पाडणे गरजेचे आहे.

६. नक्षल आत्मसमर्पण योजनेत समर्पीत लोक हे संगमचे कार्यकत्ये असल्याने या सुविधांना पाहून बेरोजगारी व दारीद्रयापेक्षा बरे अशी स्थायी झाली आहे.

७. पोलीसांच्या पाल्यांसाठी असलेली शाळा अनुदान तत्वावर नसल्याने चांगला प्रशिक्षीत वर्ग त्यात दिसून येत नाही. ती शाळा सैनिक शाळेप्रमाणे त्या शाळेचे स्टर्डड असायला पाहिजे.

८. पोलीस शहीद पोलीसांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी चांगल्या वस्तीगृहाची सोय नाही. यासारख्या अनेक अडचणी आजही दिसून येत आहेत.

२.२१ महात्मा गांधी तंटामुक्ती :

गाव हा विश्वाचा नकाशा। गावावरुन देशाची परीक्षा।।
गावची अगता अवदशा। येईल देशा।।
गावची जरी उत्तम नसले। तरी देशाचे भवितव्य ढासळेल ।।
ऐसे मानावे जानत्याने भले। हृदयामांजी।।

ग्रामगीतेत राष्ट्रसंतानी चांगल्या गावाचे वर्णन केले आहे. गावातील भांडणे गावाच्या वेशीवर गेले की, काम वाईट स्थिती होते यांचे औचित्य राखून शासनाने महात्मा गांधी तंटामुक्ती योजना जिल्हयात यशस्वीरित्या राबविण्यात आली. गावातील वाद, भांडणे समोपचाराने मिटवून गाव सुखी रहावे हा या योजनेचा हेतू आहे. यासाठी गावामध्ये तंटामुक्ती समिती स्थापन करण्यात आली

आहे. जिल्हयाची एकूण गावे १४८१ आहेत ग्रामपंचायती ४६७ असून या सर्व ग्रामपंचायतींना यात सहभाग नोंदविला आहे. त्यापैकी २८ गावांना रोख व पारीतोषिक देवून गौरविण्यात आले आहे.

२.२२ मानव विकास मिशन :

जिल्हयात नव्याने विकास साधण्यासाठी मानव विकास मिशन प्रायोगिक तत्वावर निर्माण करण्यात आले. सध्या या मिशनचे कार्य, धानोरा, कुरखेडा या दोन तालुक्यात आहे. या प्रकल्पाद्वारे जिल्हयातील बेरोजगार युवक–युवतीकरीता बांबू हस्तकला प्रशिक्षण शिल्पकला प्रशिक्षण देण्यात आले आहे. या दोन्ही तालुक्यातील १६ गावामधील एकूण ४८० बेरोजगार युवकांना या योजनेचा लाभ मिळाला आहे.

सोबतच या दोन्ही तालुक्यातील १०० बेरोजगार युवकांना मध संकलन प्रशिक्षण देण्यात आले. त्यासोबत त्यांना डोंगराळ जंगलातील मध संकलन करण्याचे साहित्य देण्यात आले. यासाठी या मिशनद्वारे १९ लाख ५० हजार रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. या मिशनचे कार्य इतर १० तालुक्यात राबविण्यात यावे अशी अपेक्षा आहे.



प्रकरण ३

संशोधन पद्धती
(Research Methodology)

३.१ प्रस्तावना :

संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नविन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्यांचे पुर्नपरीक्षण अथवा पुन:पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेली चिकीत्सक व पद्धतशीर अभ्यास होय. जिज्ञासा पूर्ण करणे व ज्ञान संपादन करणे ही मानवाची एक मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञान इंद्रियाचा उपयोग करीत असतो. एखाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबंधी अधिकाधिक ज्ञान मिळविणे आणि त्याची कारणमीमांसा करणे म्हणजे संशोधन होय.

बुद्धीनिष्ठ आणि व्यावहारीक प्रश्नांची व समस्याची शास्त्रीय पद्धतीद्वारे समाधानकारक उत्तरे शोधून काढण्याचा संशोधन हा एक पद्धतशीर प्रमाण असतो. मानवी जीवनातील व्यवहारातील व सृष्टीतील विविध समस्या सोडविण्यासाठी सातत्याने संशोधन करणे गरजेचे असते म्हणून सत्य शोधून काढणे हा संशोधनाचा उद्देश असते.

जे. डब्ल्यू बेस्ट म्हणतात, "खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्षात कार्यान्वीत करण्याची अधिक नियमबद्ध, आकारबद्ध, सुव्यवस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया आहे."[८७]

---

८७ प्रा. प्रदीप कुमार, "सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र", यश प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. १

अर्थात एखाद्या समस्येचे उत्तर शोधण्यासाठी वैज्ञानिक पद्धती आणि तंज्ञाद्वारे संकलीत केलेले माहितीचे वस्तुनिष्ठ मुल्यमापन केल्यानंतर नविन नाण्याचा शोध घेवून विविध घटकातील कार्यकाल संबंधाच्या आधारे सर्वसामान्य सिद्धांताचे आणि नियमाचे प्रतिपादन करणारी प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

संशोधन कार्यपद्धती :

कोणतेही कार्य करतांना निश्चित असे उद्दिष्ट ठरवून त्या उद्दिष्टापर्यंत पोहचण्याकरिता निश्चित मार्गक्रम व दिशा, उद्देश ठरविणे आवश्यक आहे. दिशाहीन मार्गक्रमाचा आधार घेतल्यास संशोधन करतांना अनेक अडचणीला तोंड द्यावे लागेल व उद्दिष्ट प्रत पोहचणे शक्य होणार नाही, म्हणून संशोधनाची कार्यपद्धती समजावून घेण्यात आली. प्रस्तुत संशोधनासाठी मुख्यत: प्रश्नावली, मुलाखतपत्रिका, भेटी, चर्चा, निरीक्षण इत्यादी पद्धतींचा अवलंब करण्यात आला.

संशोधन प्रक्रिया :

संशोधन कार्यासाठी निर्दोश माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपुर्ती होण्यासाठी खालील संशोधन पद्धतीचा वापर केला गेला. गडचिरोली जिल्हयातील दुर्गम असलेल्या धानोरा, कोरची, कुरखेडा, एटापल्ली, भामरागड, सिरोंचा या तालुक्यात नक्षलवादी अनेक दलमच्या रुपाने कार्यरत आहेत. अनेक घातपात बॉम्बस्फोट, नक्षल पोलीस चकमक, या सिमावर्ती भागात घडून येते. या घातपातात अनेक पोलीस व सामान्य नागरिक शहीद झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या शहीद झालेल्या पिडीत कुटूंबावर कोणते परिणाम घडून आलेत. त्यांना शासनाची कोणती मदत मिळाली. सामान्य नागरिकांमध्ये कोणता बदल घडून आला. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व अभिरुची वर कोणता प्रभाव पडला याचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

३.२ संशोधन समस्या :

संशोधनकर्ता कोणतेही संशोधन करण्याचे काम हातात घेतो तो विशिष्ट उद्दिष्टाने प्रेरीत होवूनच तो प्रश्न किंवा चिन्हांच्या व समस्येच्या उद्देशाने समोर ठेवून अध्ययन कार्य करीत असतो. विशिष्ठ समस्येच्या पुर्तीसाठी संशोधन कार्याच्या सुरवातीला जो अध्यायनाचा विषय निवडतो तेव्हा संशोधनाचे सामान्य विषय काय आहे? त्याचे प्रतीपादन प्रथमता करावे लागते.

संशोधनकर्ता अध्ययनासाठी जो विषय निवडतो किंवा एखादे क्षेत्र निवडतो हे त्याला असलेल्या आवडीच्या अनुषंगाने लक्षात येते. म्हणून **जार्ज होमन्सने** म्हटल्या प्रमाणे "एक तर विषय संशोधन कर्त्याच्या आवडीचा असतो किंवा त्या विषयाबाबत संशोधनकर्त्यास शास्त्रीय उत्सुकता (आवड) असते. म्हणूनच विषय संशोधन कर्त्याकडून निवडला जातो." "त्याशिवाय आपले व्यक्तीमत्व त्यात कदापी उमटणार नाही. संशोधन करणे एक खेळ नाही कारण त्यात त्याचे मन, शरीर, वृष्टी, संसार त्यासाठी त्या काळात तो बांधला जातो. त्याचा आपल्या मनावर खोल संस्कार उमटतो. विषयाची निवड ही त्याच्या इच्छाशक्ती व काम करण्याची क्षमता याद्वारे झालेली असावी."[८८] 'आज सर्वच शास्त्रज्ञ या बाबीला मान्यता देतात की, संशोधकाची स्वत:ची जिज्ञासा ही कोणतेही संशोधन निवडण्याचा एकमेव मुख्य घटक आहे.[८९]

प्रस्तुत अध्ययनकर्ता ग्रामीण आदीवासी व नक्षल क्षेत्राशी परीचित असल्यामुळे त्यांच्या दृष्टीने या नक्षल क्षेत्रात असणारे प्रश्न अडचणी याचा प्रभाव पडणे स्वाभाविक आहे. कारण "कोणत्याही सामाजिक समस्येचा अभ्यास

---

८८ डॉ. दु.का. संत, ''संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग'' पुणे विद्यार्थी गृह, प्रकाशन पुणे, द्वि.आ. १९८८, पृ.क्र. ९९

८९ Henril Manhim "Sociological Research Philosophy and Method" oterio Darse Prace-1977, pg.110

करतांना त्या समस्येचा समाजाच्या बाहय व अंतर्गत दृष्टया अभ्यास करते हे समाज शास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे." [९०] याच पार्श्वभूमीवर गडचिरोली जिल्हयातील नक्षल क्षेत्रातील दुर्गम भागात असलेल्या धानोरा, कोरची, कुरखेडा, एटापल्ली, भामरागड, सिरोंचा या तालुक्यात नक्षल दलम मोठया प्रमाणात कार्यरत आहेत, अनेक घातपात, बॉम्बस्फोट, नक्षल–पोलीस चकमक रोजच घडत आहेत. या घातपातात अनेक पोलीस व सामान्य परीसरात राहणारे नागरीक शहीद होत आहेत त्या वातावरणात शहीद झालेल्या पीडीत कुटूंबावर परीणाम घडून येतात त्याचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक जीवनमान काय आहे? पोलीस व सामान्य नागरीकांना कोणत्या प्रमुख समस्यांना सामोरे जावे लागते याचे वास्तविक स्वरुप जाणून घेण्याच्या उत्सूकतेने "गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरीक यांच्या पीडीत कुटूंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय निश्चीत करण्यात आला.

३.३ संशोधनाचा उद्देश :

संशोधन अध्ययनासाठी जो विषय निवडला आहे. त्या विषयाच्या अनेक बाजू आहेत, अनेक पैलू आहेत त्यापैकी कोणत्या पैलूचा अभ्यास केला जाणार आहे हे अध्ययनाच्या उद्देशाने स्पष्ट करावे लागते. **कार्ल पीयर्स** यांनी म्हटल्या प्रमाणे "सत्याचे आकलन होण्यासाठी जवळचा रस्ता नाही विश्वासाबाबत ज्ञान शास्त्रीय पद्धतीच्या भवाक्षातूनच करुन घेण्याखेरीज दुसरा पर्याय नाही."[९१]

---

९० प्रा.व्ही. के.टी. राजेंद्रगड – ''भारतीय समाजशास्त्र'' पडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९३, पृ.क्र. १८७

९१ कार्ल प्रियर्स, ''द ग्रामर ऑफ सायन्स'', अे एड ब्लेक, लंडन, तिसरी आवृत्ती, भाग १, पृ.क्र. १०

वरील विषयांच्या अनुषंगाने खालील उद्दिष्टये डोक्यासमोर ठेवून संशोधनकर्त्याने संशोधनाची उद्देश मांडली आहेत.

१. नक्षलग्रस्त गावाचा शोध घेवून नक्षल समस्येचे आकलन होणे.

२. नक्षल कारवाहीत शहीद झालेले कुटूंबीयांच्या विविध समस्यांचा शोध घेणे.

३. शासनाच्या विविध योजना राबवितांना त्या गतिरोधक ठरल्या काय? त्या जाणून घेणे.

४. नक्षलग्रस्त कुटूंबातील शैक्षणिक व सांस्कृतिक समस्येचा शोध घेणे.

५. नक्षल प्रभावीत क्षेत्रात कोणत्या शासनाच्या उपाययोजना केल्या जातात त्याचा नक्षल प्रभावीत कुटूंबाला सावरण्यासाठी काय उपयोग होतो याचा शोध घेणे.

६. पीडीत सामान्य नागरिकासाठी शासकीय व अशासकीय उपाययोजना काय ते जाणून घेणे.

७. नक्षल व पोलीस चकमक भू–सूरुंग स्फोटातील पीडीत कुटूंबाच्या पुर्नवसनाची माहीती व समस्यांचा शोध घेणे.

८. परीसरातील दहशतीचा मानवी जीवनावर होणारा परीणाम जाणून घेणे.

३.४ गृहीतकृत्ये :

आपली अध्ययन पद्धती स्पष्ट करतांना आपण कोणकोणती गृहीतकृत्ये अथवा उपकल्पना पडताळण्यासाठी घेतल्या होत्या त्याची मांडणी क्रमवार या ठिकाणी करणे अगत्याचे ठरते.

"**लुण्ड बर्ग,** असे म्हणतात, "गृहीत कृत्य म्हणजे त्या विधानाची सत्यता पारखून घ्यायची आहे असे विधान अथवा सामान्यीकरण मुलत: उपकल्पना हा

एक काल्पनिक अथवा अनुमानात्मक विचार असू शकतो जो विचार पुढील संशोधनाचा आधार बनतो."[९२]

गृहीतकृत्य अथवा उपकल्पना ही प्रारंभिक प्राथमिक स्वरुपाची कल्पना किंवा विचार आहे. हा प्राथमिक विचार अथवा विधान सामाजिक तथ्ये आणि घटना हयाचा कार्यकारण भावात्मक शोध घेण्याची प्रेरणा देतो. त्यासंबंधी ज्ञान प्राप्त करुन घेण्यास उद्युक्त करतो. ही प्रारंभिक उपकल्पना प्रारंभिक संशोधनाच्या अंतीम चरणात बदलू शकते. म्हणून उपकल्पना अथवा गृहीतकृत्याला कामचलाऊ उपकल्पना किंवा कार्यवाहक उपकल्पना (Working Hypothesis) असेही म्हणतात. उपकल्पनेमुळे संशोधनास ध्येय प्राप्त होते व ते संशोधनास दिशा प्रदान करते.

प्रस्तुत शोध अध्ययनात पुढील उपकल्पना/गृहीत कृत्याचा पडताळा करण्यात आला आहे.

१. आदीवासींच्या जीवनावर नक्षल कारवाहीचा मोठा प्रभाव पडतो.
२. नक्षलग्रस्त पिडीत कुटूंबावर उपासमारीची समस्या जाणवते.
३. नक्षलवाद्यांच्या वाढत्या प्रभावामुळे आदीवासींचे सांस्कृतिक हीत नष्ट होत आहे.
४. नक्षलग्रस्त गावातील सामान्य नागरिकांच्या समस्या हया मानसिक, कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आदी बाबींशी संबंधीत आहेत.
५. नक्षल कारवाहीमुळे सामान्य नागरीकांचे जीवन असुरक्षीत आहे.
६. शासनाद्वारे विविध उपक्रम राबवूनही नक्षल समस्येचा प्रभाव वाढत चालला आहे.

---

९२ प्रा.रा.ना. घाटोळे, "समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती" मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ४४

७. नक्षल प्रभावामुळे अनेक शासकीय योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहचत नसल्याने त्याचा विकास खुंटला आहे.

८. नक्षलवाद्यांच्या प्रभावांचा शासकीय प्रशासनावर विपरीत परीणाम झाला आहे.

९. नक्षल प्रभावामुळे जिल्हयातील पर्यटन नष्ठ होण्याच्या मार्गावर आहे.

१०. नक्षलवाद्यांचा प्रभाव शहीद पोलीसांच्या कुटूंबावर भितीयुक्त पडतो आहे.

३.५ संशोधन आराखडा :

संशोधनाचे उद्दिष्टये, लक्षात घेतल्यानंतर किंवा संशोधन समस्येची निवड केल्याने तर उद्दिष्टये साधण्याच्या पुर्तीसाठी कोणती माहीती आवश्यक आहे. ती कोठे मिळण्यासारखी आहे, त्यासाठी कोणत्या कारणांचा योग्य होईल हे जाणून संशोधन आराखडयाच्या बांधणीकडे वळावे लागते.

"संशोधन आराखडा बनविणे म्हणजे कार्य योजना आखणे होय. आपल्या विषयाचे शास्त्रीय संशोधन करतांना अनेक पायऱ्यामधून जावे लागते. त्यात अनेक प्रश्न व अडचणी असतात. नियोजीत कार्यात उपस्थित होण्याची शक्यता असणाऱ्या समस्या व अडचणीचा विचारपुर्वक अंदाज घेवून त्या समस्या व अडचणीच्या निराकरणाची अगाऊ व्यवस्था करुन ठेवण्याच्या प्रक्रियेस संशोधन आराखडा असे म्हणतात. संशोधनाच्या उपयुक्ततेची हमी संशोधन आराखडयातच असल्यामुळे संशोधन कर्त्यास आराखडा बनविणे भाग पडते."[९३]

संशोधनाचा उद्देश, कालावधी, माहीतीची उपलब्धता, संशोधन कार्यातील मित्यव्ययता, संशोधन पद्धती साधने, तथ्यांचे विश्लेषण, नमूना निवडीचे आधार

---

९३ डॉ.बी.एम. कऱ्हाडे, "शास्त्रीय संशोधन पद्धती", पिंपळापूरे ॲन्ड क. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००७, पृ.क्र. ११५

एकूण येणारा खर्च इत्यादीचा विचार करावा लागतो. आराखडयाची ही कार्य योजना तयार करणे होय. त्यामुळे इच्छीत संशोधन करणे सहज शक्य होते.

सेल्टीझ, जहोडा, इवाइश व कुकू यांनी संशोधन आराखडयाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, "निष्कर्षाची संशोधन उद्दिष्टदृष्टया संबंधता व संशोधन कार्यात मित्यव्ययता याची सांगड घालता येईल. अशा प्रकारे तथ्यांचे संकलन व विश्लेषण करता यावे याकरीता आवश्यक अशा अटीची नियोजीत व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय."[९४]

"जीवनात कोणतेही कार्य पार पाडायचे झाल्यास प्रथम त्या आराखडयामुळे कार्याला सुव्यवस्थितपणा येतो. 'ऐलाफ', यांच्या मते "निर्णय क्रियान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वी निर्णय निर्धारीत करण्याच्या प्रक्रियेला आराखडा म्हणतात." आराखडयाचे चार प्रकार पडतात.

१. अन्वेषणात्मक वा परीचयात्मक आराखडा

२. वर्णनात्मक आराखडा

३. निदानात्मक आराखडा

४. प्रयोगात्मक आराखडा

आपले प्रस्तुत संशोधन अस्तित्वात असलेल्या ज्ञानावर आधारीत आहे आपल्या संशोधनाशी संबंधीत साहित्य उपलब्ध आहे. अशा परीस्थितीत या अध्यायनासाठी अन्वेषनात्मक आराखडा उपयुक्त नाही उपकल्पना असल्याने ते संशोधन मुळातच अन्वेषणात्मक होवू शकत नाही यात गृहीतकृत्ये घेतली जात नाही.

---

९४ सेल्टिज, जहोडा व इतर, "Reseach Metyhod in Social Relation" U.S. 1965, pg.50

अध्ययनासाठी घेतलेला समुदाय भारतीय समाजाचा एक भाग असल्यामुळे त्याचा वेगळयाने परीचय करुन देण्याची गरज नाही. त्यामुळे परीचयात्मक आराखडयाची गरज भासली नाही. तर निदर्शनास आलेल्या समस्येवर उपचार किंवा उपाययोजना हे संशोधनाचे उद्दिष्टये नाही. बहुतांशी समाज शास्त्रात उत्तरदात्याचा वैयक्तीक व कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक घटकांना अनुसरुन त्यांच्या समस्येची माहीती मुलाखतीद्वारे संकलीत केल्यामुळे यासाठी संपूर्ण वर्णनात्मक व अंशत: निदानात्मक अशा एकत्रीत प्रकाराचा उपयोग केला जातो. परंतू प्रस्तुत अध्ययनात केवळ वर्णनात्मक संशोधन आराखडा उपयोगात आणण्यात आला.

वर्णनात्मक संशोधन आराखडा :

संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर संशोधनासाठी वर्णनात्मक आराखडा प्रमाण करण्यात आला. कारण याचा मुख्य उद्देश उपलब्ध तथ्ये, माहीती व आकडेवाडीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समाज, घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्या वास्तविक तथ्यांच्या आधारावर वैशिष्टयांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा आहे. त्यासाठी अध्ययनासाठी निवडलेल्या विषय वस्तूची संपूर्ण माहीती असणे आवश्यक असते. या संशोधन आराखडयाचा आधार विश्वासनिय तत्त्व व वास्तविकता हा असतो. म्हणून याला वर्णनात्मक संशोधन आराखडा म्हणतात.

“विशीष्ट व्यक्तीच्या समुहाच्या व स्थितीच्या वैशिष्टयांचे वा लक्षणाचे यतातथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो.” “वर्णनात्मक आराखडयात संशोधनाचा उद्देश, नमूना निवड, तथ्य संकलनाच्या पद्धती, तथ्यांचे

संस्करण, संकेतन इत्यादी पायऱ्याबाबत संशोधकाला अनेक निर्णय घ्यावे लागतात."[९५]

गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या पोलीस व सामान्य नागरीकांना शासनाद्वारे काय उपाययोजना केल्या जातात? त्याचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रश्न काय आहेत, सोबत नक्षल्यांचा भितीचा पोलीस व सामान्य नागरीक यांच्यावर काय परीणाम होतो, त्याच्यासाठी दळणवळण व आधूनिक सोयी काय? याचा काय प्रभाव झाला याचे वर्णनात्मक अध्ययन करावयाचे उद्दिष्टये असल्यामुळे वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड केली आहे.

वर्णनात्मक अध्ययनात कशाचे मापन करायचे आहे. अशा भावनास आवश्यक व पर्याप्त ठरतील अशा पद्धती कोणत्या हे संशोधनकर्त्यास स्पष्ट करावे लागते. अशा प्रकारच्या अध्ययनामधून जो माहीती पुरावा गोळा करण्यात येणार त्या पद्धतीच्या लवचिकतेऐवजी अचूकतेस जास्त प्राधान्य देण्यात येते, ते मोजमाप कशाचे आहे. मोजमापाची प्रामाणिक व विश्वसनीय तंत्रे कोणती या गोष्टीचे स्पष्ट निर्धारण या अध्ययनातून होणे आवश्यक असते.

३.६ अध्ययनाचे क्षेत्र :

गडचिरोली जिल्हा आकारमानाने कमी लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. जिल्हयात १२ तालूके आहेत. या संपूर्ण तालुक्यातील नागरिकांचे वास्तव्य जंगल व्याप्त दुर्गम परीसरात असल्याने त्यांच्यात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टया मागलेपण दिसून येते. नक्षलग्रस्त भाग असल्याने येथील रस्ते व दळणवळण सोयी अपुऱ्या प्रमाणात आहेत. नक्षल सप्ताह व नक्षल्याच्या कार्यवाहीस येथील

---

९५ डॉ. भांडारकर पी.एल. "संशोधन पद्धती", महाराष्ट्र राज्य, ग्रंथ निर्मिती मंडळ, १९७६, पृ.क्र. १८५

जनता भितीयुक्त जीवन जगताना दिसून येते. जिल्हयात अशिक्षीतपणा, धर्मभोळेपणा, अज्ञान, अंधश्रद्धा येथील मोठया प्रमाणात वास्तव्यास असलेल्या आदीवासी समुदायामध्ये दिसून येते. जिल्हयात माडीया गोंड, गोंड या जमाती सोबत बंगाली समुदाय मुलचेरा, चामोर्शी तालुक्यात वास्तव्यास आहे. सोबत गैरआदीवासी समुदाय ३० टक्के प्रमाणात आहे.

जिल्हयात औद्योगिकरण नसल्याने येथील बेरोजगारीचा प्रश्न बिकट आहे. त्यामुळे येथील आदीवासी मोठया प्रमाणात पोलीस खात्यात नौकरी करीत आहेत त्याचे नातेवाईक ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहेत.

कोणत्याही संशोधनासाठी एका विशिष्ट कार्यक्षेत्राची निश्चीती करणे आवश्यक असते. त्याशिवाय संशोधन कार्य सुलभपणे पुर्ण होत नाही विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी त्या क्षेत्रात जावून त्याचा अभ्यास करावा लागतो. म्हणून संशोधनासाठी संशोधन कर्त्याने जिल्हयातील १२ तालुक्यातील नक्षल कारवायांचे प्रमाण अधिक असलेले प्रत्येक तालुक्यातील अती संवेदनशील गावाची निवड केली आहे. जे संपूर्ण जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करतील.

संशोधनाच्या उद्देशांना केंद्रबिंदू मानून गडचिरोली जिल्हयात शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरीक यांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी प्रत्येक एककाच्या अध्ययना ऐवजी समस्येचे अध्ययन केले जाईल. अशा एककाचे कितीही नमुने निवडून त्याची पहाणी केली असता येणाऱ्या निष्कर्षात समग्राच्या चाचणीच्या तुलनेत जास्त अंतर असणार नाही. अशा विश्वातून प्रत्येक तालुक्यातून २० किंवा अधिक जिल्हयातील पीडीत याप्रमाणे ५०० एककांच्या नमुन्यात अंतर्भाव करण्यात आला. या ठिकाणी एकक ही संज्ञा कुटूंबासाठी उपयोगात आणली आहे.

५०० ही संख्या निरपेक्ष आकारापेक्षा मोठी असल्यामुळे समग्राची प्रतिनिधीत्व करण्याची तिची कुवत शंकास्पद नाही.

३.७ नमुना निवड :

"वर्णनात्मक अध्ययनात संशोधनकर्ता निर्धारीत संशोधन विश्वातील लोकांच्या बाबतीत काही विधाने करु शकतो. संशोधनातून ज्या समग्र व विश्वासनीय निष्कर्ष काढण्यासाठी हा संबंधीत आहे. समग्राबाबत काही अनुमान बांधण्यासाठी समग्रामधून पहाणीसाठी एक भाग निवडण्याच्या पहाणीस नमुना चाचणी म्हणतात. त्यासाठी विश्वातील प्रत्येक व्यक्तीच्या अभिवृत्ती वर्तनाच्या वर्णनाची गरज असतेस असे नाही. तसे पाहीले तर समष्टातील प्रत्येक घटकांच्या अध्ययनाऐवजी त्यातील काही एककांना नमूना म्हणून निवडून अभ्यास करणे उपयुक्त ठरेल."[९६]

"ज्यावेळी विश्व किंवा समग्र विस्तृत असते व संपूर्ण विश्वाचा अभ्यास करणे सहज शक्य नसते तेव्हा विश्वातील काही व्यक्तीची निवड करुन त्याचा अभ्यास केला जातो. तेव्हा अशा निवडून आलेल्या गटाला नमुना असे म्हणतात." नमुना ही संपूर्ण विश्वाची लहानशी प्रतीकृती असते याला शास्त्रीय मान्यता आहे."[९७] या मार्गदर्शन तत्वानुसार नमुना निवड योजना आखण्यात आली.

नमुना निवड पद्धतीचे दोन प्रकार आहेत :

१. संभाव्यता नमुना निवड पद्धती

२. गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती

संभाव्यता नमुना निवड पद्धतीत विश्वातील व्यक्तीची संख्या माहीत असल्याने विश्वातील प्रत्येक व्यक्तीला नमुन्यात निवडून येण्याची समान संधी देता येते. त्यामुळे संशोधक नमुना निवडतांना वस्तुनिष्ठता कायम राखू शकतो.

---

९६ सेल्टिज जहोडा, त्रतेव, पृ.क्र. ६१, ७८.

९७ सेल्टिज जहोडा, त्रतेव, पृ.क्र. ७१.

म्हणजेच त्याच्या पूर्वग्रहाच्या पसंतीचा अंतर्भाव नमूना निवड प्रक्रीयेत होत नाही. त्यामुळे ही पद्धत अधिक शास्त्रीय मानली आहे.

याउलट गैरसंभाव्य नमुना निवड प्रसारात संशोधकाला अध्ययनाचे क्षेत्र माहीत असल्यामुळे कोणत्या व्यक्ती घ्यायचे हे माहीत असते. परंतु त्याची निश्चीत संख्या माहीत नसल्यामुळे तो प्रत्येकाला निवडून येण्याची समान संधी देवू शकत नाही. म्हणून आपल्या सोयीनुसार त्याला सापडेल त्याची नमुन्यात निवड करावी लागते. त्यामुळे वस्तुनिष्ठतेचा प्रश्न उद्‌भवत नाही कारण हा नमूना संशोधकाच्या स्वत:च्या सोयीने व इच्छेने निवडण्यात आलेला आहे.

अ) सोयीस्कर अथवा सुविधा जनक नमुना (उद्दिष्टये पूर्ण नमुना निवड) :

या नमुना निवड पद्धतीमध्ये संशोधक स्वत: महत्वाचा असतो. कोणत्या घटकांची निवड करायची तोच ठरवितो. त्यात जी तथ्ये उपलब्ध असतात त्यानुसार तथ्य संकलनाची पद्धती वापरण्याच्या अनुषंगाने संशोधक घटकाची निवड करीत असतो. त्यात नमुन्याची निवड ही पैसा, एककांशी, संपर्काची संधी, साधनसूची याची उपलब्धता इत्यादी गोष्टींचा विचार करून सोयीनुसार नमुन्याची निवड केली आहे.

''ही पद्धत अशास्त्रीय असली तरी काही संशोधनात ही पद्धती अतिशय उपयुक्त ठरली आहे. अभ्यासकाने निवडलेल्या संशोधन समस्येशी संबंधीत समग्रातून शास्त्रीय पद्धतीने नमुना निवडणे शक्य होते. अशावेळी संशोधकासमोर सोयीस्कर नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यांशिवाय दुसरा पर्याय उरत नाही''.[९८]

---

९८ प्रा. सुरेश मेश्राम, "प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन", यश प्रकाशन, नागपूर ३४, पृ. क्र. १२.

संभाव्यता व गैरसंभाव्यता या दोन्ही पद्धतीचा स्विकार करून सोयीस्कर नमुना निवड पद्धतीला आधारभूत मानून गावाची निवड केल्यानंतर उत्तदात्याच्या नमुना निवडीसाठी या पद्धतीची निवड करण्यांत आली.

३.८ तथ्य संकलन पद्धती :

सामाजिक संशोधनात तथ्ये संकलनास अतिशय महत्वाचे स्थान आहे. कोणत्याही संशोधनाची सुरवात तथ्यांच्या आधारे होत असते. प्रस्थापित सिद्धांताचा पडताळा घेण्यासाठी व नवीन ज्ञान प्राप्त करून त्यांच्या संदर्भात नवीन सिद्धांत प्रस्थापित करण्यासाठी तथ्यांची मदत घ्यावी लागते. कोणतीही माहिती नसलेल्या समस्येची ओळख करून घ्यायची असेल तर तथ्ये संकलनाशिवाय दुसरा मार्ग नसतो. म्हणून ''तथ्ये संकलन हा संशोधनाचा आत्मा आहे.''[९९]

आधुनिक काळात तथ्ये संकलीत करण्याच्या प्रचलीत तंत्रे या तीन पद्धतीत सम्मिलित आहेत. त्या तीन पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

१. **मौखिक** : शाब्दीक प्रकारानुसार माहिती दाराचा उपयोग म्हणजे मुलाखत.

२. **लिखीत** : शाब्दीक प्रतिक्रियान्वये जीवन चरित्र प्रश्नावली.

३. **गैरशाब्दीक क्रियाप्रमाणे** : निरीक्षण प्रयोगात्मक पद्धती.

प्रस्तुत अध्ययनात वरील तीन पद्धतीचा वापर करण्यात आला.

१. मौखिक पद्धती (मुलाखत) :

तथ्यांचे संकलन करण्यांसाठी, शाब्दीक क्रिया संबंधीत प्रश्नावली पद्धतीपेक्षा मौखिक, शाब्दीक क्रिया संलग्न मुलाखत पद्धती अनेक अर्थाने

---

९९ डॉ. बी.एम. कऱ्हाडे, "शास्त्रीय संशोधन पद्धती", पिंपळापूरे ॲंड. क. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००७, पृ.क्र. १६२

उपयुक्त ठरते. संशोधनाच्या दृष्टीने ज्यावेळी संशोधक व उत्तरदाते यांच्यात परस्पर आंतरक्रिया होवून माहिती गोळा केली जाते या क्रियेला मुलाखत असे म्हणतात. प्रश्नावली पद्धतीपेक्षा मुलाखत पद्धती अनेक अर्थाने उपयुक्त ठरते.

अलपोर्ट हा विचारवंत म्हणतो, ''लोकांच्या भावना आणि त्यांचे अनुभव, स्मरण व प्रेरणा विषयी व त्याच्या मागील कारण जाणून घ्यायचे असेल तर त्यांनाच का विचारीत नाही''[१००] यावरून असे लक्षात येते की, वैयक्तिक मुलाखत प्रश्नावलीपेक्षा सरस तंत्र आहे.

- मुलाखत पद्धतीत उत्तरदात्याशी प्रत्यक्ष संपर्क साधला जावून विस्तृत व सखोल माहिती प्राप्त करता येते. ते प्रश्नावलीत साध्य करता येत नाही.
- या पद्धतीत समग्रातील नमुना म्हणुन निवडलेल्या प्रत्येक एककांशी संपर्क साधून तथ्यांचे संकलन करता येणे व अशिक्षित व्यक्तीकडूनही स्वत: माहिती विचारून नोंदविता येते, त्यामुळे प्रश्नावली तंत्र निरीक्षणाखाली उपयुक्त ठरत नाही.
- मुलाखत अनुसूचित ग्रंथीत केलेले प्रश्न विचारत असतांना एखादया विशिष्ठ अंगाविषयी विस्तृत माहिती अथवा उपप्रश्न संशोधनकर्ता प्राप्त करू करतो, परंतू प्रश्नावलीत यावर मर्यादा निर्माण होते. केवळ निर्माण केलेल्या प्रश्नाची उत्तरे प्राप्त करता येतात.
- प्रस्तुत पद्धतीत संदिग्ध, द्विअर्थी प्रश्न असेल तर त्याचे त्वरीत स्पष्टीकरण देवून संशोधनकर्ता अपेक्षीत प्रश्नाचे उत्तर प्राप्त करू शकतो.

---

१०० डॉ. बी.एम. कन्हाडे, "शास्त्रीय संशोधन पद्धती", पिंपळापूरे ॲंड. क. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००७, पृ.क्र. १७४

- संशोधनकर्ता मुलाखत घेतांना उत्तरदात्याच्या भावभावनाशी एकरूप झालेला असतो. त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव, बोलण्यातील संप्रेषन याचे निरीक्षण प्रत्यक्षपणे करता येते.
- मुलाखत ही एकांगी प्रक्रीया नसून काही वेळा उत्तरदाता संशोधनकर्त्यास शंका, प्रश्न, विचारून एखाद्या न समजलेल्या प्रश्नाचे स्पष्टीकरण मागू शकतो. त्याअर्थी ही वस्तूत: आंतरक्रियाच असते.
- संशोधनकर्ता अध्ययनाविषयी आवश्यक तो परीचय देण्यासाठी या पद्धतीत संधी दिली जाते. उत्तरदाता स्वत: उपस्थित राहून मुलाखत देतो. त्यावेळी मुलाखत अनुसूचित असलेल्या प्रश्नांपेक्षा पूरक व सोयीस्कर अधिक माहितीचा आढावा घेणे सहज सोपे होते.

मुलाखत पद्धतीमध्ये ज्याप्रमाणे कायदयाची बाजू आहे त्याप्रमाणे त्याच्या काही मर्यादा लक्षात येतात.

- या पद्धतीत उत्तरदात्याशी संशोधनकर्त्यास प्रत्यक्ष संपर्क साधावा लागतो, त्यामुळे वेळ, पैसा, परीश्रम इ. करावे लागते.
- संशोधनकर्त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे उत्तरदात्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतात.
- मुलाखत अनुसूचीच्या व पर्यायी उत्तरांच्या स्वरूपामुळे या मुलाखतीस कृतीमता निर्माण होते.

"मुलाखत तंत्राच्या मर्यादा लक्षात घेवून गुणात्मक तथ्ये प्राप्त करून घेण्यासाठी उपयुक्त म्हणून प्रस्तुत संशोधनात मुलाखत तंत्राला स्विकृत करण्यांत आले. महत्वाचे कारण म्हणजे गडचिरोली जिल्हयात आदिवासी, गैरआदिवासी व इतर जिल्हयातील लोक पोलीस नोकरीत आलेले आहेत. त्यातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या पोलीस व सामान्य नागरीकांची संख्या मोठया

प्रमाणात आहे. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी निरक्षर व दुर्गम भागात वास्तव्य करणारे आहेत, त्यांना चांगल्या प्रकारे मराठी भाषा बोलता येत नाही. त्याच्यासाठी तथ्ये संकलन करण्यास प्रश्नावली पद्धतीचा उपयोग करणे अवघड जाते.

शास्त्रीयदृष्टया विसंगत असलेल्या कारणाने संशोधकाने प्रश्नावली ऐवजी मुलाखत पद्धतीला प्राधान्यता दिली आहे व सामाजिक संशोधनाची विश्वसनियता व उपयुक्तता वाढविण्याचा हा एक आधुनिक तंत्र आहे."[१०१]

मुलाखत अनुसूची :

संशोधनातील तथ्ये संकलनासाठी मुलाखत तंत्राचा अवलंब करावयाचा असा निर्णय घेतल्यानंतर वैयक्तिक मुलाखत घेताना संचीत मुलाखत तंत्राचा वापर करण्याबाबत निश्चित करण्यात आले. संचीत मुलाखत पद्धतीत मुलाखतकर्त्याची मुलाखत घेताना कोणत्या प्रश्नांची मांडणी करावयाची या विषयी पूर्ण निर्णय घ्यावे लागतात. त्या सर्व गोष्टीचा विचार करून मुलाखत अनुसूची विकसीत करण्यांत आली.

मुलाखत अनुसूची तयार करण्यापूर्वी संशोधन समस्येच्या विविध अंगाचे अभ्यास करण्यात आले. गडचिरोली दुर्गम परीसरात नक्षल समस्या कशी आहे. पोलीस विभागातील स्पेशल नक्षल सेल विभागात जावून आजपर्यंत जिल्हयात सामान्य नागरीक व शहीद पोलीस याची आकडेवारी घेण्यांत आली. पोलीसांवर व सामान्य नागरीकांवर नक्षल वार कसे करतात ते जाणून घेण्यांत आले. ग्रामीण पोलीस पाटील, पोलीस खबऱ्या म्हणून काम करणारे सामान्य नागरीक याचा खून नक्षल का करतात? घरातील कुटूंब प्रमुख शहीद झाल्यानंतर त्या कुटूंबावर होणारे परीणाम काय? याची माहिती घेण्यात आली.

---

१०१ सेल्टीज, जहोडा, त्रतेव, पृ.क्र. २२६

आजपर्यंत नक्षल समस्येवर मासिक, पुस्तके, वृत्तपत्रातील बातम्या, पोलीसांनी जप्त केलेले नक्षल पुस्तके, साहित्य तसेच नक्षल क्षेत्रात काम करणारे सनदी अधिकारी पोलीस अधिक्षक, जिल्हयातील राजकीय पुढारी, यांच्याशी चर्चा करण्यात आली, त्यामुळे संशोधन समस्येच्या विविध पैलुंचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली.

मुलाखत अनुसूचीमध्ये उत्तरदात्याची सर्वसाधारण कौटुंबिक माहिती, वैवाहिक स्थिती, व्यवसाय, वास्तव्य, पोलीस म्हणून कार्यरत असतांना येणारे अनुभव, त्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय स्थितीचे अवलोकन, शहीद झालेल्या कुटूंबांना येणाऱ्या अडचणी, दुर्गम भागात वास्तव्य करतांना येणाऱ्या अडचणी, पोलीसांसाठी शासनाच्या योजना, सामान्य नागरीकासाठी शासन कोणते प्रयत्न करतो, शहीद कुटूंबाच्या मुलांसाठी शिक्षणाचा व पुर्नवसनाचा प्रश्न इत्यादी माहिती प्राप्त करण्याच्या उद्देशाने प्रश्नांची मांडणी करण्यात आली.

मुलाखत अनुसूचीत दोन प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले.

१. **आवृत्त प्रश्न** : ज्याचे पर्याय ठराविक आहेत ते अनुसूचित दिले आहेत.

२. **मुक्त प्रश्न (खुले प्रश्न)** : त्याचे पर्याय दिलेले नाही. उत्तरदाता मुक्त स्वरूपात उत्तर नोंदवू शकतो. अशा प्रश्नाने उत्तराचे संकेतन करण्यास अडचणी जातात, परंतू उत्तरदात्याला अपेक्षित असणारे मत नोंदविण्यास स्वातंत्र्य असते. प्रस्तुत मुलाखत अनुसूचित व निर्देशित केलेल्या दोन्ही प्रश्नांना समाविष्ट करण्यात आले.

मुलाखत अनुसूचीची पुर्वतयारी :

मुलाखत अनुसूचीला विकसित केल्यानंतर अंतीम स्वरूप देण्यासाठी अनुसूचीची तपासणी करणे आवश्यक असते. हे लक्षात घेवून पूर्व तपासणीसाठी १० कुटूंब प्रमुखाची निवड करून मुलाखत अनुसूचीत ग्रंथित केलेल्या प्रश्नाची उत्तरे कशी देतात ते तपासण्यात आले. प्रस्तुत तपासणीमध्ये संशोधकाला काही प्रश्नाची उत्तरे सर्वांची सारखी येत असल्याचे लक्षात आले तर काही प्रश्न संदिग्ध, अपूर्ण द्विअर्थी असल्याचे लक्षात आले. काही प्रश्नांची मांडणी उत्तरदात्यास गोंधळात पाडणारे आहेत असे दिसते. त्यामुळे प्रश्नाच्या मांडणीत क्रम बदलविणे उपयुक्त ठरते असे वाटते. हया सर्व त्रृटी पूर्व तपासणीत आढळल्या, त्या दूर करण्यात आल्या आणि मुलाखत अनुसूचीला अंतीम रूप देवून मुद्रित करण्यात आले.

उत्तरदात्याशी प्रत्यक्ष संपर्क आणि तथ्याचे संकलन :

संशोधन समग्र गडचिरोली जिल्हयातील आदिवासी दुर्गम भागात वास्तव्य करणारे सामान्य नागरीक व पोलीस यांची नमुना निवड करण्यात आली. संशोधन समग्र व्यापक असल्यामुळे जिल्हयातील १२ तालुक्यात व खेडे परीसरात जावून कुटूंब प्रमुखाच्या मुलाखती, 'मुलाखत अनुसूची' हे साधन वापरून घेण्यात आल्या. हे तथ्य संकलनाचे कार्य १ जानेवारी २०१० ते ३१ मे २०१० पर्यंत म्हणजेच सहा महिन्याच्या कालखंडात पूर्ण करण्यात आले. कारण या कालावधीत जिल्हयातील लहान नद्यांना पूर नसतो. दुर्गम भागात फिरण्याचा जिल्हयातील हा सोयीस्कर कालावधी आहे.

ग्रामीण आदिवासी क्षेत्रातील लोकांची परंपरागत शेतीची कामे उरकल्यामुळे सामान्य नागरीकांच्या व शहीद पोलीसांच्या नातेवाईक, पत्नी यांच्या मुलाखती घेण्यास विशेष त्रास जाणवला नाही. प्रस्तुत संशोधनात उद्दिष्टयपूर्ण

नमुना निवड पद्धतीने कुटूंब प्रमुखाची निवड करण्यांत आली. आरंभी अनेक कुटूंबाना उत्सुकता वाटायची, आपले कुटूंबिय शहीद झाल्याने काही शासकीय मदत मिळेल असे त्यांना वाटायचे? शासकीय स्तरावरील सर्वेक्षण असेल असे वाटायचे? शहीद पोलीस व सामान्य नागरीकांना काही सानुग्राह अनुदान मिळेल काय? हे जाणण्यासाठी लोकांची गर्दी जमायची. तेव्हा संशोधक स्वत:चा परीचय दिल्यानंतर संशोधनाचा उद्देश विषद केल्यानंतर अनेक कुटूंबाचा संबंध प्रस्थापीत करण्यांत फारसे अडचणी आल्या नाही.

काही ठिकाणी संशोधकाचा मान सन्मान करण्यांत आला, परंतू बरेच प्रश्न नक्षल समस्येशी संबंधीत असल्याने सामान्य नागरीक व शहीद पोलीसांचे कुटूंबिय उत्तरे दयायला घाबरलेले असत. अशावेळी बरेचदा हळू आवाजात व भिंतीयुक्त वातावरणात उत्तरे गुप्त ठेवण्याच्या अटीवर सांगितले. काही प्रश्न भावनिकतेशी असल्याने शहीद कुटूंबिय उत्तर देतांना त्यांना स्वत:चे अश्रृ न सावरता हुंदके देत उत्तर देत होते. त्यावेळी त्यांना त्यांच्या पतीच्या, कुणाला मुलाच्या, मुलींच्या स्मृती आठवितांना दिसून आले.

तथ्ये संकलन करतांना असा अनुभव आला की, गावातील काही लोकांनी पोलीसांचा हस्तक आहे असे समजून नक्षल समर्थक संगम कार्यकर्त्यांना तक्रार केली. भामरागड ते लाहेरी परीसरात काही दलम व संगमच्या नक्षलवाद्यांनी माझ्या गाडीला अडविले. प्रथमता त्यांनी माझी विचारपूस केली. मी एक संशोधक आहे हे साक्ष देणारे माझ्या विद्यापीठाचे ओळखपत्र मला जीवंत ठेवण्यांत यशस्वी झाले. जर त्यावेळी माझ्या जवळ ओळखपत्र नसते तर माझे हे संशोधन कधीच होवू शकले नसते. असा दुसऱ्यांदा अनुभव कोरची ते कुरखेडा या पहाडावर सुद्धा आला आहे.

जेव्हा त्याची खात्री झाली तेव्हाच त्यांनी मला पुढील प्रवासाला सोडले.

मुलाखत प्रक्रीयेतील इतर नोंदी :

संबंध प्रस्थापन पायरी नंतर उत्तरदात्यास मुलाखत अनुसूचीत अंतर्भूत क्रमान्वये प्रश्न विचारण्यांत आले व उत्तराची नोंद करण्यात आली. काही प्रश्नाच्या अनुषंगाने उपप्रश्न विचारली अशा उपप्रश्नाची नोंद मागील पानावर करण्यांत आली. उत्तरदात्याने स्वत:हून दिलेली अतीरिक्त माहिती तसेच प्रत्यक्ष निरीक्षणात आलेले अनुभव आणि प्रतिक्रीया महत्वाच्या माणून शब्दबद्ध करण्यांत आल्या.

१. इतर माहितीदारांची मदत :

मुलाखत तंत्रासोबत तथ्य संकलनासाठी जिल्हयातील दुर्गम आदिवासी, माडीया, गोंड, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील, सरपंच यांच्याशी प्रथम संबंध साधण्यांत आला. काही माडीया जमातीतील लोकांना मराठी भाषा व्यवस्थीत बोलता येत नसल्यामुळे तेथील आदिवासी त्यांना आदिवासी भाषा बोलून मराठीत संवाद साधणाऱ्या दुभाषी यांची मदत घेण्यांत आली. मुलाखत अनुसूचीच्या कक्षेबाहेर जावून आदिवासीची जीवनपद्धती सनसमारंभ, सांस्कृतीक मूल्य, ...नृत्ये या विषयी माहिती मिळाली. नक्षल समस्येला घाबरून उत्तरे देण्यास दर्शविलेली असमर्थता पाहून पोलीस पाटील, मुखीया व सरपंच यांची मदत मोलाची ठरली. विषयांचे गांभीर्य सांगीतल्यानंतर सर्वांची मदत माझ्यासाठी उपयुक्त ठरली.

२. लिखित सामग्री व शाब्दीक क्रिया पद्धती :

तथ्ये संकलनाच्या पद्धतीत लिखीत पुरावा म्हणून उपलब्ध असलेली कागदपत्रे यांना महत्वाचे स्थान आहे. मूलभूत कागदपत्रांमध्ये पोलीस विभागाने पुरविलेल्या महत्वाच्या नोंदी शहीद पोलीस व सामान्य नागरीक, पोलीस पाटील, खबऱ्या यांची आकडेवारी यांचा समावेश करण्यात आला. तर दुय्यम

कागदपत्रात प्रत्यक्ष मूलभुत कागदपत्रे, संदर्भ ग्रंथ, नक्षल साहीत्य, आत्मचरित्र, मासिके यांच्या आधारे घेण्यांत आला.

प्रस्तुत संशोधनात मूलभुत कागदपत्रे म्हणून जिल्हयाची लोकसंख्या, जनगणना, शासकीय अहवाल, पोलीसांची दैनंदिन डायरी, क्राईम डायरी, जिल्हा नियोजन अधिकारी, यांनी काढलेली 'वाटचाल' ही स्मरणीका व जिल्हा माहिती अधिकारी यांनी काढलेली 'प्रतिबिंब विकासाचे' याचा उपयोग यात करण्यात आला.

दुय्यम कागदपत्रात नक्षलसंबंधी सुरवातीपासून या चळवळीचा इतिहास, चळवळीचे कार्य, उद्देश, दलम यावर आधारीत पुस्तके, वर्तमान पत्रातील घटना, सार्वजनिक मासिके, पोलीस अत्याचार, पोलीसाचे कर्तव्ये, सामान्य नागरीकांचे जिल्हयातील जीवनमान, जिल्हयात नक्षल समस्येमुळे आलेल्या अडचणी, त्याचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाच्या कृती योजना याचा समावेश करण्यात आला.

३. गैरशाब्दीक क्रिया (निरीक्षण) पद्धती :

प्रस्तुत अध्ययनात तथ्य संकलनासाठी मुलाखत तंत्रासोबत निरीक्षण तंत्राचा ही उपयोग करण्यात आला. ज्या समाज जीवनात अध्ययन करायचे आहे त्या ठिकाणी संशोधक निरीक्षण करण्यासाठी स्वत: जातो. संशोधक त्या समुहाचे निरीक्षण तटस्थपणे समुहात सहभागी न होता करू शकतो. मुलाखत अनुसूचीच्या निमीत्याने अहेरी पासून ९० कि.मी. अंतरावरील देचलीपेण पोलीस मदत केंद्र असलेल्या गावात जाण्याची संधी मिळाली. या गावाच्या सभोवताल डोंगरानी व्यापले आहे. पौर्णिमेचा दिवस होतो. उन्हाळयाचे दिवस असल्याने येथील महीला, पुरूष, मुले ताडी पेयावर ताव मारतात. मी काही मुलाखती घेतल्यानंतर तेथील नारायण सिडाम या कुटूंबाच्या घरी परत येण्याचे साधन न मिळाल्याचे मला वास्तव्य करावे लागते.

मी ज्या घरी थांबलो त्याच्या अगदी दोन घरानंतर दुर्गेया याच्या घरी रात्री २.०० वाजताच्या सुमारास काही महीला व पुरुष लोकांचा जमाव मोठयाने ओरडताना दिसला सर्व तेलगू भाषेत संवाद चालले होते. मी त्यांना विचारले असता नक्षलवादी गावात आले असे समजले. माझ्या मनात भितीचे काहुर माजले होते. तेव्हा कुटूंबीयांनी मला घराच्या वर साहीत्य ठेवण्यासाठी तयार केलेल्या 'आटाळा' येथे चढून लपण्याचे सांगीतले. जर तुम्ही पोलीसावर काही लिहीणार असे त्यांना माहीत झाल्यास तुम्हाला त्रास देतील असे त्याचे म्हणणे होते.

नक्षल्यांनी त्या गावातील दुर्गेया या तरुणाला गावातील चौकात ओढत नेवून धारदार सुऱ्याने त्याची मान कापून ठेवली होती. सकाळी पोलीस त्या ठिकाणी आले. त्याची चौकशी सुरु होती तेव्हा नारायण सिडाम यांनी मला येथे न थांबता आपणास मी रेपन्नपली पर्यंत सोडतो घाबरु नका असे म्हणून रेपन्नपलीपर्यंत सोडून दिले. दुर्गम भागात काम करतांना वेळप्रसंगी कोणता प्रसंग कसा येईल त्याचे निरीक्षण प्रत्यक्ष अनुभवास आले.

परंतु पोलीस उपकेंद्र हाकेच्या अंतरावर असूनही पोलीस किंवा सामान्य नागरीक त्याच्या मदतीस का आले नाही? याचे दु:ख मला त्यावेळी झाले.

३.९ तथ्य प्रक्रियन :

"तथ्य संकलनाच्या विविध पद्धतीचा उपयोग केल्यानंतर प्राप्त झालेल्या तथ्यांचे तथ्य प्रक्रियन व सारणीकरण ही संशोधनातील पुढची पायरी मानली जाते. गोळा केलेल्या अपरीपक्व माहीतीला विश्लेषणक्षम बनविण्याची प्रक्रिया म्हणजेच तथ्य प्रक्रियन होय."[१०२] सर्वसाधारणत: तथ्य प्रक्रियन दोन प्रकारे केले

---

१०२ डॉ. दु.का. संत, त्रतेव, पृ.क्र. ३५

जाते. संपूर्ण काम हातांनी केले जात असेल तर त्याला हस्तसारणी Hand Tabulation म्हणतात. या उलट जर संगणकांचा उपयोग करुन प्रक्रियन केल्या जात असेल तर त्याला यांत्रीक सारणीकरण असे म्हणतात.

तथ्य प्रक्रियनाचे कार्य करतांना त्याचे प्रक्रियन कोणत्या दिशेने करावे हे बहुतांशी घेतलेल्या संशोधन विषयाचे उद्देश, गृहीतकृत्य यावर अवलंबून असते. म्हणूनच प्रक्रियनाच्या प्रत्येक पायरीत उद्देश व उपकल्पना समोर ठेवाव्या लागतात. म्हणून या ठिकाणी संशोधकाने उपपायऱ्याच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाची चर्चा केलेली आहे.

१. **संस्करण** : तथ्ये संकलीत करीत असताना विविध प्रकारच्या त्रृटी राहण्याची शक्यता असते. प्रस्तुत त्रृटींना दूर केले नाही तर तथ्यातील विश्वासनियता, वस्तुनिष्ठता व अचुकतेला बाधा येते. म्हणून संकलीत तथ्यांवर संपादनाचा संस्कार म्हणून संस्करण करुन न्युनता दूर करणे आवश्यक असते.

तथ्यातील गुणात्मकता वृद्धींगत व्हावी या उद्देशाने संशोधकाने मुलाखत अनुसूचीचे सहाऱ्याने वैयक्तीक मुलाखत घेतल्यानंतर रिकाम्या वेळ प्राप्त होताच संस्करणाचे कार्य केले. उत्तरदात्याला विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तराच्या नोंदी काही ठिकाणी संक्षिप्त रितीने भरण्यात आली होती. संस्करणात अशा संक्षिप्त उत्तरांना विस्तृत प्रमाणात नोंदविण्यात आले. कारण तथ्य संकलनास दीर्घकाळ लोटला म्हणजे विसराळयांना किंवा इतर कारणांमुळे नेमका संदर्भ लक्षात येत नाही. त्या ठिकाणी नोंदी करताना काळजी घेण्यात आली. उत्तरदात्याला अभिवृत्ती दर्शक प्रश्नाच्या मालीकेतून एक–एक प्रश्न विचारीत असता होय/नाही दर्शक विधानावर खुणा करीत असताना नजर चूकीने काही ठिकाणी खुणा

करणेच विसरल्याचे आढळले. मुलाखत संपावित असताना अशा काही त्रृटी राहील्या आहेत काय? अनुसूचीला क्रम दिला आहे काय? याचा मागोवा घेत असता लक्षात आलेल्या त्रृटी त्वरीत दूर करण्यात येत गेल्या.

वैयक्तीक मुलाखती घेण्याचे कार्य संशोधनकर्त्याने स्वत: केले तसेच एककाची संख्या मर्यादीत होती त्यामुळे मुलाखतकाराची विभुक्ती करण्याची गरज भासली नाही. संशोधक स्वत: संशोधन प्रक्रीयेत सहभागी असल्यामुळे तथ्यांचे सकंलन करताना बहुंशी संस्करणाचे कार्य करण्यात आले. तात्पर्य तथ्य संकलन करीत असतानाच आणि दुसरे म्हणजेच संकलनाचे कार्य हया दिवसापुरते संपल्यावर संस्करण कार्य पार पाडण्यात येत होते.

२. **वर्गीकरण** : तथ्यांचे वर्गीकरण म्हणजे "प्राप्त केलेल्या तथ्यांचे त्याच्या सारखेपणाच्या अथवा वेगळेपणाच्या आधारावर नाही निश्चीत व मोजक्या गटात विभाजन करणे होय."[१०३] मुलाखत अनुसूचित साधारणत: मुक्त व बंद अशा दोन स्वरुपाचे प्रश्न होते. जे मुक्त प्रश्न होते अशा प्रश्नांना वेगवेगळया उत्तरदात्याकडून वेगवेगळया प्रकारची उत्तरे प्राप्त होत होती. अशा विखूरलेल्या माहितीला मोजक्या गटात आणणे आवश्यक असते. जीथे बंद प्रश्न आहेत त्या ठिकाणी पूर्वनिर्धारीत उत्तरे दिली होती. त्यामुळे त्याचे वर्गीकरण करणे आवश्यक ठरत नाही. कारण उत्तरदात्याच्या स्वरूपात पूर्वीच वर्गीकरण दिलेले होते. परंतू मुक्त प्रश्नाला अनेक स्वरूपाची उत्तरे प्राप्त होत असल्यामुळे सारणीकरणाच्या

---

१०३ प्रा. सुरेश मेश्राम ''प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन'', यश प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ३४, ३५

दृष्टीने वर्गीकरणाची गरज होती. अशा विस्कळीत उत्तरांचा बारकाईने विचार करून एकाच प्रश्नाला प्राप्त झालेल्या अनेक उत्तराचे कमीत–कमी गट करून त्याचे वर्गीकरण करण्यांत आले.

३. **सांकेतीकरण** : एकदा वर्गीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील पायरी म्हणजे सांकेतीकरण होय."तथ्यांना सारणीकृत करणाऱ्या कार्यपद्धतीला सांकेतीकरण असे म्हणतात".[१०४] सांकेतीकरणात पुर्वनिर्धारीत वर्गाला समाविष्ट होणाऱ्या प्रत्येक उत्तरास संकेत दिले जाते. हे संकेत आकडयात, शब्दांत किंवा खुणा करून दिल्या जातात. प्रश्नावली, मुलाखत अनुसूची, निरीक्षण अनुसूचि व इतर तथ्ये संकलनाच्या पद्धतीने संकलीत केलेल्या तथ्याचे प्रतिकात रूपांतर करण्यांत येते, प्रस्तुत संशोधनात संशोधकाने मुलाखत अनुसूची विकसित करतानाच संकेतल केले तसेच मुलाखत अनुसूचीमध्ये उत्तरदात्याने दिलेल्या उत्तराची नोंद करतांनाही ही नोंद सांकेतीकरित्या केली, त्यासाठी अंक व खुणाचा उपयोग करण्यांत आला. या दोन्ही स्तरावर सांकेतीकरण केल्यानंतर उर्वरित तथ्याचे सांकेतीकरण करण्यांचे कार्य संपूर्ण तथ्ये एकत्रित केल्यानंतर पार पाडले त्यासाठी मुलाखत अनुसूचीवर वेगवेगळया रंगाच्या पेन्सीलने खुणा केल्या, संशोधक स्वत:च सांकेतक असल्याकारणाने संशोधकाला तथ्याची आरंभापासून यथायोग्य माहिती होती, त्यामुळे सांकेतीकरण कार्यात सुलभता आली. संकेतीकरणापैकी तथ्याचे संस्करण करण्यांत आले होते. त्या कारणाने सांकेतीकरणात अडथळे प्रत्ययास आले नाही.

४. **संकेतन तक्ता** : प्रत्येक अनुसूचीत निर्माण केलेले संकेताचे स्थानांतरण झाल्यानंतर पुढची पायरी म्हणजे संकेतन तक्ता याला मास्टरचार्ट असे

---

१०४ डॉ. भांडारकर पी.एल, त्रतैव, पृ.क्र. ५५०

म्हणतात. सर्वच उत्तरदात्याची उत्तरे एकत्रीत आणण्यासाठी मास्टरचार्ट तयार करण्यांत आला. सर्वच उत्तरदात्याची सर्वच प्रश्नांना दिलेली उत्तरे एकत्रीत करता यावी व एका दृष्टीक्षेपात बघता यावी म्हणून मास्टरचार्टची आवश्यकता असते.

मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने सकंलीत केलेल्या तथ्याचे संकेतीकरण केल्यावर त्या सर्व समग्रास संकेतन तक्त्यामध्ये नोंदविण्यात आले. सांकेतन तक्त्यात ग्रंथीत केलेल्या तक्त्यामुळे सारणीकरणाचे काम सुलभ झाले. महत्वाचे म्हणजे विभिन्न चलातील पारस्पारीक संबंध स्पष्ट करून परस्पर छेदक सारण्या तयार करण्याचे काम साध्य झाले. संकेत तक्त्याच्या मदतीने नमुन्यातील एकाच्या संदर्भात प्राप्त झालेले तथ्य एका दृष्टीक्षेपात पहाता येतात, त्यातील अंतसंबंध दर्शविणे सोयीस्कर होते. याप्रमाणे संकेतन तक्ता सारणीकरणासाठी उपयुक्त ठरतो.

५. **सारणीकरण (तथ्यांचे किंवा सारणीच विश्लेषण)** : संख्याशास्त्रीय योजनेतील पुढील पायरी म्हणजे सारणीकरण होय. सारणीकरण यंत्राने व हाताने केल्या जाते. यंत्राने करावयाच्या सारणीकरणाला यांत्रीक सारणीकरण म्हणतात. सारणीकरणात संशोधन समस्या व उद्देश आधारभूत माणून दोन किंवा जास्त चलातील सहानुवर्ती संबंध जाणून घेण्यासाठी योजना तयार करण्यांत आली. या योजनेत नक्षलाच्या चळवळीचा होणारा प्रभाव शहीद पोलीस व सामान्य नागरीक असे तुलनात्मक अभ्यासाची मांडणी करण्यांत आली. नक्षल कारवायांचा शहीद पोलीस व सामान्य नागरीक या दोन्ही घटकांवर काय परीणाम झाला त्याची तुलना करण्यांत आली. शिक्षण, वर्ग, उत्पन्न, व्यवसाय याचा इतर चलाशी असणारा सहानुवर्ती संबंध स्पष्ट करण्याच्या हेतूने सारण्या तयार करण्यांत आल्या. सारणीमध्ये दोन, तीन चलातील संबंध

स्पष्ट करताना परस्पर छेदक सारण्या बनविण्यांत आल्या. सारण्या बनविल्यानंतर संकलीत तथ्यांना सारांश रूपाने मांडण्यासाठी सांख्यिकीय मध्य, मध्यीका, बहुलक इत्यादी मापाचा उपयोग करण्यांत आला, तसेच सारणीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यात सम्मिलीत असलेल्या चलाच्या सहानुवर्ती संबंधाला आधारभूत माणून तथ्याचे विश्लेषण व निर्वचन करण्यांत येवून निष्कर्षाची मांडणी करण्यांत आली. सांख्यिकीय तंत्रातील विविध ग्राहयता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला. त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता (Frequency) व बहुलक (Mode) काढण्यात आले. विविध भागातील प्राप्त माहितीच्या अध्ययनाकरता 'Z' test of proportion चा वापर करण्यात आला. Significance Level 0.05 ठरविण्याात आला. वरील सर्व प्रक्रियानंतर निष्कर्ष जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ कसे राहतील यांची दखल घेण्यात आली. योग्य त्या तक्त्याचा वापर करण्यात आला.

६. **अहवाल लेखन** : मास्टरचार्टच्या आधारे संपूर्ण साध्या सारण्या तयार झाल्यानंतर अहवाल कसा तयार करावा हयाचा विचार करावा लागतो. म्हणजेच अहवालात प्रकरणाची रचना व कोणत्या सारण्या हवे किंवा नाही याची योजना आखण्यांत आली. त्यासाठी अहवाल लेखनही शेवटची व महत्वाची पायरी आहे.

अहवालाची रूपरेषा तयार करताना अध्ययनामध्ये उद्देश, उपकल्पना व मिळालेले निष्कर्ष लक्षात घेवून अहवाल लेखन करावे लागले.

संशोधनातील सर्वच पायऱ्याचा सांगोपांग विचार करण्यांत आला आहे. या सर्व पायऱ्यांना न्याय देवून अहवाल लेखन करण्यांत आला.

७. **संशोधनातील अडचणी :** संशोधन प्रक्रीयेत संशोधकाने घेतलेले निर्णय कार्यान्वित करीत असताना अनेक प्रकारच्या अडचणीचा सामना करावा लागतो. संशोधन कार्यातील अडचणीमुळे प्रमाण्यता, विश्वासनियता व वस्तुनिष्ठतेला बाधा येवू शकते. यासाठी संशोधकाने अडचणीचे निवारण करण्यांसाठी प्रयत्नशील असले पाहीजे. प्रस्तुत अध्ययनात आलेल्या अडचणी खालील प्रमाणे आहे.

१. संशोधन विषयाची निवड करण्यापूर्वी हया विषयाची निवड करून अनेकाशी चर्चा केली. त्यात, अधिकारी, प्राध्यापक, पोलीस अधिकारी यांचा समावेश होतो. प्रत्येकाशी हा विषय गंभीर आहे. यावर नक्षलाची आपणास धमकी मिळेल असे काहींनी सुचविले. परंतू जिल्हयातील, या अत्यंत कमकूवत व भितीयुक्त अशा विषया–विषयी लागलेली उत्सूकता मला स्वस्थ बसू देत नव्हती. जे होईल ते बघू ही मनाशी खूनगाठ बांधून या विषयांवर संशोधन करण्याच्या ध्येयाने प्रेरीत झालो व या विषयाची निवड करून संशोधनात सुरूवात केली.

२. गडचिरोली जिल्हा आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. अध्ययनासाठी जिल्हयातील शहीद झालेले पोलिसांचे कुटूंबीय व सामान्य नागरीकांचे कुटूंबीय घेतल्यामुळे प्रत्येक कुटूंबीयाचे वास्तव्य भिन्न ठिकाणी असल्यामुळे त्याच्या कामाच्या वेळा वेगवेगळया असल्याने अनेकदा संपर्क करावे लागला. अनेक कुटूंबीय अज्ञानी असल्याने त्यांना समज देवून विषयाचे महत्व सांगून विषयाला सुरवात करण्यासाठी अधिक वेळ व्यर्थ जात होता.

३. आदिवासी समुदायाचे साक्षरतेचे प्रमाण नगण्य आहे. सामान्य नागरीकांमधील पोलीस पाटील व त्याचे कुटूंबीय माहिती देण्यासाठी

घाबरायचे तेव्हा दुसऱ्याची मदत घेवून समजूत काढण्यात व वेळप्रसंगी त्यांना माहिती देण्यासाठी तयार करण्यांत वेळ व पैसा खर्च करावा लागला.

४. पोलीस मुख्यालयातील नक्षलसेल येथील अधिकाऱ्याकडे प्रथम गेलो तेव्हा त्यानी गोपनीय माहिती कुणालाही देता येत नाही म्हणून चार आठ दिवस फिरवित ठेवले. ज्यावेळी पोलीस अधिक्षक राजेश प्रधान सरांनी प्रस्तुत संशोधनास वेळोवेळी सहकार्य करण्याचे पत्र दिल्याबरोबर मदत मिळाली, त्यात वेळोवेळी नक्षलसेल विभागातील कर्मचारी त्यांच्या माहिती देण्यांस टाळाटाळ करीत, त्याचा त्रास होत होता.

५. भामरागड, सिरोंचा या परीसरात ज्यावेळी मुलाखती घेण्यासाठी गेलो तेव्हा तेंदू तोडणीचे काम सुरू असल्यामुळे पूर्ण कुटूंबीय जंगलात जावून तीथेच वास्तव्य करीत असत. अशावेळी भामरागड येथे चार दिवस वास्तव्य करावे लागले.

वेळप्रसंगी काही कुटूंबाच्या तेंदू पुडके बांधणीच्या ठिकाणी जाऊन मुलाखती घेतल्या. त्यावेळी दुर्गमभागातील अती संवेदनशील वातावरण पाहून खूप भिती वाटत होती.

६. शहीद पोलीस कुटूंबियांना काही प्रमाणात सवलती मिळाल्या, परंतू काही कुटूंबाला नौकरी, वेतन, पेन्शन, ग्रॅज्यूटी मिळायची असल्याने अनेकांशी आपल्या समस्या कथन केल्या, त्याची दु:खे पाहून त्यांना शक्य तेवढी मदत केली. त्यामुळे पुढील कुटूंबियांमध्ये माझ्याबद्दल चांगली भावना निर्माण झाली. त्यामुळे बाकी कुटूंबियाची मुलाखत घेताना अडचणी गेल्या नाही.

७. कुरखेडा, कोरची दरम्यान प्रवासातील हा जीवघेणा प्रसंग होता. जीवणात कधीही नक्षल्याची भेट होईल असे वाटले नव्हते. ती वेळ रात्री १० ची होती. माझ्या गाडीतील लाईट बंद होते, त्यामुळे त्यांनी मला अडविले असेल कारण नक्षल क्षेत्रात रात्री गाडीच्या (कारच्या) आतील लाईट सुरू ठेवावे लागतात याची मला मुळीच कल्पना नव्हती. सुरवातीला रस्त्यावर एक झाड पडले होते. त्यावेळी मला थोडा संशय आला. पण रस्त्याच्या कडेहून गाडी बाहेर काढली. १ कि.मी. अंतर पार पडल्यावर सुरजागड पहाडीच्या खाली समोरून काही व्यक्ती पुढे येताना दिसले. त्यांनी मला हात दाखविला त्यावेळी गाडी थांबविण्याची भिती वाटली, जर गाडी थांबविली नसती तर नक्षली पोलीस समजून फायरींग करण्याची भिती होती. म्हणून गाडी थांबविली, त्यावेळी फक्त दोघे व्यक्ती माझ्याजवळ आले व काही अंतरावर उभे होते. मला त्यावेळी आलेला संशय पूर्ण खरा ठरला.

मी गाडीच्या आतून त्यांच्याशी संवाद साधला. मी एक पत्रकार संशोधक आहे असे त्यांना सांगितल्यामुळे त्यांनी आपल्या वेदना माझ्याशी कथन केल्या. काहींनी मार्क्स, लेणीन, विषयी चर्चा केली. जवळपास २० मी. त्या अरण्यातील काळोखात त्यांच्याशी चर्चा केली. मी त्यांना त्याच्या समजूतदारपणाने संवाद साधत होतो. शेवटी जाताना त्यांनी मला म्हटले “बाबुजी, आप रात के अंधेरे मे कारकी अंदरकी लाईट जलाके गाडी चलाना, जब हम समझेंगे की ये पुलिस की गाडी नही” थोडया अंतरावर आल्यावर जीव कासावीस झाला होता. माझ्या शरीरामध्ये शक्ती नसल्यासारखे वाटत होते. कुरखेडा येथे ११ वाजता पोहचल्यावर थोडे बरे वाटू लागले. माझ्या

सोबती असलेल्या मित्राचा रक्तदाब खूप वाढून गेला होता. अशा कठीण परिस्थितीत संशोधन करताना आव्हान आपण पूर्ण केले याचा आनंद वाटत राहीला.

८. सन २००९ मध्ये, मर्केगाव, हत्तीगोटा व लाहेरी या ठिकाणी शहीद झालेल्या पोलीसाची संख्या ५५ होती, तर सामान्य नागरीकाची संख्या ६२ होती. ही घटना घडून जवळपास ४–५ महिन्याचा अंतर पडला असल्याने त्या सर्व समस्या ग्रस्त कुटूंबांना प्रश्न कसे विचारावे हा माझ्यासमोर मोठा प्रश्न होता. सर्व तरूण मंडळी शहीद झाली. कुणाचे म्हातारे आई वडील तर कुणाचे नुकतेच लग्न झालेली विधवा पत्नी, कुणाचे इवलेसे लहान लहान मुले, कुणाचे मुलांचे साक्षगंध झालेल्या मुलांचे अधूरे स्वप्न भंगलेले, अशावेळी त्यांच्या समस्या लक्षात घेताना काळजाची पाणी व्हावे असे वाटत होते.

त्यांच्या कुटूंबाचे फोटो घेताना आनंदाच्या फोटोऐवजी दु:खाचा सागर वाहणारी कळा त्यांच्या प्रतिमामध्ये साकार होत होती. अशा अडचणीत त्याच्यापुढे नव्या विश्वासांचा व सांन्तवनाचा आभास देवून मुलाखत पूर्ण केल्या गेली.

९. अनेक विधवानी तीच्या जीवनातील दु:खद प्रसंग सांगून रडायच्या. त्यावेळी एक मानवी मन हेलावून सोडणारे असल्यामुळे माझ्याही डोळयातून नकळत अश्रू यायचे. त्यांना सावरणे कधी कधी कठीण होवून जायचे.

संशोधन करताना येणारे अनुभव व अडचणी भिन्न असल्या तरी सुद्धा आपल्या वैयक्तिक व निरीक्षणाकडे लक्ष केंद्रीत करून अनावश्यक गोष्टी टाळण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता.

प्रकरण ४ थे

सांख्यिकीय विश्लेषण आणि अर्थविवेचन

या प्रकरणात संशोधनपूर्तीसाठी "गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले पोलीस व सामान्य नागरिक यांच्या पिडीत कुटूंबाचे समाज शास्त्रीय अध्ययन", संकलित केलेल्या माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण आणि विवेचन करण्यात आले. तसेच त्यावरून सारणी व आलेख तयार करण्यात आलेले आहेत. या प्रकरणात संशोधन पुर्तीसाठी केलेल्या सामुग्री संकलनावरून माहितीचे पृथक्करण, विवेचन, आलेख, सांख्यिकीय विश्लेषण करून सारणी व आलेख हे तत्थ्य संकलनाच्या आधारावर करण्यात आले

कौटुंबिक प्रश्न

सारणी क्र. ४.१

लिंग

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
स्त्री	२००	८०.१	१९१	७६.३	१.४१	NS
पुरुष	५०	१९.९	५९	२३.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१ मधून उत्तरदात्यांचे लिंग संबंधीची माहिती प्राप्त होते. उत्तरदात्यांमध्ये बहुतांश सामान्य नागरिक स्त्री असून सामान्य नागरीकांचे प्रमाण ८०.१ टक्के व पोलीस कुटूंबियांचे प्रमाण ७६.३ टक्के असल्याचे दिसून येते. तसेच पुरुष उत्तरदात्यांमध्ये सामान्य नागरिकांचे प्रमाण १९.९ टक्के असून पोलीस कुटूंबियांचे प्रमाण २३.७ टक्के असल्याचे निदर्शनास येते.

यावरुन असे लक्षात येते की, उत्तरदात्यांमध्ये स्त्री व पुरुष हे दोन्ही समाजातील महत्वाचे घटक आहेत. जीवन रथातील ही दोन चाके आहेत त्यापैकी एक जरी निखळले तरी जीवनाचा रथ पुढे जाण्यास असमर्थ ठरतो. स्त्री व पुरुषातील भेद हे कमी होत आहेत व स्त्री पुरुष समानतेकडे हळूहळू लोकांचा कल झुकतो आहे. त्यामुळे शहीद कुटूंबातील स्त्रीयावर कुटूंबाचा भार सहन करावा लागतो आहे.

सारणी क्र. ४.२

उत्तरदात्याचे वय

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
२० ते ३० वर्षे	६१	२४.४	४०	१५.८	२.११	<०.०५
३१ ते ४० वर्षे	१०५	४१.९	११९	४७.५		
४१ ते ५० वर्षे	६४	२५.६	५०	२०.१		
५१ च्या वर	२०	८.१	४१	१६.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या उत्तरदात्यांच्या वयाच्या संदर्भात माहिती सारणी क्र. ४.२ मध्ये दिसून येते. वयाच्या आधारे प्राचीन काळापासून स्तरीकरण केलेले आपणास दिसते. समाजातील वृद्ध व्यक्तीचा दर्जा हा उच्च तर कमी व्यक्तीचा निम्न असे म्हटल्या जात होते. सामान्य नागरिक २० ते ३० वयोगटातील असून त्यांचे प्रमाण २४.४ टक्के व पोलीस कुटूंबियांचे प्रमाण १५.८ टक्के असल्याचे आढळून येते, तर बहुतांश ४१.९ टक्के सामान्य नागरिक व ४७.५ टक्के पोलीस कुटूंबिय हे ३१ ते ४० वयोगटातील असल्याचे दिसून येते. २५.६ टक्के सामान्य नागरिक व २०.१ टक्के पोलीस कुटूंबिय हे ४१ ते ५० वयोगटातील असल्याचे दिसून येते.

५१ च्या वर असलेले सामान्य नागरिकाचे प्रमाण ८.१ टक्के व पोलीस कुटूंबियांचे प्रमाण १६.६ टक्के असल्याचे दिसते.

पण आज वयाच्या आधारे होणाऱ्या दर्जात बरेच परिवर्तन झालेले दिसते आणि वयाच्या आधारे गणल्या जाणाऱ्या दर्जाची जागा अर्जित दर्जाने घेतली आहे. म्हणजे व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुण पात्रतेच्या आधारे तिच्या समाजात स्थान ठरू लागले आणि वय हा आधार मार्ग पडला आहे.

सारणी क्र. ४.३

वैवाहिक स्थिती

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
विवाहीत	४५	१८.१	६५	२५.९	२.२१	<०.०५
अविवाहीत	०७	२.५	०२	०.७		
विधवा	१९०	७६.३	१६९	६७.६		
विधूर	०८	३.१	१४	५.८		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

प्रस्तुत अध्ययनात सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबीयांच्या वैवाहिक स्थितीची माहिती सारणी क्र. ४.३ मध्ये दिसून येते. गडचिरोली जिल्हयातील जास्तीत जास्त सामान्य नागरिकांमध्ये विधवेचे प्रमाण ७६.३ व पोलीस कुटूंबियांचे प्रमाण ६७.६ टक्के आहे. विवाहीताच्या तुलनेत सामान्य नागरिकांचे प्रमाण १८.१ टक्के व पोलीस कुटूंबियांचे प्रमाण २५.९ टक्के आहे. तसेच अविवाहीतामध्ये सामान्य नागरिकांचे प्रमाण २.५ टक्के व ०.७ टक्के पोलीस कुटूंबियांमध्ये आढळून येते. विधूर असणाऱ्यांचे कमीत कमी प्रमाण हे सामान्य नागरिकांचे ३.१ टक्के व ५.८ टक्के पोलीस कुटूंबियांचे असल्याचे निदर्शनास येते. वरील स्पष्टीकरणातून असे दिसून येते शहीद झालेल्या कुटूंबाचा सामाजिक व आर्थिक विकास होतो.

सारणी क्र. ४.४

मातृभाषा

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
मराठी	२१६	८६.३	२३९	९५.७		
हिंदी	०२	०.६	०७	२.९		
माडीया	१२	५.०	०२	०.७		
तेलगू	०५	१.९	०२	०.७		
मराठी व हिंदी	०३	१.२	—	—	१.४५७	NS
मराठी व तेलगू	०८	३.१	—	—		
मराठी व गोंड	०३	१.३	—	—		
मराठी व बंगाली	०१	०.६	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.४ वरुन असे स्पष्ट होते की, शहीद झालेल्या कुटूंबियांपैकी ८६.३ टक्के सामान्य नागरिक व ९५.७ टक्के पोलीस कुटूंबिय मराठी भाषीक आहेत. ०.६ टक्के सामान्य नागरिक व २.९ टक्के पोलीस कुटूंबिय हिंदी भाषीक आहेत. ५ टक्के सामान्य नागरिक व ०.७ टक्के पोलीस कुटूंबिय माडीया भाषीक आहेत. १.९ टक्के सामान्य नागरिक व ०.७ टक्के पोलीस कुटूंबिय तेलगू भाषीक आहेत. १.२ टक्के सामान्य नागरिक मराठी व हिंदी दोन्ही भाषा बोलतात. ३.१ टक्के सामान्य नागरिक मराठी व तेलगू दोन्ही भाषा बोलतात. १.३ टक्के सामान्य नागरिक मराठी व गोंडी दोन्ही भाषा बोलतात. तर मराठी व बंगाली बोलणाऱ्या सामान्य नागरिकांची संख्या ०.६ टक्के आहे.

वरील तालिकेच्या टक्केवारी गुणांच्या आधारे समर्पकरित्या हे स्पष्ट होते की, अध्ययना अंतर्गत येणाऱ्या नक्षल ग्रस्त क्षेत्रात दोन्ही प्रकारच्या उत्तरदात्यामध्ये मराठी भाषिकांची संख्या मोठया प्रमाणात आढळते आणि शहीद झालेल्या मराठी भाषिक पोलीसांची संख्या सामान्य जनतेच्या तुलनेत महत्वपूर्ण पणे जास्त आहे.

सारणी क्र. ४.५

कुटूंबाचा प्रकार

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
संयुक्त कुटूंब	२७	१०.६	५०	१९.७	२.२३	<०.०५
विभक्त कुटूंब	२२३	८९.४	२००	८०.३		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले पोलीसाच्या कुटूंब प्रकाराचा विचार सारणी क्र. ४.५ मध्ये करण्यात आलेला आहे. भारतीय कुटूंब पद्धतीत संयुक्त कुटूंब पद्धती ही पिढयानपिढया चालत आलेली कुटूंब पद्धती आहे. संयुक्त कुटूंबांचे अधिक प्रमाण ग्रामीण भागात दिसून येते व आजही संयुक्त कुटुंबात लोक जास्त प्रमाणात राहतात. परंतू नवीन युगात संयुक्त कुटूंबांचे विभक्त कुटूंबे व्हायला सुरवात झाली आहे.

वरील तालिकेमध्ये दर्शविल्याप्रमाणे संयुक्त कुटूंबात राहणाऱ्या सामान्य नागरिकांची प्रतिशत १०.६ टक्के आहे. तर पोलीस कुटूंबियांची प्रतिशत १९.७ टक्के आहे. विभक्त कुटूंबात राहणाऱ्या सामान्य नागरिकांची प्रतिशत ८९.४ टक्के तर पोलीस कुटूंबियांची प्रतिशत ८०.३ टक्के आहे.

शहीद झालेल्यामध्ये विभक्त कुटूंबीयांच्या सदस्यांची संख्या स्पष्टपणे जास्त आहे. त्यातही विभक्त कुटूंबातील शहीद झालेल्या पोलीसांच्या तुलनेत, विभक्त कुटूंबातील शहीद झालेल्या सामान्य जनतेची संख्या महत्वपूर्ण रित्या ($P<0.05$) जास्त आहे. संयुक्त कुटूंबाचा विचार केला असता यात शहीद झालेल्या पोलीसाच्या तुलनेत सामान्य जनतेतून शहीद झालेल्या सदस्यांची संख्या समर्पकरित्या कमी आहे.

सारणी क्र. ४.६

उत्तरदात्याचा व्यवसाय

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
नोकरी	०३	१.२	९४	३७.७	२.६७	<०.०५
शेती	१५०	५५.९	८७	३४.८		
उद्योग	२०	८.१	०४	१.४		
इतर	८७	३४.८	६५	२६.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

तालिका क्र. ४.६ वरुन असे लक्षात येते की, उत्तरदात्याच्या व्यवसाय पुढील प्रमाणे आहेत जसे नोकरी, शेती, उद्योग व इतर त्यामध्ये शेती करणाऱ्या सामान्य जनतेची संख्या ५५.९ टक्के व शहीद झालेल्या पोलीस कुटूंबियांचे प्रमाण ३४.८ टक्के असल्याचे दिसून येते. शहीद झालेल्या पोलीस कुटूंबियांपैकी नोकरी करणारे ३७.७ टक्के व सामान्य नागरिकामध्ये नोकरी करणारे १.२ टक्के असल्याची दिसते. उद्योग धंद्यामध्ये असलेल्या सामान्य जनतेची संख्या ८.१ टक्के तसेच पोलीस कुटूंबियांची संख्या १.४ टक्के आहे. त्यापैकी इतर उत्तरदात्याच्या व्यवसायामध्ये सामान्य जनतेची संख्या ३४.८ टक्के व पोलीस कुटूंबियांची संख्या २६.१ टक्के असल्याचे निदर्शनास येते.

यावरुन गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेले सामान्य जनतेत शेती व्यवसाय असलेल्या उत्तरदात्यांच्या परिवारातील शहीदांची संख्या महत्वपुर्ण पणे ($P<0.05$) जास्त आहे, जर नोकरदार वर्गाचा विचार केला असता शहीद पोलीसांची संख्या इतर नोकरी करणाऱ्यांच्या तुलनेत स्पष्टपणे जास्त आहे.

सारणी क्र. ४.७

मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
० ते ५० हजार	०३	१.२	५१	२०.४	२.५९	<०.०५
५१ ते १ लाख	२४४	९७.५	१०२	४०.९		
१ लाखाच्या पुढे	०३	१.३	९७	३८.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील अध्ययनातून मिळणाऱ्या एकूण वार्षिक उत्पन्नाची माहिती सारणी क्र. ४.७ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. ज्या परिवारांचे वार्षिक उत्पन्न ० ते ५० हजार आहे. या वर्गात शहीद झालेल्या २०.४ टक्के पोलीसांची संख्या ही १.२ टक्के सामान्य जनतेपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. ज्या परिवारांचे वार्षिक उत्पन्न ५१ हजार ते १ लाख आहे अशा वर्गातील शहीदांमध्ये ९७.५ टक्के सामान्य जनतेतून शहीद झालेल्यांच्या तुलनेत शहीद झालेल्या पोलीसांची संख्या ४०.९ टक्के समर्पक रित्या कमी असल्याचे निदर्शनास येते, तर १ लाखाहून जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या परिवारांमध्ये शहीद झालेल्या पोलीसांची संख्या ३८.७ टक्के महत्वपूर्ण रित्या जास्त आहे. तसेच १ लाखाहून जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या परिवारांमध्ये शहीद झालेल्या सामान्य जनतेची संख्या १.३ असल्याचे दिसते.

यावरुन असे लक्षात येते की, मध्यम वर्गीय सामान्य नागरिकामध्ये शहीद होण्याचे प्रमाण इतर आर्थिक वर्गापेक्षा प्रकर्षाने ($P<0.05$) जास्त आढळून येते. जास्तीत–जास्त पोलीस कुटूंबियांतील शहीदांची संख्या याच वर्गात आढळते. विश्लेषणाअंती असे आढळते की, इतर दोन आर्थिक वर्गापेक्षा मध्यम वर्गीयांनी जीवित हानी जास्ती प्रमाणात सोसावी लागली आहे.

सारणी क्र. ४.८

कुटूंबातील एकूण स्त्रीयांची संख्या

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एक	१३४	५३.५	१५७	६२.८		
दोन	१००	४०.१	७५	२९.९	२.२१३	<०.०५
तीन	१६	६.४	१८	७.३		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.८ मध्ये कुटूंबातील एकूण स्त्रीयांच्या संख्येचा आढावा घेण्यात आलेला आहे. ज्या कुटूंबात स्त्रीयांची संख्या एक आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ५३.५ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ६२.८ टक्के आहे. ज्या कुटूंबात स्त्रीयांची संख्या दोन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ४०.१ टक्के आहे तर पोलीस कुटूंब २९.९ टक्के आहे. ज्या कुटूंबात स्त्रीयांची संख्या तीन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ६.४ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ७.३ टक्के आहे.

दोन्ही वर्गातील स्त्रीयांची संख्या एक असणाऱ्या कुटूंबाची संख्या दोन आणि तीन स्त्री संख्या असणाऱ्या कुटूंबियापेक्षा समर्पकरित्या ($P<0.05$) अधिक आहे.

सारणी क्र. ४.९

कुटूंबातील एकूण पुरुषांची संख्या

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एक	२०९	८३.८	१८३	७३.२		
दोन	३३	१३.३	५२	२०.७	२.१३२	<०.०५
तीन	०८	२.९	१५	६.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.९ मध्ये कुटूंबातील एकूण पुरुषांच्या संख्येचा आढावा घेण्यात आलेला आहे. ज्या कुटूंबात पुरुषांची संख्या एक आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ८३.८ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ७३.२ टक्के आहे. ज्या कुटूंबात पुरुषांची संख्या दोन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब १३.३ टक्के आहे तर पोलीस कुटूंब २०.७ टक्के आहे. ज्या कुटूंबात पुरुषांची संख्या तीन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब २.९ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ६.१ टक्के आहे.

दोन्ही वर्गातील पुरुषांची संख्या एक असणाऱ्या कुटूंबाची संख्या दोन आणि तीन पुरुष संख्या असणाऱ्या कुटूंबियापेक्षा समर्पकरित्या ($P<0.05$) अधिक आहे.

सारणी क्र. ४.१०

कुटूंबातील एकूण मुलांची संख्या

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एक	२१०	८३.८	१४२	५६.६	२.३२	<०.०५
दोन	०६	२.५	८८	३५.२		
तीन	११	४.४	१४	५.७		
चार	१५	६.०	०४	१.६		
पाच	०६	२.५	०२	०.९		
सहा	०२	०.८	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१० मध्ये कुटूंबातील एकूण मुलांच्या संख्येचा आढावा घेण्यात आलेला आहे. ज्या कुटूंबात मुलांची संख्या एक आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ८३.८ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ५६.६ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलांची संख्या दोन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब २.५ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ३५.२ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलांची संख्या तीन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ४.४ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ५.७ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलांची संख्या चार आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ६ टक्के आहे तर पोलीस कुटूंब १.६ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलांची संख्या पाच आहे असे सामान्य नागरिक कुटूंब २.५ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ०.९ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलांची संख्या सहा आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ०.८ टक्के आहे.

दोन्ही वर्गातील मुलांची संख्या एक असणाऱ्या कुटूंबाची संख्या दोन, तीन, चार, पाच व सहा मुलांची संख्या असणाऱ्या कुटूंबियापेक्षा लक्षणीयरित्या ($P<0.05$) अधिक आहे. त्यातही दोन मुले असणाऱ्या पोलीस कुटूंबियांची संख्या दोन मुले असणाऱ्या सामान्य नागरिकांच्या संख्येपेक्षा महत्वपूर्णपणे ($P<0.05$) अधिक आहे.

सारणी क्र. ४.११

कुटूंबातील एकूण मुलींची संख्या

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एक	१३४	५३.७	१६०	६४.१		
दोन	८५	३३.९	८०	३२.०		
तीन	२५	९.९	०७	२.९	२.२१	<०.०५
चार	०२	०.८	—	—		
पाच	०४	१.७	०३	१.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.११ मध्ये कुटूंबातील एकूण मुलीच्या संख्येचा आढावा घेण्यात आलेला आहे. ज्या कुटूंबात मुलीची संख्या एक आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ५३.७ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ६४.१ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलीची संख्या दोन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ३३.९ टक्के आहे तर पोलीस कुटूंब ३२ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलीची संख्या तीन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ९.९ टक्के आहे तर पोलीस कुटूंब २.९ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलीची संख्या चार आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ०.८ टक्के आहे. ज्या कुटूंबात मुलीची संख्या पाच आहे असे सामान्य नागरिक कुटूंब १.७ टक्के आहे तर पोलीस कुटूंब १ टक्के आहे.

दोन्ही वर्गातील मुलांची संख्या एक असणाऱ्या कुटूंबाची संख्या दोन, तीन, चार व पाच मुलांची संख्या असणाऱ्या कुटूंबियापेक्षा लक्षणीयरित्या ($P<0.05$) अधिक आहे.

सारणी क्र. ४.१२

कुटूंबातील एकूण सदस्य संख्या

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एक	—	—	—	—	१.३२	NS
दोन	०९	३.७	०५	१.५		
तीन	६१	२४.२	५०	१९.९		
चार	५८	२३.०	९४	३७.५		
पाच	५६	२२.४	५७	२२.८		
सहा	३६	१४.३	१९	७.४		
सत	१४	५.६	११	४.४		
आठ	१२	५.०	०८	३.२		
नऊ	०३	१.२	०४	१.५		
दहा	०१	०.६	०२	०.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१२ मध्ये कुटूंबातील एकूण सदस्यांच्या संख्येचा आढावा घेण्यात आलेला आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या दोन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ३.७ टक्के आहे तर पोलीस कुटूंब १.५ टक्के आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या तीन आहे असे सामान्य नागरिक कुटूंब २४.२ टक्के आहे तर पोलीस कुटूंब १९.९ टक्के आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या चार आहे असे सामान्य नागरिक कुटूंब २३ टक्के आहे तर पोलीस कुटूंबाच्या सदस्यांची संख्या ३७.५ टक्के आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या पाच आहे असे सामान्य नागरिक कुटूंब २२.४ टक्के आहे तर पोलीस कुटूंब २२.८ टक्के आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या सहा आहे असे सामान्य नागरिक कुटूंब १४.३ टक्के आहे तर पोलीस कुटूंबाच्या सदस्यांची संख्या ७.४ टक्के आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या सात आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ५.६ टक्के आहे तर पोलीस कुटूंबाच्या सदस्यांची संख्या ४.४ टक्के आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या आठ आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ५ टक्के आहे तर पोलीस कुटूंबाच्या सदस्यांची संख्या ३.२ टक्के

आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या नऊ आहे असे सामान्य नागरिक कुटूंब १.२ टक्के आहे तर पोलीस कुटूंबाच्या सदस्यांची संख्या १.५ टक्के आहे. ज्या कुटूंबातील सदस्यांची संख्या दहा आहे असे सामान्य नागरिक कुटूंब ०.६ टक्के आहे तर पोलीस कुटूंबाच्या सदस्यांची संख्या ०.७ टक्के आहे.

सामाजिक व मानसिक प्रश्न

सारणी क्र. ४.१३

आपले जिल्हयात किती वर्षापासून वास्तव्य आहे

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
१ ते १० वर्षे	२७	१०.६	८३	३३.१	२.३१२	<०.०५
११ ते २० वर्षे	०९	३.७	५४	२१.६		
२१ ते ३० वर्षे	०३	१.२	१८	७.२		
जन्मापासून	२११	८४.५	९५	३८.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सामान्य जनता व पोलीस कुटूंबिय आपले इथे किती वर्षापासून वास्तव्यास आहे या संदर्भात माहिती सारणी क्र. ४.१३ मध्ये आढळून येते. बहुतांश ८४.५ टक्के सामान्य जनता व ३८.१ टक्के पोलीस कुटूंबिय यांचे जन्मापासून वास्तव्य असल्याचे निदर्शनास येते. तसेच १ ते १० वर्ष वास्तव्यास असलेल्या पोलीस कुटूंबियांची संख्या ३३.१ टक्के व सामान्य जनतेची संख्या १०.६ टक्के असल्याचे दिसते. तसेच ११ ते २० वर्षे वास्तव्यास असलेल्या पोलीस कुटूंबियांची संख्या २१.६ टक्के असल्यास सामान्य जनतेची संख्या ३.७ टक्के आहे. २१ ते ३० वर्षे वास्तव्यास असलेल्या पोलीस कुटूंबियांची संख्या ७.२ टक्के आणि सामान्य जनतेची संख्या १.२ टक्के असल्याची आढळून येते.

यावरुन असे निदर्शनास येते की, जन्मापासून अध्ययन क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या सामान्य जनतेची संख्या पोलीस कुटूंबियांच्या संख्येच्या तुलनेत महत्वपुर्ण रित्या ($P<0.05$) अधिक आहे.

सारणी क्र. ४.१४

आपल्या कुटूंबात यापूर्वी कुणी पोलीस होते काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१८०	७२.०	२४७	९८.६	२.६७	<०.०५
नाही	२६	१०.६	०३	१.४		
सांगता येत नाही	४४	१७.४	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

कुटूंबात पुर्वोत्तरी पोलीस असलेल्या पोलीस शहीदांच्या तुलनेत कुटूंबात पुर्वोत्तरी पोलीस असलेल्या सामान्य जनतेतील शहीदांची संख्या समर्पक रित्या कमी आहे असे सारणी क्र. ४.१४ च्या अध्ययनावरुन स्पष्ट होते.

बहुतांश ९८.६ टक्के पोलीस कुटूंबिय व ७२ टक्के सामान्य जनता यांच्या तुलनेत होय म्हणणाऱ्यांची प्रमाण सामान्य जनतेपेक्षा पोलीसांचे जास्त असल्याचे दिसून येते. १.४ टक्के पोलीस कुटूंबिय व १०.६ टक्के सामान्य जनता आपल्या कुटूंबात कुणी पोलीस नाही असे दर्शवितात. तसेच १७.४ टक्के सामान्य जनता सांगता येत नाही, यावरुन आपल्या कुटूंबात यापुर्वी कुणी पोलीस होते काय या प्रश्नांच्या उत्तरार्थ मिळालेले होकारार्थी उत्तरांची संख्या सामान्य जनतेपेक्षा, पोलीस कुटूंबियांमध्ये महत्वपूर्ण रित्या ($P<0.05$) जास्त असल्याचे निदर्शनास आली.

सारणी क्र. ४.१५

असल्यास कोण पोलीस आहे?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
मुलगा	१४	५.६	६०	२३.९	२.३६	<०.०५
मुलगी	१९०	७५.८	१३	५.१		
पती	४६	१८.६	१७७	७१.०		
आप्तेष्ठ	—	—	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१५ वरुन असे लक्षात येते की, पोलीस शहीदांमध्ये पोलीस विभागात नोकरी करणाऱ्या परिवारातील कुटूंब प्रमुखांची संख्या इतरांच्या तुलनेत परिणामकारक रित्या (P<0.05) जास्त आहे. बहुतांश मुलगी ७५.८ टक्के सामान्य जनतेप्रमाणे जीवन जगतात तसेच नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या पोलीसाची संख्या ५.१ टक्के पोलीस कुटूंबियांच्यामध्ये दिसून येते. गडचिरोली जिल्हातील पोलीस कुटूंबियांमध्ये पतीची संख्या ७१ टक्के असून सामान्य जनतेच्या पतीची संख्या १८.६ टक्के निदर्शनास येते. मुलगा पोलीस असल्यास त्याची संख्या २३.९ टक्के व सामान्य जनतेची संख्या ५.६ टक्के असल्याचे दिसते.

सारणी क्र. ४.१६

आपले कुटूंबीय किती पिढयापासून नोकरी करतो?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एक पीढी	१७९	७१.४	२२५	८९.९	२.१२६	<०.०५
दोन पीढी	३९	१५.५	२५	१०.१		
तीन पीढी	१०	४.३		—		
माहीत नाही	२२	८.८		—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील अध्ययनात सामान्य जनता व पोलीस कुटूंबिय यांनी आपले कुटूंबिय किती पिढयापासून नोकरी करतात या संदर्भात माहिती सारणी क्र. ४.१६ मध्ये दिसून येते. बहुतांश ८९.९ टक्के पोलीस कुटुंबिय व सामान्य नागरिक ७१.४ टक्के हे एका पीढीकरीता नोकरी करतांना आढळून येतात. १५.५ टक्के सामान्य नागरिक व १०.१ टक्के पोलीस कुटूंबिय हे दोन पीढयापासून नोकरी करतात असे दिसते. सामान्य नागरिक यांच्या पिडीत कुटूंबाचे समाज शास्त्रीय अध्ययन केले असता आपणास तीन पीढयापासून नोकरी करणारे ४.३ टक्के कुंटूंबीय व ८.८ टक्के माहीत नाही असे दर्शविणारे सामान्य नागरिक पिडीत कुटूंबामध्ये आढळतात.

यावरुन असे लक्षात येते की, एक पिढीपासून पोलीस नोकरी करणाऱ्या शहीदांची संख्या इतरांच्या तुलनेत समर्पक रित्या ($P<0.05$) जास्त आहे.

सारणी क्र. ४.१७

कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१५७	६२.७	१९८	७९.१	२.३२१	<०.०५
नाही	२२	८.७	१८	७.२		
सांगता येत नाही	७१	२८.६	३४	१३.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय? या प्रश्नांच्या उत्तरार्थ मिळालेल्या प्रतिक्रिया पुढील प्रमाणे आहेत. ६२.७ टक्के सामान्य नागरिक व ७९.१ टक्के पोलीस कुटूंबियांनी या संदर्भात होकारार्थी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. ८.७ टक्के सामान्य नागरिक व ७.२ टक्के पोलीस कुटूंबियांनी या संदर्भात नकारार्थी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. तर २८.६ टक्के सामान्य नागरिक व १३.७ टक्के पोलीस कुटूंबियांनी या संदर्भात सांगता येत नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

सारणी क्र. ४.१७ च्या अध्ययनावरुन हे स्पष्ट होते की, दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांमध्ये पोलीस विभागात काम करायची इच्छा अधीक प्रमाणात दिसून येते, त्यातही शहीद झालेल्या सामान्य जनतेच्या तुलनेत शहीद झालेल्या पोलीसांच्या कुटुंबियांची पोलीस खात्यात नोकरी करण्याची इच्छा प्रभावी पणे ($P<0.05$) जास्त आहे.

सारणी क्र. ४.१८

असल्यास ही प्रेरणा कोणी दिली आहे?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
आईवडील	८९	३५.७	५६	२२.५	२.४७३	<०.०५
संवगडी मित्र	२९	११.५	२४	९.४		
शेजार नातेवाईक	६०	२४.१	५८	२३.२		
स्वत:ची इच्छा	७२	२८.७	११२	४४.९		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

कुटूंबातील सदस्याला पोलीस बनण्याची प्रेरणा कुठून मिळाली या सदंर्भाची माहिती सारणी क्र. ४.१८ मध्ये नमूद केलेली आहे. ३५.७ टक्के सामान्य नागरिक व २२.५ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांना ही प्रेरणा त्यांच्या आई वडीलांनी दिली. ११.५ टक्के सामान्य नागरिक व ९.४ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांना ही प्रेरणा त्यांच्या संवगडी मित्राकडून मिळाली. २४.१ टक्के सामान्य नागरिक व २३.२ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांना ही प्रेरणा त्यांच्या शेजारी व नातेवाईकांकडून मिळाली. २८.७ टक्के सामान्य नागरिक व ४४.९ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ते स्व: इच्छेने प्रेरीत झाले.

वरील तालिकेवरुन असे लक्षात येते की, पोलीस कुटूंबातील सदस्यामध्ये इतर प्रेरणा स्त्रोतांच्या तुलनेत स्व: इच्छेने प्रेरीत झालेल्या सदस्यांची संख्या महत्वपूर्ण रित्या ($P<0.05$) अधिक आहे. तर सामान्य नागरिकांच्या कुटूंबांच्या सदस्यामध्ये इतर प्रेरणा स्त्रोताच्या तुलनेत आई वडीलांकडून प्रेरणा घेणाऱ्या सदस्यांची संख्या जास्त आहे. तर इतर प्रेरणा स्त्रोतांना संमिश्र प्रतिक्रिया मिळाली आहे.

सारणी क्र. ४.१९


कुटूंबाचा प्रकार * कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?

कुटूंबाचा प्रकार		कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?			एकुण
		होय	नाही	सांगता येत नाही	
संयुक्त कुटूंब	वारंवारीता	४९	१०	१५	७४
	प्रतिशत	१३.९	२६.३	१४.०	१४.९
	एकुण	९.९	२.०	३.०	१४.९
विभक्त कुटूंब	वारंवारीता	३०३	२८	९२	४२३
	प्रतिशत	८६.१	७३.७	८६.०	८५.१
	एकुण	६१.०	५.६	१८.५	८५.१
एकुण	वारंवारीता	३५२	३८	१०७	४९७
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=2.938, P= 0.568, df=4

वरील सारणी क्र. ४.१९ वरुन असे स्पष्ट होते की, ४९७ उत्तरदात्यापैकी क्रमश: विभक्त कुटूंबातील सर्वाधिक ३०३ (६१.० टक्के) व संयुक्त कुटूंबातील ४९ (९.९ टक्के) उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्यांना पोलिस बनावे असे वाटते (या विकल्पाशी सहमत आहेत). संयुक्त व विभक्त कुटूंबातील क्रमश: १० (२ टक्के) व २८ (५.६ टक्के) सदस्यांनी या विकल्पाला नकारात्मक प्रतिसाद दर्शवला आहे. त्याचप्रमाणे, अनुक्रमे १५ (३.० टक्के) व ९२ (१८.५ टक्के) उत्तरदात्यांनी या विकल्पाला सांगता येत नाही ही प्रतिक्रिया दर्शवली आहे.

वरील क्र. ४.१९ सारणीतील उत्तरदात्यांचा कुटूंब प्रकार (संयुक्त व विभक्त) व त्यांच्या कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय? यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य २.९३८ हे ४ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य ९.४९ पेक्षा कमी असल्यामुळे कुटूंब प्रकार व कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटणे या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.१ : कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?

सारणी क्र. ४.२०

मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न * कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?


मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न		कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय?			एकुण
		होय	नाही	सांगता येत नाही	
० ते ५० हजार	वारंवारीता	१८९	३२	८१	३०२
	प्रतिशत	५४.०	८६.५	७५.०	६१.०
	एकुण	३८.२	६.५	१६.४	६१.१
५१ ते १ लाख	वारंवारीता	८२	५	१०	९७
	प्रतिशत	२३.४	१३.५	९.३	१९.६
	एकुण	१६.६	१.०	२.०	१९.६
१ लाखाच्या पुढे	वारंवारीता	७९	—	१७	९६
	प्रतिशत	२२.६	—	१५.७	१९.४
	एकुण	१६.०	—	३.४	१९.४
एकुण	वारंवारीता	३५०	३७	१०८	४९५
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=17.847, P=0.001, df=4

वरील सारणी क्र. ४.२० वरुन असे स्पष्ट होते की, ४९५ उत्तरदात्यापैकी सर्वाधिक, ० ते ५०००० रु. मासिक उत्पन्न असणाऱ्या १८९ (३८.२ टक्के), ५१ ते १ लाख रु. मासिक उत्पन्न असणाऱ्या ८२ (१६.६ टक्के) व १ लाख रु. च्या पुढे मासिक उत्पन्न असणाऱ्या ७९ (१६.० टक्के) उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्यांना पोलिस बनावे असे वाटते (या विकल्पाशी सहमत आहेत), तसेच, क्रमश: ३२ (६.५ टक्के) व ५ (१.० टक्के), ० ते ५० हजार रु. आणि ५१ ते १ लाख रु. मासिक उत्पन्न असणाऱ्या सदस्यांनी या विकल्पाला नकारात्मक प्रतिसाद दर्शवला आहे. त्याचप्रमाणे, अनुक्रमे ८१ (१६.४

टक्के), १० (२.० टक्के) व १७ (३.४ टक्के) उत्तरदात्यांनी या विकल्पाला सांगता येत नाही ही प्रतिक्रिया दर्शवली आहे.

वरील क्र. ४.२० सारणीतील उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न व त्यांच्या कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटते काय? यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार सार्थक **(P<0.05)** संबंध आहे. कारण, प्राप्त Chi-square मूल्य १७.८४७ हे ४ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य ९.४९ पेक्षा जास्त असल्यामुळे कुटूंब प्रकार व कुटूंबातील इतर सदस्य पोलीस बनावे असे वाटने या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.२ : कुटूंबातील इतर सदस्यांना पोलीस बनावे असे वाटते काय?

सारणी क्र. ४.२१

आपले कुटूंबीय किती वर्षापासून पोलीस सेवेत कार्यरत आहेत?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
१ ते १० वर्षे	१४७	५९.०	१६४	६५.५	२.१२१	<०.०५
११ ते २० वर्षे	८४	३३.५	८१	३२.४		
२१ ते ३० वर्षे	१७	६.८	०५	२.१		
३१ ते निवृत्तीपर्यंत	०२	०.७	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील अध्ययनात सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबिय यांनी त्यांचे कुटूंबिय किती वर्षापासून पोलीस विभागात नोकरी करत होते या संदर्भात माहिती सारणी क्र. ४.२१ मध्ये दिसून येते. बहुतांश ६५.५ टक्के पोलीस कुटुंबिय व सामान्य नागरिक ५९ टक्के हे १ ते १० वर्षापासून नोकरी करतांना आढळून येतात. ३३.५ टक्के सामान्य नागरिक व ३२.४ टक्के पोलीस कुटूंबिय हे ११ ते २० वर्षापासून नोकरी करतांना आढळून येतात. ६.८ टक्के सामान्य नागरिक व २.१ टक्के पोलीस कुटूंबिय हे २१ ते ३० वर्षापासून नोकरी करतांना आढळून येतात. ०.७ टक्के सामान्य नागरिक हे ३१ ते निवृत्तीपर्यत नोकरी करतांना आढळून आले.

यावरुन असे लक्षात येते की, एक ते १० वर्षापासून पोलीस नोकरी करणाऱ्या शहीदांची संख्या इतरांच्या तुलनेत समर्पक रित्या ($P<0.05$) जास्त आहे.

सारणी क्र. ४.२२

पोलीस ऐवजी दुसरी नोकरी करावे असे वाटते काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	११९	४७.८	९७	३८.८	२.०७३	<०.०५
नाही	३९	१५.५	११२	४४.६		
माहीत नाही	९२	३६.७	४१	१६.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

पोलीस ऐवजी दुसरी नोकरी करावे असे वाटते काय? या प्रश्नांच्या उत्तरार्थ मिळालेल्या प्रतिक्रिया पुढील प्रमाणे आहेत. ४७.८ टक्के सामान्य नागरिक व ३८.८ टक्के पोलीस कुटूंबियांनी या संदर्भात होकारार्थी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. १५.५ टक्के सामान्य नागरिक व ४४.६ टक्के पोलीस कुटूंबियांनी या संदर्भात नकारार्थी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. तर ३६.७ टक्के सामान्य नागरिक व १६.६ टक्के पोलीस कुटूंबियांनी या संदर्भात माहीत नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

सारणी क्र. ४.२२ च्या अध्ययनावरुन हे स्पष्ट होते की, शहीद पोलीसाच्या कुटूंबियांतील सदस्यांचा कल पोलीस खात्या व्यतिरिक्त इतर नोकरी करण्याकडे नाही ($P<0.05$) तर सामान्य नागरिकांचा कल पोलीस खात्या व्यतिरिक्त इतर नोकरी करण्यात स्पष्टपणे ($P<0.05$) जास्त आहे.

सारणी क्र. ४.२३

नविन नोकरी विषयी कधी प्रयत्न केला काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	५०	२०.०	२२	९.०	३. २२७	<०.०५
नाही	९८	३९.३	१३५	५४.१		
माहीत नाही	८८	३५.२	७०	२७.९		
सांगता येत नाही	१४	५.५	२३	९.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.२३ सामान्य नागरिक आणि शहीद पोलीस कुटूंबियांच्या नविन नोकरी मिळविण्यासंबंधीच्या प्रयत्नांची माहिती प्रदान करते.

विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात दोन्ही समुहातील उत्तरदात्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया खालील प्रमाणे आहेत.

- दोन्ही समुहातील बहुसंख्य उत्तरदात्यांनी नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे. ही प्रतिक्रिया देणाऱ्या सामान्य नागरिक आणि पोलीस कुटूंबियांचे प्रतिशत प्रमाण अनुक्रमे ३९.३ टक्के आणि ५४.१ टक्के आहे.
- दोन्ही समुहातील जास्तीत–जास्त उत्तरदात्यांच्या मते त्यांनी नोकरीसाठी प्रयत्न केलेले नाही. त्यातही पोलीसांच्या कुटूंबियांच्या तुलनेत सामान्य नागरिकांची संख्या सार्थक रित्या (< ०.०५) कमी आहे.

सारणी क्र. ४.२४

पोलीस या नोकरीत समाधानी आहात काय?

	पोलीस	टक्केवारी
होय	२०७	८२.७
नाही	११	४.४
माहीत नाही	३२	१२.९
एकूण	२५०	१००.०

सारणी क्र. ४.२४ नुसार पोलीस विभाग काम करणारे आपल्या नोकरीत समाधानी आहेत हे स्पष्टपणे सिद्ध होते. वरील प्रश्नांच्या उत्तरार्थ पुढील प्रतिक्रिया मिळाली ८२.७ टक्के पोलीसांनी पोलीस या नोकरीत समाधानी असल्याचे व्यक्त केले आहे. ४.४ टक्के पोलीसांनी पोलीस या नोकरीत समाधानी नसल्याचे व्यक्त केले आहे. १२.९ टक्के पोलीसांनी माहीत नाही ही प्रतिक्रिया दिली आहे.

सारणी क्र. ४.२५

पोलीस व्यवसाय आवडण्याची कारणे

	पोलीस	टक्केवारी
वर्दी व अधिकार	५२	२०.७
वडील पोलीस असल्यामुळे	०५	२.२
कमाई खूप असते	०२	०.७
मर्यादीत शिक्षणामुळे	१९१	७६.४
एकूण	२५०	१००.०

वरील सारणीवरुन २०.७ टक्के पोलीसांना पोलीस व्यवसाय आवडण्याचे कारणे वर्दी व अधिकार आहे, २.२ टक्के पोलीसांना त्यांचे वडील पोलीस असल्यामुळे पोलीस व्यवसाय आवडतो. ०.७ टक्के पोलीसांना या व्यवसायात कमाई खूप असल्यामुळे हा व्यवसाय आवडतो. ७६.४ टक्के पोलीसांना मर्यादीत शिक्षण असल्यामुळे हा व्यवसाय आवडतो.

यावरुन असे लक्षात येते की, जास्तीत जास्त पोलीसांना मर्यादीत शिक्षणाची सुविधा असल्यामुळे पोलीस व्यवसाय आवडतो.

सारणी क्र. ४.२६

पोलीस नोकरी कशी प्राप्त झाली?

	पोलीस	टक्केवारी
शरीरयष्टी व गुणवत्ता	२१२	८४.९
पोलीसांचा मुलगा/मुलगी	०६	२.२
पोलीसांचा खबऱ्या	३२	१२.९
वशिलेबाजीमुळे	—	—
एकूण	२५०	१००.०

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, ८४.९ टक्के पोलीसांना शरीरयष्टी व गुणवत्तेमुळे पोलीस नोकरी प्राप्त झाली. २.२ टक्के पोलीसांना पोलीसांचे अपत्य असल्यामुळे ही नोकरी प्राप्त झाली. १२.९ टक्के पोलीसांना पोलीस खबऱ्या असल्यामुळे ही नोकरी प्राप्त झाली. वरील अध्ययनावरुन हे स्पष्ट होते की, जास्तीत जास्त पोलीसांना पोलीस ही नोकरी शरीरयष्टी व गुणवत्तेमुळे प्राप्त झाली.

सारणी क्र. ४.२७

पोलीस विभागात कोणत्या पदावर कार्यरत होते?

	पोलीस	टक्केवारी
पोलीस शिपाई	१८९	७५.५
जमादार	३९	१५.८
पोलीस उपनिरीक्षक	२०	७.९
पोलीस वरिष्ठ अधिकारी	०२	०.८
एकूण	२५०	१००.०

वरील सारणीत शहीद पोलीस, पोलीस विभागात कोणत्या पदावर कार्यरत होते. या आढावा घेण्यात आलेला आहे. ७५.५ टक्के पोलीस हे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होते. १५.८ टक्के पोलीस जमादार या पदावर कार्यरत आहेत. ७.९ टक्के पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत आहे. तर ०.८ टक्के पोलीस वरिष्ठ पोलीस अधिकारी होते. सारणी क्र. ४.२७ वरुन हे स्पष्ट होते की, शहीद होणाऱ्या पोलीसांमध्ये इतर पदाधिकाऱ्यांच्या तुलनेत पोलीस शिपाईंची संख्या महत्वपूर्णपणे अधिक आहे.

सारणी क्र. ४.२८

आपले कुटूंब पोलीसांना शासनाकडून मिळणाऱ्या वेतनावर समाधानी आहे काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१६९	६७.७	२२१	८८.४	५.५०६	<०.०५
नाही	११	४.४	१२	४.७		
सांगता येत नाही	१९	७.६	१०	३.९		
माहीत नाही	५१	२०.३	७	३.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.२८ मध्ये आपले कुटूंब पोलीसांना शासनाकडून मिळणाऱ्या वेतनावर समाधानी आहे काय? या प्रश्नाबद्दलच्या प्रतिक्रिया संकलीत केलेल्या आहे.

- वरील प्रश्नांच्या उत्तरार्धात बहुसंख्य उत्तरदात्यांनी होय ही प्रतिक्रिया नमूद केली असून प्रतिउत्तर देणाऱ्या सामान्य नागरीक आणि पोलीस कुटूंबियांचे प्रतिशत प्रमाण अनुक्रमे ६७.७ टक्के व ८८.४ टक्के आहे.
- दोन्ही समुहातील उत्तरदात्यांच्या मते जास्तीत–जास्त कुटूंबिय पोलीसांना शासनाकडून मिळणाऱ्या वेतनावर समाधानी आहेत. त्यातही सामान्य नागरीकांच्या तुलनेत पोलीस कुटूंबिय सार्थक रित्या (< ०.०५) अधिक समाधानी आहेत.

सारणी क्र. ४.२९

नक्षल क्षेत्रात पोलीस म्हणून रोज किती तास काम करीत होते?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
०८ तास	०२	०.६	०२	०.७	१.३२	NS
१६ तास	३१	१२.४	३०	१२.२		
२४ तास	२११	८४.५	२०९	८३.५		
२४ तासाच्या पुढे	०६	२.५	०९	३.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.२९ वरुन नक्षल क्षेत्रात कार्य करण्याच्या कालावधीबाबत पोलीस आणि सामान्य जनते दरम्यान कोणतेही प्रभावकारी तुलनात्मक निष्कर्ष समोर येत नाही. यावरुन हे सिद्ध होते की, नक्षल प्रभावी क्षेत्रात पोलीस आणि सामान्य नागरीक आपला समान दैनंदिन कालावधी व्यक्तीत करतात.

सारणी क्र. ४.३०

कुटूंबप्रमुख नक्षल क्षेत्रात किती काळ डयुटी करतो?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
१५ दिवस	०५	१.९	१६	६.३	२. १५६	<०.०५
१ महिना	५०	२०.०	४९	१९.६		
२ महिने	११६	४६.३	१७४	६९.६		
माहीत नाही	७९	३१.८	११	४.५		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.३० नुसार नक्षल प्रभावीत क्षेत्रात आपला सेवाकाळ घालवण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस आणि सामान्य नागरिकां दरम्यान तुलना करण्यात आलेली आहे. १.९ टक्के सामान्य नागरिक व ६.३ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांचे कुटूंब प्रमुख नक्षल क्षेत्रात १५ दिवसांचा सेवाकाळ व्यतीत करायचे. २० टक्के सामान्य नागरिक व १९.६ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांचे कुटूंब प्रमुख नक्षल क्षेत्रात १ महिन्यांचा सेवाकाळ व्यतीत करायचे. ४६.३ टक्के सामान्य नागरिक व ६९.६ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांचे कुटूंब प्रमुख नक्षल क्षेत्रात २ महिन्यांचा सेवाकाळ व्यतीत करायचे. ३१.८ टक्के सामान्य नागरिक व ४.५ टक्के पोलीस कुटूंबियं माहीत नाही असे दर्शवितात.

दोन्ही वर्गातील जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या मते त्यांचे कुटूंब प्रमुख दोन महिने नक्षल क्षेत्रात सेवाकाळ व्यतीत करायचे, त्यातही नक्षल प्रभावीत क्षेत्रात दोन महिने सेवाकाळा व्यक्तीत करण्यात सामान्य नागरिकांच्या तुलनेत पोलीसांची संख्या समर्पकरित्या ($P<0.05$) अधिक आहे.

सारणी क्र. ४.३१

अशावेळी एकटेपणा कसे व्यतीत करता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	२२७	९०.७	२३१	९२.७	०.४८४	NS
नाही	०८	३.१	१३	५.१		
सांगता येत नाही	—	—	०४	१.५		
माहीत नाही	१५	६.२	०२	०.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.३१ मध्ये कुटूंब प्रमुख नक्षल क्षेत्रात कामावर गेले असता त्यांचे कुटूंबिय आपला एकटेपणा कसे व्यतीत करतात. या संबंधीच्या प्रतिक्रिया नमूद करण्यात आलेल्या आहेत.

- प्रस्तुत प्रश्नांच्या उत्तरार्थ बहुसंख्य उत्तरदात्यांनी होय ही उत्तरे दिलेली असून सामान्य नागरीक व पोलीस कुटूंबिय यांचे प्रतिशत प्रमाण क्रमश: ९०.७ व ९२.७ टक्के आहे.
- होय ही प्रतिक्रिया देणाऱ्या दोन्ही समुहातील सदस्याच्या संख्ये दरम्यान कोणतेही सार्थक फरक नाही.

सारणी क्र. ४.३२

कुटूंबाला आधार म्हणून कुणाची मदत घेता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
मुलगा/मुलगी	२२	८.८	५६	२२.५	२.१३४	<०.०५
स्वत: कामे करतो	१५८	६३.१	२२१	४८.५		
सासु–सासरे	३९	१५.६	६४	२५.४		
सहकारी मित्र/शेजार	३१	१२.५	०९	३.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील प्रश्नांला मिळालेल्या प्रतिक्रिया पुढील प्रमाणे आहे. ८.८ टक्के सामान्य नागरिक व २२.५ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते कुटूंबाला आधार म्हणून ते आपल्या अपत्याची मदत घेतात. ६३.१ टक्के सामान्य नागरिक व ४८.५ टक्के पोलीस कुटूंबिय हे स्वत:ची मदत स्वत: करतात. १५.६ टक्के सामान्य नागरिक व २५.४ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते कुटूंबाला आधार म्हणून ते सासू–सासऱ्यांची मदत घेतात. १२.५ टक्के सामान्य नागरिक व ३.६ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते कुटूंबाला आधार म्हणून सहकारी मित्र व शेजाऱ्यांची मदत घेतात.

सारणी क्र. ४.३२ नुसार दोन्ही वर्गातील जास्तीत जास्त उत्तरदात्यांनी, इतर मदतीच्या स्त्रोतांच्या तुलनेत स्वत:ची मदत स्वत:च करतो ही प्रतिक्रिया दिली आहे. कुटूंबाला आधार म्हणून मदत घेण्याची पोलीस आणि सामान्य जनते दरम्यान तुलना केली असता. पोलीसांच्या तुलनेत सामान्य नागरिक स्वत:ची मदत स्वत: करण्यात प्रभावीपणे ($P<0.05$) जास्त आहे. तर सासू सासऱ्यांकडून मदत घेण्याची तुलना केली असता सासू सासऱ्यांकडून मदत घेण्यात पोलीसांच्या कुटूंबियांची संख्या सामान्य जनतेच्या तुलनेत स्पष्टपणे जास्त आहे.

सारणी क्र. ४.३३

नक्षल क्षेत्रातून डयुटीवरुन वापस आल्यावर त्यांचे वर्तन आपणासोबत कसे होते?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
प्रेमळपणाचे	११९	४७.५	१८६	७४.६	२.६७४	<०.०५
संशयाचे	३७	१५.०	२२	८.७		
रागाचे	४५	१८.१	३३	१३.०		
माहीत नाही	४९	१९.४	०९	३.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.३३ मध्ये नक्षल प्रभावी क्षेत्रात काम करुन आल्यावर कुटूंब प्रमुखांची प्रतिक्रिया परिवारा प्रती कशी असायची याचा आढावा घेण्यात आलेला आहे. ४७.५ टक्के सामान्य नागरिक व ७४.६ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षल प्रभावी क्षेत्रात काम करुन आल्यावर त्यांचे कुटूंब प्रमुख प्रेमळपणाचे वर्तन करायचे. १५ टक्के सामान्य नागरिक व ८.७ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षल प्रभावी क्षेत्रात काम करुन आल्यावर त्यांचे कुटूंब प्रमुख संशयाचे वर्तन करायचे. १८.१ टक्के सामान्य नागरिक व १३ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षल प्रभावी क्षेत्रात काम करुन आल्यावर त्यांचे कुटूंब प्रमुख रागाचे वर्तन करायचे. १९.४ टक्के सामान्य नागरिक व ३.७ टक्के पोलीस कुटूंबियांनी माहीत नाही ही प्रतिक्रिया दर्शविली आहे.

दोन्ही वर्गातील बहुतांश उत्तरदात्यांच्या मते नक्षल प्रभावी क्षेत्रात काम करुन आल्यावर कुटूंब प्रमुखाचे वर्तन कुटूंबाप्रती प्रेमळपणाचे असायचे हे स्पष्ट होते. त्यातही सामान्य नागरिकाच्या तुलनेत महत्वपूर्णपणे ($P<0.05$) अधिक पोलीस कुटूंब प्रमुखाचे वर्तन आपल्या कुटूंबाप्रती प्रेमळपणाचे होते.

सारणी क्र. ४.३४

आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करताना आपण कुठे होता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
सोबत	२२	८.८	४३	१७.३	२.३८४	<०.०५
स्वत:चे गावी	१९८	७९.४	१०६	४२.४		
क्वॉर्टर्समध्ये	१३	५.०	९७	३८.८		
नातेवाईकांकडे	१७	६.८	०४	१.५		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील प्रश्नांच्या उत्तरार्थ पुढील प्रतिक्रिया मिळाली ८.८ टक्के सामान्य नागरिक व १७.३ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ते कुटूंब प्रमुखा सोबतच राहायचे. ७९.४ टक्के सामान्य नागरिक व ४२.४ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ते स्वत:चे गावी राहायचे. ५ टक्के सामान्य नागरिक व ३८.८ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ते क्वॉर्टर्स मध्ये राहायचे. ६.८ टक्के सामान्य नागरिक व १.५ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ते नातेवाईकांकडे राहायचे.

दोन्ही वर्गातील जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या मते कुटूंब प्रमुख नक्षल क्षेत्रात काम करीत असतांना त्यांचे कुटूंबिय स्वत:चे गावी राहायचे. त्यातही सामान्य नागरिकांच्या तुलनेत पोलीस कुटूंबियांची संख्या स्पष्टपणे ($P<0.05$) अधिक आहे.

सारणी क्र. ४.३५


कुटूंबाचा प्रकार * आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करताना आपण कुठे होता?

कुटूंबाचा प्रकार		आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करताना आपण कुठे होता?				एकुण
		सोबत	स्वत:चे गावी	कॉटर्समध्ये	नातेवाईकांकडे	
संयुक्त कुटूंब	वरंवारीता	८	४५	१७	३	७३
	प्रतिशत	१२.९	१४.५	१६.७	१५.०	१४.७
	एकुण	१.६	९.१	३.४	०.६	१४.७
विभक्त कुटूंब	वारंवारीता	५४	२६६	८५	१७	४२२
	प्रतिशत	८७.१	८५.५	८३.३	८५.०	८५.३
	एकुण	१०.९	५३.७	१७.३	३.४	८४.३
एकुण	वारंवारीता	६२	३११	१०२	२०	४९५
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=0.779, P=0.993, df=6

वरील सारणी क्र. ४.३५ वरुन असे स्पष्ट होते की, ४९५ उत्तरदात्यापैकी क्रमश: विभक्त कुटूंबातील सर्वाधिक २६६ (५३.७ टक्के) व संयुक्त कुटूंबातील ४५ (९.१ टक्के) उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्य आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करत असतांना स्वत:चे गावी राहात होते. संयुक्त व विभक्त कुटूंबातील क्रमश: ८ (१.६ टक्के) व ५४ (१०.९ टक्के) कुटूंबातील सदस्य आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करत असतांना त्यांच्या सोबत राहात होते, तसेच अनुक्रमे १७ (३.४ टक्के) व ८५ (१७.३ टक्के) उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्य आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करत असतांना शासकीय पोलिस क्वारटर्स मध्ये राहात होते. संयुक्त व विभक्त कुटूंबातील कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करत असतांना नातेवाईकांकडे राहणाऱ्या कुटूंबियांची संख्या क्रमश: ३ (०.६ टक्के) व १७ (३.४ टक्के) होती.

वरील क्र. ४.३५ सारणीतील उत्तरदात्यांचा कुटूंब प्रकार (संयुक्त व विभक्त) व त्यांचे कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करत असतांना कुटूंबातील इतर सदस्यसांच्या वास्तव्याचे ठिकाण यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ०.७७९ हे ६ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १२.६ पेक्षा कमी असल्यामुळे कुटूंब प्रकार व त्यांचे कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करत असतांना कुटूंबातील इतर सदस्यसांच्या वास्तव्याचे ठिकाण या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.३ : आपले कुटूंबीय नक्षल क्षेत्रात काम करताना आपण कुठे होता?

सारणी क्र. ४.३६

आपले कुटूंब प्रमुख कुठे डयुटी करतात?

	पोलीस	**टक्केवारी**
पोलीस स्टेशन	१९३	७७.०
पोलीस मुख्यालय	०७	२.९
पोलीस सी. ६० फोर्स	५०	२०.१
माहीत नाही	—	—
	२५०	१००.०

सारणी क्र. ४.३६ मध्ये शहीद पोलीसांच्या कार्यक्षेत्राबद्दल माहीती घेण्यात आली आहे. प्राप्त माहीतीनुसार ७७ टक्के पोलीसांचे कार्यक्षेत्र पोलीस स्टेशन होते. २.९ टक्के पोलीसांच्या कार्यक्षेत्रात पोलीस मुख्यालय होते. तर २०.१ टक्के पोलीस, पोलीस सी. ६० फोर्स मध्ये कार्यरत होते.

यावरुन असे लक्षात येते की, जास्तीत जास्त शहीद पोलीसांचे कार्यक्षेत्र पोलीस स्टेशन होते.

सारणी क्र. ४.३७

नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन कसे असते?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
आनंदाचे	७९	३१.७	९६	३८.४	२.०३१	<०.०५
निराशेचे	११२	४४.७	८७	३४.८		
अधिकारी दबावामुळे	४२	१६.८	५८	२३.२		
माहीत नाही	१७	६.८	०९	३.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.३७ मध्ये कार्यक्षेत्रात कामावर जातांना कुटूंब प्रमुखाचे वर्तन कसे असते या सदंर्भात माहिती देण्यात आली आहे. ३१.७ टक्के सामान्य नागरिक व ३८.४ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते कुटूंब प्रमुखाचे वर्तन आनंदाचे असते. ४४.७ टक्के सामान्य नागरिक व ३४.८ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते कुटूंब प्रमुखाचे वर्तन निराशेचे असते. १६.८ टक्के सामान्य नागरिक व २३.२ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते कुटूंब प्रमुखाला अधिकाऱ्यांच्या दबावामुळे नक्षल प्रभावी क्षेत्रात कामाला जावे लागते. ६.८ टक्के सामान्य नागरिक व ३.६ टक्के पोलीस कुटूंबियांनी माहीत नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

सामान्य नागरिकांच्या तुलनेत पोलीस नक्षल क्षेत्रात कामावर जातांना स्पष्टपणे ($P<0.05$) अधिक आनंदी असतात तर पोलीसांच्या तुलनेत सामान्य नागरिक नक्षल क्षेत्रात कामावर जातांना महत्वपूर्णरित्या ($P<0.05$) अधिक निराश असतात.

सारणी क्र. ४.३८

लिंग * नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन कसे असते?


लिंग		नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन कसे असते?				एकुण
		आनंदाचे	निराशेचे	अधिकारी दबावामुळे	माहीत नाही	
स्त्री	वारंवारीता	१२२	१४०	७३	२५	३६०
	प्रतिशत	७७.७	७५.७	८३.०	१००.०	७९.१
	एकुण	२६.८	३०.८	१६.०	५.५	७९.१
पुरुष	वारंवारीता	३५	४५	१५	—	९५
	प्रतिशत	२२.३	२४.३	१७.०	—	२०.९
	एकुण	७.७	९.९	३.३	—	२०.९
एकुण	वारंवारीता	१५७	१८५	८८	२५	४५५
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=5.365, P=0.252, df=4

वरील सारणी क्र. ४.३८ वरुन असे स्पष्ट होते की, ४५५ उत्तरदात्यापैकी क्रमश: सर्वाधिक स्त्री १४० (३०.८ टक्के) व पुरुष ४५ (९.९ टक्के) उत्तरदात्यांच्या मते कुटूंब प्रमुख नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन निराशेचे असते अशी प्रतिक्रिया देतात. अधिकाधिक दबावामुळे नक्षल क्षेत्रात डयुटीवर जावे लागते ही प्रतिक्रिया देणारे स्त्री व पुरुषाची संख्या क्रमश: ७३ (१६.० टक्के) आणि १५ (३.३ टक्के) असून हे उत्तरदात्यांमधील सर्वाधिक कमी प्रमाण आहे. नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना कुटूंब प्रमुखाचे वर्तन आनंदाचे असते ही प्रतिक्रिया देणाऱ्या स्त्री व पुरुष उत्तरदात्यांची संख्या अनुक्रमे १२२ व ३५ असून त्यांचे प्रतिशत प्रमाण २६.८ टक्के व ७.७ टक्के आहे.

वरील क्र. ४.३८ सारणीतील उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री—पुरुष) व नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना कुटूंब प्रमुखाचे वर्तन यांच्यात Chi-square टेस्ट च्या

आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ५.३६५ हे ४ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य ९.४९ पेक्षा कमी असल्यामुळे उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री–पुरुष) व नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना कुटूंब प्रमुखाचे वर्तन या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.४ : नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना त्यांचे वर्तन कसे असते ?

सारणी क्र. ४.३९

रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर काय परिणाम होतो?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
बेचिन वाटते	७०	२८.०	१०८	४३.२		
भिती वाटते	६५	२६.१	६७	२६.६		
नोकरी सोडून द्यावे असे वाटते	११	४.३	३४	१३.७	२.३६२	<०.०५
सवय झाली आहे	१०४	४१.६	४१	१६.५		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत विविध परिमाणा जसे, बेचैनी वाटणे, भिती वाटणे, नोकरी सोडून द्यावीशी वाटणे सवय होवून जाणे इत्यादीद्वारे पोलीस आणि सामान्य नागरिकांच्या कुटूंबीयांच्या मनावर होणाऱ्या परिणामांचे आकलन करण्यात आलेले आहे. २८ टक्के सामान्य नागरीकांच्या तुलनेत ४३.२ टक्के पोलीस कुटुबिंयाच्या मते रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून त्यांना बेचैनी होते असे लक्षात येते. या घटना ऐकून दोन्ही वर्गाच्या कुटूंबियांना भिती वाटण्याचे प्रमाण जवळपास सारखेच आहे. (२६.१ टक्के व २६.६ टक्के अनुक्रमे) नोकरी सोडून द्यावी असा विचार करणारे पोलीस कुटूंबीय १३.७ टक्के आहेत तर सामान्य जनतेत हे प्रमाण ४.३ टक्के असल्याचे दिसून येते. सवय झाली आहे असे सांगणारे सामान्य नागरीक ४१.६ टक्के आहे तर पोलीस कुटूंबीयांमध्ये हे प्रमाण १६.५ टक्के आहे. या चार परिणामापैकी पहिल्या तीन परिमाणांचे आकडे दोन्ही वर्गाला ग्रासलेल्या चिंतेचे परिणाम आहे. तर शेवटचे परिणाम वारंवारीतेचे प्रदर्शक आहे.

सारणी क्र. ४.४०

अशावेळी कुटूंबीय डयुटीवर असल्यास काय करता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
पोलीस कंट्रोलला विचारतो	४५	१८.०	८६	३४.५	२.०६९	<०.०५
चिंता करतो	१५२	६०.९	१३७	५४.७		
शेजारी पोलीसांना विचारतो	१७	६.८	२०	७.९		
काहीच नाही	३६	१४.३	०७	२.९		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत पोलिस आणि नक्षली यांच्यात चकमक सुरू असतांना कुटूंबातील सदस्य सेवेवर असल्यास त्यांना सदस्याच्या परिस्थितीची माहिती कुठून मिळते याचे निरीक्षण करण्यात आले आहे. उपलब्ध परिणामांवरून असे लक्षात येते की, १८ टक्के सामान्य नागरीक आणि ३४.५ टक्के पोलीसांचे कुटूंबीय आपल्या कुटूंबातील सदस्याच्या परिस्थितीचा आढावा पोलिस कंट्रोलला विचारून घेतात. ६०.९ टक्के सामान्य नागरीक ५४.७ टक्के पोलिस कुटूंबीय कुठलीही चौकशी न करता चिंता करीत असतात. ६.८ टक्के सामान्य नागरीक आणि ७.९ टक्के पोलिस कुटूंबीय ही चौकशी आपल्या शेजारी पोलिसांना विचारून करतात, तर १४.३ सामान्य नागरीक आणि २.९ टक्के पोलिस कुटूंबीय काहीच करीत नाही.

वरील टक्केवारीचा विचार करता असे लक्षात येते की, जास्तीत जास्त पोलिस आणि सामान्य नागरीक कुटूंबियांना पोलिस–नक्षल चकमकीच्या वेळी संचार साधनांची उपलब्धता होऊ शकत नाही किंवा ते तसा प्रयत्न करीत नाही.

सारणी क्र. ४.४१

उत्तरदात्याचे वय * रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर काय परिणाम होतो?


उत्तरदात्याचे वय		रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर काय परिणाम होतो?				एकुण
		बेचैन वाटते	भिती वाटते	नौकरी सोडून द्यावे असे वाटते	सवय झाली आहे	
२० ते ३० वर्षे	वारंवारीता	३२	१८	१७	३५	१०२
	प्रतिशत	१८.३	१३.५	३९.५	२३.७	२०.५
	एकुण	६.४	३.६	३.४	७.०	२०.४
३१ ते ४० वर्षे	वारंवारीता	८८	५७	१५	६२	२२२
	प्रतिशत	५०.३	४२.९	३४.९	४१.९	४४.६
	एकुण	१७.७	११.५	३.०	१२.४	४४.६
४१ ते ५० वर्षे	वारंवारीता	२७	४७	८	३३	११५
	प्रतिशत	१५.४	३५.३	१८.६	२२.३	२३.१
	एकुण	५.४	९.४	१.६	६.७	२३.१
५१ च्या वर	वारंवारीता	२८	१०	३	१८	५९
	प्रतिशत	१६.०	७.५	७.०	१२.२	११.८
	प्रतिशत	५.६	२.०	०.६	३.६	११.८
एकुण	वारंवारीता	१७५	१३३	४३	१४८	४९८
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=19.550, P=0.021, df=9

वरील सारणी क्र. ४.४१ वरुन असे स्पष्ट होते की, ४९८ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ८८ (१७.७ टक्के), ३१ ते ४० वर्षे, वयोमर्यादा असलेले उत्तरदात्यांच्या मते त्यांना नक्षल व पोलीस चकमकीच्या घटना ऐकण्याची सवय झाली आहे. ४१ ते ५० वर्षे वयोमर्यादा असलेल्या सर्वाधिक ४७ (९.४ टक्के) उत्तरदात्यांनी नक्षल व पोलीस चकमकीच्या घटना ऐकून भिती वाटते. २० ते ३० वर्षे वयोगटातील उत्तरदात्यांपैकी रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून ३२ (६.४ टक्के) उत्तरदात्यांना बेचैनी वाटते, १८ (३.६ टक्के) उत्तरदात्यांना भिती वाटते, १७ (३.४ टक्के) उत्तरदात्यांना नोकरी सोडून द्यावीशी वाटते. तर सर्वाधिक २१ (७ टक्के) उत्तरदात्यांना या घटनांची

सवय झाली आहे असे प्रतिक्रिया नोंदवितात. ३१ ते ४० वर्षे, वयोमर्यादा असलेल्या उर्वरीत उत्तरदात्यांपैकी ५७ (११.५ टक्के) उत्तरदात्यांना भिती वाटते, ६२ (१२.४ टक्के) उत्तरदात्यांना सवय झालेली आहे अशी प्रतिक्रिया नोंदवितात तर सर्वाधिक कमी १५ (३ टक्के) उत्तरदात्यांना रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून नोकरी सोडून द्यावीशी वाटते. तसेच ४१ ते ५० वर्षे वयोमर्यादा असलेल्या उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक कमी ८ (१.६ टक्के) उत्तरदात्यांना नोकरी सोडून द्यावीशी वाटते. ५१ च्या वर वय असलेल्या सर्वाधिक २८ (५.६ टक्के) उत्तरदात्यांना बेचैनी वाटत असून सर्वाधिक कमी ३ (०.६ टक्के) उत्तरदात्यांना नोकरी सोडून द्यावीशी वाटते.

वरील क्र. ४.४१ सारणीतील उत्तरदात्यांचे वय व रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर होणारा परिणाम यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार सार्थक **(P<0.05)** संबंध आहे. कारण, प्राप्त Chi-square मूल्य १९.५५० हे ९ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १६.९ पेक्षा जास्त असल्यामुळे उत्तरदात्याचे वय व रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर होणारा परिणाम या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.५ : रोजच्या पोलीस चकमकीच्या घटना ऐकून मनावर काय परिणाम होतो?

सारणी क्र. ४.४२

गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? हे खरे आहे काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	२४७	९८.८	२४१	९६.४	१.३२१	NS
नाही	०३	१.२	०९	३.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? ही आख्यायिका खरी आहे किंवा खोटी आहे हे वरील तालिकेवरून पडताळण्यात आले आहे. या संदर्भात ९८.८ टक्के सामान्य नागरिक आणि ९६.४ टक्के पोलिस यांनी होकारार्थी उत्तरे दिलेली आहेत. तर १.२ टक्के सामान्य नागरिक आणि ३.६ टक्के पोलिस यांनी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे. यावरून असे लक्षात येते की, वरील आख्यायिका स्पष्टपणे खरी आहे.

सारणी क्र. ४.४३

लिंग * गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? हे खरे आहे काय?


लिंग		गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? हे खरे आहे काय?		एकुण
		होय	नाही	
स्त्री	वारंवारीता	३८५	५	३९०
	प्रतिशत	७९.१	४२.९	७८.३
	एकुण	७७.३	१.०	७८.३
पुरुष	वारंवारीता	१०२	६	१०८
	प्रतिशत	२०.९	५७.१	२१.७
	एकुण	२०.४	१.३	२१.७
एकुण	वारंवारीता	४८७	११	४९८
	एकुण	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square =5.218, P=0.022, df=1

वरील सारणी क्र. ४.४३ वरुन असे स्पष्ट होते की, ४९८ उत्तरदात्यापैकी क्रमश: सर्वाधिक स्त्री ३८५ (७७.३ टक्के) व पुरुष १०२ (२०.४ टक्के) उत्तरदात्यांच्या मते कुटूंब प्रमुख नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात, हे खरे आहे. सर्वाधिक कमी ५ (१ टक्के) स्त्री व ६ (१.३ टक्के) पुरुष उत्तरदाते वरील वक्तव्य खरे नाही ही प्रतिक्रिया नोंदवितात.

वरील क्र. ४.४३ सारणीतील उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री–पुरुष) व नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात हे वक्तव्य यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार सार्थक

(P<0.05) संबंध आहे कारण, प्राप्त Chi-square मूल्य ५.२१८ हे १ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य ३.८४ पेक्षा जास्त असल्यामुळे उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री–पुरुष) व नक्षल क्षेत्रात डयुटीवर जाताना गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात हे वक्तव्य या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.६ : गडचिरोली पोलीस पत्नीचे कुंकू पुसून डयुटीवर जातात? हे खरे आहे काय?

सारणी क्र. ४.४४

अशावेळी आपणास मदत कोणाची घेता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
पोलीस	६५	२५.९	९३	३७.०	२.३७५	<०.०५
शेजार	३७	१४.६	१७	७.१		
कुटूंबीय	१३४	५३.८	१३६	५४.३		
कोणीच नाही	१४	५.७	०४	१.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत पोलीस–नक्षल चकमकीत शहीद झाल्यास सामान्य नागरीक आणि पोलिस कुटूंबातील सदस्यांना मदतीच्या स्त्रोताची शक्यता तपासण्यात आलेली आहे. उपलब्ध माहितीवरून असे निदर्शनास येते की, २५.९ टक्के सामान्य नागरीक आणि ३७ टक्के पोलीस कुटूंबियांना पोलीस विभागाने मदत केलेली आहे. १४.६ टक्के सामान्य नागरीक आणि ७.१ टक्के पोलीस कुटूंबियांना शेजाऱ्यांनी मदत केलेली आहे. ५३.८ टक्के सामान्य नागरीक आणि ५४.३ टक्के पोलीस कुटूंबियांना नातेवाईकांनी मदत केलेली आहे तसेच ५.७ टक्के सामान्य नागरीक आणि १.६ टक्के पोलीस कुटूंबियांना कोणीही मदत केलेली नाही.

वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, बहुतांश सामान्य नागरीक आणि पोलिसांना त्यांच्या कुटूंबियांनीच मदतीचा हात दिलेला आहे. इतर मदतीच्या स्त्रोतांपासून कमीत कमी मदत मिळालेली आहे.

आर्थिक प्रश्न

सारणी क्र. ४.४५

शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	२१२	८४.८	२४८	९९.३	२.३३२	<०.०५
नाही	३८	१५.२	०२	०.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय? या प्रश्नाच्या उत्तरादाखल करण्यात आलेल्या पडताळणीचे परीणाम खालीलप्रमाणे आहेत. ८४.८ टक्के सामान्य नागरीक आणि ९९.३ टक्के पोलिस कुटूंबियांनी या प्रश्नाला होकारार्थी उत्तर दिलेले आहे, तर १५.२ टक्के सामान्य नागरीक आणि .७ टक्के पोलिस कुटूंबियांनी या प्रश्नाला नकारार्थी उत्तर दिलेले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, या बाबतीत शासन जागरूक असून सामान्य नागरीक आणि पोलिस कुटूंबियांना शासनाची तात्काळ मदत वेळेवर मिळत आहे.

सारणी क्र. ४.४६

कुटूंबाचा प्रकार * शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय?


कुटूंबाचा प्रकार		शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय?		एकुण
		होय	नाही	
संयुक्त कुटूंब	वारंवारीता	५८	१४	७२
	प्रतिशत	१३.२	३२.०	१४.८
	एकुण	१२.०	२.७	१४.८
विभक्त कुटूंब	वारंवारीता	३८५	२८	४१३
	प्रतिशत	८६.९	६८.०	८५.२
	एकुण	७९.३	५.८	८५.२
एकुण	वारंवारीता	४४३	४२	४८५
	एकुण	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square= 6.503, P=0.039, df=2

वरील सारणी क्र. ४.४६ वरुन असे स्पष्ट होते की, ४८५ उत्तरदात्यापैकी क्रमश: विभक्त कुटूंबातील सर्वाधिक ३८५ (७९.३ टक्के) व संयुक्त कुटूंबातील ५८ (१२ टक्के) उत्तरदाते शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली असे नमूद करतात. संयुक्त व विभक्त कुटूंबातील क्रमश: १४ (२.७ टक्के) व २८ (५.८ टक्के) उत्तरदात्यांना शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली नाही.

वरील क्र. ४.४६ सारणीतील उत्तरदात्यांचा कुटूंब प्रकार (संयुक्त व विभक्त) व शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार सार्थक **(P<0.05)** संबंध आहे. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ६.५०३ हे २ स्वातंत्र्यांश वर Chi

square तालीका मूल्य ५.९९ पेक्षा जास्त असल्यामुळे कुटूंब प्रकार व शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.७ : शहीदांच्या अंत्यसंस्कारासाठी शासनाची तात्काळ मदत मिळाली काय?

सारणी क्र. ४.४७

पोलीस कल्याणद्वारे मदत मिळाली काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१७२	६८.६	२२५	८९.९	२.३६२	<०.०५
नाही	७८	३१.४	२५	१०.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

पोलीस कल्याणद्वारे मदत मिळाली काय? हे पडताळण्यासाठी करण्यात आलेले सर्वेक्षणाला ६८.६ टक्के सामान्य नागरीक आणि ८९.९ टक्के पोलीस कुटूंबियांनी होकारार्थी उत्तरे दर्शविलेली आहे. तर ३१.४ टक्के सामान्य नागरीक आणि १०.१ टक्के पोलीस कुटूंबियांनी नकारार्थी उत्तरे दर्शविलेली आहे. या वरून स्पष्टपणे असे निदर्शनास येते की, दोन्ही वर्गातील जास्तीत जास्त कुटूंबियांनी पोलिसा कल्याणाद्वारे मदत मिळालेली आहे.

सारणी क्र. ४.४८

पोलीस कल्याणद्वारे कोणत्या सुविधा मिळतात?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
तात्काळ मदत	१३४	५३.५	११०	४३.९	२.०७२	<०.०५
गटविमा	२५	१०.१	१२३	४९.६		
सुरक्षा	१३	५.०	०२	०.७		
कोणताही नाही	७८	३१.४	१५	५.८		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत शहीदांच्या कुटूंबियांना पोलिस कल्याणाद्वारे मिळणाऱ्या सुविधांची पडताळणी करण्यात आलेली आहे. यात खालील सुविधा नमुद करण्यात आलेल्या आहेत.

जसे – तात्काळ मदत, गटविमा आणि सुरक्षा इत्यादी.

सर्वेक्षणाअंती पुढील परिणाम निदर्शनास आलेले आहे. ५३.५ टक्के सामान्य नागरीक आणि ४३.९ टक्के पोलीस कुटूंबियांना तात्काळ मदत देण्यात आलेली आहे. १०.१ टक्के सामान्य नागरीक आणि ४९.६ टक्के पोलीस कुटूंबियांचा गटविमा करून देण्यात आलेला आहे. ५.० टक्के सामान्य नागरीक आणि .७ टक्के पोलीस कुटूंबियांना सुरक्षा देण्यात आलेली आहे.

यावरून असे निदर्शनास येते की, जास्तीत जास्त पोलीस कुटूंबियांना पोलिस कल्याणाद्वारे मिळणाऱ्या सुविधांचा लाभ झाला आहे. फक्त ६८.६ टक्के सामान्य नागरीकांना या सुविधांचा लाभ झाला आहे. तर इतर सामान्य नागरीकांना या लाभापासून वंचित राहावे लागले आहे.

सारणी क्र. ४.४९

शहीदांना सरकार तात्पुरती मदत करतो त्यानंतर अधिकारी लक्ष देत नाही हे खरे आहे काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	२०	८.१	७०	२७.९	२.६५१	<०.०५
नाही	२०	८.१	२२	९.०		
सांगता येत नाही	४२	१६.८	४५	१८.०		
माहीत नाही	८४	३३.६	४८	१८.९		
खरे	८१	३२.२	५३	२१.३		
कधी कधी	०३	१.२	०४	१.६		
नेहमी	—	—	०८	३.३		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

शहीदांना सरकार तात्पुरती मदत करतो त्यानंतर अधिकारी लक्ष देत नाही हे खरे आहे काय? या प्रश्नाच्या उत्तरादाखल करण्यात आलेल्या पाहणीतून पुढील माहिती प्राप्त झाली. ४०.३ टक्के सामान्य नागरीक तर ४९.२ टक्के पोलिस कुटूंबियांनी वरील प्रश्नाला होकारार्थी उत्तर दिलेले आहे. ८.१ टक्के सामान्य नागरीक तर १२.३ टक्के पोलिस कुटूंबियांनी वरील प्रश्नाला नकारार्थी उत्तर दिलेले आहे. ५१.७ टक्के सामान्य नागरीक तर ३८.५ टक्के पोलिस कुटूंबियांनी वरील प्रश्नाला निश्चित उत्तर दिलेले आहे. वरील माहितीवरून शासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबद्दल कोणतीही निश्चित माहिती प्राप्त होत नाही.

सारणी क्र. ४.५०

शहीद कुटूंबीयांना शासन कोणती मदत देते?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
सान्तवन करते	१२६	५०.३	४४	१७.६	२.५३७	<०.०५
नोकरीची हमी देते	१०५	४२.०	१७६	७०.४		
पतीचा पूर्ण पगार देते	०२	०.७	२८	११.१		
कोणतेही नाही	१७	७.०	०२	०.९		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीवरून शासन दोन्ही वर्गातील शहीदांच्या कुटूंबांना कोण कोणत्या प्रकारची मदत देते यांचा आढावा घेण्यात आला आहे. ५०.३ टक्के सामान्य नागरीक आणि १७.६ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते शासन सान्तवना देते तर ४२.० टक्के सामान्य नागरीक आणि ७०.४ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते शासन नोकरीची हमी देते. तसेच ०.७ टक्के सामान्य नागरीक आणि ११.१ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते पतीचा पूर्ण पगार देते तर तसेच ७.० टक्के सामान्य नागरीक आणि ०.९ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते कोणतीही मदत नाही.

वरील सर्वेक्षणावरून असे स्पष्टपणे निदर्शनास येते की, बहुतांश सामाजिक नागरीकांच्या मते शासन शहीदांचे फक्त सान्तवन करते तर बहुतांश पोलीस कुटूंबियांच्या मते शासन नोकरीची हमी देते.

सारणी क्र. ४.५१

उत्तरदात्याचे वय * शहीद कुटूंबीयांना शासन कोणती मदत देते?


उत्तरदात्याचे वय		शहीद कुटूंबीयांना शासन कोणती मदत देते?				एकुण
		सांत्वन करते	नोकरीची हमी देते	पतीचा पूर्ण पगार देते	कोणतेही नाही	
२० ते ३० वर्षे	वारंवारीता	३०	५०	५	३	८८
	प्रतिशत	१८.६	२१.१	२३.१	१६.७	२०.१
	एकुण	६.८	११.४	१.१	०.८	२०.१
३१ ते ४० वर्षे	वारंवारीता	६८	१०८	१०	९	१९५
	प्रतिशत	४२.३	४५.८	४६.२	४१.७	४४.३
	एकुण	१५.५	२४.६	२.३	१.९	४४.३
४१ ते ५० वर्षे	वारंवारीता	४०	५०	७	८	१०५
	प्रतिशत	२४.७	२१.१	३०.८	४१.७	२३.९
	एकुण	९.१	११.४	१.५	१.९	२३.९
५१ च्या वर	वारंवारीता	२४	२८	०	०	५२
	प्रतिशत	१४.४	१२.०	०	०	११.७
	एकुण	५.३	६.४	०	०	११.७
एकुण	वारंवारीता	१६२	२३६	२२	२०	४४०
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=6.377, P=0.702, df=9

वरील सारणी क्र. ४.५१ वरुन असे स्पष्ट होते की, ४४० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक १०८ (२४.६ टक्के), ३१ ते ४० वर्षे, वयोमर्यादा असलेले उत्तरदात्यांच्या मते त्यांना शहीद कुटूंबीयांना शासन नोकरीची हमी देते. सर्वाधिक कमी संख्या ३ (०.८ टक्के) शहीद कुटूंबीयांना शासन कोणतीही मदत देत नाही ही प्रतिक्रिया देणाऱ्याची असून हे उत्तरदाते २० ते ३० वर्षे वयोगटातील आहेत. ३१ ते ४० वर्षे, वयोमर्यादा असलेल्या उर्वरीत

उत्तरदात्यांपैकी ६८ (१५.५ टक्के) उत्तरदात्यांच्या मते शासन शहीद कुटूंबीयांचे सात्वंन करते. तसेच १० (२.३ टक्के) उत्तरदात्यांच्या मते शहीद कुटूंबियांच्या परिवाराला शासन पतीचा पुर्ण पगार देते.

वरील क्र. ४.५१ सारणीतील उत्तरदात्यांचे वय व शासनाकडून शहीद कुटूंबियांना दिली जाणारी मदत यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणतेही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ६.३७७ हे ९ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १६.९ पेक्षा कमी असल्यामुळे उत्तरदात्याचे वय व शासनाकडून शहीद कुटूंबियांना दिली जाणारी मदत या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.८ : शहीद कुटूंबीयांना शासन कोणती मदत देते?

सारणी क्र. ४.५२

सामान्य नागरीक म्हणून किती वर्षापासून या गावात आहात?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
जन्मापासून	२०६	८२.६	८५	३४.१	२.७६५	<०.०५
१० वर्षापासून	३०	११.८	१२०	४७.८		
१५ वर्षापासून	११	४.३	४०	१५.९		
माहीत नाही	०३	१.३	०५	२.२		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत शहीदांच्या कुटूंबियांच्या वास्तव्य काळाचा आढावा घेण्यात आलेला आहे. सर्वेक्षणाअंती पुढील परीणाम प्राप्त झालेले आहेत.

८२.६ टक्के सामान्य नागरीक आणि ३४.१ टक्के पोलिस कुटूंबिय जन्म: अध्ययन क्षेत्रात वास्तव्यास आहे. तर ११.८ टक्के सामान्य नागरीक आणि ४७.८ टक्के पोलिस कुटूंबिय १० वर्षापासून अध्ययन क्षेत्रात वास्तव्यास आहे तसेच ४.३ टक्के सामान्य नागरीक आणि १५.९ टक्के पोलिस कुटूंबिय १५ वर्षापासून अध्ययन क्षेत्रात वास्तव्यास आहे. तर १.३ सामान्य नागरीक आणि २.२ टक्के पोलिस कुटूंबियांना आपण किती वर्षापासून अध्ययन क्षेत्रात वास्तव्यास आहे हे माहित नाही.

यावरुन असे लक्षात येते की, नक्षल ग्रस्त क्षेत्रात शहीद झालेल्या जास्तीत–जास्त नागरिकांचे कुटूंब मोठया कालावधीपासून अध्ययन क्षेत्रात वास्तव्यास आहे. पोलिस विभागातील शहीद झालेल्या जवानांची कुटूंबियांचे वास्तव्य १० वर्षापासून या कालावधीत जास्त प्रमाणात दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे पोलीस विभागातील वारंवार स्थानांतरण होय. यावरुन असेही लक्षात येते की, मोठया कालावधीपासून नक्षल क्षेत्रात राहणाऱ्या जास्तीत–जास्त नागरिकांना नक्षली कार्यवाहीची झळ पोहचली आहे.

सारणी क्र. ४.५३

आपल्या गाव व परीसरात नक्षल घटना घडतात काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	२५०	१००.०	२४२	९७.०	१.२१४	NS
नाही	—	—	०८	३.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

NS: Not Significant (महत्वपूर्ण तफावत नाही)

आपल्या गाव व परिसरात नक्षल घटना घडतात काय? या प्रश्नांचे उत्तरार्थ १०० टक्के सामान्य नागरिकांनी होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. आणि ९७ टक्के पोलिस कुटूंबियांनी पण होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील प्रत्येक गावात कधी—ना—कधी तरी नक्षल घटना घडल्या आहे.

सारणी क्र. ४.५४

असल्यास कशा प्रकारच्या?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
जाळपोळ करणे/वाहतूक अडविणे	९२	३६.६	४७	१८.७	२.७३२	<०.०५
पोलीस चकमक	१०४	४१.६	१४५	५८.२		
लोकांचा छळ करणे	५२	२१.१	४७	१८.७		
माहीत नाही	०२	०.७	११	४.४		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत नक्षल वाद्यांकडून घडविण्यात आलेल्या घटनांचा आढावा घेण्यात आलेला आहे. यात ३६.६ टक्के सामान्य नागरिक आणि १८.७ टक्के पोलीस कुटूंबियांनी जाळपोळ व वाहतूक अडविणे या घटनांचा उल्लेख केलेला आहे, ४१.६ टक्के सामान्य नागरिक आणि ५८.२ टक्के पोलीस कुटूंबियांनी पोलीस चकमकीचा उल्लेख केलेला आहे, २१.१ टक्के आणि १८.७ टक्के पोलीस कुटूंबियांनी लोकांना झालेल्या छळाचा उल्लेख केलेला आहे.

वरील आकडे लक्षात घेता असे निदर्शनास येते की, नक्षल वाद्यांनी बहुतांशी हिसांचाराची मदत घेवून आपले वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सारणी क्र. ४.५५

अशा घटनांना पाहून आपणास काय वाटते?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
घर सोडून जाणे	१०२	४०.९	३७	१४.८	२.५५३	<०.०५
त्रास सहन करणे	११८	४७.२	१६०	६३.९		
माहीत नाही	११	४.४	१२	४.९		
कुटूंबाची सुरक्षा करणे	१९	७.५	४१	१६.४		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

अशा घटनांना पाहून आपणास काय वाटते? या प्रश्नांचे उत्तरार्थ करण्यात आलेल्या पडताळणीत पुढील परिणाम निदर्शनास आलेले आहे. ४०.९ टक्के सामान्य नागरिक आणि १४.८ टक्के पोलीस कुटूंबियांना या घटना ऐकून घर सोडून जावेसे वाटते. ४७.२ टक्के सामान्य नागरिक आणि ६३.९ टक्के पोलीस कुटूंबियांना त्रास सहन करावा असे वाटते. ७.५ टक्के सामान्य नागरिकांना आणि १६.४ टक्के पोलीस कुटूंबियांना कुटूंबाची सुरक्षा करावी असे वाटते. तर ४.४ टक्के आणि ४.९ टक्के पोलीस कुटूंबियांनी माहीत नाही ही प्रतिक्रिया दिली.

बहुतांश पोलीस कुटूंबियांच्या प्रतिक्रिया त्रास सहन करुन घेण्याकडे आहे. सामान्य नागरिकांच्या मिश्रीत प्रतिक्रिया आहेत. यात ४०.९ टक्के नागरिकांना घर सोडून जावे अशी प्रतिक्रिया दिलेली आहेत तर ४७.२ टक्के नागरिकांनी त्रास सहन करावा ही प्रतिक्रिया दिलेली आहे. कुटूंबाची सुरक्षा करावी ही प्रतिक्रिया देणाऱ्या एकूण उत्तरदात्यांपैकी पोलिस कुटूंबियांची संख्या स्पष्टपणे जास्ती आहे.

गृहीतकृत्य परीक्षण :—

- प्रस्तुत अध्ययनात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणावरून प्राप्त परीणामांवरून नक्षलवाद्यांचा प्रभाव शहीद पोलीसांच्या कुटूंबावर भितीयुक्त पडतो आहे या गृहीतकृत्याचा स्वीकार करण्यात येतो.

सारणी क्र. ४.५६

उत्तरदात्याचे वय * परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून आपणास काय वाटते ?


उत्तरदात्याचे वय		परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून आपणास काय वाटते ?				एकुण
		घर सोडून जाणे	त्रास सहन करणे	माहीत नाही	कुटूंबाची सुरक्षा करणे	
२० ते ३० वर्षे	वारंवारीता	२७	४७	१०	११	९५
	प्रतिशत	१९.३	१८.४	४६.२	२१.९	२०.४
	एकुण	५.७	१०.०	२.१	२.५	२०.४
३१ ते ४० वर्षे	वारंवारीता	६३	१०९	१०	२५	२०७
	प्रतिशत	४५.८	४२.८	४६.२	४६.९	४४.३
	एकुण	१३.६	२३.२	२.१	५.४	४४.३
४१ ते ५० वर्षे	वारंवारीता	३२	६५	२	८	१०७
	प्रतिशत	२२.९	२५.७	७.७	१५.६	२२.९
	एकुण	६.८	१३.९	०.४	१.८	२२.९
५१ च्या वर	वारंवारीता	१७	३३	०	८	५८
	प्रतिशत	१२.०	१३.२	०	१५.६	१२.५
	एकुण	३.६	७.१	०	१.८	१२.५
एकुण	वारंवारीता	१३९	२५४	२२	५२	४६७
	एकुण	१००.०	१००.०	१०००	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=9.297, P=0.410, df=9

वरील सारणी क्र. ४.५६ वरुन असे स्पष्ट होते की, ४६७ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक १०९ (२३.२ टक्के) ३१ ते ४० वर्षे व ६५ (१३.९ टक्के) ४१ ते ५० वर्षे वयोमर्यादा असलेले उत्तरदात्यांच्या मते त्यांना परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून त्रास होतो. २० ते ३० वर्षे वयोगटातील उत्तरदात्यांपैकी परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून ४७ (१० टक्के) उत्तरदात्यांना त्रास होतो. २७ (५.७ टक्के) उत्तरदात्यांना घर सोडून जावे असे वाटते, ११ (२.५ टक्के) उत्तरदात्यांना कुटूंबाची सुरक्षा करावी असे वाटते. तर सर्वाधिक कमी १० (२.१ टक्के) उत्तरदात्यांनी माहीत नाही ही प्रतिक्रिया नोंदवितात. ३१ ते ४० वर्षे, वयोमर्यादा असलेल्या उर्वरीत उत्तरदात्यांपैकी ६३

(१३.६ टक्के) उत्तरदात्यांना घर सोडून जावे असे वाटते, २५ (५.४ टक्के) उत्तरदात्यांना कुटूंबाची सुरक्षा करावी असे वाटते. तसेच ४१ ते ५० वर्षे वयोमर्यादा असलेल्या उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक कमी ३२ (६.८ टक्के) उत्तरदात्यांना घर सोडून जावे असे वाटते. ५१च्या वर वय असलेल्या सर्वाधिक ३३ (७.१ टक्के) उत्तरदात्यांना त्रास होतो, तर ८ (१.८ टक्के) उत्तरदात्यांना कुटूंबाची सुरक्षा करावी असे वाटते.

वरील क्र. ४.५६ सारणीतील उत्तरदात्यांचे वय व परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून होणारा परिणाम यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ९.२९७ हे ९ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १६.९ पेक्षा कमी असल्यामुळे उत्तरदात्याचे वय व परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून होणारा परिणाम या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.९ : परीसरात नक्षलघटना घडतांना पाहून आपणास काय वाटते ?

सारणी क्र. ४.५७

पोलीस आप्तेष्ठ किंवा कुटूंबीय असल्याने नक्षल्याकडून त्रास होतो काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१४१	५६.३	९३	३७.२	२.३२६	<०.०५
नाही	९६	३८.५	९९	३९.७		
माहीत नाही	०५	२.२	१७	६.६		
कधी कधी	०८	३.०	४१	१६.५		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत पोलीस आप्तेष्ठ किंवा कुटूंबियांना नक्षल्याकडून होणाऱ्या त्रासाचा आढावा देण्यात आलेला आहे. या प्रश्नांच्या उत्तरादाखत पुढील परिणाम निदर्शनास आले. ५६.३ टक्के सामान्य नागरिक व ३७.२ टक्के पोलीस कुटूंबियांनी होकारार्थी उत्तरे दर्शविलेली आहे. ३८.५ टक्के सामान्य नागरिक व ३९.७ टक्के पोलिस कुटूंबियांनी नकारार्थी उत्तरे दर्शविलेली आहे. २.२ टक्के सामान्य नागरिक व ६.६ टक्के पोलिस कुटूबियांनी माहित नाही अशी प्रतिक्रिया नोंदविली आहे. ३ टक्के सामान्य नागरिक व १६.५ टक्के पोलिस कुटूंबियांनी कधी कधी त्रास होतो असे दर्शविलेले आहे.

वरील पडताळणी वरुन असे निदर्शनास येते की, जास्तीत–जास्त सामान्य नागरिकांच्या मते पोलिस आप्तेष्ठ आणि कुटूंबिय असल्याने नक्षलवाद्यांकडून त्रास होतो तर पोलिस कुटूंबियांची या बाबतीत मिश्रीत प्रतिक्रिया प्राप्त होते. कमीत–कमी सामान्य नागरिकांच्या मते कधी कधी त्रास होतो ही प्रतिक्रिया प्राप्त झालेली आहे. तर कमीत–कमी पोलिस कुटूंबियांनी या बाबतीत माहीत नाही ही प्रतिक्रिया दर्शविली आहे.

सारणी क्र. ४.५८

आपणास नक्षल दलम किंवा संगमच्या सभेसाठी जावे लागले काय? व कसे?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१४१	५६.३	३५	१३.९	२.७३५	<०.०५
नाही	७९	३१.७	१९१	७६.६		
माहीत नाही	१८	७.८	०६	२.२		
खरे	०४	१.४	१२	५.१		
कधी कधी	०४	१.४	०२	०.७		
नेहमी	०४	१.४	०४	१.५		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत नक्षल वाद्यांच्या दलम किंवा संगमच्या सभेसाठी नागरिक किंवा पोलीसांना जावे लागले आहे काय हयांचा आढावा देण्यात आलेला आहे. ५६.३ टक्के सामान्य नागरिक १३.९ टक्के पोलीस कुटूंबियांनी हया प्रश्नांची उत्तरार्थ होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. ३१.७ टक्के सामान्य नागरिक आणि ७६.६ टक्के पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे. ७.८ टक्के सामान्य नागरिक व २.२ टक्के पोलिस कुटूंबियांनी माहीत नाही असे उत्तर नोंदविलेले आहे. १.४ टक्के सामान्य नागरिक व ५.१ टक्के पोलिस कुटूंबियांनी दलम किंवा संगमच्या सभेला जावे लागते हे खरे आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे. १.४ टक्के सामान्य नागरिक व ०.७ टक्के पोलिस कुटूंबियांनी दलम किंवा संगमच्या सभेला कधी कधी जावे लागते ही प्रतिक्रिया दिली आहे. १.४ टक्के सामान्य नागरिक व १.५ टक्के पोलिस कुटूंबियांनी दलम किंवा संगमच्या सभेला नेहमी जावे लागते ही प्रतिक्रिया दिली आहे.

जास्तीत–जास्त सामान्य नागरिकांनी या प्रश्नाला होकारार्थी उत्तर दिले आहे तर जास्तीत–जास्त पोलिस कुटूंबियांनी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे यावरुन असे लक्षात येते की, जास्तीत–जास्त सामान्य नागरिक दलम किंवा संगमच्या वारंवार सान्निध्यात येतात.

सारणी क्र. ४.५९


उत्तरदात्याचे वय * आपणास नक्षल दलम किंवा संमगच्या सभेसाठी जावे लागले काय? व कसे?

उत्तरदात्याचे वय		आपणास नक्षल दलम किंवा संमगच्या सभेसाठी जावे लागले काय? व कसे?				एकुण
		होय	नाही	सांगता येत नाही	माहीत नाही	
२० ते ३० वर्षे	वारंवारीता	३३	४३	४	८	८८
	प्रतिशत	१८.५	१७.४	६६.७	२७.८	१९.१
	एकुण	७.२	९.४	०.७	१.८	१९.१
३१ ते ४० वर्षे	वारंवारीता	७७	११७	२	१७	२१३
	प्रतिशत	४२.६	४७.०	३३.३	६१.१	४६.०
	एकुण	१४.४	२५.२	०.४	४.०	४६.०
४१ ते ५० वर्षे	वारंवारीता	४७	५८	०	२	१०७
	प्रतिशत	२५.९	२३.५	०	५.६	२३.०
	एकुण	९.४	१२.६	०	०.४	२३.०
५१ च्या वर	वारंवारीता	२३	३०	०	२	५५
	प्रतिशत	१३	१२.१	०	५.६	११.९
	एकुण	४.७	६.५	०	०.४	११.९
एकुण	वारंवारीता	१८०	२४८	६	२९	४६३
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=19.751, P=0.347, df=18

वरील सारणी क्र. ४.५९ वरुन असे स्पष्ट होते की, ४६३ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ११७ (२५.२ टक्के), ४३ (९.४ टक्के), ५८ (१२.६ टक्के) व ३० (६.५ टक्के) क्रमश: ३१ ते ४० वर्षे, २० ते ३० वर्षे, ४१ ते ५० वर्षे व ५१ च्या वर वयोमर्यादा असलेल्या उत्तरदात्यांनी त्यांना नक्षल दलम किंवा संमगच्या सभेसाठी जावे लागले नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे, तर सर्वाधिक कमी २ (५.६ टक्के) उत्तरदात्यांनी त्यांना याबद्दल माहित नाही ही प्रतिक्रीया व्यक्त केली आहे.

वरील क्र. ४.५९ सारणीतील उत्तरदात्यांचे वय व नक्षल दलम किंवा संमगच्या सभे मध्ये त्यांची उपस्थिती यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य १९.७५१ हे १८ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य २८.९ पेक्षा कमी असल्यामुळे उत्तरदात्याचे वय व नक्षल दलम किंवा संमगच्या सभे मध्ये त्यांची उपस्थिती या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.१० : आपणास नक्षल दलम किंवा संमगच्या सभेसाठी जावे लागले काय? व कसे?

सारणी क्र. ४.६०

गावातील अज्ञान व्यक्तीच्या (चुगलीचा) काही त्रास होतो काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१९५	७८.१	१७७	७०.५	१.२१६	NS
नाही	५५	२१.९	७३	२९.५		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

गावातील अज्ञान व्यक्तीच्या चुगलीचा त्रास होतो काय? या प्रश्नांच्या उत्तरार्थ ७८.१ टक्के सामान्य नागरिक व ७०.५ टक्के पोलीस कुटूंबियांनी होकारार्थी उत्तरे दर्शविलेली आहे. तर २१.९ टक्के सामान्य नागरिक व २९.५ टरक्के पोलीस कुटूंबियांनी नकारार्थी उत्तरे दर्शविलेली आहे.

दोन्ही वर्गातील जास्तीत–जास्त उत्तरदात्यांनी या प्रश्नाला होकारार्थी उत्तरे दिली आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, एखाद्या व्यक्तींची चुकीमुळे बहुतेक जणांना त्रास होतो.

सारणी क्र. ४.६१

असल्यास कोणता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
धमकी	३३	१३.०	२९	११.५		
मारझोड सहन करणे	१२३	४९.१	११९	४७.५		
स्त्रीयांना छळणे	४३	१७.४	३२	१२.९	१.३१४	NS
कोणताही नाही	५१	२०.५	७०	२८.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

गावातील अज्ञान व्यक्तीच्या चुकीमुळे सर्वसामान्य कसा त्रास होतो याबद्दलच्या प्रतिक्रिया वरील सारणी क्र. ४.६१ मध्ये नोंदविण्यात आल्या आहे. १३ टक्के सामान्य नागरिक आणि ११.५ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षलवाद्यांकडून धमकी दिली जाते ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. ४९.१ टक्के सामान्य नागरिक व ४७.५ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांना मारझोड सहन करावी लागते ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली. १७.४ टक्के सामान्य नागरिक व १२.९ टक्के पोलीस कुटूंबियांनी नक्षलवादी स्त्रीयांना छळतात ही प्रतिक्रिया नोंदविली आहे. २०.५ टक्के सामान्य नागरिक व २८.१ टक्के पोलिस कुंटूबियांना कोणताही त्रास होत नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांनी नक्षल वाद्यांकडून मारझोड सहन करावी लागते ही प्रतिक्रिया जास्तीत–जास्त संख्येनी नोंदविली आहे. दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांनी नक्षलवादी धमकी देतात ही प्रतिक्रिया कमीत–कमी संख्येने नोंदविली आहे. यावरुन असे लक्षात येते की, एखाद्या अज्ञान व्यक्तीच्या चुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांना नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराला बळी पडावे लागते.

सारणी क्र. ४.६२

परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१६५	६५.८	१०५	४२.०	२.६७५	<०.०५
नाही	८५	३४.२	१४५	५८.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

या प्रश्नांला मिळालेल्या उत्तरात ६५.८ टक्के सामान्य नागरिक व ४२ टक्के पोलीस कुटूंबियांनी होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. तर ३४.२ टक्के सामान्य नागरिक व ५८ टक्के पोलीस कुटूंबियांनी नकारार्थी उत्तर दिलेली आहे. वरील आकडयांच्या अध्ययनावरुन असे निदर्शनास येते की, जास्तीत–जास्त सामान्य नागरिकांच्या मतानुसार त्यांना पोलीसांकडून त्रास होतो तर जास्तीत–जास्त पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांना परिसरातील पोलीसाकडून त्रास होत नाही.

सारणी क्र. ४.६३

असल्यास कोणता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
नक्षलसमर्थक म्हणून	३४	१३.७	११	४.३	२.५८२	<०.०५
नक्षल मिटींगला गेला म्हणून	६८	२७.३	२९	११.६		
गुप्त माहिती सांगा म्हणून	६४	२५.५	५६	२२.५		
कोणताही नाही	८४	३३.५	१५४	६१.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

परिसरातील पोलीसाकडून कसल्या प्रकारचा त्रास दिल्या जातो याबद्दलच्या प्रतिक्रिया वरील सारणी क्र. ४.६३ मध्ये नोंदविण्यात आलेल्या आहे. १३.७ टक्के सामान्य नागरिक आणि ४.३ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षलसमर्थक म्हणून त्रास दिला जातो ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. २७.३ टक्के सामान्य नागरिक व ११.६ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षल मिटींगला गेला म्हणून त्रास सहन करावी लागते ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली. २५.५ टक्के सामान्य नागरिक व २२.५ टक्के पोलीस कुटूंबियांनी गुप्त माहिती मिळविण्यासाठी त्रास देण्यात येतो ही प्रतिक्रिया नोंदविली आहे. ३३.५ टक्के सामान्य नागरिक व ६१.६ टक्के पोलिस कुंटूबियांना कोणताही त्रास दिल्या जात नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

जास्तीत–जास्त संख्येने पोलीस कुटूंबियांतील उत्तरदात्यांनी कोणताही त्रास दिला जात नाही ही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तर सामान्य नागरिकांच्या प्रतिक्रिया या मिश्रीत स्वरुपाच्या आहे. त्यातही पोलीसांकडून कोणताही त्रास होत नाही ही प्रतिक्रिया देणाऱ्या सामान्य नागरिकांची संख्या जास्त आहे. तर पोलीसाकडून नक्षल समर्थक म्हणून त्रास दिला जातो ही प्रतिक्रिया देणाऱ्या दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांची संख्या सगळयात कमी आहे.

सारणी क्र. ४.६४

इतर कोणत्या अधिकाऱ्याचा त्रास होतो?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
वनअधिकारी	५३	२१.१	०४	१.५	२.५४७	<०.०५
सावकार/ठेकेदार	७९	३१.७	२३	९.५		
तलाठी/ग्रामसेवक	२३	९.३	०६	२.२		
कोणत्याही नाही	९५	३७.९	२१७	८६.८		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

इतर कोणत्या अधिकाऱ्याचा त्रास होतो काय? याबद्दलच्या प्रतिक्रिया वरील सारणी क्र. ४.६४ मध्ये नोंदविण्यात आलेल्या आहे. २१.१ टक्के सामान्य नागरिक आणि १.५ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांना वनाधिकाऱ्यांकडून त्रास दिला जातो ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. ३१.७ टक्के सामान्य नागरिक व ९.५ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते सावकार व ठेकेदाराकडून त्रास दिला जातो ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली. ९.३ टक्के सामान्य नागरिक व २.२ टक्के पोलीस कुटूंबियांना तलाठी व ग्रामसेवकाकडून त्रास देण्यात येतो ही प्रतिक्रिया नोंदविली आहे. ३७.९ टक्के सामान्य नागरिक व ८६.८ टक्के पोलिस कुंटूबियांना कोणीही त्रास देत नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

जास्तीत–जास्त संख्येने पोलीस कुटूंबियांतील उत्तरदात्यांनी कोणीही त्रास देत नाही ही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तर सामान्य नागरिकांनीही जास्तीत–जास्त संख्येने त्यांना कोणीच त्रास देत नाही ही प्रतिक्रिया नोंदिवली आहे. सांगता येत नाही ही प्रतिक्रिया देणाऱ्या दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांची संख्या सगळयात कमी आहे.

सारणी क्र. ४.६५


उत्तरदात्याचे वय * परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो काय?

उत्तरदात्याचे वय		परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो काय?		एकुण
		होय	नाही	
२० ते ३० वर्षे	वारंवारीता	५०	५२	१०२
	प्रतिशत	१९.०	२२.७	२०.५
	एकुण	१०.४	१०.१	२०.५
३१ ते ४० वर्षे	वारंवारीता	१२८	९२	२२०
	प्रतिशत	४७.२	४१.०	४४.३
	एकुण	२५.८	१८.४	४४.३
४१ ते ५० वर्षे	वारंवारीता	६५	५०	११५
	प्रतिशत	२३.८	२२.७	२३.२
	एकुण	१३.१	१०.१	२३.२
५१ च्या वर	वारंवारीता	२८	३२	६०
	प्रतिशत	१०.४	१४.२	१२.१
	एकुण	५.७	६.३	१२.१
एकुण	वारंवारीता	२७१	२२६	४९७
	एकुण	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=8.388, P=0.496, df=9

वरील सारणी क्र. ४.६५ वरुन असे स्पष्ट होते की, ४९७ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक १२८ (२५.८ टक्के), ५० (१०.४ टक्के) व ६५ (१३.१ टक्के) क्रमश: ३१ ते ४० वर्षे, २० ते ३० वर्षे व ४१ ते ५० वर्षे वयोमर्यादा असलेल्या उत्तरदात्यांनी त्यांना परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो ही प्रतिक्रिया नोंदविली आहे, तर ५१ च्या वर वय असलेल्या सर्वाधिक ३२ (६.३ टक्के) उत्तरदात्यांनी परीसरातील पोलीसांकडून त्रास होत नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे,

वरील क्र. ४.६५ सारणीतील उत्तरदात्यांचे वय व परीसरातील पोलीसांकडून होणारा त्रास यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ८.३३८ हे ९ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १६.९ पेक्षा कमी असल्यामुळे उत्तरदात्याचे वय व परीसरातील पोलीसांकडून होणारा त्रास या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.११ : परीसरातील पोलीसांकडून त्रास होतो काय?

सारणी क्र. ४.६६

पोलीस/अधिकारी व नक्षल यांच्या कैचित सापडलो असे आपणास वाटते काय? ते सांगा.

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	११०	४४.२	६०	२४.०		
नाही	१३	५.१	३९	१५.५		
सांगता येत नाही	१६	६.५	२५	१०.१		
माहीत नाही	०९	३.६	१५	६.२	२.३२७	<०.०५
खरे	६०	२३.९	४१	१६.३		
कधी कधी	०८	२.९	१६	६.२		
नेहमी	३४	१३.८	५४	२१.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबिय पोलीस/अधिकारी व नक्षल यांच्या कैचित सापडलो आहे काय? हयांचा आढावा घेण्यात आलेला आहे. ४४.२ टक्के सामान्य नागरिक २४ टक्के पोलीस कुटूंबियांनी हया प्रश्नांची उत्तरार्थ होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. ५.१ टक्के सामान्य नागरिक आणि १५.५ टक्के पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे. ६.५ टक्के सामान्य नागरिक आणि १०.१ टक्के पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थी सांगता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. ३.६ टक्के सामान्य नागरिक व ६.२ टक्के पोलिस कुटूंबियांनी माहीत नाही असे उत्तर नोंदविलेले आहे. २३.९ टक्के सामान्य नागरिक व १६.३ टक्के पोलिस कुटूंबियांना पोलीस/अधिकारी व नक्षल यांच्या कैचित सापडलो आहे हे खरे आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे. २.९ टक्के सामान्य नागरिक व ६.२ टक्के पोलिस कुटूंबियांना पोलीस/अधिकारी व नक्षल यांच्या कैचित सापडलो आहे असे कधी कधी वाटते ही प्रतिक्रिया दिली आहे. १३.८ टक्के सामान्य नागरिक व २१.७

टक्के पोलिस कुटूंबियांना पोलीस/अधिकारी व नक्षल यांच्या कैचित सापडलो आहे असे नेहमी वाटते ही प्रतिक्रिया दिली आहे.

दोन्ही वर्गातील जास्तीत–जास्त उत्तरदात्यांनी हया प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी उत्तर दिलेले आहेत. यावरुन असे लक्षात येते की, सर्वसामान्य नागरिक व पोलीस कुटुंबियांना सुद्धा पोलीस व शासकीय अधिकाऱ्यांचा त्रास सहन करावा लागतो. व नक्षल वाद्यांची भिती बाळगावी लागते या पद्धतीने त्यांना आपण पोलीस अधिकारी व नक्षलांच्या कैचीत सापडलो आहे असे त्यांना वाटते.

सारणी क्र. ४.६७

आपल्या परीसरात नक्षल्यांकडून हत्या झाल्याचे ऐकले आहे काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	२४४	९७.५	२३९	९५.७	१.२५३	NS
नाही	०६	२.५	११	४.३		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

या प्रश्नांला मिळालेल्या उत्तरात ९७.५ टक्के सामान्य नागरिक व ९५.७ टक्के पोलीस कुटूंबियांनी होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. २.५ टक्के सामान्य जनता व तर ४.३ टक्के पोलीस कुटूंबियांनी नकारार्थी उत्तर दिलेली आहे.

वरील आकडयांच्या अध्ययनावरुन असे निदर्शनास येते की, जास्तीत–जास्त सामान्य नागरिक आणि पोलिस कुटूंबियांनुसार त्यांच्या परिसरात नक्षलवादयांकडून हत्या झाल्याचे त्यांनी ऐकले आहे.यावरून असे स्पष्ट होते की, अध्ययन क्षेत्रात नक्षलवादयांकडून कुणाची ना कुणाची हत्या होणे ही नित्य नेमाची बाब झालेली आहे.

सारणी क्र. ४.६८

असल्यास कोणती?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
पोलीस पाटील	५५	२२.०	०४	१.४	२.३१७	<०.०५
पोलीस	१३	५.०	१५२	६०.९		
सामान्य नागरीक/पोलीस खबऱ्या	१८२	७३.०	८७	३४.८		
माहीत नाही	—	—	०७	२.९		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

आपल्या परिसरात नक्षलवादयांकडून कुणाची हत्या झाली याची माहिती घेण्याच्या उद्देशाने विचारलेल्या प्रश्नाला पुढील उत्तरे नोंदविलेली आहे. २२ टक्के सामान्य नागरीक व १.४ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते त्यांनी पोलिस पाटलाची हत्या झाली असे ऐकले. ५ टक्के सामान्य नागरीक व ६०.९ टक्के पोलिस कुटूंबियांनी पोलिसाची हत्या झाली असे ऐकले आहे. ७३.० टक्के सामान्य नागरीक व ३४.८ टक्के पोलिस कुटूंबियांनी सामान्य नागरीक किंवा पोलिस खबऱ्या यांची हत्या झाली असे ऐकले. २.९ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते त्यांना याबद्दल माहीत नाही असे उत्तर नोंदविण्यात आले.

वरील आकडयांच्या अध्ययनावरून जास्तीत जास्त सामान्य नागरीकांच्या मते नक्षलवादयांनी सामान्य नागरीक किंवा पोलिस खबऱ्याची हत्या केल्याचे निदर्शनास येते. तर जास्तीत जास्त पोलिसांच्या मते नक्षलवादयांनी पोलिसाची हत्या केल्याचे निदर्शनास येते. यावरून पोलिस व सामान्य नागरीक हया दोनही वर्गांना नक्षलवादयांकडून जवळपास सारखीच जीवहानी सहन करावी लागली आहे असे लक्षात येते.

सारणी क्र. ४.६९

अशावेळी आपण पिडीतांना कसे मदत करता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
पोलीसांना निरोप देणे	१४६	५८.४	११६	४६.३	२.०३२	<०.०५
गांव एकत्रित येवून	६०	२४.२	५७	२२.८		
फक्त नातेवाईक	४४	१७.४	६२	२५.०		
माहीत नाही	—	—	१५	५.९		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील तालिकेत दोनही वर्गातील लोक पिडीतांना कशा प्रकारे मदत करतात याचा आढावा घेण्यात आलेला आहे. ५८.४ टक्के सामान्य नागरीक व ४६.३ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते ते पोलिसांना निरोप देवून पिडीतांची मदत करतात. तर २४.२ टक्के सामान्य नागरीक व २२.८ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते गावातील सर्व लोक एकत्र येवून पिडीतांना मदत करतात. १७.४ टक्के सामान्य नागरीक व २५.० टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते फक्त पिडीतांचे नातेवाईकच त्यांना मदत करतात. तर ५.९ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते त्यांना याबद्दल माहीत नाही हे उत्तर मिळाले.

वरील आकडयांच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की, दोनही वर्गातील जास्तीत जास्त उत्तरदाते पोलिसांना निरोप देवून पिडीतांची मदत करतात.

सारणी क्र. ४.७०

अशावेळी शासनाकडून काही मदत मिळते काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
तात्काळ पोलीस मदत	१०४	४१.६	११०	४४.१	१.२१२	NS
पैशाची मदत	१३७	५४.७	११४	४५.६		
नोकरीची संधी	०१	०.६	१६	६.६		
कोणतेही नाही	०८	३.१	१०	३.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोनही वर्गातील पिडीतांना शासनाची मदत कशा प्रकारे मिळते याचा आढावा घेण्यात आलेला आहे. ४१.६ टक्के सामान्य नागरीक व ४४.१ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते शासन तात्काळ पोलिस मदत देते तर ५४.७ टक्के सामान्य नागरीक व ४५.६ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते शासन त्यांना पैशाची मदत करते. ०.६ टक्के सामान्य नागरीक व ६.६ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते शासन त्यांना नोकरीची संधी देते तर ३.१ टक्के सामान्य नागरीक व ३.७ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मते शासन त्यांना कोणतीच मदत देत नाही.

वरील आकडयांच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की, दोनही वर्गातील जास्तीत जास्त सामान्य नागरीकांच्या मते त्यांना शासनाकडून पैशाची मदत मिळते तर पोलिस कुटूंबियांच्या मते त्यांना शासनाकडून तात्काळ पोलिस मदत व पैशाची मदत मिळते या बद्दल मिश्रित प्रतिक्रिय देण्यात आलेले आहे. कमीत कमी सामान्य नागरीकांच्या मते शासन त्यांना नोकरीची संधी देते तर कमीत कमी पोलिस कुटूंबियांच्या मते शासन त्यांना कोणतीच मदत देत नाही.

गृहीतकृत्य परीक्षण :–

- प्रस्तुत अध्ययनात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणावरून प्राप्त परीणामांवरून नक्षलग्रस्त पिडीत कुटूंबावर उपासमारीची समस्या जाणवतेया गृहीतकृत्याचा अस्वीकार करण्यात येतो.

सारणी क्र. ४.७१

नक्षल क्षेत्रात राहणाऱ्या लोकांची जिव सुरक्षित नाही या मताशी सहमत आहे काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१८६	७४.२	१९२	७७.०	०.५२१	NS
नाही	२८	११.५	३४	१३.५		
सांगता येत नाही	०२	०.७	—	—		
माहीत नाही	०२	०.७	—	—		
खरे	३०	१२.२	२४	९.५		
नेहमी	०२	०.७	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.७१ मध्ये नक्षल क्षेत्रात राहणाऱ्या लोकांची जिव सुरक्षित नाही या मताशी सहमत आहे काय? या प्रश्नासंबंधी उत्तरदात्यांकडून आलेल्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत.

- बहुसंख्य उत्तरदाते नक्षल क्षेत्रात राहणाऱ्या लोकांची जिव सुरक्षित नाही या मताशी सहमत आहेत. प्रस्तुत प्रश्नांशी सहमत असणाऱ्या सामान्य नागरीक आणि पोलीस कुटूंबियांचे प्रतिशत प्रमाण क्रमश: ७४.२ टक्के व ७७ टक्के एवढे आहे.
- दोन्ही समुहातील प्रश्नांशी सहमत असणाऱ्या सदस्यांपैकी पोलीस कुटूंबियांची संख्या सामान्य नागरिकांच्या संख्येपेक्षा अधिक असून दोघांमध्ये कोणताही सार्थक फरक आढळत नाही.

गृहीतकृत्य परीक्षण :—

- प्रस्तुत अध्ययनात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणावरून प्राप्त परीणामांवरून नक्षल कारवाहीमुळे सामान्य नागरिकांचे जीवन असुरक्षित आहे या गृहीतकृत्याचा स्वीकार करण्यात येतो.

सारणी क्र. ४.७२

शासन स्तरावर मदतीसाठी प्रयत्न केला काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१५३	६१.२	१५९	६३.७	०.४६२	NS
नाही	८८	३५.४	८०	३१.८		
माहीत नाही	०२	०.७	०७	३.०		
खरे	०५	२.०	—	—		
कधी कधी	०२	०.७	—	—		
सांगता येत नाही	—	—	०४	१.५		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.७२ मध्ये शासन स्तरावर मदतीसाठी प्रयत्न केला काय? या प्रश्नासंबंधी उत्तरदात्यांकडून आलेल्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत.

- प्रस्तुत प्रश्नांच्या उत्तरार्थ बहुसंख्य उत्तरदात्यांनी होकारार्थी प्रतिक्रिया दर्शविलेल्या असून, होकारार्थी प्रतिक्रिया देणाऱ्या सामान्य नागरीक आणि पोलीस कुटूंबियांचे प्रतिशत प्रमाण क्रमश: ६१.२ व ६३.७ टक्के एवढे आहे.
- प्रस्तुत प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी प्रतिक्रिया दर्शविणाऱ्या सामान्य नागरिकांच्या तुलनेत पोलीस कुटूंबियांची संख्या अधिक असून त्यांच्या दरम्यान कोणताही सार्थक फरक आढळत नाही.

सारणी क्र. ४.७३

सरकारने आपणासाठी काही उपाय योजना करावी असे वाटते काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
गावाचे पुर्नवसन करणे	१३०	५२.२	१३४	५३.६	१.१२४	NS
संपूर्ण कुटूंबाचा विमा काढणे	७६	३०.४	९३	३७.०		
बंदुकांना परवानगी देणे	०८	३.१	०९	३.६		
पोलीस मदत देणे	३६	१४.३	१४	५.८		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

शासनाने पिडीतांसाठी काही उपाय योजना करावी असे वाटते काय? या प्रश्नाचे उत्तरार्थ खालील परिणाम समोर आलेले आहे. ५२.२ टक्के सामान्य नागरीक व ५३.६ टक्के पोलिस कुटूंबियांकडून सरकारने गावाचे पुर्नवसन करावे ही प्रतिक्रिया देण्यात आली. ३०.४ टक्के सामान्य नागरीक व ३७.० टक्के पोलिस कुटूंबियांकडून सरकारने संपूर्ण कुटूंबाचा विमा काढवा ही प्रतिक्रिया देण्यात आली. ३.१ टक्के सामान्य नागरीक व ३.६ टक्के पोलिस कुटूंबियांकडून सरकारने बंदुका वापरण्याची परवानगी दयावी ही प्रतिक्रिया व्यक्त केली. १४.३ टक्के सामान्य नागरीक व ५.८ टक्के पोलिस कुटूंबियांकडून सरकारने पोलीस मदत दयावी ही प्रतिक्रिया व्यक्त केली.

वरील दोन्ही वर्गातील जास्तीत जास्त उत्तरदात्यांच्या मते सरकारने गावाचे पुर्नवसन करावे अशी इच्छा व्यक्त केली आहे तर कमीत कमी उत्तरदात्यांनी मते सरकारने बंदुका वापरण्याची परवागनी दयावी ही प्रतिक्रिया व्यक्त केली.

सारणी क्र. ४.७४

नक्षल्याद्वारे कोणते अत्याचार होतात?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
धमकी देणे	२६	१०.६	२७	१०.७		
स्त्रीयांची अभ्रु लूटणे	८०	३१.९	५५	२२.०		
मारझोड करणे/कत्तल करणे	१४३	५६.९	१५१	६०.७	१.२३१	NS
माहीत नाही	०१	०.६	१७	६.८		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

नक्षलवादयांमुळे सर्वसामान्य कसा त्रास होतो याबद्दलच्या प्रतिक्रिया वरील सारणी क्र. ४.७४ मध्ये नोंदविण्यात आल्या आहे. १०.६ टक्के सामान्य नागरिक आणि १०.७ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षलवाद्यांकडून धमकी दिली जाते ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. ५६.९ टक्के सामान्य नागरिक व ६०.७ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांना मारझोड सहन करावी लागते ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली. ३१.९ टक्के सामान्य नागरिक व २२.० टक्के पोलिस कुटूंबियांनी नक्षलवादी स्त्रीयांना छळतात ही प्रतिक्रिया नोंदविली आहे. ०.६ टक्के सामान्य नागरिक व ६.८ टक्के पोलिस कुंटूबियांनी माहीत नाही असे उत्तर नोंदविले आहे तर ०.८ टक्के पोलीस कुटूंबियांनी सांगता येत नाही असे उत्तर नोंदविले आहे.

दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांनी नक्षल वाद्यांकडून मारझोड सहन करावी लागते ही प्रतिक्रिया जास्तीत–जास्त संख्येनी नोंदविली आहे. सामान्य नागरीकांनी माहिती नाही तर पिडीत पोलिस कुंटूबियांनी सांगता येत नाही ही प्रतिक्रिया कमीत–कमी संख्येने नोंदविली आहे. यावरुन असे लक्षात येते की, सर्वसामान्य नागरिकांना वारंवार नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराला बळी पडावे लागते.

सारणी क्र. ४.७५

नक्षल समर्थक ठरवून पोलीस अत्याचार कोणता होतो?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
मानसिक त्रास देणे	६८	२७.३	५१	२०.४	२.०४७	<०.०५
पोलीस कस्टडीत ठेवणे	२३	९.३	०८	२.९		
स्त्रीयांचे लैंगिक शोषण करणे	३०	११.८	०९	३.७		
कोणत्याही नाही	१२९	५१.६	१८२	७३.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

नक्षल समर्थक ठरवून पोलिसांकडून कसल्या प्रकारचा त्रास दिल्या जातो याबद्दलच्या प्रतिक्रिया वरील सारणी क्र. ४.७५ मध्ये नोंदविण्यात आलेल्या आहे. २७.३ टक्के सामान्य नागरिक आणि २०.४ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षलसमर्थक म्हणून मानसिक त्रास दिला जातो ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. ९.३ टक्के सामान्य नागरिक व २.९ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षलसमर्थक म्हणून पोलीस कस्टडीत ठेवले जाते. ११.८ टक्के सामान्य नागरिक व ३.७ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते नक्षलसमर्थक ठरवून स्त्रियांना त्रास दिल्या जातो ही प्रतिक्रिया नोंदविली आहे. ५१.६ टक्के सामान्य नागरिक व ३.६ टक्के पोलिस कुंटूबियांच्या मते कोणत्याही प्रकारचा अत्याचार केल्या जात नाही ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

जास्तीत–जास्त संख्येने दोनही वर्गातील उत्तरदात्यांनी कोणताही त्रास दिला जात नाही ही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तर कमीत कमी संख्येने दोनही वर्गातील उत्तरदात्यांनी नक्षलसमर्थक ठरवून पोलिस कस्टडीत ठेवतात ही प्रतिक्रिया व्यक्त केली. यावरून असे लक्षात येते की दोनही वर्गातील कमीत कमी सदस्य पोलिस अत्याचाराला बळी पडले आहे.

सारणी क्र. ४.७६

लोकप्रतिनिधी विषयी आदर वाटतो काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१११	४४.४	१५६	६२.३	२.२६२	<०.०५
नाही	१३९	५५.६	९४	३७.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

४४.४ टक्के सामान्य नागरिक आणि ६२.३ टक्के पोलिस यांनी होकारार्थी उत्तरे दिलेली आहेत तर ५५.६ टक्के सामान्य नागरिक आणि ३७.७ टक्के पोलिस यांनी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे. बहुतांश सामान्य नागरिकांना लोकप्रतिनिधी विषयी आदर वाटत नाही तर पोलीस कुटूंबियांना आदर वाटतो. यावरून असे लक्षात येते की, बहुतांश सामान्य नागरिकांना लोकप्रतिनिधींबद्दल तिटकारा वाटतो.

सारणी क्र. ४.७७

असल्यास का व कसे?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
निवडणूकी पुरती येतात	३२	१२.६	३१	१२.२	१.२२६	NS
लोकहितांचे काम होत नाही	७७	३०.८	८२	३२.८		
निवडणूकी नंतर भेटी देत नाही	३०	११.९	४४	१७.६		
कोणतीही मदत मिळत नाही	१११	४४.७	९३	३७.४		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

लोकप्रतिनिधी विषयी आदर वाटतो काय? नसल्यास का व कसे? याबद्दलच्या प्रतिक्रिया वरील सारणी क्र. ४.७७ मध्ये नोंदविण्यात आलेल्या आहे. १२.६ टक्के सामान्य नागरिक आणि १२.२ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते लोकप्रतिनिधी निवडणूकी पुरती येतात म्हणून त्यांचा आदर वाटत नाही ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. ३०.८ टक्के सामान्य नागरिक व ३२.८ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते लोकहितांचे काम होत नाही म्हणून त्यांचा आदर वाटत नाही ही प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे. ११.९ टक्के सामान्य नागरिक व १७.६ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते निवडणूकी नंतर भेटी देत नाही तर ४४.७ टक्के सामान्य नागरिक व ३७.४ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते त्यांच्याकडून कोणतीही मदत मिळत नाही म्हणून त्यांचा आदर वाटत नाही अशाप्रकारच्या प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे.

जास्तीत–जास्त संख्येने दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांनी लोकप्रतिनिधींकडून कोणतीही मदत मिळत नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तर कमीत कमी संख्येने दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांनी लोकप्रतिनिधी निवडणूकी पुरती येतात किंवा निवडणूकी नंतर भेटी देत नाही अशाप्रकारच्या प्रतिक्रिया नोंदविण्यात आली आहे.

वरील प्रतिक्रियेवरून असे लक्षात येते की, दोनही उत्तरदात्यांना आपल्या क्षेत्रातील लोकप्रतिनिधी कोणत्याही अपेक्षा नाही आणि असल्यास पुर्ण होत नाही.

सारणी क्र. ४.७८

नक्षल्यांना गावबंदी करावे असे वाटते काय व कसे?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	७६	३०.४	१०६	४२.३	२.०१४	<०.०५
नाही	६०	२३.९	५८	२३.५		
सांगता येत नाही	५७	२२.८	५०	२०.०		
माहीत नाही	३०	१२.०	१८	७.१		
नेहमी	२७	१०.९	१८	७.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांना नक्षल्यांना गावबंदी करावी असे वाटते काय व कसे? याबद्दलच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या. ३०.४ टक्के सामान्य नागरिक ४२.३ टक्के पोलीस कुटूंबियांनी हया प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. २३.९ टक्के सामान्य नागरिक आणि २३.५ टक्के पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे. २२.८ टक्के सामान्य नागरिक आणि २०.० टक्के पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थी सांगता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. १२.० टक्के सामान्य नागरिक व ७.१ टक्के पोलिस कुटूंबियांनी माहीत नाही असे उत्तर नोंदविलेले आहे. १०.९ टक्के सामान्य नागरिक व ७.१ टक्के पोलिस कुटूंबियांनी नक्षलवादयांना नेहमीसाठी गावबंदी करावी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

दोन्ही वर्गातील जास्तीत–जास्त उत्तरदात्यांनी हया प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी उत्तर दिलेले आहेत. यावरुन असे लक्षात येते की, सर्वसामान्य नागरिक व पोलीस कुटुंबियांच्या मते नक्षलवादयांना गावबंदी करावी असे वाटते.

सारणी क्र. ४.७९

अत्याचार पीडीत सामान्य नागरीक म्हणून कोणती मदत मिळाली?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
घर किंवा अकस्मीक मदत	७५	३०.०	५४	२१.७	२.०७३	<०.०५
शासन विमा	५०	२०.०	८१	३२.६		
नोकरीची हमी	८१	३२.५	९०	३५.५		
कोणतीही नाही	४४	१७.५	२५	१०.२		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोनही वर्गातील पिडीतांना शासनाची मदत कशा प्रकारे मिळाली याचा आढावा घेण्यात आलेला आहे. ३०.० टक्के सामान्य नागरीक व २१.७ टक्के पोलिस कुटूंबियांना घर किंवा अकस्मीक मदत मिळाली तर २०.० टक्के सामान्य नागरीक व ३२.६ टक्के पोलिस कुटूंबियांना शासन विमा करून देण्यात आला. ३२.५ टक्के सामान्य नागरीक व ३५.५ टक्के पोलिस कुटूंबियांना शासनाकडून नोकरीची हमी देण्यात आली तर १७.५ टक्के सामान्य नागरीक व १०.२ टक्के पोलिस कुटूंबियांना शासनाकडून कसल्याही प्रकारची मदत देण्यात आली नाही.

दोनही वर्गातील जास्तीत जास्त सामान्य नागरीकांना शासनाकडून नोकरीची हमी देण्यात आली. कमीत कमी दोनही वर्गातील कमीत कमी उत्तर दात्यांना शासनाकडून कोणतीही मदत देण्यात आलेली नाही. यावरून असे लक्षात येते की, दोनही वर्गातील अधिकाधिक पिडीत नागरीकांना शासनाकडून मदतीचा हात देण्यात आला आहे.

सारणी क्र. ४.८०

शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणती मदत मिळाली?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
जमीन/घर	४५	१८.१	०४	१.४	२.६८२	<०.०५
सानुग्राह अनुदान	१६०	६३.८	१९३	७७.०		
मुलांना नोकरी	१५	६.२	४३	१७.३		
कोणतीही नाही	३०	११.९	१०	४.३		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोन्ही वर्गातील शहीद कुटूंबियांना शासनाची कोणती मदत मिळाली याचा आढावा घेण्यात आलेला आहे. १८.१ टक्के सामान्य नागरीक व १.४ टक्के पोलिस कुटूंबियांना शासनाकडून जमीन किंवा घरे देण्यात आली तर ६३.८ टक्के सामान्य नागरीक व ७७.० टक्के पोलिस कुटूंबियांना सानुग्राह अनुदान राशी शासनाकडून प्रदान करण्यात आली. ६.२ टक्के सामान्य नागरीक व १७.३ टक्के पोलिस कुटूंबियांच्या मुलांना शासनाकडून नोकरी देण्यात आली तर ११.९ टक्के सामान्य नागरीक व ४.३ टक्के पोलिस कुटूंबियांना शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत देण्यात आली नाही.

दोनही वर्गातील जास्तीत जास्त सामान्य नागरीकांना शासनाकडून सानुग्राह अनुदान राशी प्रदान करण्यात आली. कमीत कमी पिडीत सामान्य नागरीकांच्या मुलांना शासनाकडून नोकरी देण्यात देण्यात आली तर कमीत कमी पिडीत पोलिस कुटूंबियांना शासनाकडून जमीन किंवा घर देण्यात आले. यावरून असे लक्षात येते की, दोनही वर्गातील अधिकाधिक पिडीत नागरीकांना शासनाकडून मदतीचा हात देण्यात आला आहे.

सारणी क्र. ४.८१


कुटूंबाचा प्रकार * शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणती मदत मिळाली?

कुटूंबाचा प्रकार		शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणती मदत मिळाली?				एकुण
		जमीन/घर	सानुग्राह अनुदान	मुलांना नौकरी	कोणतीही नाही	
संयुक्त कुटूंब	वारंवारीता	८	५३	७	५	७३
	प्रतिशत	१६.१	१५.४	१२.१	१२.०	१४.८
	एकुण	१.७	१०.८	१.३	१.०	१४.८
विभक्त कुटूंब	वारंवारीता	४३	२९३	४८	३८	४२२
	प्रतिशत	८३.९	८४.६	८७.९	८४.४	८५.२
	एकुण	८.८	५९.३	९.८	७.१	८५.२
एकुण	वारंवारीता	५१	३४६	५५	४३	४९५
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=11.300, P=0.080, df=6

वरील सारणी क्र. ४.८१ वरुन असे स्पष्ट होते की, ४९५ उत्तरदात्यापैकी क्रमश: विभक्त कुटूंबातील सर्वाधिक २९३ (५९.३ टक्के) व संयुक्त कुटूंबातील ५३ (१०.८ टक्के) उत्तरदात्यांना शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून सानुग्राह अनुदान मदत मिळाली असे नमूद करतात. संयुक्त व विभक्त कुटूंबातील क्रमश: ५ (१.० टक्के) व ३८ (७.१ टक्के) उत्तरदात्यांना शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणतीही मदत मिळाली नाही. संयुक्त कुटूंबातील व विभक्त कुटूंबातील क्रमश: ८ (१.७ टक्के) व ४३ (८.८ टक्के) उत्तरदात्यांना शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून जमीन/घरे मिळाली असे नमूद करतात, तसेच अनुक्रमे ७ (१.३ टक्के) व ४८ (९.८ टक्के) उत्तरदात्यांच्या अपत्यांना शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून नोकरी देण्यात आली असे नमूद करतात.

वरील क्र. ४.८१ सारणीतील उत्तरदात्यांचा कुटूंब प्रकार (संयुक्त व विभक्त) व शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून मदत यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ११.३०० हे ६ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १२.६ पेक्षा जास्त असल्यामुळे कुटूंब प्रकार व शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून मदत या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.१२ : शहीद कुटूंब म्हणून सरकारकडून कोणती मदत मिळाली?

सारणी क्र. ४.८२

निराधार कुटूंब यासाठी शासनाकडे अर्ज केला काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१९८	७८.९	२००	७९.९	१.२१६	NS
नाही	५२	२१.१	५०	२०.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

गडचिरोली जिल्हयातील सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांना निराधार कुटूंब यासाठी शासनाकडे अर्ज केला या संदर्भात माहिती सारणी क्र. ४.८२ मध्ये दिसून येते. ७८.९ टक्के सामान्य नागरिक ७९.९ टक्के पोलीस कुटूंबियांनी हया प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. २१.१ टक्के सामान्य नागरिक आणि २०.१ टक्के पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे.

यावरुन असे लक्षात येते की, दोन्ही वर्गातील बहुतांश कुटूंबियांनी निराधार कुटूंब यासाठी शासनाकडे अर्ज केला होता.

सारणी क्र. ४.८३

निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता कोणाकडून त्रास होतो?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
सरपंच	२९	११.८	०६	२.२	२.५७९	<०.०५
तलाठी	३३	१३.०	१३	५.०		
इतर सहकारी	९३	३७.३	१२७	५१.१		
माहीत नाही	९५	३७.९	१०४	४१.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील तालिकेत दोन्ही वर्गातील निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता कोणाकडून त्रास होतो या सदंर्भात माहिती सारणी क्र. ४.८३ मध्ये दर्शविण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या निराधार कुटूंबियांनामध्ये ५१.१ टक्के पोलीस कुटूंबिय व ३७.३ टक्के सामान्य नागरिक कार्यालयात गेले असता त्यांना इतर सहकाऱ्यांकडून बराच त्रास सहन करावा लागतो. ४१.७ टक्के पोलीस कुटूंबिय व ३७.९ टक्के सामान्य नागरिक हे कार्यालयात कामाकरीता गेले असता त्यांना माहीत नाही अशा वाक्यप्रचाराचा त्रास सहन करावा लागतो. १३ टक्के सामान्य नागरिक व ५ टक्के पोलीस कुटूंबिय यांना तलाठयांकडून त्रास सहन करावा लागतो. ११.८ टक्के सामान्य नागरिक व २.२ टक्के पोलीस कुटूंबिय यांना निराधार कुटूंब म्हणून सरपंच्याकडून थोडया प्रमाणात त्रास सहन करावा लागतो.

यावरुन असे लक्षात येते की, निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता बहुतांश सामान्य नागरिक आणि पिडीत पोलीस कुटूंबियांनी सरपंच, तलाठी व इतर सहकाऱ्यांकडून त्रास सहन करावा लागला, त्यातही इतर सहकाऱ्यांकडून जास्त उत्तरदात्यांना त्रास सहन करावा लागला.

सारणी क्र. ४.८४

यासाठी ते कोणत्या आमीषाची मागणी करतात काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
पैशाची मागणी करणे	७०	२८.२	१७	६.६	२.७२७	<०.०५
एकटया स्त्रीचा गैरफायदा	१०३	४१.०	९५	३८.०		
टाळाटाळ करुन त्रास देणे	५६	२२.४	१०७	४३.०		
मानसिक त्रास देणे	२१	८.४	३१	१२.४		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोन्ही वर्गातील निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी कोणत्या अमिषाची मागणी करतात या सदंर्भात माहिती सारणी क्र. ४.८४ मध्ये दर्शविण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या निराधार कुटूंबियांनामध्ये ६.६ टक्के पोलीस कुटूंबिय व २८.२ टक्के सामान्य नागरिक कार्यालयात गेले असता त्यांना पैशाची मागणी करण्यात आली. ३८ टक्के पोलीस कुटूंबिय व ४१ टक्के सामान्य नागरिकाच्या मते कार्यालयात कामाकरीता गेले असता एकटया स्त्रीचा गैरफायदा घेतात.२२.४ टक्के सामान्य नागरिक व ४३ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते टाळाटाळ करुन त्रास देतात. ८.४ टक्के सामान्य नागरिक व १२.४ टक्के पोलीस कुटूंबिय यांना निराधार कुटूंब म्हणून कार्यालयात गेले असता मानसिक त्रास देण्यात आला.

यावरुन असे लक्षात येते की, बहुतांश निराधार कुटूंबियांना कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी कोणत्या ना कोणत्या अमिषाची मागणी करतात. बहुतांश सामान्य नागरिकांच्या मते कर्मचारी एकटया स्त्रीचा गैरफायदा घेतात तर बहुतांश पिडीत पोलीस कुटूंबियांच्या मते कार्यालयीन कर्मचारी टाळाटाळ करुन त्रास देतात.

सारणी क्र. ४.८५


लिंग * निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता ते कोणत्या आमीषाची मागणी करतात काय?

लिंग		निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता ते कोणत्या आमीषाची मागणी करतात काय?				एकुण
		पैशाची मागणी करणे	एकटया स्त्रीचा गैरफायदा	टाळाटाळ करुन त्रास देणे	मानसिक त्रास देणे	
स्त्री	वारंवारीता	५८	१७५	११२	३८	३८३
	प्रतिशत	६६.०	९०.५	७१.३	७६.७	७८.५
	एकुण	११.९	३५.८	२२.९	७.९	७८.५
पुरुष	वारंवारीता	३०	१८	४५	१२	१०५
	प्रतिशत	३४.०	९.५	२८.७	२३.३	२१.५
	एकुण	६.१	३.८	९.२	२.३	२१.५
एकुण	वारंवारीता	८८	१३०	२२०	५०	४८८
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=17.965, P=0.001, df=4

वरील सारणी क्र. ४.८५ वरुन असे स्पष्ट होते की, ४८८ उत्तरदात्यापैकी सर्वाधिक १७५ (३५.८ टक्के) स्त्री उत्तरदात्यांच्या मते निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता शासकीय कर्मचारी व अधिकारी एकटया स्त्रीचा गैरफायदा घेतात, तसेच सर्वाधिक पुरुष उत्तरदात्यांच्या मते निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता शासकीय कर्मचारी व अधिकारी टाळाटाळ करुन त्रास देतात. सर्वाधिक कमी ३८ (७.९ टक्के) स्त्री व १२ (२.३ टक्के) पुरुष उत्तरदाते उत्तरदात्यांच्या मते निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता शासकीय कर्मचारी मानसिक त्रास देतात ही प्रतिक्रीया नोंदवितात.

वरील क्र. ४.८५ सारणीतील उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री–पुरुष) व शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यां कडून होणारा त्रास यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार सार्थक **(P<0.05)** संबंध आहे कारण, प्राप्त Chi-square मूल्य १७.९६५ हे ४ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य ९.४९ पेक्षा जास्त असल्यामुळे उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री–पुरुष) व शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यां कडुन होणारा त्रास या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.१३ : निराधार कुटूंब म्हणून कामासाठी कार्यालयात गेले असता ते कोणत्या आमीषाची मागणी करतात काय?

सारणी क्र. ४.८६

शहीद कुटूंब म्हणून शासनाची मदत कुणास मिळाली?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
पत्नी	१६५	६५.८	१८२	७२.७	२.०४६	<०.०५
मुले	०८	३.२	—	—		
आईवडील	५२	२१.१	६८	२७.३		
कुणासही नाही	२५	९.९	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोन्ही वर्गातील शहीद कुटूंबियांना शासनाची मदत कुणास मिळाली याचा आढावा घेण्यात आलेला आहे. ६५.८ टक्के सामान्य नागरीक व ७२.७ टक्के पोलिस कुटूंबियांना शासनाकडून पत्नी म्हणून मदत देण्यात आली तर ३.२ टक्के सामान्य नागरीकांच्या मुलांना शासनाकडून मदत मिळाली असे लक्षात आले. २१.१ टक्के सामान्य नागरीक व २७.३ टक्के पोलिस कुटूंबियांच्या आईवडीलांना शासनाकडून मदत देण्यात आली. ९.९ टक्के सामान्य नागरीक म्हणून शासनाची मदत मिळाली

दोन्ही वर्गातील जास्तीत जास्त कुटूंबियांना शासनाकडून पत्नी म्हणून मदत करण्यात आली. कमीत कमी पिडीत सामान्य नागरीकांच्या मुलांना शासनाकडून मदत देण्यात आली तर कमीत कमी पिडीत पोलिस कुटूंबियांना शासनाकडून आई वडील या नात्याने मदतीची साथ देण्यात आली. यावरून असे लक्षात येते की, दोन्ही वर्गातील अधिकाधिक पिडीत नागरीकांना शासनाकडून मदतीचा हात देण्यात आला आहे.

सारणी क्र. ४.८७

मिळणाऱ्या पैशातून भांडणे होतात काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	९४	३७.७	१३०	५१.८	२.२६२	<०.०५
नाही	१५६	६२.३	१२०	४८.२		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांना मिळणाऱ्या पैशातून परिवार भांडणे होतात काय? याबद्दलच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या. ३७.७ टक्के सामान्य नागरिक ५१.८ टक्के पोलीस कुटूंबियांनी हया प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी उत्तरे दिलेली आहे. ६२.३ टक्के सामान्य नागरिक आणि ४८.२ टक्के पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थी नकारार्थी उत्तरे दिलेली आहे.

बहुतांश सामान्य नागरिकांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ नकारार्थी उत्तरे नोंदविली आहेत. बहुतांश पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी उत्तरे दिलेली आहेत.

सारणी क्र. ४.८८

ही भांडणे कुणाकडून सोडविता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
पोलीस अधिक्षक	१९	७.५	३२	१२.९	२.५२४	<०.०५
नातेवाईक द्वारे	६१	२४.४	६८	२७.३		
कोर्टाद्वारे	१४	५.६	३०	१२.१		
माहीत नाही	१५६	६२.५	१२०	४७.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांना मिळणाऱ्या पैशातून परिवार भांडणे होतात काय? असल्यास ही भांडणे कोणाकडून सोडविण्यात येतात याबद्दलच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या. ७.५ टक्के सामान्य नागरिक १२.९ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ही भांडणे पोलीस अधिकक्षकांद्वारे सोडविण्यात येतात.

२४.४ टक्के सामान्य नागरिक आणि २७.३ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ही भांडणे नातेवाईकांद्वारे होतात. ५.६ टक्के सामान्य नागरिक आणि १२.१ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते ही भांडणे कोर्टाद्वारे सोडविल्या जातात. तर ६२.५ टक्के सामान्य नागरिक व ४७.७ टक्के पोलिस कुटूंबियांनी माहीत नाही असे उत्तर नोंदविलेले आहे.

दोन्ही वर्गातील बहुतांश उत्तरदात्यांच्या मते त्यांना ही भांडणे कोणाकडून सोडविण्यात येतात तर या बद्दलची माहिती नाही. दोन्ही वर्गातील कमी कमी उत्तरदात्यांच्या मते ही भांडणे कोर्टाकडून सोडविण्यात येतात.

सारणी क्र. ४.८९

मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
बॅंक बचत	२९	११.४	७४	२९.६	२.२४७	<०.०५
घर बांधणे	१०१	४०.५	९१	३६.४		
मुलांचे शिक्षण	५७	२२.८	६१	२४.४		
लागू नाही	६३	२५.३	२४	९.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांना शहीद कुटूंब म्हणून मिळालेल्या पैशाच्या विनियोगाबाबत विचारलेल्या प्रश्नांबाबतच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या. ११.४ टक्के सामान्य नागरिक २९.६ टक्के पोलीस कुटूंबियांच्या मते मिळालेल्या पैशाचा उपयोग बॅंक बचत करुन करतात. ४०.५ टक्के सामान्य नागरिक आणि ३६.४ टक्के पोलीस कुटूंबियांनी मिळालेल्या पैशातून घर बांधले. २२.८ टक्के सामान्य नागरिक आणि २४.४ टक्के पोलीस कुटूंबियांनी मिळालेल्या पैशाचा विनियोग मुलांच्या शिक्षणात केलेल्या आहे. तर २५.३ टक्के सामान्य नागरिक व ९.६ टक्के पोलिस कुटूंबियांनी हे प्रश्न लागू नाही.

दोन्ही वर्गातील बहुतांश उत्तरदात्यांनी मिळालेल्या पैशाचा विनियोग घराच्या बांधकामात केला, दोन्ही वर्गातील जवळपास सारख्याच उत्तरदात्यांनी पैशाचा विनियोग मुलांच्या शिक्षणात केला. तर दोन्ही वर्गातील उर्वरीत उत्तरदात्यांनी पैशाचा विनियोग बॅंक बचत करुन केला.

सारणी क्र. ४.९०


कुटूंबाचा प्रकार * मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसा करता?

कुटूंबाचा प्रकार		मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसा करता?				एकुण
		बॅंक बचत	घर बांधणे	मुलांचे शिक्षण	लागू नाही	
संयुक्त कुटूंब	वारंवारीता	१४	३५	१२	१२	७३
	प्रतिशत	१४.६	१८.७	१०.५	१३.६	१५.१
	एकुण	२.९	७.२	२.५	२.५	१५.१
विभक्त कुटूंब	वारंवारीता	८२	१५२	१०२	७६	४१२
	प्रतिशत	८५.४	८१.३	८९.५	८६.४	८४.९
	एकुण	१६.९	३१.३	२१.०	१५.७	८४.९
एकुण	वारंवारीता	९६	१८७	११४	८८	४८५
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square = 11.708, P= 0.165, df= 8

वरील सारणी क्र. ४.९० वरुन असे स्पष्ट होते की, ४८५ उत्तरदात्यापैकी क्रमश: संयुक्त कुटूंबातील सर्वाधिक ३५ (७.२ टक्के) व विभक्त कुटूंबातील १५२ (३१.३ टक्के) उत्तरदाते मिळालेल्या पैशाचा विनीयोग घर बांधण्यासाठी करणार असे नमुद करतात (या विकल्पाशी सहमत आहेत). संयुक्त व विभक्त कुटूंबातील क्रमश: मुलांचे शिक्षण (२.५ टक्के) व बॅंक बचत (१६.९ टक्के) या विकल्पाशी (मिळालेल्या पैशाचा विनीयोग) सर्वात कमी उत्तरदात्यांनी सहमती दर्शवली. त्याचप्रमाणे, अनुक्रमे २.५ टक्के व १५.७ टक्के उत्तरदात्यांनी मिळालेल्या पैशाचा विनीयोग हा प्रश्न लागु नाही असे म्हटले आहे.

वरील क्र. ४.९० सारणीतील उत्तरदात्यांचा कुटूंब प्रकार (संयुक्त व विभक्त) व त्यांना मिळालेल्या पैशाचा विनीयोग यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ११.७०८ हे ८ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १५.५ पेक्षा कमी असल्यामुळे कुटूंब प्रकार व मिळालेल्या पैशाचा विनीयोग या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.१४ : मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसा करता?

सारणी क्र. ४.९१


उत्तरदात्याचा व्यवसाय * मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?

उत्तरदात्याचा व्यवसाय		मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?				एकुण
		बॅंक बचत	घर बांधणे	मुलांचे शिक्षण	लागू नाही	
नौकरी	वारंवारीता	३०	२५	२७	५	८७
	प्रतिशत	३१.३	१३.४	२३.३	५.७	१७.८
	एकुण	६.२	५.१	५.५	१.०	१७.८
शेती	वारंवारीता	४२	९७	४७	४१	२२७
	प्रतिशत	४३.८	५१.९	४०.५	४६.६	४६.६
	एकुण	८.६	१९.९	९.७	८.४	४६.६
उद्योग	वारंवारीता	३	१३	२	७	२५
	प्रतिशत	३.१	७.०	१.७	८.०	५.१
	एकुण	०.७	२.७	०.३	१.४	५.१
इतर	वारंवारीता	२१	५२	४०	३५	१४८
	प्रतिशत	२१.९	२७.८	३४.५	३९.८	३०.४
	एकुण	४.५	१०.६	८.२	७.१	३०.५
एकुण	वारंवारीता	९६	१८७	११६	८८	४८७
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=22.638, P=0.031, df=12

वरील सारणी क्र. ४.९१ वरुन असे स्पष्ट होते की, ४८७ उत्तरदात्यापैकी सर्वाधिक ९७ (१९.९ टक्के), १३ (२.७ टक्के) आणि ५२ (१०.६ टक्के) क्रमश: शेती, उद्योग आणि इतर व्यवसाय करणारे उत्तरदाते मिळालेल्या पैशाचा विनीयोग घर बांधण्यासाठी करणार असे नमुद करतात. सर्वाधिक नोकरी करणारे उत्तरदाते ३० (६.२ टक्के) मिळालेल्या पैशाचा विनीयोग बॅंक बचत साठी करणार असे नमुद करतात. सर्वाधिक कमी २ (०.३ टक्के) उद्योग हा व्यवसाय करणारे उत्तरदाते मिळालेल्या पैशाचा विनीयोग मुलांच्या शिक्षणा साठी करणार असे नमुद करतात.

वरील क्र. ४.९१ सारणीतील उत्तरदात्यांचा व्यवसाय व त्यांना मिळालेल्या पैशाचा विनीयोग यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार सार्थक **(P<0.05)** संबंध आहे. कारण, प्राप्त Chi-square मूल्य २२.६३८ हे १२ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य २१.० पेक्षा जास्त असल्यामुळे कुटूंब प्रकार व मिळालेल्या पैशाचा विनीयोग या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.१५ : मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?

सारणी क्र. ४.९२


उत्तरदात्याचे वय * मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?

उत्तरदात्याचे वय		मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?				एकुण
		बॅंक बचत	घर बांधणे	मुलांचे शिक्षण	लागू नाही	
२० ते ३० वर्षे	वारंवारीता	२२	३१	२३	२२	९८
	प्रतिशत	३७.९	२७.४	३३.३	४२.३	२०.२
	एकुण	४.५	६.५	४.८	४.१	२०.२
३१ ते ४० वर्षे	वारंवारीता	४३	८२	६७	२६	२१८
	प्रतिशत	४४.८	४३.४	५८.०	३०.८	४४.९
	एकुण	८.९	१६.८	१३.७	५.५	४४.९
४१ ते ५० वर्षे	वारंवारीता	२०	५५	१७	२०	११२
	प्रतिशत	२०.७	२९.२	१४.५	२३.१	२२.९
	एकुण	४.१	११.३	३.४	४.१	२२.९
५१ च्या वर	वारंवारीता	१२	२०	८	१८	५८
	प्रतिशत	१२.१	१०.६	७.२	२१.२	१२.०
	एकुण	२.४	४.१	१.७	३.८	१२.०
एकुण	वारंवारीता	९७	१८८	११५	८६	४८६
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=19.370, P=0.080, df=12

वरील सारणी क्र. ४.९२ वरुन असे स्पष्ट होते की, ४८६ उत्तरदात्यापैकी सर्वाधिक ३१ (६.५ टक्के), ८२ (१६.८ टक्के), ५५ (११.३ टक्के) आणि २० (४.१ टक्के) क्रमश: २० ते ३० वर्षे, ३१ ते ४० वर्षे, ४१ ते ५० वर्षे आणि ५१ च्या वर वय असलेले उत्तरदाते मिळालेल्या पैशाचा विनीयोग घर बांधण्यासाठी करणार असे नमुद करतात. ५१ वर्षापेक्षा जास्त वय असलेले सर्वाधिक कमी उत्तरदाते ८ (१.७ टक्के) मिळालेल्या पैशाचा विनीयोग मुलांच्या शिक्षणासाठी करणार असे नमुद करतात. मिळालेल्या पैशाचा विनीयोग मुलांच्या शिक्षणासाठी आणि बॅंक बचतीसाठी करणार असे नमुद करणाऱ्या सर्वाधिक उत्तरदाते ३१ ते ४० वयोमर्यादेतील आहेत.

वरील क्र. ४.९२ सारणीतील उत्तरदात्यांचे वय व त्यांना मिळालेल्या पैशाचा विनीयोग यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणतेही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य १९.३७० हे १२ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य २१.० पेक्षा कमी असल्यामुळे उत्तरदात्याचे वय व मिळालेल्या पैशाचा विनीयोग या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.१६ : मिळालेल्या पैशाचा विनीयोग कसे करता?

सारणी क्र. ४.९३

पतीनिधनानंतर किती दिवसात नोकरी मिळाली?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
सहा महिन्यात	०३	१.२	०५	२.२	२.४२१	<०.०५
एका वर्षात	०५	१.९	४७	१८.७		
दोन वर्षात	०६	२.५	६५	२६.१		
मिळाली नाही	२३६	९४.४	१३३	५३.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांमध्ये विधवा स्त्रियांना पतीनिधनानंतर किती दिवसानी नोकरी मिळाली या संदर्भातील माहिती सारणी क्र. ४.९३ देण्यात आलेली आहे. १.२ टक्के सामान्य नागरिक २.२ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांना सहा महिन्यात नोकरी मिळाली. १.९ टक्के सामान्य नागरिक आणि १८.७ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांना एका वर्षात नोकरी मिळाली. २.५ टक्के सामान्य नागरिक आणि २६.१ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांना दोन वर्षात नोकरी मिळाली. तर ९४.४ टक्के सामान्य नागरिक व ५३ टक्के पोलिस कुटूंबातील विधवांना नोकरी मिळाली नाही.

दोन्ही वर्गातील बहुतांश उत्तरदात्यांना पती निधनानंतर नोकरी मिळाली नाही. दोन्ही वर्गातील उत्तरदात्यांमध्ये नोकरी मिळणाऱ्या बहुतांश विधवांना दोन वर्षात नोकरी मिळाली तर कमीत–कमी विधवांना सहा महिन्यात नोकरी मिळाली. यावरुन असे लक्षात येते की, बहुतांश शहीद कुटूंबियातील विधवांना नोकरी देण्यात व्यवस्था अपुरी पडली आहे.

सारणी क्र. ४.९४

पतीनिधनानंतर त्यांचे वेतन मिळते काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
अर्धेवेतन	—	—	०४	१.४	२.६८३	<०.०५
पूर्णवेतन	—	—	२७	१०.९		
पेन्शन	०३	१.२	२०१	८०.५		
कोणतेही नाही	२४७	९८.८	१८	७.२		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील तालिकेत सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांना पतीनिधनानंतर त्यांचे वेतन मिळते काय? याबद्दलच्या प्रतिक्रिया सारणी क्र. ४.९४ मध्ये दिसून येतात. १.४ टक्के पोलीस कुटूंबियांनी पती निधनानंतर अर्धेवेतन मिळते. १०.९ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांना पूर्णवेतन मिळते. १.२ टक्के सामान्य नागरिक आणि ८०.५ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांना पेन्शन मिळते. तर ९८.८ टक्के सामान्य नागरिक व ७.२ टक्के पोलिस कुटूंबातील विधवांना पती निधनानंतर मिळणारे वेतन मिळत नाही.

बहुतांश सामान्य नागरिकांमधील विधवांना पती निधनानंतर कोणतेही वेतन मिळाले नाही. तर बहुतांश पोलीस कुटूंबातील विधवांना पती निधनानंतर पेन्शनचा लाभ झालेला आहे.

यावरुन असे लक्षात येते की, सामान्य नागरिकांच्या विधवांना पती निधनानंतर भविष्य निर्वाहासाठी कसलेही वेतन योजना राबविण्यात आली नाही. या तुलनेत शहीद पोलीस विधवांना पेन्शन व इतर योजनांचा लाभ झाला.

वैवाहिक व शैक्षणिक प्रश्न

सारणी क्र. ४.९५

पतीच्या निधनानंतर कुणाचा आधार घेता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
आई—वडील	३०	१.८	६६	२६.२	२.४७१	<०.०५
सासू सासरे	३०	११.८	८३	३३.३		
सहकारी आप्तेष्ठ	३३	१३.७	६२	२४.६		
कोणीही नाही	१५७	६२.७	३९	१५.९		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.९५ मध्ये पतीच्या निधनानंतर परिवाराला कुणाचा आधार आहे याबद्दलची माहिती घेण्यात आली आहे. बहुतांश ६२.७ टक्के सामान्य जनता व १५.९ टक्के पोलीस कुटूंबियांना पतीच्या निधनानंतर कोणीही नाही असे निदर्शनास येते. १३.७ टक्के सामान्य जनता व २४.६ टक्के पोलीस कुटूंबियांचा सहकारी आप्तेष्ठांचा आधार मिळतो. ११.८ टक्के सामान्य जनता व ३३.३ टक्के पोलीस कुटूंबिय यांना पती निधनानंतर सासू—सासरे यांचा आधार असावयास हवा. १.८ टक्के सामान्य जनता व २६.२ टक्के पोलीस कुटूंबियांना आई—वडीलांच्या आधाराची जवळीक भासते असे निदर्शनास येते.

यावरुन असे लक्षात येते की, गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या कुटूंबियांना पतीच्या निधनानंतर स्वत: स्वत:चा आधार असतो, तर शहीद झालेल्या पोलीस कुटूंबियांपैकी बहुतांश कुटूंबियांना कोणत्या ना कोणत्या नातेवाईकांचा आधार आहे.

सारणी क्र. ४.९६


लिंग * कुटूंबाला आधार म्हणून कुणाची मदत घेता?

लिंग		कुटूंबाला आधार म्हणून कुणाची मदत घेता?				एकुण
		मुलगा/मुलगी	स्वता: कामे करतो	सासु–सासरे	सहकारी मित्र/शेजार	
स्त्री	वारंवारीता	५८	२०२	९५	३३	३८८
	प्रतिशत	७७.३	७२.१	९५.०	७८.६	७८.१
	एकुण	११.८	४०.६	१९.१	६.६	७८.१
पुरुष	वारंवारीता	१७	७८	५	९	१०९
	प्रतिशत	२२.७	२७.९	५.०	२१.४	२१.९
	एकुण	३.४	१५.७	१.०	१.८	२१.९
एकुण	वारंवारीता	७५	२८०	१००	४२	४९७
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=13.739, P=0.003, df=3

वरील सारणी क्र. ४.९६ वरुन असे स्पष्ट होते की, ४९७ उत्तरदात्यापैकी क्रमश: सर्वाधिक स्त्री २०२ (४०.६ टक्के) व पुरुष ७८ (१५.७ टक्के) उत्तरदाते कुटूंबाला आधार देण्या साठी स्वत: कामे करतात . सर्वाधिक कमी स्त्री व पुरुष उत्तरदाते क्रमश: ३३ (६.६ टक्के) आणि ९ (१.८ टक्के) कुटूंबाला आधार देण्या साठी सहकारी, मित्र किंवा शेजाऱ्यांची मदत घेतात. मुलगा किंवा मुलीवर अवलंबून राहणाऱ्या स्त्री व पुरुष उत्तरदात्यांची संख्या क्रमश: ५८ (११.८ टक्के) व १७ (३.४ टक्के) असून, सासू–सासऱ्यांवर अवलंबून राहणाऱ्या स्त्री व पुरुष उत्तरदात्यांची संख्या क्रमश: ९५ (१९.१ टक्के) व ५ (१.० टक्के) आहे.

वरील क्र. ४.९६ सारणीतील उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री–पुरुष) व कुटूंबाला आधार म्हणून घेण्यात येणारी मदत यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार सार्थक **(P<0.05)** संबंध आहे. कारण, प्राप्त Chi-square मूल्य १३.७३९ हे ३ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य ७.८१ पेक्षा जास्त असल्यामुळे उत्तरदात्यांचे लिंग (स्त्री–पुरुष) व कुटूंबाला आधार म्हणून घेण्यात येणारी मदत या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.१७ : कुटूंबाला आधार म्हणून कुणाची मदत घेता?

सारणी क्र. ४.९७

पती निधनानंतर कुटूंबीयाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
सहकार्याची	५५	२२.२	५९	२३.४	१.३६३	NS
आर्थिक लुबाडणूकीची	७९	३१.६	११३	४५.२		
चारित्र्य संशयाची	५९	२३.४	३१	१२.४		
कोणतीही नाही	५७	२२.८	४७	१९.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोन्ही वर्गातील विधवांना पती निधनानंतर कसल्या प्रकारची वागणूक मिळते या सदंर्भात माहिती सारणी क्र. ४.९७ मध्ये दर्शविण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या निराधार कुटूंबियांनामधील विधवांपैकी २३.४ टक्के शहीद पोलीस विधवांना व २२.२ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांना कुटूंबांकडून सहकार्याची वागणूक दिली जाते. ४५.२ टक्के शहीद पोलीस विधवांना व ३१.६ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांना कुटूंबांकडून आर्थिक लुबाडणूकीची वागणूक मिळाली आहे. १२.४ टक्के शहीद पोलीस विधवांना व २३.४ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांना कुटूंबांकडून चारित्र्यावर संशय घेण्याची वागणूक मिळाली जाते. १९ टक्के शहीद पोलीस विधवांना व २२.८ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांना कुटूंबांकडून कोणत्याच प्रकारची वागणूक मिळाली नाही.

दोन्ही वर्गातील बहुतांश विधवांना त्यांच्या कुटूंबियांकडून आर्थिक लुबाडणूकीची वागणूक मिळाली आहे. तर इतर विकल्पाना समिश्र प्रतिसाद मिळालेला आहे.

सारणी क्र. ४.९८


कुटूंबाचा प्रकार * पती निधनानंतर कुटूंबीयाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?

कुटूंबाचा प्रकार		पती निधनानंतर कुटूंबीयाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?				एकुण
		सहकार्याची	आर्थिक लुबाडणूकीची	चरित्र्य संशयाची	कोणतीही नाही	
संयुक्त कुटूंब	वारंवारीता	१५	३२	१३	१३	७३
	प्रतिशत	१३.४	१७.५	१४.४	१२.६	१५.०
	एकुण	३.१	६.५	२.७	२.७	१५.०
विभक्त कुटूंब	वारंवारीता	९७	१५१	७७	९०	४१५
	प्रतिशत	८६.६	८२.५	८५.६	८७.४	८५.०
	एकुण	१९.९	३०.९	१५.८	१८.४	८५.०
एकुण	वारंवारीता	११२	१८३	९०	१०३	४८८
	एकुण	१००.०	१००.०	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=5.229, P=0.515, df=6

वरील सारणी क्र. ४.९८ वरुन असे स्पष्ट होते की, ४८८ उत्तरदात्यापैकी क्रमश: संयुक्त कुटूंबातील सर्वाधिक ३२ (६.५ टक्के) व विभक्त कुटूंबातील १५१ (३०.९ टक्के) उत्तरदाते पती निधनानंतर कुटूंबीयाकडून आर्थिक लूबाडणूकीची वागणूक मिळाली असे नमुद करतात. संयुक्त व विभक्त कुटूंबातील क्रमश: १५ (३.१ टक्के) व ९७ (१९.९ टक्के) उत्तरदात्यांना पती निधनानंतर कुटूंबियाकडून सहकार्याची वागणूक मिळाली, तसेच चारित्र्य संशयाची वागणूक मिळालेल्या उत्तरदात्यांची संख्या व प्रतिशत प्रमाण सर्वाधिक कमी असून ते क्रमश: १३ (२.७ टक्के) आणि ७७ (१५.८ टक्के) आहे.

वरील क्र. ४.९८ सारणीतील उत्तरदात्यांचा कुटूंब प्रकार (संयुक्त व विभक्त) व त्यांना पती निधनानंतर कुटूंबीयाकडून मिळालेली वागणूक यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणताही सार्थक संबंध नाही. कारण, प्राप्त Chi-square मूल्य ५.२२९ हे ६ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १२.६ पेक्षा कमी असल्यामुळे कुटूंब प्रकार व पती निधनानंतर कुटूंबीयाकडून मिळालेली वागणूक या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध नसल्याचे आढळते.



आलेख ४.१८ : पती निधनानंतर कुटूंबीयाकडून कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली?

सारणी क्र. ४.९९

पती निधनानंतर आपल्या जीवनात निर्माण झालेली पोकळी कसे भरुन काढणार?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
कुटूंबीयांच्या मदतीने	६५	२६.१	९५	३८.४	२.१४६	<०.०५
आईवडीलांच्या मदतीने	७०	२८.०	६०	२३.९		
मुलामुलींच्या सहकार्याने	५०	२०.४	५२	२१.०		
कोणतेही नाही	६५	२५.५	४३	१६.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोन्ही वर्गातील विधवांना पती निधनानंतर त्यांच्या जीवनात निर्माण झालेली पोकळी कशी भरुन काढणार? या सदंर्भात माहिती सारणी क्र. ४.९९ मध्ये दर्शविण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या निराधार कुटूंबियांनामधील विधवांपैकी ३८.४ टक्के शहीद पोलीस विधवा व २६.१ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांच्या मते जीवनात निर्माण झालेली पोकळी कुटूंबियांच्या मदतीने भरुन काढतात. २३.९ टक्के शहीद पोलीस विधवा व २८ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांच्या मते जीवनात निर्माण झालेली पोकळी आई–वडीलांच्या मदतीने भरुन काढतात. २१ टक्के शहीद पोलीस विधवा व २०.४ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांच्या मते जीवनात निर्माण झालेली पोकळी मुलामुलींच्या सहकार्याने मदतीने भरुन काढतात. १६.७ टक्के शहीद पोलीस विधवा व २५.५ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांच्या मते जीवनात निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यासाठी कोणताही आधार नाही.

वरील प्रश्नांच्या उत्तरार्थ शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांकडून मिळालेल्या प्रतिक्रिया समिश्र स्वरुपाच्या आहे. तर बहुतांश शहीद पोलीस विधवा आपल्या जीवनात निर्माण झालेली पोकळी कुटूंबियांच्या साहाय्याने भरुन काढतात.

सारणी क्र. ४.१००

मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	४०	१६.१	२०	७.९	२.०३६	<०.०५
नाही	२१०	८३.९	२३०	९२.१		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वरील सारणीत दोन्ही वर्गातील विधवांनी पती निधनानंतर मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय? या बद्दलची प्रतिक्रिया घेण्यात आल्या. गडचिरोली जिल्हयातील नक्षल कारवायांमध्ये शहीद झालेल्या निराधार कुटूंबियांनामधील विधवांपैकी ७.९ टक्के शहीद पोलीस विधवा व १६.१ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ होकारार्थी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. ९२.१ टक्के शहीद पोलीस विधवा व ८३.९ टक्के शहीद सामान्य नागरिकांच्या विधवांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ नकारार्थी प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. दोन्ही वर्गातील बहुतांश शहीदांच्या विधवांनी वरील प्रश्नांच्या उत्तरार्थ नकारार्थी उत्तर दर्शविले आहे.

सारणी क्र. ४.१०१


उत्तरदात्याचे वय * मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय?

उत्तरदात्याचे वय		मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय?		एकुण
		होय	नाही	
२० ते ३० वर्षे	वरंवारीता	२५	७६	१०१
	प्रतिशत	३७.३	१७.६	२०.३
	एकुण	५.०	१५.३	२०.३
३१ ते ४० वर्षे	वारंवारीता	३२	१९०	२२२
	प्रतिशत	४७.८	४४.१	४४.६
	एकुण	६.४	३८.२	४४.६
४१ ते ५० वर्षे	वारंवारीता	७	१०८	११५
	प्रतिशत	१०.५	२५.१	२३.१
	एकुण	१.४	२१.७	२३.१
५१ च्या वर	वारंवारीता	३	५७	६०
	प्रतिशत	४.५	१३.२	१२.०
	एकुण	०.६	११.४	१२.०
एकुण	वारंवारीता	६७	४३१	४९८
	एकुण	१००.०	१००.०	१००.०

Pearson Chi-Square=18.337, P=0.031, df=9

वरील सारणी क्र. ४.१०१ वरुन असे स्पष्ट होते की, ४९८ उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ७६ (१५.३ टक्के), १९० (३८.२ टक्के), १०८ (२१.७ टक्के) आणि ५७ (११.४ टक्के) क्रमश: २० ते ३० वर्षे, ३१ ते ४० वर्षे, ४१ ते ५० वर्षे आणि ५१ च्या वर वय असलेले उत्तरदात्यांनी मुलांच्या संगोपनासाठी व पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला नाही. सर्व वयोगटातील सर्वाधिक कमी ३ (०.६ टक्के) ५१ वर्षापेक्षा जास्त वय असलेले उत्तरदात्यांनी पती निधनानंतर मुलांच्या संगोपनासाठी आणि पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केल्याचे आढळते.

वरील क्र. ४.१०१ सारणीतील उत्तरदात्यांचे वय व पती निधनानंतर मुलांच्या संगोपनासाठी आणि पुढील जीवनासाठी पुर्नविवाह यांच्यात Chi-square टेस्ट च्या आधारे काढलेल्या मूल्यांनूसार कोणतेही सार्थक **(P<0.05)** संबंध आहे. कारण, प्राप्त Chi-square मूल्य १८.३३७ हे ९ स्वातंत्र्यांश वर Chi square तालीका मूल्य १६.९ पेक्षा जास्त असल्यामुळे उत्तरदात्याचे वय व पती निधनानंतर मुलांच्या संगोपनासाठी आणि पुढील जीवनासाठी पुर्नविवाह या चलांमध्ये महत्वपूर्ण संबंध असल्याचे आढळते.



आलेख ४.१९ : मुलांच्या संगोपनासाठी किंवा पुढील जीवनासाठी पुर्नविवाह केला आहे काय?

सारणी क्र. ४.१०२

असल्यास विधवा झाल्या किती कालावधीनंतर

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एक वर्षे	१३	५.०	०४	१.४	१.२६८	NS
दोन वर्षे	१७	६.९	०९	३.६		
तीन वर्षे	१५	६.२	१४	५.८		
विवाह केला नाही	२०५	८१.९	२२३	८९.२		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांमध्ये विधवा स्त्रियांनी पतीनिधनानंतर किती दिवसानी पुर्नविवाह केला या संदर्भातील माहिती सारणी क्र. ४.१०२ मध्ये देण्यात आलेला आहे. ५ टक्के सामान्य नागरिक १.४ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांनी पती निधनाच्या एक वर्षानंतर पुर्नविवाह केला. ६.९ टक्के सामान्य नागरिक ३.६ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांनी पती निधनाच्या दोन वर्षानंतर पुर्नविवाह केला. ६.२ टक्के सामान्य नागरिक ५.८ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांनी पती निधनाच्या तीन वर्षानंतर पुर्नविवाह केला. ८१.९ टक्के सामान्य नागरिक ८९.२ टक्के पोलीस कुटूंबातील विधवांनी पती निधनानंतर पुर्नविवाह केला नाही.

दोन्ही वर्गातील बहुतांश उत्तरदात्यांना पती निधनानंतर पुर्नविवाह केला नाही. दोन्ही वर्गातील फार कमी उत्तरदात्यांनी पती निधनानंतर पुर्नविवाह केला.

सारणी क्र. ४.१०३

'पैशापुढे सर्व सुख खरेदी करता येते' या विषयीचे मत सांगा?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	०३	१.२	१३	५.१	४.५५३	<०.०५
नाही	५१	२०.५	८७	३४.८		
सांगता येत नाही	९५	३७.९	९७	३९.१		
माहीत नाही	१०१	४०.४	५३	२१.०		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

'पैशापुढे सर्व सुख खरेदी करता येते' या विषयीचे मत सांगा? या प्रश्नासंबंधीच्या उत्तरदात्यांनी दिलेल्या प्रतिक्रियेत सारणी क्र. ४.१०३ मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

- दोन्ही समुहातील उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य सामान्य नागरीकांनी सांगता येत नाही व माहित नाही अशा प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. त्यांचे प्रतिशत प्रमाण अनुक्रमे ३७.९ टक्के व ४०.४ टक्के एवढे आहेत.
- बहुसंख्य पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ सांगता येत नाही व नाही या प्रतिक्रिया नोंदविल्या असून त्यांचे प्रतिशत प्रमाण क्रमश: ३९.१ टक्के व ३४.८ टक्के आहे.
- पैशापुढे सर्व सूख खरेदी करता येतात या मताविषयीची दोन्ही समुहात तुलना केली असता सामान्य नागरीकांच्या तुलनेत पोलीस कुटूंबिय सार्थक रित्या (<०.०५) या मतांच्या विरुद्ध आहेत असे आढळते.

सारणी क्र. ४.१०४

पती असतांना आपली मुले कुठे शिक्षण घेत आहेत?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
कॉन्वेंट	०७	२.६	५३	२१.०	२.७२५	<०.०५
जि.प. शाळा	२३२	९३.२	५४	२१.८		
पोलीस शाळा	०५	१.९	१४३	५७.२		
कुठेच नाही	०६	२.३	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

पती जीवंत असतांना मुलांची शैक्षणिक अवस्थेची माहिती सारणी क्र. ४.१०४ मध्ये नोंदविण्यात आलेल्या आहे. २.६ टक्के सामान्य नागरिक आणि २१ टक्के पोलीस कुटूंबियांची अपत्ये कॉन्वेंट मध्ये शिकत होती. ९३.२ टक्के सामान्य नागरिक आणि २१.८ टक्के पोलीस कुटूंबियांची अपत्ये जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकत होती. १.९ टक्के सामान्य नागरिक आणि ५७.२ टक्के पोलीस कुटूंबियांची अपत्ये पोलीसांच्या शाळेत शिकत होती. २.३ टक्के सामान्य नागरिकांची अपत्ये शाळेत शिकत नव्हती.

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, बहुतांश सामान्य नागरिकांची अपत्ये वडीलांच्या मृत्यूपुर्वी जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकत होती. तर बहुतांश पोलीस कुटूंबियांची अपत्ये त्यांच्या वडीलांच्या मृत्यूपूर्वी पोलीस शाळेत शिकत होती.

सारणी क्र. ४.१०५

आता आपली मुले कुठे शिक्षण घेत आहेत?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
जिल्हा परीषद	५२	३६.५	८०	३२.०	४.३९०	<०.०५
आश्रम शाळा	१४३	५७.४	९३	३६.९		
कॉन्वेंट	१०	४.१	७७	३१.१		
कूठेच नाही	०५	२.०	—	—		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१०५ मध्ये कुटूंब प्रमुखाच्या निधनानंतर त्यांची मुल्ये कुठे शिक्षण घेत आहे. यासंबंधीची माहिती मिळते.

- बहुसंख्य उत्तरदात्यांची अपत्य आश्रम शाळेत शिक्षण घेत असून या उत्तरदात्यांपैकी सामान्य नागरीक व पोलीस कुटूंबियांचे प्रतिशत प्रमाण अनुक्रमे ५७.४ टक्के व ३६.९ टक्के एवढे आहेत.
- दोन्ही समुहातील आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या अपत्यांची तुलनात्मक संख्या पोलीस कुटूंबियांच्या तुलनेत सामान्य नागरीकांमध्ये अधिक असून दोन्ही समुहातील आश्रम शाळेत शिकणाऱ्या अपत्यांच्या संख्येमध्ये सार्थक फरक (<०.०५)असल्याचे आढळून येते.

सारणी क्र. ४.१०६

वडीलांच्या पश्चात मुलांवर कसे नियंत्रण करता?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
एकटे ठेवून	०५	१.९	०३	१.४	१.३४७	NS
नातेवाईकाकडे	४५	१८.३	३५	१३.८		
चांगली वागणूक देवून	१९५	७८.०	१८५	७४.१		
माहीत नाही	०५	१.८	२७	१०.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

वडीलांच्या मृत्यूनंतर मुलांवर कसल्या प्रकारचे नियंत्रण ठेवून त्यांना अनुशासन लावतात हयांचा संदर्भ सारणी क्र. ४.१०६ मध्ये देण्यात आलेला आहे. १.९ टक्के सामान्य नागरिक व १.४ टक्के पोलीस कुटूंबिय आपल्या मुलांना एकटे ठेवून त्यांच्यावर नियंत्रण करतात. १८.३ टक्के सामान्य नागरिक व १३.८ टक्के पोलीस कुटूंबिय आपल्या मुलांना नातेवाईकांकडे ठेवून त्यांच्यावर नियंत्रण करतात. ७८ टक्के सामान्य नागरिक व ७४.१ टक्के पोलीस कुटूंबिय आपल्या मुलांना चांगली वागणूक देवून त्यांच्यावर नियंत्रण करतात. १.८ टक्के सामान्य नागरिक व १०.७ टक्के पोलीस कुटूंबियांनी माहित नाही हे उत्तर नोंदविले आहे.

यावरुन असे लक्षात येते की, दोन्ही वर्गातील बहुतांश कुटूंबिय वडीलांच्या मृत्यू पश्चात चांगली वागणूक देवून त्यांच्यावर नियंत्रण ठेवतात.

सारणी क्र. ४.१०७

आपल्या मुलांसाठी शासनाने वेगळी व्यवस्था केली काय? व कोणती?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	१०	३.८	०२	०.७	२.०५२	<०.०५
नाही	२२१	८८.७	२३५	९४.०		
सांगता येत नाही	०५	१.९	०४	१.६		
माहीत नाही	१४	५.६	०९	३.७		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१०७ मध्ये आपल्या मुलांसाठी शासनाने वेगळी व्यवस्था केली काय? व कोणती? या प्रश्नासंबंधीच्या उत्तरदात्यांकडून प्राप्त झालेल्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत.

- दोन्ही समुहातील बहुसंख्य उत्तरदाते या प्रश्नांच्या उत्तरार्थ नाही ही प्रतिक्रिया दर्शवित असून, ही प्रतिक्रिया देणाऱ्या सामान्य नागरिक व पोलीस कुटूंबियांचे प्रतिशत प्रमाण क्रमश: ८८.७ टक्के व ९४ टक्के एवढे आहेत.
- दोन्ही समुहातील नाही ही प्रतिक्रिया देणाऱ्या सदस्यांपैकी सामान्य नागरीकांच्या तुलनेत पोलीस कुटूंबियांची संख्या सार्थक पणे (<०.०५) कमी आहे.

सारणी क्र. ४.१०८

आपल्या मुलांना शिक्षण देवून अधिकारी बनवावे असे वाटते काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	५२	२०.७	१५९	६३.५	९.५९८	<०.०५
नाही	३५	१४.०	१८	७.३		
सांगता येत नाही	७५	२९.८	३४	१३.५		
माहीत नाही	७२	२८.९	१६	६.३		
कधी कधी	०२	०.८	२	१.०		
नेहमी	१४	५.८	२१	८.४		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१०८ मध्ये आपल्या मुलांना शिक्षण देवून अधिकारी बनवावे असे वाटते काय? या प्रश्नासंबंधीच्या उत्तरदात्यांकडून प्राप्त झालेल्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत.

- सामान्य नागरीक समुहातील बहुसंख्य उत्तरदात्यांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ सांगता येत नाही व माहित नाही या प्रतिक्रिया नोंदविल्या असून त्यांचे प्रतिशत प्रमाण अनुक्रमे २९.८ टक्के व २८.९ टक्के एवढे आहेत.
- बहुसंख्य पोलीस कुटूंबियांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ होय ही प्रतिक्रिया नोंदविली असून त्याचे प्रतिशत प्रमाण ६३.५ टक्के एवढे आहेत.
- प्रस्तुत प्रश्नांच्या सहमती संबंधी दोन्ही समुहात तुलना केली असता सामान्य नागरीकांच्या तुलनेत सहमत असणाऱ्या पोलीस कुटूंबियांची संख्या सार्थकपणे (<०.०५) अधिक असल्याचे आढळते.

सारणी क्र. ४.१०९

शहीद पत्नी म्हणून कुटूंबीय छळतो काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	८५	३४.०	९३	३७.४	१.३६३	NS
नाही	१६५	६६.०	१५७	६२.६		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

पती निधनानंतर कुटूंबियांकडून शहीद विधवांचा छळ होतो काय? या प्रश्नांची पडताळणी सारणी क्र. ४.१०९ मध्ये करण्यात आलेली आहे. विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरार्थ ३४ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व ३७.४ टक्के शहीद पोलीसांच्या विधवा होकारार्थी प्रतिक्रिया नोंदविली आहे. तर ६६ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व ६२.६ टक्के शहीद पोलीसांच्या विधवा नकारार्थी प्रतिक्रिया नोंदविली आहे. यावरुन असे लक्षात येते की, शहीद पत्नी म्हणून बहुतांश विधवांना त्यांचे कुटूंबिय छळत नाहीत.

सारणी क्र. ४.११०

असल्यास कोणत्या नातेवाईकांकडून?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
मुले/मुली	०५	१.९	०२	०.७	१.३३६	NS
सासू/सासरे	६३	२५.२	६५	२५.९		
ननद दीर	१७	६.९	२५	१०.१		
कोणीही नाही	१६५	६६.०	१५८	६३.३		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

पती निधनानंतर कुटूंबियांकडून शहीद विधवांचा छळ होतो काय? होत असल्यास तो कोणत्या नातेवाईकांकडून होतो? या प्रश्नांची पडताळणी सारणी क्र. ४.११० मध्ये करण्यात आलेली आहे. १.९ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व ०.७ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते त्यांचे मुले व मुली त्यांना छळतात. २५.२ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व २५.९ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते त्यांचे सासू/सासरे त्यांना छळतात. ६.९ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व १०.१ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते त्यांचे ननद, दीर त्यांना छळतात. ६६ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व ६३.३ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते त्यांची छळवणूक होत नाही.

यावरुन असे लक्षात येत नाही, बहुतांश दोन्ही वर्गातील शहीद विधवांची त्यांच्या नातेवाईकांकडून छळवणूक होत नाही. छळल्या गेलेल्या शहीद विधवांमध्ये सासू/सासऱ्यांकडून छळल्या गेलेल्या विधवा बहुसंख्य आहेत.

सारणी क्र. ४.१११

आपल्या मुलांच्या मनात कधी नक्षल्याप्रती बदल्याची भावना दिसून आली होती?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	४४	१७.५	१७	७.०	३.१३७	<०.०५
नाही	११५	४५.८	१५१	६०.२		
सांगता येत नाही	४४	१७.५	५९	२३.४		
माहीत नाही	३५	१४.२	१७	७.०		
कधी कधी	०४	१.७	०४	१.६		
नेहमी	०८	३.३	०२	०.८		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

सारणी क्र. ४.१११ मध्ये आपल्या मुलांच्या मनात कधी नक्षल्याप्रती बदल्याची भावना दिसून आली होती? या प्रश्नासंबंधीच्या उत्तरदात्यांकडून प्राप्त झालेल्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत.

- दोन्ही समुहातील बहुसंख्य उत्तरदात्यांनी या प्रश्नांच्या उत्तरार्थ नाही ही प्रतिक्रिया दर्शविली असून ही प्रतिक्रिया दर्शविणाऱ्या सामान्य नागरीक व पोलीस कुटूंबियांचे प्रतिशत प्रमाण क्रमश: ४५.८ टक्के व ६०.२ टक्के एवढे आहे.
- दोन्ही समुहातील उत्तरदात्यांपैकी तुलनात्मक दृष्टया नाही ही प्रतिक्रिया देणाऱ्या सामान्य नागरीकांच्या तुलनेत पोलीस कुटूंबियांची संख्या सार्थकपणे (<०.०५) अधिक असल्याचे आढळते.

सारणी क्र. ४.११२

आपल्या मुलामुलींचे लग्न करतांना कोणत्या अडचणी आल्या?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
स्थळ शोधणे	२७	१०.७	०९	३.६		
हुंडा देणे घेणे	२७	१०.७	१६	६.६		
आर्थिक जुळवाजुळव करणे	१२१	४८.४	१६५	६५.९	२.३२२	<०.०५
कोणतेही नाही	७५	३०.२	६०	२३.९		
एकूण	**२५०**	**१००.०**	**२५०**	**१००.०**		

पती निधनानंतर मुलामुलींचे लग्न करतांना कोणत्या अडचणी आल्या? या प्रश्नांची पडताळणी सारणी क्र. ४.११२ मध्ये करण्यात आलेली आहे. १०.७ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व ३.६ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते मुलामुलींचे लग्नासाठी स्थळे शोधण्यात त्यांना अडचणी आल्या. १०.७ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व ६.६ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते मुलामुलींचे लग्नासाठी हुंडा देण्याघेण्यात अडचणी आल्या. ४८.४ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व ६५.९ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते मुलामुलींच्या लग्नात आर्थिक जुळवाजुळव करण्यात त्यांना अडचणी आल्या. ३०.२ टक्के शहीद झालेल्या सामान्य नागरिकांच्या विधवा व २३.९ टक्के शहीद पोलीसांच्या विधवांच्या मते मुलामुलींचे लग्नासाठी कोणत्याही अडचणी आल्या नाहीत.

यावरुन असे लक्षात येते की, दोन्ही वर्गातील शहीद विधवांना मुलामुलीच्या लग्नात आर्थिक जुळवाजुळव करण्यात अनेक अडचणी आल्या. त्यातही सामान्य नागरिकांच्या विधवेच्या तुलनेत शहीद पोलीसांच्या विधवांची संख्या जास्त आहे.

सारणी क्र. ४.११३

'मृत्यु पश्चात अनेक विधवांचे लैंगिक शोषण होते' हे खरे आहे काय?

	सामान्य जनता	टक्केवारी	पोलीस	टक्केवारी	Z	P
होय	८७	३४.८	५९	२३.७	२.१७१	<०.०५
नाही	१६३	६५.२	१९१	७६.३		
